# रसराज

१९८२•८३



# देवगड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड
## ❋ देवगड ❋

तालुका – देवगड, जिल्हा – सिंधुदुर्ग – ४१६६१३

रजि. नं. ७३४८ ) ऑडिट वर्ग – 'अ' ( फोन नं. ३८

### ❋ ठेवीवरील व्याजाचे आकर्षक दर ❋

| ठेवीचा प्रकार | मुदत | व्याजाचा दर |
|---|---|---|
| चालू ठेव | | ०–५० % |
| सेव्हिंग | | ५–५० % |
| **रिकरिंग –** | | |
| (दरमहा ठेवावयाची कमीतकमी रक्कम रु. ५–) | १ वर्ष | ९–०० % |
| व त्याचे पटीत जास्तीत जास्त रु. २००–) | २ वर्ष | १०–०० % |
| | ३ वर्ष व पुढे | ११–०० % |
| | ५ वर्ष व पुढे | १२–०० % |
| **पिग्मि –** | | |
| दररोजची ठेवावयाची रक्कम कमीतकमी | २ वर्ष | ५–०० % |
| ०–२५ पैसे व त्याचे पटीत जास्तीत जास्त १०–०० रु. | ३ वर्ष | ६–०० % |
| | ४ वर्ष | ७–०० % |
| | ५ वर्ष | ८–०० % |
| **मुदत ठेव –** | | |
| | १ वर्ष ते २ वर्षापेक्षा कमी | ९–०० % |
| | २ वर्ष ते ३ वर्षापेक्षा कमी | १०–०० % |
| | ३ वर्ष ते ५ वर्षापेक्षा कमी | ११–०० % |
| | ५ वर्ष व जास्त | १२–०० % |
| **अल्प मुदत ठेव –** | | |
| | १५ दिवस ते ४५ दिवस | ४–०० % |
| | ४६ दिवस ते ९० दिवस | ५–०० % |
| | ९१ दिवस ते ६ महिन्यापेक्षा कमी | ६–०० % |
| | ६ महिने ते ९ महिन्यापेक्षा कमी | ७–०० % |
| | ९ महिने ते १ वर्षापेक्षा कमी | ८–०० % |

**अधिक माहितीसाठी समक्ष भेटा.**

सुरेश रसाळ
चेअरमन

गुरुनाथ लोंबर
मॅनेजर

WITH BEST COMPLIMENTS FROM

PRINCIPAL
SHRI : S. H. KELKAR COLLEGE OF ARTS & COMMERCE
**DEVGAD**, Dist : Sindhudurg

शिक्षण विकास मंडळ या संस्थेचे,

## श्री. सदाशिव हरी केळकर
## कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

वर्ष ३७

# 'रसराज' वार्षिक

१९८३-८४

**अंक चौथा**

**संपादक मंडळ**

प्राचार्य आर. ए. कुलकर्णी / अध्यक्ष

प्रा. लता बळसंगकर / कार्यकारी संपादक

**सहाय्यक संपादक**

प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर

प्रा. सुलभा कुलकर्णी

**संपादन सहाय्य**

सतीश भिडे


संदेश शिरसाट

हनीफ नबाब

संजीव कुलकर्णी

सुभाष कोदे

माधुरी धुपकर



**प्रकाशक :**

प्राचार्य आर. ए. कुलकर्णी

**मुद्रक :**

कल्याण सहकारी मुद्रणालय

देवगड (सिंधुदुर्ग)

**मुखपृष्ठ व ब्लॉक मेकर :**

मास ॲडव्हर्टायझिंग, कोल्हापूर

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

## स्थानिक नियामक समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. | वसंतराव सावंत | अध्यक्ष |
| २ | ,, | अमृतराव राणे | सदस्य |
| ३ | ,, | प. रा. जोशी | ,, |
| ४ | ,, | मुरलीधर जोशी | ,, |
| ५ | ,, | गु. शां. शिरसाट | ,, |
| ६ | ,, | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | कार्यवाह |
| ७ | ,, | प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ८ | ,, | प्रा. ल. दा. गोलतकर | ,, |
| ९ | ,, | श्री. एम्. व्ही. लेले | कर्मचारी प्रतिनिधी |

श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

## विद्यार्थी महामंडळ १९८३-८४

| | | |
|---|---|---|
| १ | जनरल सेक्रेटरी | दिनेश खाडिलकर |
| २ | विद्यार्थिनी प्रतिनिधी | माधुरी ठाकूर |
| ३ | पाश्चात्य खेळ | अरविंद परुळेकर |
| ४ | भारतीय खेळ | नथुराम उपरकर |
| ५ | रसराज भित्तीपत्रक | सतीश भिडे |
| ६ | सांस्कृतिक मंडळ | सुनील पारकर |
| ७ | प्लॅ. फोरम व गायडन्स | तुळशीदास डामरी |
| ८ | वादविवाद मंडळ | उदय दांडेकर |
| ९ | नियोजन व प्रसिद्धी | जयानंद फाटक |
| १० | सहल विभाग | लीलाधर कोयंडे |
| ११ | वाङ्मय मंडळ | अनघा कुलकर्णी |

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

## स्थानिक नियामक समिती

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. | वसंतराव सावंत | अध्यक्ष |
| २ | ,, | अमृतराव राणे | सदस्य |
| ३ | ,, | प. रा. जोशी | ,, |
| ४ | ,, | मुरलीधर जोशी | ,, |
| ५ | ,, | गु. शां. शिरसाट | ,, |
| ६ | ,, | प्राचार्य आर. ए. कुलकर्णी | कार्यवाह |
| ७ | ,, | प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर | प्राध्यापक प्रतिनिधी |
| ८ | ,, | प्रा. ल. दा. गोलतकर | ,, |
| ९ | ,, | श्री. एस्. व्ही. लेले | कर्मचारी प्रतिनिधी |

श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

## विद्यार्थी महामंडळ १९८३-८४

| | | |
|---|---|---|
| १ | जनरल सेक्रेटरी | दिनेश खाडिलकर |
| २ | विद्यार्थिनी प्रतिनिधी | माधुरी ठाकूर |
| ३ | पाश्चात्य खेळ | अरविंद परुळेकर |
| ४ | भारतीय खेळ | नथुराम उपरकर |
| ५ | रसराज भित्तीपत्रक | सतीश भिडे |
| ६ | सांस्कृतिक मंडळ | सुनील पारकर |
| ७ | प्लॅ. फोरम व गायडन्स | तुळशीदास डामरी |
| ८ | वादविवाद मंडळ | उदय दांडेकर |
| ९ | नियोजन व प्रसिद्धी | जयानंद फाटक |
| १० | सहल विभाग | लीलाधर कोयंडे |
| ११ | वाङ्मय मंडळ | अनघा कुलकर्णी |

## ॥ संपादकीय ॥

रसिक वाचकहो,

'रसराज' चा हा संग्राह्य देवगडदर्शन विशेषांक आपल्या हाती देताना आम्हाला आनंद होत आहे. खर तर देवगडदर्शन विशेषांकाची कल्पना मुळात आमच्या प्राचार्यांची. आमचं महाविद्यालय म्हणजे येथील परिसराचं एक प्रतिनिधीक रुप. म्हणजे सामाजिक ऋणाची जबाबदारी ही पर्यायाने आलीच. प्रस्तुत अंकाच्या कल्पनेमागे आमच्या प्राचार्यांची ऋणविमोचनाची स्तुत्य कल्पना आहे. महाविद्यालयाच्या स्थापनेला दहा वर्षे पूर्ण होत असल्याने तालुक्याचे सर्वांगीण विकासाचे चित्र या निमित्ताने रेखाटले जावे या सरांच्या कल्पनेला साकार करण्यासाठी गेले कित्येक दिवस आमचे विद्यार्थी, प्राध्यापक परिश्रम करत आहेत. या कल्पनेचे मूर्त स्वरुप आम्ही आपल्या हाती देत आहोत.

अंकातील साहित्यासंबंधी सांगायचं झालं तर, शैक्षणिक-सामाजिक-सांस्कृतिक अशा सर्व विषयांना त्यातील तपशीलासह मांडण्याचा विद्यार्थ्यांनी प्रयत्न केला आहे. त्यातील काहींचा विकास झालेला, काहींचा होऊ घातलेला तर काहींच्या बाबतीत विकासाची चिन्हेच नाहीत. या सर्वांची कारणमीमांसा शोधून त्यावरील उपाय सुचवताना आमची भूमिका संशोधकाबरोबरच एका समाजसुधारकाची आहे. विद्यार्थ्यांनी ठराविक पद्धतीच्या कथा-कविताऐवजी काही संशोधनपर लेखन करावे, त्यासाठी संदर्भ गोळा करुन त्याची सुसंगत मांडणी त्यांना करता यावी व निष्कर्ष काढता यावेत यासाठी आम्ही प्रोत्साहन दिले. विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तम प्रतिसादाची साक्ष म्हणजेच हा अंक.



## ॥ अंतरंग– ॥


**मुखपृष्ठ व ब्लॉक मेकर :**
मास ॲडव्हर्टायझिंग, कोल्हापूर

**छायाचित्रे :**
रामदास फोटो स्टुडिओ, देवगड

**संपादकीय :**
प्रा. लता बळसंगकर / ३

**इतिहास भूगोल** ☆
इतिहासकालीन देवगड– श्रीकांत धुपकर / ९
मुक्काम पोस्ट विजयदुर्ग– अरविंद परुळेकर / १४
मंदिरे आणि धार्मिक प्रथा– सुरेखा गावकर १७
देवगडचा भूगोल– साधना जोशी / २१
देवगडचे हवामान– विजया पेठे / २७
देवगड बंदर– माधुरी जोशी / ३१

**दोन मुलाखती** ☆
आम. श्री. दादासाहेब राणे– सदानंद देसाई / ३५
श्री. मुरलीधर जोशी– गजानन तारी / ४१

**हापूस आंब्याची कहाणी** ☆
असा आहे हापूस आंबा– मिलिंद केळकर / ४५
आंबा वाहतूक सेवा– छाया कुळकर्णी / ५१
फळ प्रक्रिया प्रकल्प– प्रदीप धुवाळी / ५५

या अंकात तुम्हाला काय दिसणार नाही ? देवगडची पूर्वीची नावे तुम्हाला मिळतील; येथील प्रथा, परंपरांची माहिती मिळेल; इथला भूगोल तुम्ही, अभ्यासाल; इथल्या हवामानाचा अंदाज घेतल्यावर; त्यावर पोसलेल्या ' रसराज ' ला तुम्ही भेटाल; इथला जीवनदाता मासा विविध रुपाने तुमच्यासमोर येईल; मराठी साहित्याचे आधारस्तंभ इथेच जन्मलेले तुम्हाला आढळतील; त्याशिवाय येथील बँक, ग्रंथालये, वृत्तपत्रे समाज, स्त्री, एवढेच नव्हे तर येथील सागर, पक्षी औषधी वनस्पती आणि फुरसेदेखील ! म्हणूनच या सर्व लेखांचे मूल्यमापन कठोर आणि श्रेष्ठ साहित्य-मूल्यांच्या निकषावर न करता कौतुकाच्या भावनेने व्हावे. आपल्या अभिप्रायासाठी आम्ही आतुर आहोत.

महाविद्यालयाचे प्राध्यापक व सहकारी वर्गाचा वेळोवेळी अंकासाठी हातभार लागलेला आहे. अंकाचे मुखपृष्ठ व ब्लॉक्सची जबाबदारी पुन्हा एकदा ' मास अॅडव्हर्टाइझिंग ' यांनी स्विकारली तर येथील ' कल्याण सहकारी मुद्रणालया ' ने पूर्वीच्याच तत्परतेने अंक साकार केला आहे. शिवाय आपली जाहिरात देऊन महाविद्यालयाचा स्नेह वृद्धींगत करणारे आमचे जाहिरातदार-स्नेही. या सर्वांचेच आभार.

या अंकात उणिवा नाहीतच असे कसे म्हणावे ! त्याची आम्हाला जाणीव आहे. शिवाय देवगडचा एकेक बिंदू एकेका लेखाचा विषय ठरु शकेल. म्हणूनच अशावेळी अंकाच्या मर्यादेचा विचार करावा लागतो. प्रस्तुत अंकातील सर्व चांगल्याचे श्रेय सहकाऱ्यांचे आणि उणिवांची जबाबदारी अर्थातच संपादकाची.

म्हणूनच–

**" तऱ्ही न्यून ते । अधिक ही सरतें ।**
**करुनि घेयावे हें तुमते । विनविले मियां । "**


**मत्स्यावतार ★**

जीवनदाता मासा– कामिनी जोशी / ५७
कोळंबी– सूर्यकांत पाळेकर / ६१
मत्स्य भुकटी– माधुरी धुपकर / ६३

**परिवर्तन ★**

बँक व्यवसाय– अलका बापट / ६५
हॉटेल व्यवसाय– राजेंद्र लांबोरे / ६७
व्यापार– संदेश शिरसाट / ६९
सहकारविश्व– अविनाश सावंत / ७१
इंजिनियरिंग क्षेत्र– सतीश धुरत / ७८

**साहित्य– शिक्षण– संस्कृती ★**

साहित्यविश्व– अंजली नलावडे/७९
शैक्षणिक चळवळ– सतीश भिडे / ८३
सार्वजनिक ग्रंथालये– अनिरुद्ध बोंडाळे / ८५
काही भजनीमंडळे– प्रसाद मोंडकर / ९०
वृत्तपत्रसृष्टी– शुभांगी सप्रे / ९१
समाजजीवन– उदय दांडेकर / ९३
सागर दर्शन– अलका हर्डीकर / ९५
संगीत परंपरा– आनंद प्रभुदेसाई / ९६
स्त्री जीवन– सुनंदा भांडारी / ९७
निसर्गयात्रा– सुनिता पळसुले / ९८

**संकीर्ण– ★**

फुरसे– प्रकाश मराठे / ९९
विहंगविश्व– विजय खवळे / १०२
औषधी वनस्ती– गजानन बोडस / १०५

**वाटचाल ★**

Statement about ownership & other particulars about the periodical

**RASRAJ**

Form IV ( Rule 8 )

| | | |
|---|---|---|
| 1) | Place of publication : | Devgad |
| 2) | Periodicity of its publication : | Yearly |
| 3) | Printer's Name : | J. P. Hadkar |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Kalyan Sahakari Mudranalaya Devgad, Dist : Sindhudurg |
| 4) | Publisher's Name : | Prin. R. A. Kulkarni |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce, Devgad |
| 5) | Editor's Name : | Prof. Lata Valsangkar |
| | Nationality : | Indian |
| | Address : | Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce, Devgad |
| 6) | Ownership of Publication : | Shri S. H. Kelkar College of Arts & Commerce |

I, R. A. Kulkarni, hereby declare that the perticulars given above are true to the best of my knowledge and belief.

Sd. R. A. Kulkarni
Signature of Publisher

प्रकाशक : प्राचार्य आर. ए. कुलकर्णी, संपादक : प्रा. लता वळसंगकर

मुद्रक : कल्याण सहकारी मुद्रणालय, देवगड (सिंधुदुर्ग)

या अंकातील लेखकांच्या मताशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच, असे नाही.

FOR PRIVATE CIRCULATION ONLY


## —: जाण्यासि ज्या परत न येणे :—

मुंबई विद्यापीठाचे माजी कुलगुरु श्री. साठे, बंधनाच्या पलीकडची कला जोपासणारे संगीतक्षेत्रातील गंधार डॉ. वसंतराव देशपांडे, भारतीय कसोटी वीर व उत्कृष्ट फलंदाज विजय मांजरेकर, भारतीय दूतवासातील उप–उच्चआयुक्त रवींद्र म्हात्रे, प्रसिद्ध शिक्षणतज्ञ ग. वि. अकोलकर, प्रसिद्ध कायदेपंडित सय्यद अली झाहीर, 'चले जाव' चळवळीतील कार्यकर्ते सदाशिव बागाईतकर, राजारामबापू पाटील, सी. एम्. स्टीफन, सोविएत रशियाचे अध्यक्ष युरी आंद्रोपोव्ह, प्रसिद्ध हिंदी चित्रपट अभिनेते, निर्माते, दिग्दर्शक आय. एस. जोहर, पत्रकार, समीक्षक व लेखक प्रभाकर पाध्ये, रविकीरण मंडळाचे सदस्य श्री. बा. रानडे, प्रसिद्ध लेखिका व समाजकार्यकर्त्या कुसुम अभ्यंकर, कलाकार दत्ता भट, तसेच सोहराब मोदी, वसंत देशमुख, पंडित नारायण व्यास आणि नि. शं. नवरे. महाविद्यालयाची या सर्वांना भावपूर्ण श्रद्धांजली. !

# शिक्षण विकास मंडळ, देवगड

## नियामक समिती

१) श्री. शां. कृ. पंतवालावलकर — अध्यक्ष
२) ,, के. जे. ठाकूर — उपाध्यक्ष
३) ,, अर्जुनराव नलावडे — उपाध्यक्ष
४) ,, वसंतराव साटम — कार्यवाह
५) ,, आम. अमृतराव राणे — सहकार्यवाह
६) ,, मुरलीधर जोशी — सभापती नियामक समिती
७) ,, डॉ. अरुण खाडिलकर — कोषाध्यक्ष
८) ,, स. ज. पारकर — सभासद
९) ,, य. द. राणे ,,
१०) ,, ह. अ. नलावडे ,,
११) ,, ल. य. कोयंडे ,,
१२) ,, डॉ. मा. रा. नेने ,,
१३) ,, य. ग. पोकळे ,,
१४) ,, रा. धों. पारकर ,,
१५) ,, पु. ज. ओगले ,,
१६) ,, प्रा. ल. दा. गोलतकर ,,
१७) ,, स. भि. जामसंडेकर ,,
१८) ,, डॉ. वा. कृ. आपटे ,,
१९) ,, गु. शां. शिरसाट ,,
२०) ,, भा. गो. पाटणकर ,,
(श्री. भाऊसाहेब केळकर यांचे प्रतिनिधी)
२१) ,, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी (निमंत्रित)
२२) ,, आ. गो. बांबुळकर (निमंत्रित)
२३) ,, श. ज. कुलकर्णी (निमंत्रित)




★

## आमचे स्फूर्तीस्थान

卐

**माननीय श्री. शां. कृ. तथा बापूसाहेब पंतवालावलकर**
अध्यक्ष
शिक्षण विकास मंडळ, देवगड

★



●


## आमचे श्रद्धास्थान

卐

**प्राचार्य श्री. आर. ए. कुलकर्णी**
श्री. स. ह. केळकर महाविद्यालय, देवगड


●

नामपरिवर्तन–



महाविद्यालयाच्या नामकरण समारंभप्रसंगी महाराष्ट्राचे उप-मुख्यमंत्री ना. बॅ. रामराव आदिक यांच्यासमवेत सहकार राज्यमंत्री अभयसिंहराजे भोसले, महसूल राज्यमंत्री भाई सावंत, संस्थाचालक, महाविद्यालयाचे प्राचार्य व इतर.

विद्यानगरी–



'श्रीमती नीराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरी' फलक अनावरण करताना संस्थेचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब पंतवालावलकर.

# असा रंगला सोहळा-

महाविद्यालयाच्या इमारतीचा उद्घाटन व नामकरण सोमवार दि. १७ ऑक्टोबर १९८३ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना. बॅ. रामराव आदिक यांच्या हस्ते संपन्न झाला. 'श्री. सदाशिव हरी केळकर कला आणि वाणिज्य महाविद्यालय' असे महाविद्यालयाचे नामकरण करण्यात आले. शिक्षणप्रेमी व दानशूर व्यापारी श्री. बापूसाहेब पंतवालावलकर; अध्यक्ष, शिक्षण विकास मंडळ यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसराचे, 'श्रीमती नीराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरी' असे नामकरण करण्यात आले.

महाविद्यालयाच्या भव्य प्रांगणावर उपमुख्यमंत्री ना. बॅ. रामराव आदिक यांचे हेलीकॉप्टरमधून आगमन होताच टाळ्यांच्या गजरात महाविद्यालय व इतर अनेक संस्थांतर्फे पुष्पहार घालून त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीस शिक्षण विकास मंडळाचे सहकार्यवाह आमदार श्री अमृतराव राणे यांनी उपमुख्यमंत्री बॅ. ना. रामराव आदिक, ना. अभयसिंहराजे भोसले, ना. भाईसाहेब सावंत श्री. बापूसाहेब पंतवालावलकर यांचा यथोचित परिचय करून देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच न्यायमूर्ती सेवगी श्री. बांबुळकर, माजी उपाध्यक्ष श्री. मिराशी, पत्रकार, जिल्ह्यातील प्रतिष्ठीत व्यक्ती, अधिकारी वर्ग आणि प्रचंड जनसमुदायाचे स्वागत केले. शिक्षण विकास मंडळाचे सभापती श्री. मुरलीधर जोशी यांनी कृषीराज्यमंत्री, विविध महाविद्यालये, माजी विद्यार्थी आणि महाविद्यालयप्रेमी यांच्याकडून कार्यक्रमास आलेल्या शुभेच्छापर संदेशाचे वाचन केले.

महाविद्यालयाच्या आजपर्यंतच्या कार्याचा वृत्तांत सांगताना शिक्षण विकास मंडळाचे कार्यवाह श्री. वसंतराव आटम यांनी महाविद्यालय निर्मितीचे श्रेय देवगडमधील एक नागरीक नेसवणकर यांना दिले. उच्च शिक्षणाची आवश्यकता, महाविद्यालय निर्मितीत निर्माण झालेल्या अनेक अडचणी, स्वयंपूर्णतेबद्दलची साशंकता या सर्वातूनही महाविद्यालाने केलेल्या यशस्वी वाटचालीचा परामर्श त्यांनी आपल्या भाषणात घेतला. शिक्षणप्रेमी कै. जगन्नाथभाऊ पारकर यांनी महाविद्यालयासाठी विनाअट दिलेल्या २३ एकर जमिनीचा, तसेच कै. सदाशिव हरी केळकर यांनी दिलेल्या देणगीचा व मंडळाचे अध्यक्ष श्री. बापूसाहेब पंतवालावलकर यांच्या ३ लाख ६५ हजार रु. देणगी देण्याच्या संकल्पाचा त्यांनी आदरपूर्वक उल्लेख केला. महाविद्यालय कर्जमुक्त झाले आहे असे समाधानाचे उद्‌गार काढून विविध देणगीदारांबद्दल कृतज्ञताही व्यक्त केली. श्री. बांबुळकरांनी आपल्या भाषणात तांत्रीक शिक्षणाला प्राधान्य देण्याचे महाराष्ट्र सरकारचे धोरण योग्य असल्याचे सांगून त्याचा लाभ म्हणून पॉलीटेक्नीक व आय. टी. आय. चा काही भाग देवगडला देण्यासाठी शासनाने पाऊल उचलले तर त्याला आम्ही जरूर हातभार लावू असे आश्वासन दिले.

महाविद्यालयाच्या उभारणीत ज्यांचे भरघोस सहकार्य लाभले अशांचा सत्कार करण्याची विनंती प्राचार्य श्री आर. ए. कुलकर्णी यांनी उपमुख्यमंत्र्याना केल्यानंतर आर्किटेक्ट श्री. भोबे, कॉंट्रॅक्टर श्री. सुरेश गोगटे व सब् डिव्हीजनल इंजीनीअर श्री. मर्चंटसाहेब इत्यादींचा शाल व श्रीफळ देऊन उपमुख्यमंत्री ना. बॅ. रामराव आदिक यांनी सत्कार केला.

ना श्री. भाईसाहेब सावंत यांनी कोकणात कॉलेज काढणे किती अवघड आहे याचा उल्लेख करुन, कोकणचा शेतकरी आपण समर्थ करत असल्याचे सांगून श्रमातून विकास करुन घेण्याचे आवाहन सर्वांना केले. ना. अभयसिंहराजे भोसले यांनी आपल्या भाषणात, सातत्याने कार्य करणाऱ्यांची एक फळी उभी राहिल्यानेच हे कॉलेज निर्माण झाल्याचे सांगून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या 'श्रमातून शिक्षण' या तत्वाचा उल्लेख केला. उपमुख्यमंत्री ना. बॅ. रामराव आदिक यांनी महाविद्यालय कर्जमुक्त झाल्याबद्दल समाधान व्यक्त करुन, शासनाकडून मिळणाऱ्या सर्व सवलतींची पूर्तता करु व मुख्यमंत्रीनिधीतून महाविद्यालयास अर्थसहाय्य मिळवून देण्याचे प्रयत्न करु असे आश्वासन दिले.

आभाराच्या भाषणात महाविद्यालयाचे प्राचार्य श्री आर. ए. कुलकर्णी यांनी, देवगडच्या इतिहासात हा कार्यक्रम म्हणजे अनुपम सोहळा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या शेवटी आ. श्री. अमृतराव राणे यांच्या हस्ते प्रमुख पाहुणे व उपस्थितांना पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केल्यानंतर राष्ट्रगीताने या नामकरण सोहळ्याची सांगता झाली.

## सतत तेवे स्नेह-ज्योति
## ज्या उरी अति आदरे

'रसराज' देवगडदर्शन विशेषांकासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वर्ग, ग्रंथपाल यांच्याबरोबरच अनेक देवगडवासियांचे बहुमोल सहकार्य आम्हाला मिळाले. आम्ही त्यांचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करीत आहोत.


श्री. मुरलीधर जोशी, श्री. अप्पासाहेब गोगटे, श्री. पी. आर. धनवटकर, श्री. व्ही. वाय्. करंदीकर, डॉ. भा. वा. आठवले, श्री. नाटेकर, श्री. पेठे, श्री. बशीर मेमन, श्री. पद्माकर जोशी, श्री. के. जी. ठाकूर, श्री. सदानंद पारकर, श्री बंडोपंत पाटणकर, श्री. केळकर, श्री. लोंबर, श्री. कुलकर्णी, श्री. प्रभाकर कार्लेकर, श्री. मधुकर जोशी, श्री. शि. स. देसाई, श्री. नंदू घाटे, श्री. रामभाऊ मुंज, श्री. तात्या गोखले, श्री. बी. पी. जोशी, श्री. विष्णू सखाराम घाडी, श्रीमती पार्वतीबाई माधव कार्लेकर, श्री. सहदेव शिवराम मुळम, श्री. एस्. आर्. सावंत, श्री. गोपाळ घाडी, श्री. विजय सदाशिव वारीक, श्री. उत्तम विठोबा धुरी, श्री. सुभाष बावकर, श्री. जानू शंभू घाडी, श्री. बाळकृष्ण दत्तात्रय मिराशी श्री. व्ही. बी. होनापुरे श्री. शाहूराव देऊलकर, श्री. ना. वि. गोडसे, श्री. ज. य. मराठे, तहसीलदार श्री. कदम, नायब तहसीलदार जाधव, श्री. वाडकर, श्री. पद्माकर गोगटे.

—संपादक

★

### ।। शुद्धिपत्रक ।।

| चुकीची जागा | चूक | दुरुस्ती |
|---|---|---|
| १) पान २९ | हिवाळा | हिवाळा |
| २) पान ४१ लेखाचे शिर्षक | बातचित | बातचीत |
| ३) पान ५१ लेखाचे शिर्षक | वहातूक | वाहतूक |


विजयदुर्ग
राजापूर
गिर्ये
वाघोटन नदी
वाघोटन
मुटाट
पडेल
बापर्डे
तरळे
कणकवली
वाडा
देवगड
जामसंडे
देवगड
फोंडा
कुणकेश्वर
नारिंगे
साळशी
आचरा नदी
मिठबांव
सुची
गाव
तालुका सीमा
रस्ते
नदी
डोंगराळ भाग

# इतिहास-भूगोल

## ॥ इतिहासकालीन देवगड ॥

॥ श्रीकांत धुपकर / तृतीय वर्ष कला ॥

मी इतिहास विषयाचा विद्यार्थी असल्यामुळे मुद्दामच या विषयावर लेख लिहायचं ठरवलं. कारण त्यामुळं निरनिराळी कागदपत्रं, पुस्तकं इ. साधनांचा कसा उपयोग करुन घ्यायचा, याची मलासुद्धा माहिती होणार होती. सरकारी गॅझेटियर, तहसीलदार कचेरीतील दफ्तरे व इतर बरीच पुस्तके मी अभ्यासली.

सावंतवाडी, कोल्हापूर अशासारखं देवगड हे पूर्वी कधीच संस्थान किंवा जहागीर नव्हतं. त्यामुळं माहिती गोळा करणं काहीसं कठीणच वाटलं. कारण खुद्द देवगडमध्ये जुन्या सरदारांचा वाडा, जहागिरदाराची गढी असं इतिहासाशी नातं सांगणारं काहीच नाही. त्यामुळे अशा जुन्या घराण्यातल्या व्यक्तींची मुलाखत घेणं, त्यांच्या दफ्तरातले कागदपत्र अभ्यासणं हे मार्ग उपलब्धच नव्हते.

एकंदरीत पाहिल्यास सम्राट अशोकाच्या कारकीर्दीपूर्वीचा कोकणचा इतिहास अद्याप तरी निश्चितपणे समजू शकत नाही. इ. पूर्व २५० सालामध्ये रत्नागिरी जिल्हा सम्राट अशोकाच्या साम्राज्यात सामील झाल्याचा पुरावा आढळतो. इ. स ७७० ते १०२० पर्यंत दक्षिण कोकणभागावर शिलाहार घराणे राज्य करीत असून त्यानंतर कदंब राजांची दीर्घकाल राजवट होती. जयकेशी द्वितीय हा स्वतःला 'कोकण चक्रवर्ती' असा किताब अभिमानाने लावून घेई. द. कोकणातील बराच प्रदेश इ. स. ११८७ पासून १३१० पर्यंत देवगिरीच्या यादव घराण्याच्या अमलाखाली होता. पुढे दिल्लीच्या अल्लाउद्दिन खिलजीचा सेनापती मलिककाफूर हजार दिनारी याने देवगिरीवर विजय मिळविल्यामुळे हा जिल्हा सुलतानी साम्राज्याचा भाग बनला. १३४७ मध्ये हा प्रदेश अल्लाउद्दिन बहमनशहाने आपल्या राज्यात आणला होता. तरीही काही प्रदेश विजयनगर हिंदू साम्राज्यातही होता. बहामनी राज्याचे विघटन झाल्यामुळे इ. स. १४९८ मध्ये रत्नागिरी जिल्हा विजापूरच्या आदिलशाही राज्याचा भाग झाला. पुढे शिवाजी महाराजांनी कोकणावर वर्चस्व प्रस्थापित करण्यास प्रारंभ केला व इ. स. १६७५ मध्ये हा प्रदेश मराठी अंमलाखाली आला. तेंव्हापासून पेशवाईचा अस्त होईपर्यंत या भागावर मराठ्यांची सत्ता होती. १८१८ मध्ये पेशवाई बुडाल्यानंतर ब्रिटिशांच्या साम्राज्यात हा भाग विलीन झाला.

# चोपडेकर ब्रदर्स

देवगड. ☎ ५६

रसराजच्या देवगड दर्शन विशेषांकास आणि

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालयास

卐 हार्दिक शुभेच्छा 卐

उत्कृष्ट फोटोग्राफीसाठी–

**रामदास फोटो स्टुडीओ**

(लग्न व शुभकार्याच्या ऑर्डर्स स्वीकारल्या जातील.)

★

ताज्या व उत्कृष्ट फराळासाठी–

**समता उपाहार गृह**

☆

चवदार मच्छिजेवणासाठी–

**समता भोजनालय**

★

तत्पर प्रवासी सेवेसाठी–

**सुभद्रा रिक्षा**

☆

ताज्या मासळीसाठी–

**सुभद्रा व इंदुमती लाँच**

★

सुबक झेरॉक्स प्रतीसाठी–

**देवगड झेरॉक्स केंद्र.**

प्राचीन महाराष्ट्राच्या इतिहासात कोकण भागास 'अपरांत' असे म्हणत असत. द. कोकणचा उल्लेख 'तळघाट' असा फेरिश्त्याने केला आहे, तर औरंगजेबाचा समकालीन इतिहासकार खाफीखान या भागाचा उल्लेख 'तळकोकण' अशा शद्बात करतो.

पूर्वीच्या रत्नागिरी जिल्ह्याचे १९८१ मध्ये विभाजन केले गेले व दक्षिण भागास 'सिंधुदुर्ग' जिल्हा असे म्हणण्यात येऊ लागले. आपल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड बरोबर कणकवली, वैभववाडी, कुडाळ, सावंतवाडी, वेंगुर्ले आणि मालवण ह्या तालुक्यांचा समावेश होतो.

भौगोलिक भाषेतच सांगायचं तर देवगड गाव हे १६°२३' उत्तर अक्षांश आणि ७३°२१' पूर्व रेखांशावर आहे प्राचीन काळात 'अरुम' या नावाने देवगड ओळखले जात होते हें वाचून आपणांस कदाचित् आश्चर्य वाटेल. 'पेरिप्लस ऑफ दि एरथ्युयन सी' या प्राचीन ग्रंथात देवगडला 'तोगरुम' म्हणून संबोधले आहे. (याच ग्रंथात विजयदुर्गचा उल्लेख ब्याझांन्शन, जयगडचा उल्लेख मेलिझाग्रा आणि चौलचा उल्लेख सिमुल्ला असा केला आहे, हे जाताजाता नमूद करावेसे वाटते.) इ. स. १५३८ मध्यें एका कागदपत्रात देवगडला 'तामर' असे संबोधले आहे.

मुंबईपासुन दक्षिणेस १८० मैलांवर असणाऱ्या देवगडची लोकसंख्या इ. स. १८७२ साली केवळ ८९४ इतकीच होती त्यावेळी देवगड उपविभागाची (तालुक्याची) लोकसंख्या १,१८,९२१ असून त्यात ९६ टक्के हिंदू व २.६ टक्के हे मुस्लाम होते असे सरकारी गॅझेटियरमध्ये नमूद केले आहे. या उपविभागाचा महसूल त्याकाळी दरवर्षी ९२,७५० रुपये होता इ. स. १८७५ मध्ये उपविभागाचे मुख्यठिकाण खारेपाटणहून देवगड येथे आणले गेले. ब्रिटिशांच्याच काळात सरकारी कार्यालय, न्यायालय व विश्रामगृहाच्या इमारती बांधण्यात आल्या.

देवगड तालुक्यास पश्चिमेकडे विजयदुर्ग ते आचरा असा सागरी किनारा लाभला आहे. सागरी किनारा असणारे जे थोडेच तालुके भारतात आहेत, त्यात आपलाही तालुका आहे. पूर्वी देवगड तालुक्यात देवगड, विजयदुर्ग व वाघोटण ही बंदरे होती. यातील पहिली दोन बंदरे आजही वापरात आहेत. विजयदुर्ग, मिठबांव, मीठमुंबरी आणि आचरा या खाड्या तालुक्यात आहेत. पूर्वी अंतर्गत भागातील दळणवळण मुख्यत्वे विजयदुर्ग खाडीतून होई असे आढळून येते.

देवगडचा किल्ला फारसा प्राचीन काळातील नाही. इ. स. १७०५ मध्ये पेशव्यांचे आरमारप्रमुख कान्होजी आंग्रे यांनी देवगडच्या दक्षिणेकडील टेकडीवर खाडीच्या मुखाजवळ हा जलदुर्ग बांधला. मराठी दफ्तरात या किल्ल्याचा उल्लेख 'जंजिरा' असा केल्याचे दिसून येते. कारण अठराव्या शतकात हा दुर्ग सगळीकडून समुद्राच्या पाण्याने वेष्टित होता. पुढे गावाकडील बाजूकडे गाळ साचत गेल्याने तेथे जमिनीचा पट्टा तयार झाला.

पेशवाईच्या अस्तानंतर पश्चिम किनाऱ्यावरील किल्ले इंग्रजांनी ताब्यात घेतले. ८ एप्रिल १८१८ रोजी कर्नल इमलॅक याच्या नेतृत्वाखाली देवगडचा किल्ला इंग्रजांनी कबजात आणला. त्यावेळी किल्ल्यात ४१ तोफा होत्या. आज मात्र तेथे केवळ तीनच तोफा आढळतात. आणखी २ तोफा सरकारी विश्रामगृहाच्या आवारात ठेवलेल्या असून जुन्या चावडीजवळ १ तोफ आहें. किल्ल्याचे क्षेत्र १२० एकर असून आज तटबंदीची बरीच पडझड झालेली आहे. ब्रिटिशांनी पूर्वी किल्ल्याच्या पठारावर एक लहानसे दीपगृह (Light House) बांधले होते. नंतर त्याचे जागा १९५८ मध्ये सध्याचे आधुनिक दीपगृह भारत सरकारतर्फे २ लक्ष रु. खर्चून बांधण्यात आले. दीपगृहाच्या नोकर वर्गासाठी तेथेंच निवासस्थानेही बांधलेली आहेत. किल्ल्यावर गणपतीचे एक लहान मंदिर आहे. बाकी किल्ल्यामध्ये पहाण्यासारखे असे काहीही नाही. विजयदुर्ग, सिंधुदुर्ग, मुरुडजंजिरा या जलदुर्गांइतके ऐतिहासिक महत्त्व देवगडच्या किल्ल्याला नाही.

पश्चिम किनाऱ्यावर जयगड ते कारवारपर्यंतच्या भागात देवगड हेच एक उत्तम असे निसर्गसंरक्षित बंदर आहे. त्याची मोक्याची जागा लक्षात घेऊन ब्रिटिशांनी दुसऱ्या महायुद्धाच्या काळात जहाजांना वाटेत इंधन भरण्यासाठी थांबता यावे या हेतूने येथे लहान धक्का बांधला होता. १९५८ मध्ये भारत सरकारतर्फे प्रवासी बोटी थांबू शकतील असा मोठा धक्का व बंदरासाठी आव-

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

**आणि**

रसराजच्या देवगड दर्शन विशेषांकास

**आमच्या**

**हार्दिक शुभेच्छा**




**जामसंडे ग्रुप विविध कार्यकारी सहकारी सेवा मंडळ, लि.**

जामसंडे- तहसील देवगड,

जि. सिंधुदुर्ग

श्यक त्या इतर दोन इमारती बांधल्या गेल्या. त्यासाठी ५ लाख रु. खर्च आल्याची नोंद आढळते. मुंबई ते गोवा या मार्गावर वाहतूक करणाऱ्या प्रवासी बोटी मालवण, वेंगुर्ले या बंदरांमध्ये थांबत नसल्या, तरी देवगड बंदरात मात्र थांबतातच. मात्र धक्क्याजवळील पाण्याची खोली कमी असल्यामुळे धक्क्यापासून एक दीड फर्लांग अंतरावर बोट थांबते. लहान मचव्यातून बोटीपर्यंत प्रवाशांना नेले व आणले जाते. मार्च आणि मे-जून महिन्यातील प्रसिद्ध हापूस आंबे यांचा मोठा व्यापार बंदरातून होत असतो.

देवगड तालुक्यास निसर्गाचा वरदहस्त मिळाला असून विजयदुर्ग, कुणकेश्वर, वाघोटण इ. ऐतिहासिकदृष्टचा महत्त्वाची स्थळेही आहेत.

**विजयदुर्ग :** देवगडच्या उत्तरेस १२ मैलांवर वाघोटण खाडीच्या मुखाजवळ हा बळकट जलदुर्ग आहे. विजापूरच्या सुलतानांनी हा बांधला असावा इ. स. १६५३ मध्ये शिवाजी महाराजांनी विजयदुर्ग जिंकून त्याची दुरुस्ती व विस्तार केला. त्यानंतर हा दुर्ग मराठी आरमाराचे एक महत्त्वाचे ठाणे बनला. मराठी आरमार-प्रमुख आंग्रे यांनी या दुर्गाच्या आश्रयाने सिद्दी, वलंदेज आणि टोपीकर इंग्रज अशा बलाढ्य सागरी सत्तांपासून स्वराज्याचे रक्षण केले. इ स. १८१८ मध्ये पेशवाईचा अस्त झाल्यानतर विजयदुर्ग इंग्रजांच्या कबजात होता. विजयदुर्ग किल्ल्याच्या लगतच बंदर असून मुंबई-गोवा मार्गावरील प्रवासी बोटी तेथे थांबतात.

**वाघोटण :** विजयदुर्ग खाडीच्याकाठी समुद्र किनाऱ्यापासून पंधरा मैल अंतरावर वाघोटण हे खेडे व लहानसे बंदर आहे. पूर्वी वाघोटण महत्त्वाचे ठिकाण होते. ब्रिटिश आमदानीत इ. स. १८५० मध्ये तेथे बरेच प्रवासी बंगले आणि अधिकाऱ्यांसाठी निवासस्थाने सरकारने बांधली होती. त्यावरुन कदाचित तेथे तालुक्याचे ठिकाण करायची सरकारची योजना असावा असे वाटते. पण तो बेत रद्द झाल्याने हे सर्व बंगले सरकारतर्फे लिलाव करुन विकण्यात आले. वाघोटण खाडीतून लहान गलबतांची ये-जा होते.

**कुणकेश्वर :** देवगडपासून ८ मैलांवर समुद्राकाठी असलेले हे मंदिर पुरातन शिवस्थान आहे. हे इ. स. ११०० च्या सुमारास यादवांनी बांधले व शिवाजी महाराजांनी नालकंठ बावडेकर यांना सांगून त्याचा जीर्णोद्धार करविला. श्री कुणकेश्वराचे शिवलिंग स्वयंभू असून जांभ्या दगडाचे आहे. दरवर्षी महाशिवरात्रीला तेथे मोठी यात्रा भरते. मंदिराचे व त्या गावाचे नाव कुणकेश्वर हेच आहे. दक्षिण कोकणात कुणकेश्वरसारखे विशाल मंदिर दुसरे नाही. कुणकेश्वर ते तांबळडेग समुद्रकिनारा, पर्यटनकेंद्र म्हणून विकसित करण्यास बराच वाव आहे.

वरील स्थानाखेरीज देवगड तालुक्यात सौंदळे, किंजवडे, पोंभुर्ले आणि वाडा ही निसर्गरम्य ठिकाणे आहेत. ऐतिहासिक दृष्टीकोनातून जरी त्यांना फारसे महत्त्व नसले तरी, सृष्टिसौंदर्याच्या दृष्टीने ती आकर्षक आहेत.

## ॥ मुक्काम पोस्ट विजयदुर्ग ॥

॥ अरविंद परुळेकर / तृतीय वर्ष कला ॥

देवगड तालुक्यातील एक महत्वाचा किल्ला म्हणजे विजयदुर्ग होय. वाघोटणपर्यंत जाणाऱ्या खाडीच्या मुखाशी समुद्रकिनाऱ्यावर हा दुर्ग आहे. खाडीच्या दुतर्फा सुमारें पन्नास गावे आहेत. किल्ल्याच्या पायथ्यापर्यंत विजयदुर्ग गावचा विस्तार आहे. बंदर लगतच आहे. मुंबई-गोवा मार्गावरील प्रवासी बोटी या बंदरावर थांबतात. देवगडहून विजयदुर्गला बोटीने जाण्यास एक तास लागतो.

विजयदुर्ग हे भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील एक सुरक्षित उत्तम बंदर म्हणून प्रसिद्ध आहे. त्यास 'कोकणचे जिब्राल्टर' म्हणून संबोधले जाते.

हा दुर्ग पूर्वीच्या काळी घेरिया या नावाने ओळखला जाई. तो शिलाहारांच्या कारकिर्दीत बांधला असावा, असा तर्क करण्यात येतो. सुमारे १२०० च्या सुमारास विजयदुर्ग बांधला गेला असावा. शिलाहारांचा देवगिरीच्या यादवांनी १२१८ मध्ये पराभव केला. यादवांनंतर १३५४ मध्ये विजयनगरच्या हिंदु सम्राटांनी कोकण जिंकले. त्यावेळी अर्थात्‌च त्यांच्या अंमलाखाली विजयदुर्ग होते. पुढे बहामनी सुलतानांची सत्ता कोकणावर आली. त्यांच्या ऱ्हासानंतर विजयदुर्ग आदिलशाहीकडे होता. १६५३ मध्ये शिवाजीमहाराजांनी विजयदुर्ग जिंकून घेतला. त्यावेळी विजय संवत्सर चालू होते. म्हणून या किल्ल्यास महाराजांनी विजयदुर्ग हे नाव दिले असें म्हणतात. त्याच वेळी किल्ल्यात मारुतीचे मंदिर बांधले गेले. महाराजांनी किल्ल्याची दुरुस्ती व विस्तार करुन तो जास्त बळकट बनविला. विजयदुर्ग हे मराठ्यांचे बलाढ्य आरमारी ठाणे झाले. सरखेल कान्होजी आंग्रे किनाऱ्याच्या रक्षणाचे कार्य जागृतपणे करीत. त्यांचा इंग्रज व पोर्तुगीजांनाही अतिशय दरारा वाटे.

कान्होजीचा पुत्र तुळाजी आंग्रे पेशव्यांना व छत्रपतींनाही मानेनासा झाला. त्यामुळे नानासाहेब पेशव्यांनी इंग्रजांच्या मदतीने विजयदुर्गवर स्वारी करण्याचे ठरविले. इंग्रजांना तुळाजी नकोसा वाटतच होता. १३ फेब्रुवारी १७५६ रोजी इंग्रजांनी किल्ला घेतला. पुढे इंग्रजांनी हा दुर्ग पेशव्यांकडे सोपविला. या युद्धात रुद्राजीराव धुळप यांनी पेशव्यांच्या बाजूने लढा दिला होता. त्याबद्दल त्यांना विजयदुर्गची किल्लेदारी दिली गेली. पण विजयदुर्गचे आरमार इंग्रजांच्या मदतीने पेशव्यांनी नष्ट केल्याने मराठी आरमाराचे सामर्थ्य व दरारा कमी झाला. इंग्रजांना वाव मिळाला.

श्री. सदाशिव हरी केळकर
कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.

–० व ०–

'रसराज' च्या देवगडदर्शन विशेषांकाला आमच्या शुभेच्छा !

# देवगड फिशरमेन्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, देवगड, जि. सिंधुदुर्ग.

| | |
|---|---|
| सभासद | ८४४ |
| नाममात्र सभासद | ३२ |
| सभासद भाग भांडवल | रु. ५९,२७०–०० |
| सर. वि. प. भाग भां. (NP) | रु. १,५४,५१०–०० |
| खास वि. भा. भां. (NCDC) | रु. ४,३०,१४०–०० |
| सामान्य भा. भां. (NCDC) | रु. १,०७,५१०–०० |
| निधी | रु. ९७,२५३–६८ |
| गुंतवणुका | रु. ४२,७५६–५२ |

संस्थेच्या मच्छिमार साधनांचे दुकानातून मालाची खरेदी करा.

संस्थेच्या मासळी खरेदी-विक्री विभागाद्वारे मासळीची विक्री करुन मासळीला उत्कृष्ट दर मिळवा व कमिशनची बचत करा.

संस्थेच्या कार्यालयाशी संपर्क साधून विविध योजनांचा लाभ घ्या.

## मच्छिमारी बांधवांचा सर्वांगीण विकास हेच आमचे ध्येय!

| | | |
|---|---|---|
| एस्. के. मोरे. | एस्. यु. धुरी. | बी. डी. परब. |
| सचिव | व्हा. चेअरमन | चेअरमन |

इ. स. १७६४ ते ९४ या काळात मराठी आरमाराचे प्रमुख आणि विजयदुर्गचे किल्लेदार आनंदराव धुळप हे होते. त्यांचे वंशज आजही विजयदुर्ग येथेच वास्तव्य करुन आहेत.

विजयदुर्ग बंदरापासून सुमारे २ मैलांवर खाडीत आंग्र्यांनी बांधलेली गोदी आहे. त्यात आनंदराव धुळपांनी सुधारणा केली.

१८१८ मध्ये पेशवाई नष्ट झाल्यानंतर जूनमध्ये इंग्रजांची सत्ता विजयदुर्गवर प्रस्थापित झाली. तेव्हापासून भारत स्वतंत्र होईपर्यंत १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत विजयदुर्ग इंग्रजी अमलाखाली होता. थोड्याच अंतरावर १२५ वर्षांचे प्राचीन रामेश्वराचे सुंदर देवालय आहे. मराठेशाहीतील श्रेष्ठ मुत्सद्दी नाना फडणीस यांच्या बंधूंनी हे मंदिर बांधले. देवगड तालुक्यातील निवडक मंदिरात याची गणना होते.

विजयदुर्ग किल्ल्यात दुमजली इमारतीत सरकारी विश्रामगृह आहे. ते अत्यंत सुरेख असून राहण्या जेवण्याची सोय तेथे होऊ शकते. बरेच प्रवासी विजयदुर्ग पहाण्यास आल्यानंतर तेथे वास्तव्यही करतात. टूरिस्ट सेंटर म्हणून विजयदुर्गचा विकास होण्यास पुष्कळच वाव आहे.



*With Best Compliments From--*

☎ C/o. 46

**THAKUR ELECTRIC WORKS**

Specialist in Electric Motor Winding,
Household Fitting and Repairersin Eelectrical Appliances
PROP. : **K. A. THAKUR**

B. K. G. HIGHWAY, KANKAVALI - 416 602, DIST.- SINDHUDURG

## ॥ मंदिरे आणि धार्मिक प्रथा ॥

॥ सुरेखा गावकर / तृतीय वर्ष कला ॥

देवगड तालुक्यातील सर्वसामान्य जनता ही भाविक वृत्तीची आहे, असे दिसून येते. गावोगावी असलेल्या देवांचे पारंपारिक उत्सव अतिशय उत्साहाने आणि श्रद्धापूर्वक साजरे केले जातात. नोकरीव्यवसायासाठी दूरवर गेलेली माणसे देखील अशा प्रसंगी गावी येतात. अनेक मंदिरांमध्ये श्रावण महिन्यात सप्ताह करण्याची प्रथा आहे. किनाऱ्यावरील गावांमध्ये विठ्ठलाचे देऊळ हमखास आढळून येते. देवगड गावात गणपती, विठ्ठल, दत्त आणि ब्राह्मणदेव ही प्रमुख देवालये आहेत. देवगड तालुक्यात १५० पेक्षा जास्त मंदिरे असून त्यापैकी कुणकेश्वर, जामसंडे येथील दिर्बादेवी व रामेश्वर, कामते येथील भगवती, वाडे येथील विमलेश्वर, मोंडचे रामेश्वर, नारिंग्रे येथील गंगेश्वर, मुटाट येथील रामेश्वर व स्थानेश्वर आणि पोखरबाव येथील गणेश ही देवालये विशेष महत्वाची आहेत. शंकर, पवनाई आणि ब्राह्मणदेव या देवांची मंदिरे बऱ्याच गावात असल्याचे दिसून येते. शिवमंदिरे एकांतात आढळतात.

एकंदरीत पाहाता श्रीरामनवमी, हनुमानजयंती, आषाढी व कार्तिकी एकादशी, विजयादशमी, त्रिपुरीपौर्णिमा, महाशिवरात्र व होळी पौर्णिमा हे उत्सव अनेक मंदिरात केले जातात. असे आढळते. बऱ्याच मंदिरात तरंग असून उत्सवप्रसंगी त्यांची मिरवणूक काढली जाते. त्यावेळी तरंगधारक व्यक्तीच्या अंगात देवाचा संचार होतो, अशी श्रद्धा आहे. त्यास भक्तगण प्रश्न विचारतात. शिवमंदिरात आणि देवीच्या मंदिरात देवास कौल मागण्याची पद्धत आहे. उत्सवप्रसंगी धर्मभेद व जातिभेद विसरुन समाजातील सर्व लोक एकत्र जमतात व ऐक्यभावनेचे सुंदर दर्शन होते.

गावागावातून भजने व कीर्तने तसेच प्रसंगी दशावतारी खेळ, गोंधळ व कथाप्रवचने इ. कार्यक्रम उत्साहाने केले जातात. शेगावचे श्री गजानन महाराज, पावसचे स्वरुपानंदस्वामी, कणकवलीचे भालचंद्रमहाराज आणि शिरडीचे साईबाबा यांचे भक्त मोठ्याप्रमाणावर आहेत.


मुस्लीम वस्ती अल्प असुन त्यांचे दर्गे व काही मशिदी आहेत. ईद, मोहरम, रमजान हे सण साजरे केले जातात. त्यावेळी हिंदुसुद्धा त्यात सहभागी होतात. अशा प्रकारे सांस्कृतिक धार्मिक ऐक्य जाणवते.

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

आणि

रसराजच्या देवगड दर्शन विशेषांकास

आमच्या हार्दिक शुभेच्छा !



मे. श्रीराम मोरेश्वर गोगटे

आंबा वाहतूक सर्व्हिस

जामसंडे व नाडण

तहसील- देवगड, जिल्हा- सिंधुदुर्ग

पीन : ४१६६१२

**श्री कुणकेश्वर मंदिर–** देवगडपासून ८ मैलावर असलेले 'कुणकेश्वर' हे गाव व मंदिर दोन्ही समुद्रालगतच आहेत. संगमेश्वरमाहात्म्यात याचा उल्लेख आला असून द. कोकणातील प्रसिद्ध स्थानांत याचा समावेश होतो. पूर्वी कुणक वृक्षाची राई तेथे असावी. ३० फूट उंचीच्या चौथऱ्यावर ७० फूट उंचीचे हे देवालय द्रविडी पद्धतीने बांधलेलें आहे. बांधकामात वापरलेल्या शिला अजस्त्र असून त्या देवळाचा प्राचीनपणा दाखवितात. देवालयाच्या बहिरंगाला चार भव्य स्तंभ असून मधोमध वर्तुळाकृती कासव बसविलेले आहे. तुळयांवर कलाकुसरीचे काम आढळते. बांधकामात जांभ्या दगडांचा उपयोग केला असून पश्चिमेस समुद्राचे बाजूला भक्कम तट बांधलेला आहे. देवालयासमोर २ दीपमाळा व तुळशीवृंदावन आहे. उत्तरेस बांधलेला एक तलाव आढळतो. कुणकेश्वराचेच बाजूला मंडलिक, नारायण व गणेश यांचीही लहान देवालये आहेत. गावात आणखी ५ प्राचीन मंदिरे आहेत. महाशिवरात्रीस कुणकेश्वरला मोठी यात्रा भरते. त्यावेळी कित्येक ठिकाणचे देव आपापल्या इतमामासह तेथे येतात. यात्रेस व महापर्वकाळी समुद्रस्नानास प्रचंड गर्दी होते.

कुणकेश्वराचे देवालय कोणी केव्हा बांधले हे निश्चितपणे सांगता येत नाही. बहुतेक ते इ. स. ११०० चे सुमारास यादवांनी बांधले असावे. पुढे शिवाजीमहाराजांनी नीलकंठ बावडेकर यांना सांगून त्याचा जीर्णोद्धार करविला. एक दंतकथा सांगितली जाते. इराणचा एक मुस्लीम व्यापारी जहाज घेऊन कोकणकिनाऱ्याजवळ येत असता प्रचंड वादळ झाले. त्यास किनाऱ्यावर दिवा दिसला व त्याने देवास नवस केला, तो वादळातून जहाजासह सुखरुप किनाऱ्यावर उतरला. त्याने श्रद्धापूर्वक हे मंदिर नंतर बांधले.

**मुणगे येथील भगवती मंदिर–** समुद्रकाठी असलेले मुणगे हे गाव मालवण तालुक्याचे हद्दीजवळ आहे. मुनिग्राम हे गावाचे मूळ नाव होते. अपभ्रंश होऊन त्यास मुणगे म्हणू लागले. मुणगे गावात देवी भगवतीचे प्राचीन मदिर आहे. दरवर्षी पौष पौर्णिमेच्या दिवशी तेथे यात्रा भरते. देवगड तालुक्यातील पाच दिवस चालणारी ही एकमेव यात्रा होय. हे जागृत देवस्थान असून देवी भक्तांच्या नवसाला पावते अशी सर्वांची श्रद्धा आहे. यात्रेच्या प्रसंगी दूरवरुन भक्तजन येत असतात. खणनारळाने ओटी भरणें, भजन, पूजन, कीर्तन इ. कार्यक्रम ५ दिवस चालू असतात. पाचव्या दिवशी ललिताचा कार्यक्रम होतो. त्याच वेळी नवस बोलले जातात, तसेच पूर्वी केलेले नवस पूर्ण केले जातात.

मंदिरात प्रवेशण्याअगोदर सर्व जण तळीवर पाय धुवून महापुरुषाला शहाळे देऊन देवीदर्शन घेतात. श्रीभगवती मदिरापासून दीड मैलावर कारिवणेवाडी आहे. दर ३ वर्षांनी वैशाख शुद्ध तृतीयेस देवी श्री. पाडावे यांच्या घरी येते. सर्व लव्याजम्यासह देवीची भव्य मिरवणूक निघते. ताशे, ढोल वाजवले जातात, शोभेचे दारुकामही केले जाते. दुसरे दिवशी देवी परत निघून आपल्या ठिकाणी येते. त्यावेळीही मिरवणूक काढण्यात येते.

**इतर ठळक देवालये–** कामते गावात श्री भगवती मंदिर असून त्यास सरकारतर्फे इनाम दिले गेले आहे. तेथे नवरात्रात दरसाल मोठी यात्रा भरते. काहींच्या अंगात त्यावेळी देवीचा संचार होतो.

किंजवडे गावी असलेले श्री स्थानेश्वराचे देवालय जागृत देवस्थान म्हणून प्रसिद्ध आहे. पारंपारिक प्रथेनुसार येथे उत्सव दरवर्षी साजरे केले जातात.

देवगडजवळील जामसंडे गावातील दिर्बादेवीचे मदिरात दरवर्षी कार्तिक पौर्णिमेस मोठी यात्रा भरत असते. त्यालगतचे रामेश्वराचे देऊळसुद्धा सुंदर आहे. विजयदुर्गजवळ असलेले रामेश्वर मंदिर प्रेक्षणीय असून दर होळीपौर्णिमेस तेथे उत्सव साजरा केला जातो. देवाची बैलावर बसलेली मूर्ती चांदीची आहे.

याशिवाय पाडगावचे दत्तस्थान, दहिबावचा महादेवेश्वर, इळये येथील श्री महालक्ष्मी, मिठबावचा गणपती, नारिंग्रे येथील गंगेश्वर, पुरळचा वीरभद्रेश्वर, वाघोटणचा स्थानेश्वर, तिर्लोटचे रामेश्वर व रवळनाथ, मणचे येथील केळविका आणि वाघेश्वर, साळशीचे पावनाई-सिद्धेश्वर आणि बापर्डे येथील पवनाई ही देवालये देवगड तालुक्यामधील उल्लेखनीय मंदिरे आहेत. एकंदरीत सगळ्याच मंदिरांना उत्तम निसर्गसौंदर्याची पार्श्वभूमी लाभली असून त्यामुळे तेथे अधिकच पवित्र व रम्य वाटते.

केळकर कॉलेज

**हार्दिक शुभेच्छा !**

सर्व प्रकारचे रेडिमेड ड्रेसेस, कापड, साड्या, बनियन्स वगैरे
माफक दरात मिळण्याचे
**जामसंडे येथील एकमेव ठिकाण**

## शिवकृपा

## कटपीस कॉर्नर

जामसंडे, ता. देवगड

**प्रोप्रा. अंकुश गणपत वारीक**

**हार्दिक शुभेच्छा !**

सर्व प्रकारचे शालोपयोगी साहित्य,
अिलेक्ट्रीक सामान,
सायकल टायर व ट्यूब्स इत्यादी वस्तू
योग्य दरात मिळण्याचे ठिकाण.

## गणेश ट्रेडर्स

एस्. टी. स्टँड जवळ

**मेनरोड, देवगड**

प्रोप्रा. पां. ना. लिमये

रसराजच्या देवगड दर्शन विशेषांकास आणि
श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालयास
卐 हार्दिक शुभेच्छा 卐



## श्री. जे. के. बगदादी

**प्रसिद्ध आंबा बागाईतदार**

मु. पो. गिर्ये, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

# ॥ देवगडचा भूगोल ॥

॥ साधना जोशी / प्रथम वर्ष कला ॥

शासकीयदृष्टच्या महाराष्ट्राचे चार विभाग पाडलेले आहेत. या विभागानुसार एकूण २८ जिल्ह्यांची निर्मिती झाली. सुरवातीला सिंधुदुर्ग व रत्नागिरी मिळून रत्नागिरी जिल्हा होता. याचा विस्तार १५°३६' उत्तर ते १८°५ उत्तर व ७३°५' पूर्व ते ७४°३६' पूर्व रेखांश यांच्या दरम्यान पसरलेला होता. त्याचे एकूण क्षेत्रफळ ५०२१ चौ. मैल होते. परंतु १९८०–८१ मध्ये या जिल्ह्याची विभागणी झाली व रत्नागिरी व सिंधुदुर्ग असे दोन जिल्हे बनले. सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड, कणकवली, कुडाळ, वेंगुर्ला व सावंतवाडी इत्यादी दक्षिणेकडील तालुके येतात. त्यापैकी देवगड तालुक्याबद्दल या ठिकाणी सर्वसाधारणपणे माहिती द्यावयाची आहे.

**स्थान व विस्तार :–** देवगड तालुका हा महाराष्ट्राच्या नैऋत्येकडे असून या तालुक्याच्या पश्चिमेस अरबी समुद्र, दक्षिणेला वेंगुर्ले, आग्नेयेस कुडाळ, पूर्वेस कणकवली व उत्तरेस राजापूर तालुका इत्यादी तालुक्याच्या दरम्यान तो पसरलेला आहे. देवगड तालुक्याची उत्तर सीमा वाघोटण नदीने (Vaghotan) मर्यादित केलेली आहे, तर दक्षिणेकडील सीमा आचरा नदीने मर्यादित केलेली आहे. पश्चिमेकडील सीमा अरबी समुद्राने व पूर्वेकडील सीमा टेकड्यांनी मर्यादित केलेली आहे.

हा तालुका १६°२३' उत्तर अक्षांश व ७३°२१' पूर्व रेखांश यांच्या दरम्यान पसरलेला आहे. या तालुक्याचा पूर्व पश्चिम विस्तार सुमारे २० मैल आहे. उत्तर दक्षिण विस्तार सुमारे ३२ मैल आहे. या तालुक्याचे एकूण क्षेत्रफळ २८३.७ चौरस मैल आहे. या तालुक्याला ३२ मैल लांबीचा समुद्र किनारा लाभलेला आहे. या तालुक्यात ६४ गावे आहेत.

**प्राकृतिक रचना :–** देवगडच्या नकाशाचे निरीक्षण केल्यास असे आढळून येते की संपूर्ण प्रदेश हा उंचसखल भूभागांनी व्यापलेला आहे. या संपूर्ण प्रदेशाचा उतार हा पश्चिमेकडे आहे या तालुक्याची प्राकृतिक रचना सर्व-साधारणपणे साधी असली तरी, वैशिष्ट्यपूर्ण आहे. थोडक्यात म्हणजे हा प्रदेश सखल मैदान नसून डोंगरदऱ्यांनी व्यापलेला व कमी उंचीचा आहे. अनेक ठिकाणी डोंगराचे सुळके (सह्याद्री पर्वताचे) समुद्रापर्यंत उतरलेले आढळतात. तसेच नद्यांच्या खननकार्यामुळे या भूपृष्ठाची आणखी गुंतागुंत वाढलेली दिसून येते म्हणजेच देवगड तालुक्यातील ज्या नद्या आहेत, त्या लांबीने आखूड असून शीघ्रवाही आहेत. त्यामुळे कित्येक ठिकाणी भूपृष्ठ

श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय देवगड व रसराजला हार्दिक शुभेच्छा !

## श्री. दामोदर हरी मसुरकर आणि कंपनी

— जनरल मर्चंट —

मु. पो. पडेल
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

रसराजला हार्दिक शुभेच्छा !

## मेसर्स— कार्लेकर-भिडे

(स्थापना : १९२३)

धान्य, किराणा, मसाले, चहा, साबण, बिस्कीटे, पेपरमीट, तंबाखू, विडी, सिगरेट, घरगुती औषधे, जंतुनाशके, इ. जीवनावश्यक व नेहमीच्या गरजेच्या वस्तु मिळण्याचे प्रमुख व्यापारी केंद्र.

**वाडेतर**
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

हार्दिक शुभेच्छा !

## — चेतन —

## — लंच होम —

देवगड, जिल्हा- सिंधुदुर्ग
शाकाहारी व मांसाहारी
जेवणाची उत्तम सोय

प्रोप्रा. सुंदर जगताप

श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड व रसराजला हार्दिक शुभेच्छा !

मेसर्स— ☎ १६

## अमृत विष्णु नलावडे

जनरल मर्चंट

देवगड, जि. सिंधुदुर्ग.

अतिशय खोल खणले आहे. उदा. दाभोळ. तसेच वाडातर खाडी हा संपूर्ण प्रदेश अतिप्राचीन अग्निजन्य खडकांपासून बनलेला असल्याने कठीण भूपृष्ठ आढळून येते. त्यामुळे नद्यांनी आपली खोरी अतिशय खोल खणलेली आढळून येतात.

देवगड तालुक्यामध्ये सखल प्रदेशाची उंची पश्चिमेकडून पूर्वेकडे वाढत जाते. त्याचे उंचीनुसार दोन भाग पडतात, ते पुढीलप्रमाणे–

**खलाटी :–** पश्चिमेकडील अरबी समुद्रालगतच्या भागास खलाटी म्हणतात. याची उंची समुद्रसपाटीपासून फार कमी आहे.

**वलाटी :–** याच्या पश्चिमेस जो डोंगराळ भाग आहे त्यास वलाटी असे म्हणतात. याची उंची ३०० मीटर आहे.

देवगड तालुक्याच्या समुद्रकिनाऱ्याचे निरीक्षण करता लाभलेला किनारा हा 'रिया' प्रकारचा आहे. म्हणजेच नद्यांच्या मुखाजवळील जमिनीचा भाग भूहालचालीमुळे खचतो. त्यामुळे नद्यांच्या मुखाजवळील जमिनीचा भाग पाण्यात बुडून समुद्राचे पाणी नद्यांच्या मुखातून नद्यांच्या खोऱ्यांमध्ये आतपर्यंत शिरते. नद्यांच्या मुखातून अशारितीने समुद्राचे पाणी आत शिरले म्हणजे समुद्राचे फाट समुद्रकिनाऱ्यावरील जमिनीत आत शिरल्यासारखे दिसतात. उदा. देवगड तालुक्यामध्ये येणाऱ्या जेवढ्या नद्या आहेत तेवढ्या नद्यांच्या खोऱ्यात समुद्राचे पाणी आत दूरवर गेलेले आहे.

देवगडच्या उत्तर सीमेवर असणारी वाघोटण नदी, विजयदुर्गजवळ असणारी देवगड नदी, वाडातर नदी, दाभोळ नदी, व दक्षिणेकडे असणारी आचरा नदी इत्यादी नद्यांच्या खोऱ्यात समुद्राचे पाणी खूप आत घुसलेले आढळून येते. या निरीक्षणावरून असे अनुमान काढता येते की, येथील किनारा थोडासा दंतूर झालेला आहे.

तसेच काही ठिकाणी समुद्रकिनारा उथळ पडल्यामुळे खनन व संचयन झालेले आढळून येते. संचयनाचे उदा. म्हणजे देवगड गावाशेजारील कुणकेश्वर, तारामुंबरी त्याचप्रमाणे विजयदुर्ग जवळ लाटेने संचयन होऊन किनाऱ्याला समांतर सागरी मैदाने तयार झालेली आहेत.

देवगडच्या जलप्रणालीच्या दृष्टीने लांबीने मोठ्या नद्या आढळून येत नाहीत. कारण देवगड तालुक्याचा पूर्व-पश्चिम विस्तार अत्यंत कमी आहे. तसेच दुसरे म्हणजे हा प्रदेश उत्तर-दक्षिण लांबीने जास्त पसरलेला आहे. अरबी समुद्राजवळ सह्याद्री पर्वत पसरलेला आहे. या पर्वतातून नद्या उगम पावून ४० कि. मी. अंतरावर असणाऱ्या अरबी समुद्राला येऊन मिळतात. भूपृष्ठाचा उतार तीव्र असल्याने सर्व नद्या शीघ्रप्रवाही आहेत या नद्यांमध्ये पावसाळ्यात पाणी जास्त असते व उरलेल्या ऋतूत या नद्या कोरड्या असतात. परिणामी या नद्या दळणवळणाच्या दृष्टीकोनातून निरुपयोगी आहेत.

देवगड तालुक्याच्या उत्तर सीमेजवळ असणारी वाघोटण नदी लांबीने जास्त आहे. ही नदी पूर्वेकडील सह्याद्री पर्वतात उगम पावते व ही नदी पश्चिमेला वहात जाऊन अरबी समुद्राला येऊन मिळते

तसेच दक्षिणेकडे असणारी आचरा नदी पूर्वेकडील फोंडा येथे उगम पावते व पश्चिमेकडे वहात जाऊन आचरा या ठिकाणी समुद्राला येऊन मिळते.

शिरगावच्या डोंगरावर उगम पावणारी नदी पश्चिमेला वहात जाते. या नदीला मुटाट गावाजवळून येणारी उपनदी येऊन मिळते व हा संयुक्त प्रवाह विजयदुर्ग या ठिकाणी समुद्राला जाऊन मिळतो.

देवगड तालुक्यातील जास्तीत जास्त भाग पाणलोट प्रकारच्या नद्यांनी व्यापलेला आहे

देवगडचा भूपृष्ठभाग टर्शरी युगातील खडकापासून तयार झालेला आहे. हे खडक अतिप्राचीन आहेत. या खडकामध्ये लोह, मॅग्नेशियम, ॲल्युमिनियम इ. महत्त्वपूर्ण खनिजे आढळून येतात. परंतु या खनिजांचे प्रमाण कमी असल्यामुळे त्यांचा व्यापारी दृष्टीकोनातून फारसा उपयोग होत नाही. परंतु यावर वातावरणाचा परिणाम झालेला दिसून येतो व त्याचे प्रमाण कमी झाले आहे. कारण ज्या ठिकाणी तपमान व वातावरणात बाष्प (दमट) जास्त असते त्याठिकाणी निरनिराळ्या वायूंचा परिणाम होऊन भस्मीकरणाची (Oxida-

हार्दिक शुभेच्छा !

सु-दीर्घ आयु-आरोग्यासाठी 'श्रीराम'ची शास्त्रशुद्ध व गुणकारी औषधे वापरा.

# श्रीराम औषधि भांडार

**आयुर्वेदीय औषधांचे निर्मात**

मु. चिपळूण, जि. रत्नागिरी

३१७

भस्मे, रसायने, मात्रा, चूर्णे, आसव-अरिस्ट-काढे, लेप इ. शंभरावर औषधांची निर्मिती.



लाभदायी उषःकाल,
आपल्याच हाती

**भारतीय स्टेट बँक**

नानाविध योजना

- ☆ सेव्हिंग डिपॉझीट ☆ रिकरिंग डिपॉझीट
- ☆ फिक्स डिपॉझीट ☆ कॅश सर्टिफिकेटस्
- ☆ बरोबरच अनेक नव्या योजना सादर करत आहे.

- ★ बाराशे रुपये भरुन निवृत्तीच्या वेळी फंडासारखीच रक्कम मिळवा.
- ★ सातवर्षापर्यंत दरमहा नियमीत पैसे भरुन तहह्यात तितकीच पेन्शन मिळवा.

सुरक्षितता एक
सुखद भावना

अधिक माहितीसाठी जवळच्या
शाखेशी संपर्क साधा.

tion) क्रिया घडून येते. येथील भूपृष्ठाकडे येणाऱ्या पावसाच्या पाण्यांत वातावरणातील प्राणवायू थोडयाफार प्रमाणात विरघळलेला असतो. ज्या खडकात लोहधातूचा जास्त अंश असतो अशा खडकावर प्राणवायू मिश्रित परिणाम होऊन लोखंडाचा प्राणिद तयार झालेला आहे. यात मूळ खडक कुजलेला आहे व वेगळयाच प्रकारचा खडक बनलेला आहे. उदा. आयर्नचे रुपांतर आयर्नऑक्साईड मध्ये झालेले आहे. वरील सर्व प्राकृतिक रचनेचा विचार करता येथील भूपृष्ठरचना साधी असून वैशिष्टयपूर्ण आहे. म्हणजेच या पृष्ठावरील सर्व नद्यांनी सखल मैदानी किनारपट्टी झिजवून उंचसखल भाग तयार केलेला आहे.


हार्दिक शुभेच्छा !

अद्ययावत आकर्षक
९ व ६ वारी साडया
टेरीकॉट शर्ट व पँटपीसेस डीलर्स

**कल्पना वस्त्रालंकार**

तळेबाजार, ता. देवगड.

हौजिअरी व फॅन्सी क्लॉथ सेंटर
प्रोप्रा. सौ. कल्पना प्रकाश खाडये



श्री. सदाशिव हरी केळकर
कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.
—० व ०—
'रसराज' च्या देवगडदर्शन विशेषांकाला आमच्या शुभेच्छा !

**श्री. सेवानंद गोपाळ पोसे**

(आंबा व इतर फळांचे दलाल)

卐 कोकणच्या जगप्रसिद्ध हापूस आंब्यास मुंबईत योग्य दर मिळवून देण्यासाठीच.
—एक कोकणपुत्र म्हणून प्रयत्न.

卐 रजिस्टर ऑफिस १/२३ विजयनगर बांद्रेकरवाडी जोगेश्वरी (पूर्व) मुंबई नं. ६०.

☆ हंगामात स्थानिक खरेदी— मुंबईच्या भावानेच !

卐 गावचा पत्ता— मु. पो. गिर्ये (बांदेवाडी), ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

卐 आपला विश्वास हेच आमुचे स्फूर्तीस्थान !

रसराजच्या देवगड दर्शन विशेषांकास आणि
श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालयास
卐 हार्दिक शुभेच्छा 卐

विजयदुर्ग ते तळेरे या भागात गेली २८ वर्षे अत्यंत प्रामाणिकपणें सेवा देणारी
आंबा वहातुक सर्व्हिस

**बी. जी. ठाकुरदेसाई आणि कंपनी**
**आंबा सर्व्हिस**
पडेल ते मुंबई
मु. पो. पडेल, ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

॥ श्री गजानन प्रसन्न ॥
रसराजला हार्दिक शुभेच्छा !

**श्री अंबिका विजय सॉ मिल**
☎ मिल २७ : निवास २८
मु. पो. विजयदुर्ग : पिन ४१६८०६
जिल्हा : सिंधुदुर्ग

आमचेकडे इमारती व फर्निचर करिता
लागणारे लाकूड योग्य दरात चिरुन
व विकत मिळेल.

रसराजला हार्दिक शुभेच्छा !
☎ २२
**श्री. काशिनाथ यशवंत वेलणकर**
एजंट लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन
ऑफ इंडिया
ऑफिस : मालवण (८२७)
१७७०, सोमवार पेठ, मालवण
जि. सिंधुदुर्ग
घरचा पत्ता : मु. पो. विजयदुर्ग
४१६८०६, जि. सिंधुदुर्ग

हार्दिक शुभेच्छा !



**राजाराम शंकर मसुरकर**

जनरल मर्चंट अँड कमिशन एजंट

**फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग.**

**फर्म– मे. ससुरकर आणि कंपनी**

फोंडाघाट ☎ २८

हार्दिक शुभेच्छा !



**राधाकृष्ण सोनू पावसकर**

जनरल मर्चंट अँड कमिशन एजंट

फोंडाघाट, जि. सिंधुदुर्ग. ☎ ४५

★ सचोटी व प्रामाणिकपणा हेच आमचे ध्येय ★

★ गिऱ्हाइकांचे समाधान हाच आमचा नफा ★

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड

आणि

रसराजच्या देवगड दर्शन विशेषांकास

आमच्या हार्दिक शुभेच्छा !

**श्री. विश्वनाथ शांताराम मयेकर**

**जामसंडे–भटवाडी**

**तहसील देवगड, जि. सिंधुदुर्ग**

## ॥ देवगडचे हवामान ॥

॥ विजया पेठे / प्रथम वर्ष वाणिज्य ॥

देवगड तालुक्याचा विस्तार कमी असला तरी, या तालुक्यातील हवामानावर अक्षांश, समुद्रसपाटीपासूनची उंची, समुद्रसानिध्य व वारे या घटकांचा प्रभाव पडलेला आहे.

हा तालुका मोसमी हवामानाच्या प्रदेशात येत असल्याने येथील हवामान मोसमी स्वरुपाचे आहे. परंतु वरील घटकांचा प्रभाव पडल्यामुळे येथील हवामान पूर्वेकडील अंतर्गत भागापेक्षा वेगळे झाले आहे. हा तालुका उष्ण कटिबंधात येत असून विषुववृत्ताला जवळ असल्याने जवळपास वर्षभर तपमान सातत्याने जास्त असते. वर्षातील जास्तीत जास्त दिवस सूर्यकिरण लंबरुपाने पडतात, त्यामुळे तपमान वाढते. परंतु किनारी प्रदेशात म्हणावे इतकी वाढ होत नाही. परंतु पूर्वेकडील भागात तपमाम जास्त असते. समुद्र किनाऱ्याचे भाग सोडल्यास, इतर भागाचे वार्षिक सरासरी तपमान ८०° फॅरनहीट आहे. परंतु उंचीनुसार तपमान कमी कमी होत जाते, या नियमाला अनुसरुन पूर्वेकडील डोंगराळ प्रदेशांत तपमान थोडेसे कमी झालेले दिसून येते. येथील सरासरी तपमान ७५° फॅरनहीटच्या जवळपास असते.

येथील हवामानाचे वैशिष्ठ्य म्हणजे तपमानकक्षा अतिशय कमी आहे. याचे कारण म्हणजे समुद्र सानिध्याचा परिणाम येथील तपमानावर झालेला आहे आणि त्यामुळे तपमानकक्षा कमी म्हणजे ५ ते १०° फॅरनहीटच्या आत असते. त्याचप्रमाणे या प्रदेशावरून वहाणारे दैनिक वारे, खारे व मतलई वारे यामुळे तपमान जास्त वाढत नाही अथवा कमीही होत नाही. थोडक्यात येथील तपमान उष्ण, सम व दमट आहे.


या तालुक्यातील सापेक्ष आर्द्रतेचे प्रमाण जास्त आढळून येते. (सुमारे ७० ते ८० टक्के) त्यामुळे येथील वातावरणात बाष्पाचे प्रमाण जास्त असल्यामुळे हवा दमट होते.

संपूर्ण हवामानाचा विचार करता खालील ऋतू ठळकपणे दिसून येतात –

**उन्हाळा :–** २१ मार्च नंतर उत्तर गोलार्धात सूर्यकिरणे हळूहळू लंबरूपाने पडू लागतात. त्यामुळे येथील तपमानात वाढ होऊ लागते. एप्रिल-मे पर्यंत तपमान अतिशय वाढते. परंतु किनारी प्रदेशापेक्षा तालुक्यातील अंतर्गत भागात उन्हाळा स्पष्टपणे दिसून येतो. त्या ठिकाणचे तपमान ३८° सें. ग्रे. पर्यंत वाढलेले दिसून येते. परंतु किनारी

# मागील दहा वर्षांची देवगड तालुक्याची पर्जन्याची आकडेवारी (मिलीमीटर मध्ये)

| वर्ष | जानेवारी | फेब्रुवारी | मार्च | एप्रिल | मे | जून | जुलै | ऑगस्ट | सप्टेंबर | ऑक्टोबर | नोव्हेंबर | डिसेंबर | एकूण (मि. मी.) | तपमान (सें. ग्रे.) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७३-७४ | – | – | – | – | – | ४६५ | ६९२ | ८६८ | ९८ | ९० | – | – | २२१३ | ३०° |
| १९७४-७५ | – | – | – | – | ७१ | ७६८ | ७६५ | ३६३ | ३१९ | १४१ | – | – | २४२७ | ३१° |
| १९७५-७६ | – | – | – | – | ३ | ६५९ | ७७८ | ५५५ | ३१४ | २३२ | – | – | २४४० | २७° |
| १९७६-७७ | – | – | – | – | – | ४६९ | ९२० | ३५५ | ८७ | ५ | – | – | १८३६ | २६° |
| १९७७-७८ | – | – | – | – | – | ८४० | १२०२ | ५५२ | १७८ | ३२ | – | १२३ | २८७३ | ३१° |
| १९७८-७९ | – | – | – | – | २१५ | १००८ | १०१६ | ५९० | ३६० | ५० | ११ | – | ३२५० | ३२° |
| १९७९-८० | – | – | – | – | ६९४ | ४१९ | ४०३ | २११ | – | २ | – | – | ११३१ | २९° |
| १९८०-८१ | – | – | – | – | – | १०१३ | ५८७ | ६३८ | १४५ | – | २४ | ८० | २४६७ | ३०° |
| १९८१-८२ | – | – | – | – | १ | १०७७ | ५९९ | ४६० | २७१ | ४९ | १४ | – | २४७२ | ३०.७° |
| १९८२-८३ | – | – | – | – | – | ७७० | ६३९ | ४१८ | १८७ | ३५ | २९ | – | २०७८ | २७° |
| १९८३-८४ | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | – | ३१२५ | ३०° |




१ इंच = १००० मिलिमीटर पर्जन्य   १ इंच = ५° सेंटिग्रेड तपमान

प्रदेशात तपमान वाढत [illegible] नाही. कारण या ठिकाणी खारे
वारे व मतलई वारे [illegible] वाहतात. त्यामुळे हवेतील
तपमानाची जाणीव होत [illegible] नाही, तर हवा आल्हाददायक
असते. या ऋतूत काही [illegible] ळेस कमी भाराचे केंद्र निर्माण
होऊन अभिसरण प्र [illegible] रचा पाऊस पडतो. त्याला
वळवाचा पाऊस असे म [illegible] णतात, हा पाऊस आंब्याच्या
पिकास पोषक नाही. या [illegible] ाच आम्रसरी असे म्हणतात

**पावसाळा :—** मे महि [illegible] न्याच्या शेवटच्या आठवड्या-
पर्यंत संपूर्ण आशियाचे भू [illegible] ष्ठ तापते. त्यामुळे भारताच्या
वायव्य भागात एक ती [illegible] कमी भाराचे केंद्र निर्माण
होते. त्याचवेळी ऑस्ट्रे [illegible] याच्या भूखंडावर सूर्यकिरणे
तिरपी पडत असल्यामु [illegible] जास्त भाराचे केंद्र निर्माण
होते. ही विभिन्न भाराची [illegible] केंद्रे जूनच्या पहिल्या आठव-
ड्यापर्यंत अधिक तीव्र हो [illegible] तात. वाऱ्याच्या नियमानुसार
वारे जास्त भाराच्या [illegible] प्रदेशाकडून कमी भाराच्या
प्रदेशाकडे वाहतात. त्यामु [illegible] ऑस्ट्रेलियाच्या भूखंडावरून
आशियाकडे वारे नैऋ [illegible] त्येकडून वाहतात हे वारे
भारताकडे नैऋत्येकडून, [illegible] ईशान्येकडे हिंदी महासागरा-
वरून येतात. त्यामु [illegible] त्यांच्याबरोबर पुष्कळ
बाष्प येते.


देवगड तालुका भारताच्या [illegible] एक भाग असल्यामुळे या
तालुक्याकडे वारे नैऋत्येक [illegible] ईशान्येकडे वाहतात. या
ठिकाणी वारे अरबी समु [illegible] रून येत असताना बाष्प
ग्रहण करतात. व देवगड [illegible] प्राकृतिक रचनेनुसार कमी
अधिक पाऊस देतात. सु [illegible] ला साधारणपणे हे वारे
१५ जूनपर्यंत किनारपट्टी [illegible] येऊन धडकतात. त्यामुळे
किनारपट्टीवर पाऊस [illegible] या ऋतूतील संपूर्ण पाव-
साचे वितरण पाहिले तर [illegible] समान आहे किनारपट्टी-
वरील प्रदेशात दक्षिणेक [illegible] त्तरेकडे पावसाचे प्रमाण
कमी कमी होत जाते. [illegible] प्रदेशात दक्षिण भागात
मालवण या ठिकाणी १ [illegible] पर्यंत पाऊस पडतो; तर
विजयदुर्ग या ठिकाणी [illegible] '' पर्यंत पाऊस पडतो.
त्याचप्रमाणे किनारी प्र [illegible] सोडला तर तालुक्याच्या
मध्यवर्ती भागात (तळेरे [illegible] वाघोटन) या ठिकाणी
थोडासा पर्जन्य छायेचा [illegible] निर्माण झालेला दिसून
येतो. परंतु आणखी पूर्वे [illegible] गेल्यास पावसाचे प्रमाण
वाढते कारण ईशान्येकडे [illegible] भाग डोंगराळ असल्याने
१५०'' पाऊस पर्यंत पाऊ [illegible] पडतो. या वेळी ऋतूत

तपमान थोडेसे उतरते कारण सूर्यकिरणांचा अभाव! परंतु ऊबदार समुद्रामुळे व वातावरणातील बाष्पामुळे तपमान घटत नाही. त्यावेळी संपूर्ण तालुक्यात सापेक्ष आर्द्रता ८० ते ९० टक्के पर्यंत दिसून येते. जून-ऑगस्ट मध्ये पावसाचे प्रमाण जास्त असते. नंतर पाऊस कमी होतो. सप्टेंबरमध्ये परत पाऊस वाढतो व सप्टेंबरच्या शेवटच्या आठवड्यात पाऊस पूर्णपणे बंद होतो. यानंतर ऑक्टोबरची उष्णता जाणवू लागते. अधून-मधून पावसाची सर येते. त्यावेळी पुरते हवामान आल्हाद-दायक होते.

**हिवाळा :—** नोव्हेंबर नंतर सूर्य पूर्णपणे दक्षिण गोलार्धात जातो. त्यावेळी सूर्यकिरणे या तालुक्याच्या भूपृष्ठावर थोडीशी तिरपी पडतात. रात्रीमानाचा कालावधी जास्त असतो. त्यामुळे उष्णता कमी मिळते. किनारी प्रदेशात सागराचा प्रभाव पडत असल्यामुळे दैनिक तपमानकक्षा जास्त आढळत नाही. परंतु पूर्वे-कडील सीमेवर सागराचा प्रभाव पडत नाही. त्यामुळे दैनिक तपमानकक्षा जास्त असते. दिवसाचे तपमान सुमारे २५° सें. ग्रे. पर्यंत वाढते. व रात्रीचे तपमान सुमारे १५° सें. ग्रे. पर्यंत कमी होते. अशाप्रकारे या भागातील तपमानात विविधता आढळते. संपूर्ण ऋतू साधारणत: कोरडा जातो. येथील तपमान कधीच गोठणबिंदुपर्यंत खाली उतरत नाही. कारण सागराचा प्रभाव व हवेतील बाष्पामुळे तपमान कमी होत नाही. या ऋतूत खारे व मतलई वारे वहातात. त्यामुळे तप-मानात फरक आढळत नाही.

संपूर्ण वर्षातील सापेक्ष आर्द्रतेचे वितरण पाहिले तर जास्त आहे. ते ७० ते ८० टक्के आढळते. त्यामुळे हवा दमट आढळून येते. थोडक्यात येथील हवामान उष्ण, दमट व सम आढळते.

रत्नागिरी जिल्ह्यात
स्टील फर्निचरचे
सर्वात मोठे
एकमेव विक्रेते



महाराजा
स्टील फर्निचर
महाराजा ट्रेडींग कार्पोरेशन
१९३५, राम मंदीर नजिक
श्रीराम लेन
रत्नागिरी-४१५६१२
१/१६: शिरसाट बिल्डींग
मुंबई-गोवा हायवे
कणकवली-४१६६०२

महाराजा ट्रेडींग कॉर्पोरेशन
कडवईकर बिल्डींग
बाजारपेठ चिपळूण, जि. रत्नागिरी

## ॥ देवगड बंदर ॥

॥ माधुरी जोशी / अकरावी कला ॥

आपल्या महाराष्ट्राला [illegible] णूपासून रेडीपर्यंत ७२० किलोमीटर लांबीचा समुद्र किनारा लाभला आहे. मुंबईच्या उत्तरेकडे डहाणूपर्यंत तशी [illegible] घेण्यासारखी बंदरे नाहीत. दक्षिणेकडे मात्र दिघी, जयगड, विजयदुर्ग, देवगड अशी बंदरे आहेत. त्यातील कोणत्या [illegible]ी वाऱ्यापासून सुरक्षित बंदर म्हणून पूर्वापार देवगड बंदराची ख्याती आहे.

देवगड बंदरात उत्तरेकडे प[illegible]याचा डोंगर, पश्चिमेकडे देवगड किल्ल्याचा डोंगर, दक्षिणेकडे रांज व पूर्वेकडे देवगड बाजारपेठ-सडा भाग असे [illegible]ी बाजूने संरक्षण आहे. उत्तर व पश्चिमेच्या दोन डोंगरांमध्येच बंदराचे तोंड म्हणजेच नस्त आहे. सैतवड्याच्या [illegible] च्याद्वारून तळवडा-ताम्हाण्यावर उडी घेणारी नदी ह्या नस्तामधून समुद्राला भेटते. त्यामुळे नस्तावर नेहमी [illegible] पाणी रहाते. मात्र नदीच्या प्रवाहातून येणारा गाळ बंदराच्या दक्षिणेकडील किल्ला ते आनंदवाडी पर्यंतच्या [illegible] दरवर्षी साचतो. त्यामुळे दरवर्षी देवगड बंदर गाळाने होरत आहे. ही हूर १८६८ च्या ब्रिटिशांनी केलेल्या सर्व्हे [illegible]र १९६८ पर्यंत आमच्या नाविक दलाने केलेल्या १०० वर्षांच्या काळात ४२ झाली. म्हणजे आपले देवगड बंदर १[illegible]० वर्षांच्या खोलीचा विचार करता एक जागतिक बंदर होऊ शकेल इतके खोल आहे, पण लक्ष कोण देतो ?

मात्र शिवाजी महाराजांच्या [illegible]मारातील बंदराच्या यादीमध्ये देवगडला फार महत्त्वाचे स्थान होते, ह्याची देवगडचा किल्ला साक्ष देतो. दत्ता[illegible]वळाकडे बौद्धवाड्यातून किल्ल्याचे प्रवेशद्वार गेले आहे तर कस्टम कार्यालयाच्या माथ्यावर मारुती आणि [illegible]तीच्या मंदिराची निर्मिती शिवाजी महाराजांच्या काळाची साक्ष देते. ठिकठिकाणचे बुरुजही आरमारी बंदराच्या [illegible]क्ष वेतात. ह्यावरून शिवकालात देवगड बंदर पश्चिम किनाऱ्यावरील एक महत्त्वाचे आरमारी बंदर होते, ह्याची [illegible]चतो येते.

शिवकालानंतरच्या काळात [illegible]गड बंदर एक व्यापारी बंदर म्हणून प्रसिद्ध होते, हे बंदरावरील वखारीवरून दिसून येते. बंदर होरण्यापूर्वी [illegible]खारीच्या नजीकपर्यंत कालिकतपासून मोठमोठी मालवाहू गलबते येत होती. ह्या गलबतामधून कौले, लाकूड [illegible]न्य, सुंभ, रॉकेलचे डबे, मीठ इत्यादी माल बंदरात उतरला जाई, तर देवगडमधून लाकूड आंब्याच्या करंड्या, [illegible]ळीची कुटी, ऊस, गवत, चिवारीची काठी इत्यादी माल पाठविला जाई. त्यासाठीच बंदर किनाऱ्यावर व्यापाऱ्या[illegible]ा वखारी बांधलेल्या होत्या. अशा व्यापाऱ्यांमध्ये प्रामुख्याने पारकर, बिडये, शेटये,

शिरसाट, जोशी, खाडये, पीरखान, मुणगेकर, कोयंडे
प्र इत्यादी व्यापाऱ्यांचा समावेश होता.

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आपल्या महाराष्ट्र शासनाने मुख्यत्वे गावोगावच्या रस्त्यांच्या सुधारणेवर जोर दिला. मुंबई-गोवा हमरस्ता, देवगड कोल्हापूर रस्ता तसेच अंतर्गत अनेक रस्ते जोडले गेल्यामुळे व रस्त्यावरून चालणाऱ्या खटाऱ्यांचे यांत्रिक वाहनात रुपांतर झाल्याने समुद्रातील वाहतूक आपोआपच कमी कमी होत गेली. त्यामुळे देवगड बंदरावर व्यापारीदृष्टचा अवकळा आली. व्यापाऱ्यांच्या वखारी ढगळू लागल्या. डब्यातून येणारे रॉकेल टँकरने येऊ लागले. कारवारहून गलबताने येणारे लाकूड हुबळी-धारवाडच्या जंगलातून परस्पर ट्रकने देवगडच्या सड्यावरच्या सॉ-मिलवर उतरु लागले. मंगलोरी कौले परस्पर भट्टीतून दाजीपूर राधानगरीच्या घरावर ट्रकने येऊन पडू लागली. पर्यायाने बंदरातील व्यापार थंडावला.

शिवकालीन गड जसेच्या तसे उभे राहिले. परंतु व्यापारातून निर्माण झालेला देव नष्ट होत गेला. त्यामुळे देवगड हे नावही हरुन जाते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली. पण बंदराच्या नावातील दे पुन्हा जागा झाला. १९४८ पासून ६६ सालपर्यं देवगडमधील श्री. जगन्नाथभाऊ पारकर यानी दुसऱ् महायुद्धातील ६ लाँचिस खरेदी करून देवगड बंदरा पहिले यांत्रिकीकरण युग सुरु केले. त्यामुळे किल्ल आनंदवाडी, तारामुंबरी, मळई ह्या परिसरात मच्छिमार लोक यांत्रिकीकरणात प्रवीण झाले. ब जण पोर्ट ट्रस्ट, मझगाव गोदी, सरकारी नाविक अशा ठिकाणी बड्या पगाराच्या नोकऱ्यांवर गेले, गावात राहिलेले यांत्रिकीकरणात तरबेज होऊन रा

ह्या काळात बंदराचा व्यापारीदृष्टया फार विकास झाला नाही. त्यामुळे देवगड बाजारपेठही ओस दिसू लागली. परंतु तो ओसपणा परमेश्व दिव्यदृष्टीला मानवला नाही आणि त्यामुळेच घेऊन की काय तारामुंबरी येथील श्री. बाबाजी जोशी बंधू व कृष्णा हरी बापर्डेकर बंधू यानी मध्ये २ यांत्रिक ट्रॉलर्स आणून यांत्रिक मासे

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड व रसराजला
**हार्दिक शुभेच्छा !**

**श्री. नारायण दत्तात्रेय फाटक**
**मु. पो. पुरळ-हुर्शी**
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

**हार्दिक शुभेच्छा !**

**फडके रेडिओ ॲण्ड इलेक्ट्रीक हाऊस**
**मु. पो. वाडा, ता. देवगड.**

रेडिओ टेपरेकॉर्डर व सर्व इलेक्ट्रीक सा
विक्री व दुरुस्ती
मोटार सायकल, स्कूटर, लक्ष्मी इ
स्पेअर पार्टसचे वाडयातील
एकमेव विक्रेते.

युगाला सुरुवात केली. शासनाच्या ३ योजनांद्वारे आज
देवगड परिसरात १९६५ ते ८३ पर्यंत ४० यांत्रिक
ट्रॉलर्स झाले. यांत्रिक पद्धतीने निरनिराळ्या प्रकारच्या
मासेमारीचे शास्त्र विकसित झाले. लोकांच्या घरावरील
केंबळा जाऊन कौले चढली. ह्या यांत्रिक युगाच्या
प्रवर्तकाचा बराचसा भाग श्री. मुरलीधर जोशी
यांच्याकडे जातो. त्यांनी देवगडला १९६६ साली नौका
बांधणीचा कारखाना सुरु केला. देवगड बंदरातील ४०
यांत्रिक नौकांपैकी २२ नौका त्यांच्या कारखान्यात
बांधलेल्या आहेत. त्यानंतर श्री. राजाराम कोयंडे
बंधूनी आनंदवाडीला नौका बांधणी कारखाना काढला,
तर गेल्या २ वर्षापासून श्री. भगवान परब यांनी
तारामुंबरी येथे एक नौकाबांधणी कारखाना काढला.
अशातऱ्हेने देवगड परिसरात आज ३ कारखाने उभे
आहेत.

देवगड बंदराच्या ह्या नैसर्गिक सुरक्षिततेबरोबरच
देवगडच्या समुद्रात 'कापशी' जातीच्या चिंगळेचे एक
वरदान विधात्याने इथल्या मच्छिमारांना दिले आहे.
त्यामुळे दिवसेंदिवस स्थानिक यांत्रिक नौका वाढतच
आहेत. शिवाय दरवर्षी नोव्हेंबर ते मे ह्या ७ महि-
त्याच्या कालावधीत श्रीवर्धन, दाभोळ, जयगड,
रत्नागिरी, पावस, पूर्णगड, साखरीनाटे विजयदुर्ग,
मिठबांव, आचरा, वेंगुर्ला इत्यादी बंदरातून सुमारे
२५० बोटी देवगड बंदरात मासेमारीसाठी येतात.
ह्या बोटींनी पकडलेली चिंगळ नेण्यासाठी रोज ८–१०
ट्रक गोव्यापासून रत्नागिरीपर्यंतच्या गावातून येतात
मासळी खरेदीसाठी देवगड परिसरातील शेकडो
व्यापारी स्त्री-पुरुष एस्.टी. च्या गाडीने देवगडला
येतात. शिवाय ७–८ टेंपो मालवणपासून संगमेश्वरपर्यंत
मासळी घेऊन जातात, तर 'खटवी' ह्या अखाद्य
प्राण्याला वाळविण्याचे काम देवगड बंदरालगतच्या
शेकडो कुटुंबात चालते. त्यामुळे देवगड परिसरात
मासळीची भुकटी करण्याचे ५ कारखाने उभे राहिले
आहेत. ही भुकटी 'फिश मील' ह्या नावाने संबोधिली
जाते व ती कोंबड्या, गुरे, मेंढ्या ह्यांच्या अन्नामध्ये
वापरली जाते. ह्या ५ कारखान्यामधून दरमहा सुमारे
६ लाख रुपयांची भुकटी तयार होते व हा सर्व पैसा
अगदी सामान्य नागरिकांच्या हातात येतो. त्यामुळे
देवगडचा आर्थिक विकास ह्या मासेमारी व्यवसायाने
झालेला आहे. ह्या ७ महिन्याच्या हंगामात देवगड
शहरात सुमारे २ हजार लोकांची रोज वर्दळ चालू

असते. त्यामुळे देवगड बाजारपेठ, सिनेमागृहे, भाजी-
बाजार अगदी तेजीत चालताना दिसतात. देवगडच्या
प्रसिद्ध हापूस आंब्याचे माधुर्य प्रत्येक माणसाच्या
हृदयात सामावलेले असल्याने ह्या बाहेरून आलेल्या
लोकांना आम्ही देवगडवासीय कधी उपद्रव देत नाही.
आणि ह्या आमच्या स्वभाववैशिष्ट्यानेच देवगडच्या
मासेमारीचा विकास होत आहे.

आधुनिक मासेमारीसाठी आमचे बंदर सर्व सुविधांनी
युक्त नाही. बंदरात पिण्याच्या पाण्याची सोय नाही.
बोटीतील मासळी उतरण्यासाठी धक्का नाही. इंजिन
दुरुस्तीसाठी अत्याधुनिक कार्यशाळा, नौका दुरुस्तीसाठी
सुकी गोदी, डिझेलचा पंप इत्यादी सुविधा नाहीत.
त्यासाठी इथल्या स्थानिक मत्स्य व्यवसाय विकास
समितीच्या पदाधिकाऱ्यांनी ५ वर्षापूर्वीपासून शासनाचे
लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न केला होता. त्यासाठी
आपले लोकप्रिय आमदार दादासाहेब राणे यांनी
पाठपुरावा करून देवगड बंदरात 'आनंदवाडी प्रकल्प'
नावाचा एक मासेमारी धक्का शासनाकडून कार्यवाहित
आणला आहे. हा धक्का येत्या २-२ वर्षात पुरा होईल.
त्यासाठी सुमारे एक कोटी रुपये खर्च होणार आहेत.
केंद्र सरकारच्या पहाणी पथकाकडून सध्या जागेची
[illegible] झाली आहे. हा धक्का तयार झाल्यावर खोल
[illegible] मासेमारी करणाऱ्या ६–७ मीटर खोलीच्या
मोठ्या बोटीही देवगड बंदरात आपली मासळी उतर-
विण्यासाठी येतील, तर देवगडचा कोळंबी देवगड
बंदरातून भविष्यकाळात निर्यात केली जाईल.

केवळ मासेमारी व्यवसायामुळेच बंदराचा विकास
होईल असे नाही, तर देवगड बंदराच्या ह्या नैसर्गिक
सुरक्षिततेपुढे आताच्या उतार धक्यापासून कस्टम
कार्यालयापर्यंत धक्का बांधून तिथला गाळ काढत गेला
तर देवगडचा आंबा, पुणे-कोल्हापूरचा साखर, घाटातील
खनिज, कोकणातील बांबू, कोल्हापुरची चप्पल, तास-
गांवची द्राक्षे इत्यादी पदार्थ देवगड बंदरातून परस्पर
निर्यात होतील. ही किमया व्हायला फार वर्षे वाट
पहावी लागणार नाही. शासनाला आज ना उद्या हे
करावेच लागेल इतकी मुंबईमध्ये माणसांची व परदेशी
बोटींची गर्दी होत आहे. शिवाय देवगड बंदराच्या
समोरील समुद्रात तेलाचे साठेही उपलब्ध झाले आहेत.
त्या साठ्यांचे उत्खनन होताना देवगड बंदराला कोणते
महत्व येईल हे काय वर्णू ?

॥ श्री ॥

श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड
व रसराजला हार्दिक शुभेच्छा !

# लिना ऑप्टीशिअन्स

चष्मे व सनग्लासचे विक्रेते

प्रोप्रा. : दुखंडे

**कणकवली**

– आमची दर्जेदार उत्पादने –

**अंबिका,** हापूस आंबारस (हवाबंद डब्यामध्ये),
आंबा सरबत, आंबालोणचे, मिश्र लोणचे– आणि बरेच काही.

–: उत्पादक :–

# द्वारका फुडस्

जामसंडे, पिन- ४१६६१२, जि. सिंधुदुर्ग : ☎ ४०

श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय देवगड व रसराजला
हार्दिक शुभेच्छा !

# पाध्ये मेडिकल स्टोअर्स

देशी व विदेशी औषधांचे विक्रेते

**कणकवली**

रसराजला आमच्या हार्दिक शुभेच्छा !


# टेलर मेट्रो

जेण्टस् स्पेशालिस्ट

**कणकवली,** जि. सिंधुदुर्ग


# अभिनंदन !

सुभाष कुलकर्णी



★ जनरल चँपियन


विद्या प्रभुदेसाई



★ जनरल चँपियन


सिनीअर

विनेश खाखिलकर




जनरल सेक्रेटरी

अरविंद पवळेकर



विद्यापीठ प्रतिनिधी

माधुरी ठाकूर



विद्यार्थिनी प्रतिनिधी

नरेंद्र शिरवडकर



★ जनरल चँपियन
व पोहणे जिल्ह्यात पहिला

ज्युनिअर

पद्मजा पारकर




★ जनरल चँपियन

# यशःश्री पायींची दासी !


## प्रथम वर्ग

अजित सावंत



बारावी वाणिज्य

दत्तात्रय दातार



बारावी वाणिज्य

प्रथम वर्ग

विजया गेठे



बारावी वाणिज्य

आशालता बर्वे



बारावी वाणिज्य


साधना जोशी



बारावी कला

राष्ट्रीय गुणवत्ता शिष्यवृत्ती

राजन डोके




बारावी कला प्रथम वर्ग

कामिनी जोशी




अकरावी कला : राष्ट्रीय कर्जाऊ शिष्यवृत्ती



# दोन मुलाखती


"आमदार म्हणून माझ्या ४ वर्षांच्या काळात वेगवेगळ्या विकास कामावर सुमारे ३ कोटी रु. खर्च झाला आहे."



आमदार श्री. दादासाहेब राणे यांची मुलाखत घेताना विद्यार्थी सदानंद देसाई

## -0 बातचीत 0-

श्री. मुरलीधर जोशी यांची मुलाखत घेताना विद्यार्थी गजानन तारी.



"येथील कोळंबी 'Made in Devgad' अशा शिक्क्यासह साऱ्या जगाला पुरवण्यात आम्ही यशस्वी ठरु."



प्राचार्यांसमवेत प्राध्यापक, सहकारी व सेवकवर्ग.

# ॥ आमदार श्री. दादासाहेब राणे यांची मुलाखत ॥

॥ सदानंद देसाई / द्वितीय वर्ष कला ॥

देवगड तालुक्यातील लोकप्रिय आमदार श्री. दादासाहेब राणे गेली चार वर्षे आमदारकीची धुरा यशस्वीपणे सांभाळीत आहेत. त्यापूर्वी ते पंचायत समितीचे सभापती होते. त्यामुळे देवगडच्या विकासाच्या दृष्टीने त्यांनी केलेले प्रयत्न स्तुत्य आहेत. आजपर्यंत त्यांनी केलेली विकासाची कामे विविध क्षेत्रातली आहेत. मतदारांच्याकडून त्यांना आलेले अनुभव, नगरपालिकेच्या दृष्टीने त्यांचे विचार, देवगड बंदराच्या विकासाच्या दृष्टीने त्यांच्या समोरील योजना, शैक्षणिक तसेच औद्योगिक प्रगती, अशा अनेक बाबतीत त्यांनी केलेल्या प्रयत्नांचे स्पष्ट रुप देवगडवासियांना समजावे म्हणून 'रसराजने' केलेला हा प्रयत्न. कोकण रेल्वेबाबत सर्वचजण जसे आशावादी आहेत, तसेच कुणकेश्वर येथे पर्यटनस्थळ झाल्यास तालुक्याच्या सौंदर्यात निश्चीतच भर पडेल असेही वाटल्यास नवल नाही. तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे आजपर्यंत झालेले प्रयत्न, यापुढील विविध योजना यांच्या संदर्भात त्यांची मुलाखत घेतली. यातून तालुक्याच्या सर्वांगीण विकासाचे चित्र स्पष्ट होईल, अशी अपेक्षा आहे.

**आपल्या देवगड मतदार संघाच्या विकासासाठी आपण सर्वात प्रथम (राजकारणात प्रवेश केल्यानंतर) कोणते काम हाती घेतले ?**

**मी** १९६७ मध्ये राजकारणात प्रवेश केला आणि त्यावेळी सर्वसामान्य जनतेला ज्या समस्यांना तोंड द्यावे लागते, त्या समस्यांवर मात करण्याच्या दृष्टीने खेड्यातील रस्ते आणि खेड्यांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा या प्रमुख कामांच्या दृष्टीने सुरुवात केली.

**विकासाची आजपर्यंत महत्वाची कामे कोणती झालीत ?**

**कोणतेही** काम मग ते लहान असो वा मोठे असो मी प्रत्येक काम महत्त्वाचे मानतो. तरीसुद्धा काही ठळक कामे म्हणून पुढील कामांचा उल्लेख करता येईल.

★ देवगड सां. बां. खाते व पंचायत समिती यांना नवीन जीप्स.

★ देवगड ग्रामीण रुग्णालयासाठी नवी रुग्णवाहिका.

★ आनंदवाडी प्रकल्प मार्गी लावण्यासाठी प्रयत्न.

★ देवगड तालुक्याचे १०० टक्के विद्युतीकरण पूर्ण.

★ कालावली पूल मंजुरीसाठी शिष्टमंडळ नेमून प्रयत्न.

★ वाडातर पुलासाठी माझ्या कारकीर्दीत ५० लाख रुपये खर्च झाले असून १९८४ अखेर हा पूल पूर्ण होईल.

★ आचरे पुलावर ३५ लाखांचे दरम्यान खर्च झाला असून हा पूल मुदतीपूर्वी पूर्ण झाला.

★ देवगड तहसीलदार कार्यालयासाठी अद्यावत इमारतीचे काम मंजूर झाले असून लवकरच कामाला सुरुवात होईल.

★ फलोद्यान जिल्हा कार्यालय देवगड येथे सुरु झाले आहे.

★ विजयदुर्ग येथे शासकीय विश्रामगृहाचे बांधकामास मंजुरी मिळाली असून लवकरच कामाला सुरुवात होईल.

★ सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी असलेल्या पशुवैद्यकीय दवाखान्याचे पथक देवगड तालुका हेडक्वॉर्टर झाले.


महाराष्ट्राच्या वैभवात भर घालणारा

# विहार

## उद्योग समूह

☎ २३२२

तीन तपांच्या यशस्वी तपश्चर्येचे फलीत
विविध ग्राहकांच्या
विविध रुची पूर्ण करणारी
उद्योगांची प्रचंड साखळी

१) भर बाजारपेठेत पूर्ण शाकाहारी
**"विहार हॉटेल"**

२) अत्याधुनिक यंत्रसामुग्रीने युक्त
**"विहार बेकरी"**

३) ड्रायफ्रुटस्, मसाल्याचे जिन्नसांसाठी
**"विहार स्वीटस् अँड बेकर्स"**

४) लग्न, पार्टी व समारंभास साजेसे
लज्जतदार व स्वादिष्ट
**"विहार आइस्क्रिम"**

**शिवाय**

☆ खास पर्यटकांसाठी
★ अलिशान व भव्य वास्तूत नटलेले
☆ तीन तारांकित

**हॉटेल**

# विहार डीलक्स

☎ २९४४, २९४५

शाकाहारी व मांसाहारी डिशेस
एअर कंडीशन्ड परमिटरुम
प्रशस्त व हवेशीर लॉजिंग

केळकर कॉलेज

★ दुग्ध व्यवसाय अपेक्षेप्रमाणें विजयदुर्ग भागात व नांदगांव, शिरगांव, हिंदळे, मुणगे, आचरे अशी दुधाची वाहतूक सुरु झाली.

★ मुववळे पूल मंजूर झाला असून कामाला लवकरच प्रारंभ होईल.

★ आरे आणि चाफेड-मणेरी पुलाचे कामांना नियोजन मंडळानें मान्यता दिली आहे.

★ आमदार म्हणून माझ्या या तीन वर्षाच्या काळात वेगवेगळ्या विकास कामांवर सुमारें तीन कोटी रुपये खर्च झाला आहे.

विकासाच्या कामात मतदारांकडून काय अनुभव आला ? आणि एखादे काम हाती घेतल्यानंतर ते पुरे करता येत नाही असे कधी घडले आहे काय ?

विकासाचे काम करीत असताना मतदारांकडून चांगला अनुभव आला. त्यांच्याकडून अपेक्षित प्रतिसाद मिळाला. एखादे काम करीत असताना त्यात कोणी अडथळा निर्माण करतो आहे असे कधी घडले नाही.

तुमच्या उपप्रश्नाबद्दल बोलायचे तर एखादे काम हाती घेतल्यानंतर ते पूर्ण होत नाही असे कधीच घडले नाही. कारण मी एखादे काम हाती घेतल्यानंतर त्यात कितीही अडचणी आल्या तरी ते काम कधीच अर्धवट सोडले नाही. उदाहरणच सांगायचे झाले तर मी सभापती असताना कोटकामते या गावातील लोकांना सुचवले की, तुमच्या गावात मराठी शाळेसाठी आठ खोल्यांची इमारत जिल्हा ग्रामविकास निधीतून कर्जे घेऊन बांधा. पण त्यात विशेष लक्ष घालून कोणी काम करेना. तेव्हा मी त्या गावातील मुंबईच्या मंडळींना भेटलो व गावात शाळा पाहिजेच असा आग्रह धरला. त्यानंतर काही बारीक-सारीक अडचणींमुळे कामाला अपेक्षित वेग येईना, आणि आज जवळजवळ पाच वर्षांच्या कालावधीनंतर सर्व अडचणींवर मात करुन त्या कामाला सुरुवात झाली आहे.

देवगड येथे नगर पालिका स्थापन करता येईल काय ?

८७

देवगड-जामसंडे अशी नगरपालिका स्थापन करता येईल. मात्र त्यासाठी जनतेची मागणी आवश्यक आहे. त्याचप्रमाणें जनतेकडून योग्य तो प्रतिसादही मिळावयास हवा.

आपण आमदार झालात, त्यावेळी विकासाच्या दृष्टीनें देवगडची परिस्थिती काय होती ?

मी आमदार होण्यापूर्वी सभापती होतो. त्यामुळे सन १९७२ पासूनच देवगडच्या विकासाच्या दृष्टीने प्रयत्नशील आहे. काही कामे पूर्णही झालेली आहेत.

देवगड तालुक्याच्या विकासाच्या काही योजना सरकार दप्तरी पडून आहेत काय ? असल्यास त्याची कारणें कोणती ?

विकासाच्या दृष्टीनें सरकारदप्तरी काही योजना पडून आहेत. त्यात् प्रामुख्याने औद्योगिक वसाहत, कुणकेश्वर आणि विजयदुर्ग ही पर्यटन केंद्रे मंजुरीच्या मार्गावर आहेत. आरे, चाफेड पुलाला नियोजन मंडळानें मान्यता दिलेली आहे. तारामुंबरी - मोठमुंबरी, हिंदळे मिठबांव, वानिवडे - मोंड या पुलांची मंजुरी मिळावयाची आहे. ही कामे रेंगाळण्याचे प्रमुख कारण म्हणजे आर्थिक मदत कमी मिळते. कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने निधीची उपलब्धता लवकर होत नाही.

देवगड बंदराच्या विकासासाठी काही योजना आपल्या डोळ्यापुढे आहेत काय? असल्यास कोणत्या ?

देवगड आणि विजयदुर्ग येथे सध्या जे प्रवासी धक्के आहेत त्यांना सध्याच्या बोटी लागत नाहीत. त्यासाठी ते धक्के जर मोठे करावयाचे झाले तर त्यासाठी येणारा खर्च इतका मोठा आहे की, तालुक्यातील विकासाची इतर कामे होणारच नाहीत आणि त्यावर उपाय म्हणून लहान प्रवासी बोटी सुरु कराव्यात की ज्या सध्याच्या धक्क्यांना लागू शकतील. यासाठी प्रयत्न सुरु आहेत, आणि तशा लहान बोटी खरेदी करण्याचा सरकारचा विचार चालू आहे. त्या लवकरच आल्या तर सध्याच्या धक्क्यामध्ये आवश्यक ती सुधारणा थोडक्या खर्चात करता येईल. शिवाय ही बंदरे सुधारावी यासाठी केंद्र सरकारने राज्य सरकारला मोठा निधी उपलब्ध करुन द्यावा, असा अशासकीय ठरावही विधानसभेत मांडला आहे.

पश्चिम महाराष्ट्रात ' शुगर लॉबी ' आहे, तशी कोकणात ' मँगो लॉबी ' निर्माण होत आहे, असे ना. ग. गोरे म्हणतात. ते आपणास पटते काय ?

ना. ग. गोरे म्हणतात ते मला मुळीच पटत नाही. याचे कारण असे की पश्चिम महाराष्ट्रात अशी परिस्थिती आहे की एखादा मोठा ऊस उत्पादक किंवा साखर कारखानदार आहे म्हणून तो राजकारणात येतो. याउलट कोकणामध्ये आंबा व्यावसायिक आहेत म्हणून ते राजकारणात कधीच नसतात. शिवाय पश्चिम महाराष्ट्रातील ऊस उत्पादकांप्रमाणे आमच्या-कडील आंबा व्यावसायिक संघटीत नाहीत. आमच्या-कडे श्री. आप्पासाहेब गोगटे यांच्यासारखा माणूस राजकारणात किंवा समाजकारणात येतो, तेंव्हा खरो-खरच समाजसेवा करणे हा उद्देश त्यामागे असतो. राजकारण खेळणे यांत त्याना स्वारस्य नसते. त्यामुळे कोकणात ' मँगो लॉबी ' वगैरे म्हणणे निरर्थक आहे.

आंबा व्यवसायाच्या विकासासाठी देवगड परि-सरात काय करतायेण्याजोगे आहे ?

देवगड तालुक्यात कमी जास्त प्रमाणात सुमारे ६० ते ७०% लोकांचे आंबा उत्पादन आहे. त्यादृष्टीने आंबा विक्री सहकारी संस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. ' देवगड हापूस'चा दर्जा राखला जावा असाही प्रयत्न आहे. आंबा विक्री सह-कारी संस्थेचा, साखर कारखान्याप्रमाणे फंड उभारावा आणि त्यातून मग सर्वांगीण विकास साधावा अशी कल्पना आहे.

देवगड तालुक्याच्या शैक्षणिक प्रगतीबाबत आपले मत काय ? त्याबाबतीत आपल्या काय योजना आहेत?


देवगडच्या शैक्षणिक बाबतीत सुधारणा होणे आवश्यक आहे. देवगडमध्ये इंग्लीश मिडियमची शाळा असावी, कॉलेजमध्ये सायन्स शाखा असावी, कॉलेज-मध्ये बाहेरील विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहाची सोय असावी, देवगडमध्ये एखादे टेक्निकल हायस्कूल असावे.

मी स्वतः ४ नवीन हायस्कूलना (त्यातील दोन अनुदानासहित आणि दोन विना अनुदान) मान्यता


॥श्री॥

अरविंद इलेक्ट्रॉनिक्स

स्पेशालिस्ट इन स्टिरीओ साऊंड सिस्टीम



प्रोप्रा. अरविंद धडाम

१५८२ बी वॉर्ड श्री शाहु को-ऑपरेटिव्ह बँकेजवळ

मंगळवारपेठ, कोल्हापूर



॥ श्री ॥

लक्ष्मी कोल्ड्रींक्स



आमचे येथे लग्न, मुंजी इत्यादी

समारंभासाठी आइस्क्रीमच्या

ऑर्डर्स स्विकारल्या जातील.

प्रोप्रा : बाळ ओंबळकर


केळकर कॉलेज

मिळवून दिली, शिवाय दोन एस्. एस्. केंद्रामध्ये वाढ केली.

तांत्रिक शिक्षणाच्या दृष्टीने देवगडमध्ये काहीच सुविधा नाहीत. त्याबाबत I. T. I. साठी आपण प्रयत्नशील आहात काय ?

शिक्षण विकास मंडळाच्या वतीने देवगडमध्ये विना अनुदान तत्वावर I. T. I. सुरू करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार होते. मात्र आता शासनानेच आमच्या मागणीनुसार देवगड तालुक्यासाठी I. T. I. देण्याचे धोरण जाहीर केले आहे.

देवगड येथे औद्योगिक प्रगती फारशी दिसत नाही, कारणे काय?

देवगड येथे औद्योगिक प्रगती फारशी दिसत नाही याची अनेक कारणे आहेत. देवगड हे भौगोलिक-दृष्ट्या एका बाजूला आहे. दळणवळणासाठी योग्य सुविधा उपलब्ध नाहीत. [illegible] सर्वसामान्यांच्या दृष्टीने दोन गोष्टींमध्ये प्रगती झालेली दिसून येते. १५/२० वर्षांपूर्वीचा मच्छिमार आणि आजचा मच्छिमार यात फार फरक पडलेला आहे. शिवाय आंबा व्यवसायाचाही विकास झालेला आहे. [illegible] तरुण साधारणपणे एस्. एस्. सी. झाला की मुंबईला जातो इत्यादी कारणांमुळे औद्योगिक प्रगती फारशी दिसत नाही. तरीही इतर तालुक्यांच्या [illegible] दृष्टीने देवगड तालुक्याची प्रगती चांगली आहे.

औद्योगिक प्रगती[illegible]च्या दृष्टीने आपल्या काही भावी योजना आहेत [illegible] ?

औद्योगिक प्रगती [illegible]च्या दृष्टीने देवगडमध्ये औद्योगिक वसाहत निर्माण [illegible]ण्याच्या दृष्टीने प्रयत्न सुरु आहेत. आणि त्यासाठी शासनावर अवलंबून रहाण्याऐवजी सहकारी [illegible]वर व कार्यकर्त्यांच्या बळावर त्यांची उभारणी [illegible] की असा विचार चालू आहे. त्यादृष्टीने उद्यो[illegible]ची बैठक लवकरच बोलावण्यात येणार आहे.

देवगड येथे औद्यो[illegible] वसाहत झाली तर आपल्या परिसरात कोणते [illegible]ग उभारता येण्याजोगे आहेत ?

मच्छिव्यावसायिकांच्या दृष्टीने बर्फ कारखाना आणि आंब्यावर प्रक्रीया करणारे उद्योग यांचा प्रामुख्याने औद्योगिक वसाहतीत समावेश करता येईल, त्याशिवाय इंजिनियरिंग उद्योग आणि प्लॅस्टिक उद्योग सुरु करण्यासाठी काही उद्योजक उत्सुक आहेत.

कुणकेश्वर येथे पर्यटनस्थळ होण्याच्या दृष्टीने आपण काय प्रयत्न केलेत ?

एप्रिल १९८२ मध्ये सर्वप्रथम मी विजयदुर्ग आणि कुणकेश्वर येथे पर्यटनस्थळे निर्माण करण्याच्या दृष्टीने विधानसभेत प्रश्न उपस्थित केला. त्यावर विजयदुर्ग आणि कुणकेश्वर येथे सरकारी जागा उपलब्ध नाही म्हणून तो विचार सोडून दिला आहे असे मंत्री महोदयांनी सांगितले त्यावेळी जागा मोफत आम्ही मिळवून देतो असे सांगितल्यावर याचा विचार करावा, अशी सूचना अध्यक्षांनी मंत्री महोदयांना केली.

ग्रामपंचायतीने आवश्यक त्या इमारती बांधून द्याव्यात असाही एक विचार चालू आहे. लवकरच कुणकेश्वर पर्यटनस्थळ अंदाजपत्रकात येण्याची शक्यता आहे.

कोकण रेल्वेची प्रगती कितपत आणि कोकण रेल्वे आलीतर तर त्याचा फायदा कितपत होईल?

कोकण रेल्वेच्या आजच्या प्रगतीवरून असे वाटते की ती देवगड तालुक्यापर्यंत येण्यासाठी जवळजवळ चार पिढ्या लागतील त्याऐवजी मी मागच्या पावसाळी अधिवेशनात कोल्हापूर-देवगड अथवा कोल्हापूर-विजयदुर्ग असा रेल्वेमार्ग होण्याच्या दृष्टीने एक अशासकीय ठराव मांडला होता. रेल्वेमुळे प्रवासी वहातूक तर होईलच शिवाय औद्योगिकरणासही चालना मिळेल. वर नमूद केलेला रेल्वेमार्ग झाल्यास देवगड आणि विजयदुर्ग बंदरांच्या विकासासाठी प्रयत्न करता येईल आणि त्यामुळे या दोन्ही बंदरातून आयात निर्यात करता येईल व मुंबई बंदरावरचा बोजा कमी होईल.

विधानसभेच्या कामकाजाविषयी आपला अनुभव काय ?

कामकाजाविषयी स्वतःपुरता अनुभव चांगला आहे.

देवगड शहर व परिसर येथील पिण्याचा पाणीपुरवठा सध्या व्यवस्थित नाही. कर्मचारीवर्गही व्यवस्थित वागणूक देत नाही. याबाबत आपले काय मत ? कायम स्वरुपाची योजना आपल्या हाती आहे काय ?

मूळ योजना आखतानाच पाणीपुरवठ्याचा विचार व्हायला हवा होता. ज्या गावांना पाणी अपुरे आहे त्यांना छोट्या योजना करून पाणीपुरवठा केला असता तर हा प्रश्न निर्माण झाला नसता.

सर्व ग्रामपंचायतींनी एकत्र येऊन योजना राबविल्यास कर्मचारी वर्गावर लोकप्रतिनिधींचे नियंत्रण राहील.

दीड कोटीपेक्षा जास्त खर्चाची योजना झाल्याने ती यशस्वी व्हायलाच हवी, म्हणून या खात्यातील तज्ज्ञांशी चर्चा करून दोन भागात पाण्याचे साठे शोधून योजना राबविता येईल काय याचा निर्णय घेण्याच्या विचारात आहे.

ट्रायल बेसीसवर योजना चालविली
आजवरचा खर्च ५ लाख रुपये शासनाने माफ
असा प्रयत्न सुरू आहे.

कोकणातील किंवा देवगडमधील नद्या
लांबीच्या आहेत. त्या डोंगरउतारावरून वहात
त्याने त्याना गती असते. त्या गतीचा उपयोग
विद्युतनिर्मितीचे छोटे प्रकल्प उभारता येतील

विद्युतनिर्मितीचे प्रकल्प उभारता येतील
प्रकारे एकच कुणकवण-पीई हा पॉइंट आहे
विद्युतनिर्मितीसाठी तसा वाव नाही. कुणकव
या दृष्टीने पहाणी व्हावी असा प्रयत्न आहे

★★

ॐ


# मे. दत्तात्रय
## ऑईल मिल

☎ ८९

ॐ ब्रॅण्ड शेंगतेल व पेंडीचे
उत्पादक व वितरक

प्रोप्रा. मे. दत्तात्रय ऑईल मिल
कॉलेजरोड, कणकवली
जि. सिंधुदुर्ग (४१६६०२)

हार्दिक शुभेच्छा !



श्री. भास्कर गो. प
दाभोळे
ता. देवगड, जि. सि

## ॥ श्री. मुरलीधर जोशी यांच्याशी मत्स्यव्यवसायावर बातचित ॥



॥ गजानन तारी / बारावी वाणिज्य ॥

देवगड परिसरात या दहा-वीस वर्षांत मासेमारी प्रगतीपथावर वाटचाल करीत आहे. तिने परंपरागत पद्धतीची मासेमारी कधीच सोडून दिली आहे, आणि ती आता आधुनिक तंत्रांचा अधिकाधिक वापर करू लागली आहे. देवगड परिसरात ही आधुनिक मासेमारी विकसित करणारांमध्ये श्री. मुरलीधर जोशी यांचा सिंहाचा वाटा आहे. श्री. जोशी हे १९६८ मध्ये स्थापन करण्यात आलेल्या तारामुंबरी सहकारी मत्स्य व्यवसाय संस्थेचे चेअरमन असून ते देवगड तालुका इंदिरा काँग्रेसचे अध्यक्षही आहेत. गेल्याच वर्षी लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची महाराष्ट्र राज्य मत्स्योद्योग महामंडळावर ३ वर्षांसाठी नियुक्ती करण्यात आलेली आहे. देवगड परिसरात नौका बांधणीचे एकूण तीन कारखाने असून त्यातील एक कारखाना श्री. जोशी यांचा आहे. तो त्यांनी नोव्हेंबर १९६६ मध्ये देवगड येथे खाडीकिनारी सुरू केला. या सर्व पार्श्वभूमीवर देवगड परिसरातील प्रगत मत्स्योद्योगाबाबत त्यांची मुलाखत घेणे आवश्यक वाटले म्हणून मी त्यांना भेटलो.

मुलाखत देण्यास आपण का तयार झालो हें सांगताना श्री. जोशी म्हणाले, "आमचा तरुणवर्ग मुंबईला पोटापाण्यासाठी जातो. आपला पिढीजात व्यवसाय वाऱ्यावर सोडून, बाडबडलांची भूमी लाथाडून ! असा हा तरूणवर्ग यापुढे तरी आपला भाग सोडून जाऊ नये, त्याने इथेच आपले उपजीविकेचे साधन शोधावे; त्यावरच आपली अन् आपल्या भागाची प्रगती साधावी; असे मला वाटते. माझ्या मुलाखतीतून त्यांना तसे निश्चित वाटेल असे वाटते."

आपल्या पूर्वायुष्याबाबत थोडी माहिती देत असताना ते म्हणाले, "मासेमारीचा व्यवसाय आम्ही आजोबांपासून करतो आहोत. १९५७ साली मी ठाणे जिल्ह्यातील सातपाटी येथे मच्छिमारीचं शिक्षण घेतलं. नंतर खाजगी स्वरूपाच्या बांगडा वाहतूक कंपनीत मी ऑईलमन् म्हणून नोकरीस आरंभ केला. पुढे १९६० ते ६३ या ३ वर्षांत मुंबई किनाऱ्यालगत मान्सुनच्या प्रचंड पावसात मासेमारी करण्याचं धाडस केलं आणि एक विक्रमच प्रस्थापित केला. पुढे १९६६ पर्यंत मत्स्य व्यवसाय खात्यातर्फे सिंधुदुर्ग – रत्नागिरी जिल्ह्याच्या समुद्रातील कोळंबी माशाचे संशोधन केले. नंतर नोकरी सोडून दिली आणि आपली मायभूमी हेच कायमचं कार्यक्षेत्र ठरवून कामास लागलो."

१९६० च्या दरम्यान देवगड परिसराची मासेमारीबाबत काय अवस्था होती, या प्रश्नाला उत्तर देताना श्री. जोशी म्हणाले, "आमचे मच्छिमार बांधव त्यावेळी परंपरागत पध्दतीने मासेमारी करीत होते. त्यांना त्यातून फारसा पैसा मिळत नव्हता. कसंतरी पोट भरत होतं एवढंच! शिवाय त्याकाळी मासेमारीची आधुनिक तंत्रंही इथल्या मच्छिमारांना फारशी माहीत नव्हती."

आपण या परिस्थितीत सुधारणा व्हावी म्हणून [illegible] पावलं उचलली, असं श्री. जोशींना विचारलं [illegible]ता ते म्हणाले, "एकट्या–दुकट्याच्या बळावर [illegible] आधुनिक तंत्रांचा अवलंब करण्यापेक्षा सर्व मच्छिमार [illegible] बांधवांना एकत्रित केलं तर ते अधिक फायद्याचं ठरेल; [illegible] असा विचार करून मी तारामुंबरी सहकारी मत्स्य व्यवसाय संस्थेची १९६८ मध्ये स्थापना केली आणि [illegible] कार्यास लागलो. आज या संस्थेचे ३६० सभासद असून



रसराजला हार्दिक शुभेच्छा !



श्री.
बापू काशिनाथ केळकर
दाभोळे
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

रसराजला हार्दिक शुभेच्छा !

सरस्वती टाईपींग इन्स्टीटयूट
आणि
फाटक क्लासेस

जामसंडे (४१६६१२)

प्रोप्रा.– मधुसूदन वा. फाटक

केळकर कॉऊज

सिंधुदुर्ग जिल्ह्यात 'ए' ग्रेडची आमची ही एकमेव सहकारी संस्था आहे." पुढं ते म्हणाले, "नौकाबांधणीचा कारखाना त्यावेळी देवगड परिसरात एकही नव्हता. म्हणून मी नोव्हेंबर १९६६ मध्ये तो सुरू केला. सध्या देवगड बंदरात एकूण ४८ यांत्रिक नौकांपैकी माझ्या कारखान्यात तयार झालेल्या २२ नौका आहेत. देवगड बंदरात १९६५ च्या सुमारास माझ्या 'सरस्वती' नावाच्या बोटीच्या आगमनानं येथल्या मासेमारीच्या यांत्रिक युगास प्रारंभ झाला, असं म्हटलं तर ही अतिशयोक्ती होणार नाही. त्या बोटीच्या मदतीनं मी येथल्या लोकांना आधुनिक पध्दतीनं मासेमारी करण्यास शिकवलं."

मासेमारीतील आधुनिकीकरणाविषयी बोलताना ते म्हणाले, "सुमारें १९६३ पासून येथें ट्रॉलिंग पध्दतीने मासेमारी करण्यात येऊ लागली. काही अडचणीमुळे याहून प्रगत पध्दतींचा इथं अवलंब करता येत नसल्याने सध्याही हीच पध्दत आधुनिक स्वरुपाची म्हटली जाते. जाळ्यांच्या बाबतीतही खूपच सुधारणा झालेली आहे. पूर्वी तागाच्या सुताची जाळी वापरत. पुढे ताग मिळेनासा झाल्यावर कापशी सुताची जाळी वापरण्यात येऊ लागली. परंतु कापशी सुत हे चिखल व पाणी यामुळे कुजून जाउन तुटू लागलं. म्हणून काही काळानंतर जाळ्यांसाठी टायरमधून निघणाऱ्या नायलॉनच्या धाग्याचा वापर केला जाऊ लागला. अशा प्रकारची जाळी पूर्वी हाताने विणली जात. अशी जाळी ट्रॉलरवर एकूण ४०–५० लागतात. त्यामुळ गैरसोय होऊ लागली. त्यातूनच सफेद नायलॉनच्या जाळ्यांचा मार्ग निघाला. शिवाय ही जाळी यंत्रांवर तयार केली जातात. हे यंत्र दिवसाला २० जाळी तयार करु शकतं. अशी यंत्र रत्नागिरी व गोवा इथच आहेत."

मासेमारीच्या प्रकाराबाबत बोलताना श्री. जोशी म्हणाले, "तरत्या कल्ल्यांच्या जाळ्यांची मासेमारी रात्री केली जाते. कारण रात्री पृष्टभागावरील पाणी थंड असल्यानं मासे थंडाव्यासाठी पृष्टभागावर आलेले असतात; तर तळाची कल्ल्यांच्या जाळ्यांची मासेमारी दिवसा केली जाते. त्यात वागळी मुशी, शेंगळा हे मासे सापडतात."

देवगड बंदरात कोळंबी (चिंगुळ–Prawns) हा मासा अधिक प्रमाणात सापडतो. त्याबाबत बोलताना श्री. जोशी म्हणाले, "आमची कोळंबी रत्नागिरीहून जपानला जाते आणि तेथून Made in Japan असा त्यावर शिक्का मारून ती साऱ्या जगाला पुरविली जाते. या संदर्भात मी एक स्वप्न उराशी बाळगून आहे आणि तें असें की, येथली कोळंबी Made in Deogad अशा शिक्यासह साऱ्या जगाला पुरवण्यात आम्ही यशस्वी ठरू."

तारामुंबरी सहकारी मत्स्य व्यवसाय संस्थेच्या प्रगतीबद्दल, तिच्या भावी वाटचालीबाबत प्रश्न विचारला असता ते म्हणाले, "अगदी अलीकडच्या काळापर्यंत मच्छिमार आपले मासे खाजगी व्यापाऱ्याला विकत असत. तो व्यापारी जो दर सांगे, त्या दरानं त्याला आपले मासे विकावे लागत. परंतु आम्ही मच्छिमारांचा फायदा व्हावा म्हणून ऑक्टो. ८३ पासून आमच्या संस्थेतर्फे मासे मच्छिमारांकडून विकत घेऊ लागलो आहोत. यामुळं मच्छिमारांचा फायदा सध्या होत असला; तरी आमच्या संस्थेला मात्र झळ सोसावी लागत आहे. कारण मासे तावडतोब बाजारपेठेत पाठवण्यासाठी संस्थेच्या मालकीची वाहनं नाहीत. शिवाय गोठवण केंद्राची येथे सोय नसल्यानें आणि पुरेसा बर्फ उपलब्ध होऊ शकत नसल्याने नुकसान फार होतं. श्री. पद्माकर जोशी यांचा २ टन बर्फ तयार करणारा कारखाना असला, तरी तो अपुरा पडतो. कारण मासेमारीच्या हंगामात रोज ४० टन बर्फाची आवश्यकता असते म्हणून आम्ही संस्थेचं एक गोठवण केंद्र येत्या ५ वर्षात देवगडला उभारण्याच्या प्रयत्नात आहोत. अशी गोठवण केंद्रं फक्त रत्नागिरीलाच असून ती आठच्या आठ सर्व खाजगी स्वरूपाची आहेत. आमचं गोठवण केंद्र उभारण्यासाठीं १५ लाख रुपये खर्च येईल."

महाराष्ट्र राज्य मत्स्योद्योग महामंडळावर श्री. मुरलीधर जोशी लोकप्रतिनिधी म्हणून मार्च ८३ मध्ये नियुक्त झाले. त्यांच्या या नियुक्तीला वर्ष झाले आहे, म्हणून "या वर्षभरात आपण या महामंडळात राहून मत्स्योद्योगासंदर्भात काय प्रयत्न केले", असा प्रश्न श्री. जोशींना विचारला. उत्तरादाखल ते म्हणाले,–

"आमच्या महामंडळाच्या बैठकांमध्ये आम्ही वेगवेगळी धोरणे ठरवून त्यातून काही योजना आखल्या आहेत. सहकारी व व्यापारी तत्त्वावर मासेमारी करण्यात यावी, असा एक ठराव आम्ही संमत करून घेतला आहे. आपल्या इकडच्या बोटींना खोल समुद्रात जाऊन तसेच किनाऱ्यापासून लांबवर जाऊन मासेमारी करता येत नाही. म्हणून केंद्र सरकारतर्फे सिंगापूर, तैवान येथून त्यांच्या तंत्रज्ञांसह बोटी भाड्याने आणून येथे मासेमारी करण्याची एक योजना आम्ही आखली आहे. ह्या बोटी मासेमारीसाठी आपला समुद्रकिनारा वापरणार असून त्याबदल्यात ते महामंडळाला ७५ लाख रु. भाडे देणार आहेत; शिवाय त्यांच्या तंत्रज्ञांच्या हाताखाली आपले महाराष्ट्रीय तंत्रज्ञ तयार करण्यात येणार आहेत. या बोटी समुद्रकिनाऱ्यापासून १०० कि. मी. च्या पलीकडील समुद्रातच मासेमारी करतील. तसेच या वर्षापासून तलाव व धरणे येथील मासेमारीविषयीचा सर्व व्यवहार आम्ही महामंडळाच्या कक्षेत आणला असून त्यात नवनवीन योजना आम्ही आखत आहोत. आतापर्यंत कलकत्ता वगैरे भागातून मत्स्यबिजांची आयात महाराष्ट्राला करावी लागत असे. आता महाराष्ट्रातच मत्स्यबीज तयार करण्याचा प्रयत्न आम्ही सुरु केलाय. अलीकडेच सरकारनं डिझेल खरेदीसाठी मच्छिमारांना सबसिडी जाहीर केली असून त्यावरील विक्रीकरही माफ करण्यात आला आहे. अशा परिस्थितीत डिझेल खरेदीसाठी सहकारी संस्थांना महामंडळातर्फे आर्थिक सहाय्य पुरवण्याची आम्ही एक योजना तयार केली आहे. जाळी तयार करण्याचा एक कारखाना कणकवली किंवा देवगड येथे महामंडळातर्फे उभारण्याचा माझा प्रयत्न सध्या सुरू आहे."

आनंदवाडी प्रकल्पाबाबत सध्या खूप गाजावाजा झाला आहे. म्हणून त्याबाबत परिस्थिती काय आहे, असं श्री जोशींना विचारता ते म्हणाले, ' आम्ही हा प्रकल्प अस्तित्वात यावा म्हणून आम. दादा राणे यांच्या साहाय्यानं १९७८ पासून सरकारदरबारी प्रयत्न करीत होतो. शेवटी आता कुठे यश आले आहे. नुकतीच केंद्र सरकारच्या सर्व्हे पथकानं व सांख्यिकी पथकानं त्या दृष्टीनं येथील सर्व पाहणी केली आहे. हा प्रकल्प केंद्र सरकार व महाराष्ट्र सरकार या दोघांनी हाती घेतला असून त्यासाठी ४ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. अर्थात् हा प्रकल्प प्रत्यक्षात यायला ४ – ५ तरी वर्षे निश्चितच लागणार आहेत." या प्रकल्पाचं स्वरूप व त्यापासून होणारे फायदे सांगताना श्री. जोशी म्हणाले, "अगदी बंदराजवळच मोठा भक्कम असा सिमेंटचा धक्का बांधला जाईल. या धक्याला मोठमोठ्या बोटी येउन थांबू शकतील. आणि मासळीही किनाऱ्यावर उतरून घेणें एकदम सुलभ होईल. एका वेळेला ४० नौका धक्याला थांबू शकतील, या धक्याच्या जवळच मच्छिमारांच्या सर्व व्यावसायीक गरजा भागवल्या जातील.

श्री. मुरलीधर जोशींबरोबर बातचीत करता करता कधी वेळ संपून गेला हे कळलंच नाही. मुलाखतीतून, बातचितीतून जे कळलं ते एकून मला मनोमन खात्री पटली की, देवगड या १० – २० वर्षात एक मासेमारीचं उच्च प्रतीचं भारतातलं केंद्र होणार, श्री. जोशी यांच्या कार्याचं, प्रयत्नाचं फळ प्रत्यक्षात लवकर दिसो, अशी मी परमेश्वर चरणी प्रार्थना करून त्यांचा निरोप घेतला.



# स्नेहसंमेलन : क्षणचित्रे



प्रमुख पाहुणे **श्री. शं. ना. नवरे–**
'आजुबाजूच्या निसर्गातून हिरवा रंग टिपावयाचा असतो व पिऊन घ्यावयाचा असतो.'




भाषणात तल्लीन
झालेला श्रोतृसमुदाय



**नाटक– साष्टांग नमस्कार**

आनंद प्रभुदेसाई, राजेंद्र हिंदळेकर, जयंत साटम, श्रीकांत धुपकर व मिनाक्षी तारकर.




⇐ 'तिसरी घंटा'–
ज्योती जोग, जयश्री पारकर,
अनघा कुलकर्णी व नीता कुलकर्णी.

~★~




⇐ 'गजा नाटक करतो'–
दिलीप सारंग, प्रसाद मोंडकर, उदय फाटक
नथुराम उपरकर व संजय पाळेकर




'साष्टांग नमस्कार'– ⇑
राजेंद्र हिंदळेकर, आनंद प्रभुदेसाई व
अंजली नलावडे.

'साडी उडाली आकाशी'–
अनघा कुलकर्णी, सिंधू कोरगावकर व प्रवीणा सावंत ⇓





हापूस



आंब्याची



कहाणी

'फळांचा राजा हापूस आंबा' हे कोकणचे आणि विशेष करून देवगड तालुक्याचे भूषण आहे. देवगडचा हापूस आंबा हा सर्वच बाबतीत जगप्रसिध्द आहे. त्याची गोडी तर अवीट आहेच पण रंग – रुपही तितकेच मोहक आहे.

आंबा हे देवगड तालुक्यातील उत्पन्नाचे प्रमुख साधन आहे. या देवगड तालुक्यात आंब्याच्या लागवडीचे प्रमाण हे समुद्रकिनाऱ्यापासून १० ते १२ मैलापर्यंत जास्त प्रमाणात आढळते. देवगड तालुक्यात ५० ते ६० % लोक हे आंब्याचा व्यापार करतात. देवगड तालुक्यात आंब्याचा व्यापार करणारे लोक स्थानिक आहेत. देवगड तालुक्यामधील अंदाजे ७ ते ८ हजार एकर क्षेत्र हे आंब्याच्या लागवडीखाली आहे व

# ॥ असा आहे हापूस आंबा ॥

## ॥ मिलिंद केळकर / प्रथम वर्ष कला ॥

त्यामध्ये सुमारे अडीच लाखाच्या दरम्यान कलमांची संख्या आहे. तालुक्यातील साधारण ९५% कलमे ही हापूस जातीची असून ५% पायरी, माणकूर, मालगोस इत्यादी प्रकारची आढळतात.

आंब्याचा दर्जा उत्तम राखण्यासाठी व भरपूर उत्पन्न मिळविण्यासाठी येथील बागायतदार सर्वसाधारणपणे खालील तीन प्रकारच्या कलमांची लागवड करतात.

**जोड कलम–** आंब्याचा बाठा (लहान रोप) मातीच्या कुंडीमध्ये वाढवून कलमाच्या फांदीला एकमेकांची साल काढून जोडून कलम तयार करतात. याला जोड कलम असे म्हणतात. ही कामगिरी सर्वसाधारणपणे जानेवारी व फेब्रुवारी या महिन्यात करतात. कलम पूर्णपणे जोडले जाईपर्यंत बाठ्याच्या कुंडीमध्ये पाणी घालावे लागते. सुमारे ४ ते ५ महिन्यांनी असे कलम पूर्णपणे सांधले जाते व ते लागवडीस

योग्य असे होते. देवगड तालुक्यात अशाच कलमांची लागवड प्रामुख्याने केली जाते.

**खुंटी कलम–** रायवळ आंब्याच्या झाडाला जमिनीपासून सुमारे १ ते १½ फूट उंचीवर हापूस कलमाच्या सुमारे १ फूट लांबीच्या फांदयांच्या (टाळी) खुंटचा जून-जुलै महिन्यामध्ये भरतात. साधारणपणे माघ, फाल्गुन महिन्यात ह्या खुंटयांना पालवी फुटू लागते. ह्या खुंटया जगल्या अशी खात्री झाल्यावर खुंटया भरलेल्या जागेच्या वरती रायवळ आंबा तोडून टाकण्यात येतो. अशाप्रकारे केलेल्या कलमास ' खुंटी कलम ' असे संबोधतात.

**कोय कलम–** आंब्याच्या बाठेला कोंब फुटल्यापासून आठ ते दहा दिवसाच्या आत कलमाची लहान फांदी त्या कोंबाला जोडून (कोंबात भरून) जे कलम केले जाते त्याला कोय कलम असे म्हणतात.

**कलम लागवडीची पध्दत–** पाण्याच्या निचरा होणाऱ्या डोंगर उताराच्या जमिनीत आंब्याच्या कलमांची लागवड करतात. पाणी साचणाऱ्या जमिनी-मध्ये कलमे होत नाहीत. सर्वसाधारणपणे दर एकरी तीस याप्रमाणे कलमे समान अंतरावर लावली जातात. कलम लावण्यासाठी तीन फूट लांब, तीन फूट रुंद व तीन फूट खोल असा खड्डा खणतात. त्या खड्यामध्ये इतर झाडांची मुळे आली असल्यास ती काढून टाकतात. त्याचप्रमाणे खड्याच्या आजुबाजूस दगड-गोटे असल्यास तेही काढुन टाकतात. नंतर खड्यात इतर झाडांचा पाला–पाचोळा जाळतात, तसेच तो खड्डा दोनफूट पर्यंत चांगली माती घालून बुजवतात व नंतर त्यावर कलम लावून उरलेला खड्डा शेण व माती यांनी भरुन टाकतात. यावेळी जर गोबर गॅसचे शेण मिळाले तर ते जास्त फायदेशीर ठरते. कारण त्या शेणात कीड-मुंगी होत नाही व त्याचा खत म्हणून जास्त चांगल्या प्रकारे उपयोग होतो.

वरील पध्दत साधारणपणे जिथे माती आहे अशा ठिकाणी वापरून कलमे लावतात. पण जर लागवडीच्या जागी माती पुरेशा प्रमाणात नसेल किंवा कातळ असेल, तर दोन फूट लांब, दोन फूट रुंद व एक फूट खोल एवढा खड्डा मारुनही कलमांची लागवड करतात. अशा प्रकारे लावलेली कलमे तुलनेने कमी वर्षे जगतात.

कलमांची लागवड जून महिन्यात करतात. पण सर्व प्रथम कलमे लावायच्या क्षेत्राला कंपाउंड घालणे हे अत्यावश्यक आहे. कारण कलमांची कोवळी पालवी जर गुरांनी खाल्ली तर कलमांची वाढ खुंटते किंवा कलम मरण्याचीही शक्यता असते. त्याचप्रमाणे कलमांचे वाऱ्यापासून रक्षण करण्यासाठी वाऱ्याच्या दिशेला शक्य असल्यास दगडी किंवा झापांचा आडोसा करणेही तितकेच आवश्यक आहे.

कलमे लावल्या पासून पहिली तीन वर्षेपर्यंत ती शिपावी लागतात. तसेच पहिल्या वर्षी प्रत्येक कलमाला १/२ किलो युरिया व गोबर गॅसचे शेण

*With Best Wishes From*

**RATNA CANNING INDUSTRIES**

*Industrial Estate*

**RATNAGIRI**

घालतात, तर दुसऱ्या वर्षी प्रत्येकी १ किलो युरीया वापरतात. नंतर तिसऱ्या वर्षी लेंडी (शेळयांची) प्रत्येकी सुमारे दोन घमेली, संपूर्णा, अगर स्टॅरॉमिल प्रत्येकी दोन किलो याप्रमाणे घालतात. त्यानंतर कलमाच्या वाढीप्रमाणे संपूर्णा, स्टॅरोमिल, रॅलिमिल अगर अन्य रासायनिक खते वापरतात.

वरील सर्व गोष्टी शक्य नसतील तर काही जण फक्त इतर झाडांचा पाला–पाचोळा (आला) कलमाच्या मुळात घालून वर माती टाकतात.

**कलमांचा विस्तार–** पूर्ण वाढ झालेली सखल व खोलगट भागातील कलमें सर्वसाधारणपणे ५० फूट उंच वाढतात, तर कातळावरील कलमे १५ ते २० फुटापर्यंतच उंच वाढतात; तर दोन्ही ठिकाणच्या कलमांचा घेर १५ ते ५० फुटापर्यंत असू शकतो.

**उत्पन्नाची सुरुवात–** कलम लावल्यापासून साधारणपणे ५ ते ६ वर्षे वयाला फळे द्यायला सुरुवात करते. परंतु कलमांचे खरे तारुण्य हे १५ ते २० वर्षानंतरच सुरु होते. नंतर २० ते २५ वर्षानंतर कलम एक वर्षाआड धरु लागते. म्हणजे २० वर्षानंतरच कलमाचे खरे उत्पन्न मालकाला मिळू लागते. कारण सुरुवातीला ५ ते १५ वर्षापर्यंतचे कलमापासूनचे उत्पन्न, कलमांची निगा व जोपासनेसाठी खर्च होते, व नंतर १५ ते २० वर्षापर्यंत खर्च भागून सर्वसाधारणपणे निव्वळ उत्पन्न मिळू लागते व अशाप्रकारे कलम ४० वर्षानंतर जरी एक वर्षाआड येऊ लागले तरी ते उत्पन्न निव्वळ स्वरुपाचे असते. अशाप्रकारे पूर्ण वाढ झालेले कलम एका वेळी सर्वसाधारणत: ३००० ते ४००० फळे देते. परंतु असे भरघोस उत्पन्न देणाऱ्या पिकाला मेहनतही तितकीच करावी लागते.

**उत्पन्नाचा कालावधी–** साधारणपणे डिसेंबर ते मे अखेर पर्यंतचा कालावधी हा आंब्याच्या झाडापासून उत्पन्न मिळवण्याचा व त्यासाठी मेहनत घेण्याचा असा असतो. आंब्याच्या झाडाच्या फुलाला 'मोहोर' असे म्हणतात. झाड मोहोरले म्हणजेच फुलले होय. सर्वसाधारणपणे नोव्हेंबर अखेर ते डिसेंबर महिन्यापासून कलमाला मोहोर येण्यास सुरुवात होते. हा मोहर हवा, जमीन कलमाची निगा व मशागत ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे फेब्रुवारीपर्यंत येत असतो. समुद्र किनाऱ्यापासून ४ । ५ मैल अंतरापर्यंतची कलमे नोव्हेंबर ते डिसेंबर ह्या कालावधीत कमी-जास्त प्रमाणात मोहरतात व जसजसे समुद्र किनाऱ्यापासून दूर जावे तसतसे कलम मोहरण्याचा कालावधी हा फेब्रुवारी पर्यंत लांबतो.

**फवारणी–** देवगड तालुक्याचा विचार करता डिसेंबर, जानेवारी व फेब्रुवारी हे तीन महिने बागायतदार निरनिराळ्या प्रकारची कीटकनाशके मोहरावर फवारुन आंब्यांचे उत्पादन वाढविण्यासाठी झटू लागतात. तुडतुड्यासारख्या अनेक कीटकांपासून मोहराचे रक्षण करण्यासाठी ही कीटकनाशके फवारली जातात. देवगड तालुक्यातील बागायतदार साधारणपणे थायोडॉन, डिमेक्रॉन, झोलोन इत्यादी कीटकनाशके वापरतात. मोहोर आल्यापासून ते फळ टिकेपर्यंत कीटकनाशकांचे प्रमाण कमी-अधिक करुन साधारणपणे ६ ते ७ फवारण्या (प्रत्येक झाडावर) करतात. कारण किटकापासून मोहराचे रक्षण करणे ही फार महत्वाची बाब आहे. अन्यथा मोहोर येऊनही कीटकांच्या त्रासाने झाडावर फळ लागू शकत नाही; किंवा टिकू शकत नाही, कीटकनाशकांची फवारणी ही हातपंप किंवा पायपंपाच्या सहाय्यानेच केली जाते.

**तोडणी–** सर्वसाधारणपणे एप्रिलच्या पहिल्या आठवड्यापासून आंबा तयार होऊ लागतो. डिसेंबर जानेवारीमध्ये आलेल्या मोहराचा आंबा तयार होण्यास चार महिने लागतात; तर त्यानंतर आलेल्या मोहराचा आंबा तीन महिन्यातच तयार होतो. अशाप्रकारे हवेत ज्याप्रमाणे उष्णता वाढेल त्याप्रमाणे आंबा तयार होण्यास निसर्गाची मदत होते. आंब्याच्या देठाशी थोडासा खोलगट भाग दिसू लागला म्हणजे फळ तयार झाले असे समजतात. अशा तयार फळांची तोडणी करून ती विक्रीसाठी पाठविली जातात. तोडणी हाताने व घळाच्या सहाय्याने केली जाते. हाताला लागणारी फळेच हातानें तोडतात व उंचावरील फळे तोडण्यासाठी 'घळाचा' वापर करतात. हा घळ बांबूच्या सरळ लांब काठीला एका टोकाला तारेचा गोल बसवून व त्याला दोऱ्याची जाळी लावून तयार

करतात. तारेच्या गोलाला, बांबूच्या टोकाच्या बाजूला आंब्याचे देठ पटकन तुटण्यासाठी लोखंडी ब्लेडस् लावतात. आंब्याच्या विक्रीच्या दृष्टीनें आंब्याला देठ असणें आवश्यक असतें. देठ तुटल्यावर त्याच्यातून डींक (रस) बाहेर येतो व त्यामुळे फळाचा मोहकपणा कमी होतो. असा देठासकट आंबा तोडण्यासाठी ह्या ब्लेडस्‌चा उपयोग करतात: अशा प्रकारे तोडणी केलेले आंबे बेळाच्या टोपल्यांतून जेथे भरणी (पॅकींग) करतात. अशा ठिकाणी माणसांच्या सहाय्याने किंवा बैलगाडीच्या साहाय्याने आणले जातात.

**भरणी—** यानंतर तोडणी करुन आणलेल्या मालाची (आंब्याची) त्यांच्या आकार व रंगरुपा-प्रमाणे चार प्रतीत विभागणी करतात. पहिल्या व दुसऱ्या प्रतीचा (एक नंबर व दोन नंबर) माल पत्र्याच्या ट्रंकेत पद्धतशीरपणे भरतात. असा उत्तम आंबा एका ट्रंकेत ६॥ ते ७॥ डझनपर्यंत राहू शकतो. तसेच नंबर तीन व चारचा माल हा लाकडी पेटीत भरतात. देवगड तालुक्यातून अशा अनेक प्रकारात पेट्या पाठवतात. अशा पेटीत साधारणपणे ६ ते ७ डझनपर्यंत आंबा रहातो. आंबा सुरक्षितपणे बाजार-पेठेपर्यंत जाण्यासाठीं ट्रंकेत व लाकडी पेटीत गवताच्या दोन थरामध्ये आंब्याचा एक थर अशा प्रकारे भरला जातो. नुसत्या गवतात तयार आंबा लवकर पिकतो. तो पिकू नये यासाठी व गवताचे तण लागून आंब्याचा नैसर्गिक मोहकपणा कमी होऊ नये म्हणून आंब्याच्या थराच्या वर व खाली रद्दीचा आकर्षक पणे वापर केला जातो व नंतर ट्रंक किंवा लाकडी पेटी ही सुंभाच्या (दोरी) साहाय्याने बांधतात. अशाप्रकारे तयार केलेले हे पार्सल देवगडमधून सर्वसाधारणपणे मुंबईच्या क्राफर्ड मार्केटमध्ये पाठवितात. वरील चार प्रतीत मालाची विभागणी करुन जो माल उरतो त्याला 'गाळ' असे म्हणतात. असा माल बेळाच्या करंड्यां-मध्ये फक्त गवताचा उपयोग करुन पॅक करतात व मुंबईलाच पिक्या मालाच्या बाजारपेठेत पाठवतात. प्रत्येक ट्रक, पेटी किंवा करंड्यावर माल पाठवणाऱ्या बागायतदाराच्या व माल घेणाऱ्या दलालाच्या नावाची अद्याक्षरेही लिहिलेली असतात.

श्री. सदाशिव हरी केळकर
कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड.
—० व ०—
'रसराज' च्या देवगडदर्शन विशेषांकाला आमच्या शुभेच्छा !

**क्वालिटी सी एंटरप्राईझेस**
विजयदुर्ग, ता. देवगड
पिन : ४१६८०६ ☎ ३१
**कलम बागायतीसाठी घाऊक दरात कोंबडी शीट आणि मासळी खत मिळेल.**

**बाजारपेठ—** देवगड तालुक्यातील बहुतेक सर्व आंबा हा विक्रीसाठी मुंबई येथील बाजारपेठेत पाठवितात. तसेच अगदी किरकोळ पुणें किंवा कोल्हापूर येथील बाजारपेठेत पाठवतात. काही आंब्याचे कॅनिंग करून ते मुंबईस तसेच स्थानिक बाजारपेठेत विक्रीसाठी उपलब्ध असतात. देवगड तालुक्याचा आंबा हा परदेशात पाठविला जातो. परिणामी भारताला परकीय चलन प्राप्त होते. (उदा. अरब राष्ट्रे) मुंबईच्या तुलनेने पुणें व कोल्हापूर येथे दर खूपच कमी असतो.

**वाहतूक—** देवगड तालुक्यातील सर्व आंबा हा ट्रकच्या साहाय्यानेंच मुंबई बाजारपेठेत पाठवला जातो. देवगड तालुक्याला अशा प्रकारे मुंबईला आंबा वाहतूक करणाऱ्या सहा सेवा आहेत. प्रत्येक बागायतदार आपल्या बागेत किंवा घरी आंब्याचे पॅकिंग करून ट्रंक, पेटी किंवा करंडी वाहतुकीस तयार करून ठेवतात व वरील सहा सेवेतील ठराविक ट्रक तो माल त्या जागेवर येऊन नेतात. म्हणजेच बागायतदाराच्या बागेस किंवा घराजवळ ट्रक येऊन माल नेत असल्यामुळे ही सेवा अत्यंत सुलभ व सोयीची झाली आहे. साधारणपणे गोगटे, ठाकुरदेसाई, शिरसाट, गोरे इत्यादी वाहतूक कंपन्या प्रत्येक पार्सलमागे (ट्रंक / पेटी / करंडी) ९ रु. ते ११ रु. पर्यंत वाहतूक खर्च आकारतात. देवगड तालुक्यातून दरवर्षी साधारणपणे अशा प्रकारची ५ ते ६ लाख पार्सले मुंबईला रवाना होतात. आणि त्यांची किंमत अंदाजे ५ ते ६ कोटी रुपये एवढी येते.

**भाव—** मार्च / एप्रिलमध्ये पाठवल्या जाणाऱ्या आंब्याला मुंबईमध्ये सर्वसाधारणपणे ७५ ते १०० रुपये डझन असा भाव मिळतो. तोच भाव एप्रिल / मे मध्ये २५ ते ५० रुपये डझन असा मिळतो; तर त्यानंतर पाठविल्या गेलेल्या मालाला १० ते १५ रुपये डझन एवढाच भाव मिळतो.

**इतर व्यवसायांना चालना—** आंबा व्यवसाय हा केवळ आंबा बागायतदारानाच पैसा मिळवून देतो असे नाही; तर त्यांच्या बरोबरच अनेक कामगार व कारागिरांनाही तो पैसा, काम मिळवून देतो. देवगड तालुक्यात आंबा सिझनला साधारणपणें ३५०० ते ४००० कामगारांना हंगामी का होईना, काम मिळते. दररोज १० ते २० रु. पर्यंत प्रत्येकाच्या कौशल्याप्रमाणे कामगारांना वेतन दिले जाते. तसेच या व्यवसायामुळे रद्दी, सुंभ तारचुक (खोके, लाकडी पेट्या) ट्रंका, करंडी, तसेच ट्रंका दुरूस्त करणारे, व खोके बनविणाऱ्या सुतार लोकांनाही काम मिळते. त्याचप्रमाणे वाहतूक कंपन्या व ट्रकमालक यांनाही हा व्यवसाय भरपूर पैसा देऊन जातो.

सध्या कलमांची नवीन लागवड करताना महागाईमुळे खर्च फार येतो. त्याचप्रमाणे दलालांकडे मुंबईला जी विक्री येते त्यातील सुमारे ५० ते ६०% हा प्रत्येक वर्षीचा खर्च आंबा बागाईतदाराला करावा लागतो. कलम जरी वयात आले तरींसुद्धा त्याला फळ येणे हे नशिबावर व निसर्गावर अवलंबून आहे. बाकी शेतीपिकासारखे हे नक्की मिळणारे उत्पन्न नव्हे. उदाहरणार्थ ऊस, भुईमुग, कपाशी, द्राक्षे यासारखे नगदी उत्पन्न नव्हे. वरील जातींची लागवड केल्यावर एकावर्षाच्या आत अगर ठराविक वेळेला कमी–जास्त का होईना परंतु नक्की उत्पन्न मिळते. परंतु कलम एखादे वेळेला २ । ३ वर्षे सलग मोहरतच नाही. असे असल्याने ते वरील पिकाइतके भरवशाचे उत्पन्न नव्हे.



## ज्याँ पॉल सार्त्र

"ज्याँ पॉल सार्त्र यांचे जीवन आणि तत्वज्ञान न्याहाळले म्हणजे नकार देण्याची ताकद कशी असते याची कल्पना येते. त्यांनी दिलेले नकार प्रचंड होते. ते बुद्धीने तत्वज्ञ होते, पण तत्वज्ञाचे (कांटसारखे) विशुद्ध अर्थशोधक जीवन जगण्यास त्यांनी नकार दिला. नोबेल पारितोषिक मिळविण्यासाठी पाश्चात्य लेखक जीव टाकीत असतात, पण त्यांनी नोबेल पारितोषिक स्वीकारण्यास चक्क नकार दिला. सिमॉन द बावॉ सारखी स्त्री म्हणजे त्यांच्या दृष्टीने आदर्श पत्नी, पण तिच्याशी लग्न करण्यास त्यांनी नकार दिला. त्यांना सार्वजनिक, राजकीय जीवनाची हौस होती, कीर्तीचीही हौस होती, पण त्यासाठी कोणत्याही पक्षाची शिस्त पाळण्यास त्यांनी नकार दिला. त्यांनी सर्वात मोठा आणि महत्वाचा नकार दिला तो फ्रान्स व्यापून बसलेल्या नात्सी सत्तेला. हा नकार म्हणजे प्रत्यक्ष मृत्यूला आव्हान होते, त्याहीपेक्षा ते जीवनात सुरा खुपसणाऱ्या छळवादाला होते. आणि तरी त्यांनी नात्सी सत्तेला बेमुर्वत नकार दिला. त्यांनी मुळी जीवनाची व्याख्याच नकार अशी केली.

त्यांच्या तत्वज्ञानातच हा नकार रुतून बसलेला आहे. या बाबतीत त्यांनी, त्यांच्या राष्ट्राचाच महान तत्वज्ञ देकार्त याचे शिष्यवत् अनुकरण केले. देकार्तने आपला तात्विक प्रारंभच एका नकाराने केला. हा नकार म्हणजे विश्वास ठेवण्यास नकार. त्याने प्रारंभी प्रत्येक गोष्टीवर विश्वास ठेवण्याचे नाकारले. प्रत्येक गोष्टीचे अस्तित्वच नाकारले. हे बाह्य दृश्य जग, स्वतःच्या मनाखेरीज इतर मने, स्वतःचे शरीर स्वतःच्या आठवणी, स्वतःच्या संवेदना याना नकार देऊन त्याने तात्विक शोधास सुरवात केली. पण त्याला स्वतःच्या जाणिवेस नकार देता येईना, कारण नकार देणे म्हणजे जाणीवच. जाणिवेचा वापर केल्याखेरीज नकार देण्यास काही अर्थच उरत नाही. म्हणून त्याने निष्कर्ष काढला की, ' मला जाणीव आहे. मी विचार करतो, म्हणूनच मी आहे. येथे त्याच्या अविश्वासाचा अंत झाला. मीच्या अस्तित्वातून ईश्वराचे अस्तित्व सिद्ध झाले.

जाणिवेच्या शोधापासून तत्वज्ञानाच्या शोधास सुरवात करण्याचा हा धडा, सार्त्रंनी देकार्तपासून व्यवस्थित घेतला. या जाणिवेतच त्यांना आपल्या अस्तित्ववादाचा शोध लागला!"

**प्रभाकर पाध्ये**


।। श्री गजानन प्रसन्न ।।

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड व रसराजला

**हार्दिक शुभेच्छा !**

**श्री.**

**पांडुरंग रामचंद्र भिडे**

**आंबा बागाईतदार**

**मु. पो. नाडण**

ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

# ॥ आंबा वहातूक सेवा ॥

॥ छाया कुलकर्णी / तृतीय वर्ष कला ॥

हापूस आंबा सालीने पातळ व नाजूक असल्या-कारणाने त्याची वाहतूक योग्य व काळजीपूर्वक होणे अत्यंत आवश्यक आहे. या दृष्टीकोनातून आंबा वाहतूक सेवा संस्थांचे महत्व लक्षात येते.

देवगड तालुक्याचा विचार करताना एक गोष्ट लक्षात येते की १९४९–५० पर्यंत आंबा वाहतूक ट्रक-सहाय्याने होत नव्हती. १९५० पूर्वी आंबा वाहतूक बोटीने अथवा गलबताने होत असे. त्यावेळी रस्तेवाह-तूक अथवा बाहतुकीची साधने सोयीस्कर उपलब्ध नव्हती. खाडी किनाऱ्या जवळचा आंबा डोई ओझ्याने, बैलगाडीने, होडीने बंदरावर आणावा लागत असे. बोटीला तळघरामध्ये आंबा पार्सल्स ठेवण्याची व्यवस्था होती. त्यासाठी असलेल्या घसरगुंडी सारख्या चढउतारीमुळे आंबा खराब होत असे. काहीवेळेस तर मुंबई वहातुकीमध्ये प्रतिकूल हवेमध्ये आंबा वाटेतच कुजून जात असे.

याकाळात आंबा लागवड विस्तारावरोबर आंबा वाहतूक साधनांचा विस्तार व विकास होत नव्हता. बोट वाहतुकीमध्ये १५०० पेक्षा जास्त आंबा पार्सल असतील तर बोटीमध्ये भरताना आयत्यावेळी माल घेण्याचे नाकारत असत त्यामुळे आंब्याचे अतोनात नुकसान होत असे. आंबा बागायतदारांची वाहतुकीची समस्या सोडविण्यासाठी पहील्याप्रथम जामसंडे येथील कै. श्रीराम मोरेश्वर गोगटे तथा बापुराव गोगटे यांनी १९५० च्या सुमारास स्वतःच्या एका लहान ट्रकने स्वतःचा आंबा व त्याच्या जोडीला अन्य बागायतदारांचा आंबा भरुन आंब्याच्या ट्रक वाहतूक व्यवसायाला शुभा-रंभ केला. या काळात ट्रक वाहतूक करणे अत्यंत अवघड असल्याने आठवड्यात दोन वेळा आंबा वाहतूक

होत असे. मुंबई–गोवा असा महामार्ग नव्हता अथवा रस्त्याचे डांबरीकरण देखील झालेले नव्हते. त्यामुळे मुंबईला पोहचण्यासाठी व्हाया कोल्हापूर किमान १८ / १९ तासांचा कालावधी लागत असे. याच सुमारास तालुक्यात श्री जांभेकर (विजयदुर्ग) श्री. काका शिरसाट, भटवाडी कंपनी, खानविलकर पडेलचे श्री. ठाकुरदेसाई इत्यादीकडून आंबा वाहतूक ट्रकने नियमितपणे सुरु झाली. मुंबई बाजारपेठेमध्ये देवगडचा हापूस आंबा वेळेवर पोहोचण्यासाठी कै. बापूंनी आंब्याची जलद सेवा सुरु केली. आज आंबा वाहतूक सेवेमध्ये आमुलाग्र बदल घडून आलेला आहे. आज आंबा बागायतदार आपापल्या बागेतल्या आंब्याच्या पेट्या अथवा ट्रक भरुन ठेवतात. तालुक्यातील निर-निराळ्या वाहतूक कंपन्यांचे एस. टी. प्रमाणे गावोगाव फिरते वेळापत्रक असते. त्यासाठी तालुक्यात जवळपास १५० ट्रक्स हंगामात आंबा वाहतुकीची कामे करत असतात. यामध्ये काही ट्रक्स वाहतूक कंपनीच्या मालकीचे असतात, तर काही बाहेरील म्हणजे सांगली, कोल्हापूर येथील भाडोत्री स्वरुपाचे असतात. आंबा वाहतुकीचा हंगाम मार्च ते जुलैपर्यंत असतो. सुरुवातीला कैरीची देखील वाहतूक करण्यात येते. १५ एप्रिल ते १५ मे हा आंबा वाहतुकीतील गर्दीचा हंगाम असतो.

आंब्याची पेटी अथवा ट्रंकेची वाहतूक करताना कायम स्वरुपाच्या मजुरांना ३० ते ३५ रु. दैनंदिन मजुरी मिळते. हंगामी स्वरुपाच्या मजुरांना १५ रु. दैनंदिन मजुरी मिळते.याबरोबर काही लोकांना पावत्या करण्याचे काम उपलब्ध होते. यांचा मासीक पगार साधारणत: ६०० रु च्या आसपास असतो. याशिवाय कारकुनी पेशाची दिवाणजीवजा देखील काही माणसे यामध्ये काम करीत असतात.

हापूस आंब्याच्या वाहतुकीसाठी भरणी (Packing) करीत असताना प्रतवारी करण्यात येते. उत्कृष्ट चांगल्या प्रतीचा आंबा ट्रंकात भरण्यात येतो. एका आंबा पार्सलमध्ये (ट्रंक, पेटी अथवा करंडी) साधारणपणे ६ ते ७ डझन आंबे असतात. एका पार्सलसाठी येणारा वाहतूक खर्च १० रु असतो. एका आंब्याचे


रसराजला हार्दिक शुभेच्छा !

श्री. अविनाश भालचंद्र गोखले

-०- जनरल मर्चंट -०-

मु. पो. विजयदुर्ग
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

रसराजला हार्दिक शुभेच्छा !

श्री. गोविंद नारायण जोशी

-०- प्रसिद्ध आंबा बागाईतदार -०-

मु. पो. इळये
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

वजन ५०० ते ६०० ग्रॅम पर्यंत असू शकते. प्रत्येक पार्सलमध्ये प्रतवारीनुसार चिठ्ठी असते. एका ट्रकमध्ये ३०० ते ३५० पार्सले असतात. त्याचे वजन अंदाजे १० टनाच्या आसपास असते. देवगड तालुक्यातून दरवर्षी ४ ते ५ लाख आंबा पार्सलांची वाहतूक करण्यात येते. त्यामध्ये गोगटे वाहतूक सेवा संस्था १.२५ ते १.५० लाख पार्सलांची वाहतूक करते. एका पार्सलची अंदाजे किंमत ७००–८०० रु. एवढी असते. १९८२–८३ मध्ये एका डझनाला २०० रु. भाव मिळालेला होता. आंबा व्यवसायातील हा उच्चांक मानण्यात येतो. वर्षाकाठी ४ ते ५ लाख पार्सलची वाहतूक, विक्री करून वाहतूक संस्था ६ ते ७ कोटी रु. उलाढाल करीत असतात.

देवगड हापूस आंब्याची मुख्य बाजारपेठ मुंबई आहे. पूर्वीचे क्रॉफर्ड मार्केट आणि आताचे महात्मा-ज्योतिबा फुले मार्केट होय कुवेत अरब राष्ट्रे, इंग्लंड या राष्ट्रात काहीशा प्रमाणात हापूस आंब्याची निर्यात होते.

आंबा बागायतदारांचे मुंबईतील दलाल ठरलेले असतात. दलालांचे कमीशनाचे दर ८% असतात. आंबा व्यतिरिक्त इतर फळांवर १०% आहे. मुंबईतील दलालांमध्ये श्री. धोंडबा राणे, अनभवणे, वा. गो. राणे पाळेकर, लेले या काही कोकणातल्या दलालांचा समावेश होतो. याशिवाय सातारा, पन्हाळा, पुणे येथील दलालांचा भरणादेखील मोठ्या स्वरूपाचा आहे. आंबा दलाल काहीवेळेस आंबा बागायतदारांना खर्चासाठी अथवा आंबा लागवड व उत्पादनांसाठी उचल स्वरुपात पैसे देत असतात. त्याची कपात आंबा विक्री रकमेतून करण्यात येते. आंबा बागायतदारांना विकलेल्या आंबा मालाची गिसर पावती मिळत असते. जूनपूर्वी आकडेपट्टी मिळते. जूनपर्यंत आंबा विक्रीचा पैसा रोख अथवा चेकच्या स्वरुपात आंबा बागायतदारांना उपलब्ध होतो. विविध आंबा बागायतदारांना दलालाकडूनचो आंबा विक्रीची रक्कम देण्याचो सोय गोगटे वाहतूक कंपनीमध्ये आहे. आंबा वाहतुकीमध्ये मुंबई मार्केटची जागा अपूरी आहे. पूर्वीची रोजची आवक १५०० पार्सल होती आता ती १५००० झाली. कृषी–उत्पन्न बाजार समिती कायद्यानुसार येथे सुविधा उपलब्ध नाहीत. मुंबई मार्केटमध्ये गाड्या उतरण्याचे काम २४ तास चालू असते. देवगडहून ११ – १२ तासात मुंबईला पोहोचून देखील लगेच गाडीचा नंबर लागत नाही. त्यासाठी रांगेत थांबावे लागते. काहीवेळेस ही रांग बोरीबंदर-पर्यंत जाते. आंबा वाहतूक हंगामाच्या वेळी रहदारी नियंत्रणाच्या नावाखाली पोलीसांकडून ट्रकवाल्यांना फार त्रास होतो. प्रवेशासाठीही ट्रकवाल्यांना बराच खर्च करावा लागतो. दुसरे असे की मार्केटमध्ये 'हमाल' म्हणून इतर लोक पार्सलाची चढउतार करीत असताना पार्सल चोरीची भिती असते. पार्सल गहाळ झाले तर वाहतूक कंपन्याना नुकसान भरपाई भरुन द्यावी लागते. मुंबईमध्ये काही फेरीवाले, हातगाडीवाले दोन नंबरचा रत्नागिरीं येथील आंबा 'देवगडचा' हापूस आंबा म्हणून विकण्याचा प्रयत्न करतात. आंबा मार्केटमध्ये सुधारणा करण्यासाठी सहकारी पद्धतीद्वारे आंब्याची खरेदीव्यवस्था असावी. मुंबईशिवाय संपूर्ण कोकणात १० । १५ ठिकाणी खरेदी केंद्रे असावीत. मुंबई मधील रहदारी पोलिसांकडून होणारा त्रास कमी करण्यात यावा. बाजारपेठेसाठी विस्तीर्ण जागा उपलब्ध असावी.



A work of art is the unique result of a unique temperament. Its beauty comes from the fact that the author is what he is. It has nothing to do with the fact that other people want what they want. Indeed, the moment that on artist takes notice of what other people want, and tries to supply the demand, he ceases to be an artist, and becomes a dull or an amusing craftsman, an honest or dishonest tradesman. He has no further claim to be considered as an artist.

**OSCAR WILDE**

तरच आंबा वाहतूक व्यवसायाचा विकास आणखी होऊ शकेल.

गेल्याकाही वर्षात पेटीमागे २५ पैसे आकारुन गोगटे वाहतूक संस्थेने व इतर आंबा कंपन्यांनी तालुक्यातील शिक्षण संस्थांसाठी निधी उभारुन शिक्षण क्षेत्रात विधायक स्वरुपाचे कार्य केलेले आहे. त्याचेच अनुकरण इतर वाहतूक संस्थानी केले तर निश्चितच तालुक्याचा शैक्षणिक, सामाजिक विकास होऊ शकेल यात शंका नाही.

जागतिक कीर्तीच्या 'देवगड हापूस' ची वाहतूक व्यवस्था सर्वस्वी विविध ट्रक वाहतूक सेवा मार्फतच उत्तम प्रकारे होत असते. देवगड तालुक्यातील वाहतूक व्यवस्थेचे अनुकरण जर इतरत्र करण्यात आले तर एकूण आंबा व्यवसायाला ते अधिक फायदेशीर ठरेल.

सध्या देवगड तालुक्यात आंबा वाहतूक करणाऱ्या पुढील सेवा उपलब्ध आहेत.


### देवगड विभाग

१) गोगटे आंबा वाहतूक सर्व्हिस, जामसंडे
२) शिरसाट आंबा वाहतूक सर्व्हिस, देवगड
३) भटवाडी आंबा वाहतूक सर्व्हिस, जामसंडे

### विजयदुर्ग विभाग

१) सन्मित्र आंबा सर्व्हिस, विजयदुर्ग
२) काझी आंबा सर्व्हिस, वाघोटण
३) बी. जी. ठाकुरदेसाई आंबा वाहतूक सर्व्हिस, पडेल
४) गोगटे आंबा वाहतूक सर्व्हिस, नाडण

या सेवा संस्थांच्या कार्यामुळे आंबा बागायतदारांना एक प्रकारचा दिलासा व समाधान मिळालेले आहे.



हार्दिक शुभेच्छा !

डॉ. विजय गोपाळ वेलणकर आणि बंधू

नाडण
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

।।श्री।।
रसराजला हार्दिक शुभेच्छा !

– पोकळे –
मेडिकल स्टोअर्स
मु. पो. पडेल

आमचेकडे सर्व प्रकारची
देशी व विदेशी
औषधे मिळतील.

देवगड तालुक्यात आंबा ह्या फळावर प्रक्रिया करणारा असा एकमेव कारखाना असून त्याचे नांव 'द्वारका' फुडस् आहे. त्याचे मालक श्री. सुनील विष्णू ठाकूर हे आहेत. हा कारखाना देवगडपासून सुमारे ५ कि. मी. अंतरावर देवगड–कुणकेश्वर ह्या मार्गावर आहे. ह्या कारखान्याची स्थापना डिसेंबर १९७७ साली झाली. ह्या कारखान्याच्या स्थापनेमागचा उद्देश म्हणजे स्थानिक लोकांना आपल्याकडील आंब्याला योग्य किंमत मिळावी, तसेच पर्यायी बाजारपेठ मिळावी आणि लोकांमध्ये सौदाशक्ती वाढावी हा होय.

मुख्य कच्चामाल म्हणजे आंबा! देवगड तालुका हा आंब्याच्या उत्पादनात अग्रेसर म्हणून ओळखला जातो. त्यामुळे कच्चामाल विपुल प्रमाणात आणि योग्य भावातही उपलब्ध होऊ शकतो. त्याचबरोबर आंबा बागाईतदारांनाही आपल्या आंब्याला स्थानिक ठिकाणी योग्य किमत मिळू शकल्यामुळे त्यांच्या

# ।। फळ प्रक्रिया प्रकल्प ।।

**।। प्रदीप धुवाळी / अकरावी कला ।।**

आंब्यासाठी केवळ मुंबई बाजारपेठ असलेल्या ठिकाणी धावावे लागत नाही. मात्र सुरुवातीला आपल्या आंब्याला ते मुंबई बाजारपेठच पसंत करतात. कारण त्यावेळी त्यांना स्थानिक दरापेक्षाही जास्त भाव मिळू शकतो. जसजसा मार्केटमध्ये आंब्याच्या किमतीत उतार होतो, तसतसा ते आपला माल स्थानिक ठिकाणीच विकण्याचे पसंत करतात.

हा कारखाना आंब्याच्याच उत्पादनावर अवलंबून असल्यामुळे आंब्याचा हंगाम लक्षात घेता हा कारखाना केवळ चाळीस दिवसच चालतो. इतर वेळी आंबा लोणची, आंबा सरबते, आंबा जाम, आंबा टॉफी इत्यादी पदार्थ तयार केले जातात. सर्व मिळून हा कारखाना चार महिने चालतो. इतर वेळात हंगामानुसार मिळणाऱ्या इतर फळांवर प्रक्रिया करण्याचा विचार आहे. मात्र अजून तशी सुरुवात केलेली नाही.

ह्या कारखान्यामुळे २० कामगारांना १९८३ साली चाळीस दिवस रोजगार उपलब्ध झाला. त्याव्यतिरिक्त दोन कामगार हे कारखान्यात व्यवस्थापन आदी कामासाठी कायम स्वरुपाचे आहेत. ह्या कामगारांना त्यांच्या पात्रतेनुसार रोज पगार दिला जातो. कमीत–कमी पगार सध्या रोज दहा रुपये असा आहे.

हा कारखाना स्थापन होण्याच्या कामी महाराष्ट्र बँक (जामसंडे) कोंकण विकास महामंडळ, सिकॉम, डी. आय. सी. रत्नागिरी ह्यांचे सहाय्य झाले आहे. ह्या व्यतिरिक्त श्री. व्ही. जे. ठाकूर आणि श्री. के. जे. ठाकूर यांचेही मौल्यवान मार्गदर्शन लाभले आहे.

ह्या कारखान्यामध्ये सध्या मुख्यत: दोनच मोठी यंत्रे आहेत. ती म्हणजे 'पल्पर' आणि 'सिमर' ही होय. पल्पर म्हणजे आंब्याचा रस काढण्याचे यंत्र, तर सिमर म्हणजे आंब्याचा रस डब्यात भरुन झाल्यावर ते डबे बंद करण्याचे यंत्र होय. पल्परची क्षमता दरताशी २०० किलो आंब्याचा रस काढण्याची असून 'सिमर' ची क्षमता दर मिनिटाला आठ डब्यांची आहे. बंद केलेले डबे कितीही वर्षे अगदी व्यवस्थित टिकू शकतात.

१९८३ साली ह्या कारखान्यात आठ टन, आंब्याच्या रसाचे ८५० ग्रॅमचे डबे इतके उत्पादन झाले. तसे पहाता हे उत्पादन फारच कमी आहे. १९८४ पासून मोठ्या प्रमाणात उत्पादन करण्याचे उद्दिष्ट आहे.

स्थानिक बाजारपेठेत लोणची, सरबते मोठ्या प्रमाणात विकली जातात. मात्र रसाच्या डब्याच्या विक्रीसाठी योग्य स्थानिक बाजारपेठ नाही. मुंबई हेच मुख्य बाजारपेठ ठिकाण आहे आणि मुंबईला मोठ्या प्रमाणात मागणीही आहे. बाजारपेठेच्या सोयीसाठी सरकारी पातळीवर खरेदी होण्याची नितांत आवश्यकता आहे.

ह्या कारखान्याला काही समस्यांनाही तोंड द्यावे लागते. मुख्यत: वीज आणि पाणी ह्यांची समस्या आहे. कच्चा माल हा नाशवंत असल्यामुळे आणि शीतगृहाची सध्यातरी सोय नसल्यामुळे त्या-त्या वेळीच कच्चा माल वापरावा लागतो. त्यादृष्टीने विचार करता, वेळेवर वीज आणि योग्यवेळी भरपूर पाणी मिळणे अत्यंत आवश्यक आहे. अजूनही पाणी आणि वीज योग्यवेळी उपलब्ध होऊ शकत नाही.


कच्च्या मालाची विपुलता लक्षात घेता आणखीही अशाप्रकारचा कारखाना स्थापन करण्यास वाव आहे.

---

**पाश्चात्य प्रतिभा**

"स्त्रियांच्या बाबतीत शेक्सपिअरइतका उदार दृष्टिकोन दुसऱ्या कोणाचाही आढळत नाही. या बाबतीत रस्किनने शेक्सपिअरची प्रशंसा करताना जे विधान केले आहे ते प्रसिद्ध आहे. रस्किन म्हणतो की, शेक्सपिअरमध्ये नायक नाहीतच. त्याने निर्माण केलेल्या नायिकांच्या मानाने नायक फिके पडतात हे त्याच्या 'कॉमेडीज्' च्या बाबतीत अक्षरश: खरे आहे. 'ट्रॅजेडीज्' मध्ये त्याने घडविलेले स्त्रियांचे दर्शन उदात्त, सच्छील आणि त्यागाला सिद्ध होणाऱ्या व्यक्तिचेच आहे. क्वचित वाघिणीसारख्या हिंस्त्र अशा किंग लिअरच्या मुली किंवा पेरीक्लीस नाटकातील कर्दम मार्ग चोखाळणाऱ्या स्त्रियांचे दर्शन त्याने घडविले आहे. पण एकंदरीने शेक्सपिअरची स्त्री-सृष्टी हा एक अमोल ठेवा आहे ह्यात शंका नाही. शैशवापासून वार्धक्यापर्यंत मानवी जीवनाच्या सर्व अवस्था त्याने चित्रित केल्या आहेत. गुन्हेगारापासून तो परोपकारीपणात धन्यता मानणाऱ्या उदारापर्यंत, बेकारीने त्रस्त झालेल्या क्षुद्रापासून तो सम्राटापर्यंत सर्व थरातील माणसे या सृष्टीत आपले अंतर्याम उघड करुन दाखवीत आहेत. वांशिक सरमिसळीची कथासुद्धा त्यावर फारसा भर न देता परंतु अत्यंत सहानुभुतीने शेक्सपिअरने दोन वेळा तरी रंगविली आहे."

## इथे मोल ना दामाचे....



राष्ट्रीय सेवा योजना समिति

★

सुनंदा भांडारी, अलका हर्डीकर, प्रा. सुरेश सोनटक्के, प्रा. ल. दा. गोलतकर, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी प्रा. शशिकांत धुमाळ, प्रा. एस्. बी. घोळवे, अनिल गावडे, प्रकाश मराठे


## मुठ्ठीमें है तकदीर हमारी ।






## हमने किस्मत को बसमे किया है ॥

## भेटीगाठी...




श्री. गफूरभाई ठाकूर यांच्यासम वेत प्राचार्य व इतर

★ ★



कोकण कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रतापराव साळवी व
रत्नागिरी मत्स्य महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. संकोळींची भेट.



# मत्स्यावतार



# ‘ मासा एक खाद्य पदार्थ ’

अन्न-वस्त्र-निवारा या माणसाच्या मुलभूत गरजा आहेत.
अन्न ही तर अत्यंत महत्वाची गरज आहे.
आणि ही देवगडच्या इतर वैशिष्टयाप्रमाणे वैशिष्टयपूर्ण अशीच आहे.
घाटावर भाकरीचे जे महत्व आहे, तसे इथे मासळीचे.
भात आणि माशाचे कालवण हे येथील मुख्य जेवण होय.
भाजी हा प्रकार या दहा-पंधरा वर्षातच देवगडला परिचीत आहे.
भाजीच्या ऐवजी माशाचेच निरनिराळे पदार्थ जेवणात केले जातात.
येथील लोक जेवणात बाराही महिने (पावसाळयातील काही दिवस वगळता) ताजी मासळी वापरतात.
हे येथील खास वैशिष्टयच म्हणावे लागेल.
सरंगा, इसवण, पापलेट, गुंजली, सुळे, शेतकं, चिंगूळ, तिसऱ्या, मुळे, सौंदाळे, दोडी हे तऱ्हतऱ्हेचे मासे येथे मिळतात.
सुरमई (इसवण), कोळंबी (चिंगूळ), पापलेट हे येथे मिळणारे वैशिष्टयपूर्ण मासे आहेत.
माशाची पातळभाजी म्हणजे ‘भुजणं’ आणि माशाची आमटी हे दोन प्रकार सामान्यतः कुठल्याही मांसाहारी घरी नेहमी आढळतात.
कोळंबी या माशाचे पॅटीस करता येते, विहनेगर वापरुन टिकाऊ स्वरुपाचे लोणचे बनवता येते, मसाले भाताप्रमाणे कोळंबी भात करता येतो, कोळंबी शिजवून कबाब तयार करता येते.
पापलेट माशाचेही कोळंबीप्रमाणे कबाब बनवता येतात.
खोबऱ्याची चटणी भरुन ते तळून ‘ भरलं पापलेट ’ तयार करता येते.
याशिवाय कुठल्याही माशाची टोमॅटो घालून चटणी करता येते.
एकंदरीत पहता शाकाहारी भोजनातील पदार्थाप्रमाणे माशाचे चटणी, पॅटीस लोणचे, भात असे विविध पदार्थ तयार करता येतात.

# जीवनदाता मासा....

कामिनी जोशी
अकरावी वाणिज्य

मुंबई – गोवा रस्त्याला नांदगाव तिठ्यावरुन एक फाटा निघतो. ४० कि. मी. ची डांबरी सडक थेट अरबी समुद्रापर्यंत. देवगडला येणारा हा प्रमुख रस्ता. रस्त्याच्या दुतर्फा छोटी खेडी, हापूस आंब्यांच्या तुरळक बागा आणि काळाशार कातळ. २५०० मि. मी. पाऊस पडूनही सतत पाण्याची टंचाई, कारण कातळावरून पडणारे पाणी लगेच अरबी समुद्रात जमा होते आणि जाताना आपल्या सोबत जमिनीवरील सर्व प्रकारची सकस द्रव्ये घेऊन जाते. आणि म्हणूनच इतर बाबतीत निसर्गाने कानाडोळा केला. तरी या देवगड तालुक्याचा सुमारे ५० कि. मी. लांबीचा समुद्रकिनारा ही देवगडला मिळालेली निसर्गाची फार मोठी देणगी आहे. अतिशय समृद्ध किनारा, विजयदुर्ग, देवगडसारखी दोन मोठी बंदरे, नैसर्गिकरित्या सुरक्षित. मिठबांव, मुंबरी, आचऱ्यासारखी छोटी मच्छीमार बंदरे, आणि विजयदुर्गपासून आचऱ्यापर्यंत, विजयदुर्ग देवगड, मुंबरी मिठबांव, आचरा या पाच नद्या सतत गाळाच्या रुपाने सागरी जीवनखाद्य पुरविणाऱ्या.

निसर्गाच्या पार्श्वभूमीवर या तालुक्याची अर्थव्यवस्था सागरलक्ष्मीवर आधारीत असल्यास नवल नाही. कारण काळ्या कातळावर पैदा होणारा हापूस ही काही मर्यादित लोकांची मक्तेदारी असल्यामुळे त्यातून मिळणारा पैसा पुंजीपतींच्या पुंजीतच अधिक जमा होतो. त्याचा लाभ सर्वसामान्य माणसाला फारच थोड्या प्रमाणात मिळतो. मात्र सागरातून निघणारी लक्ष्मी ही गरिबापासून श्रीमंतापर्यंत सर्वांच्या खिशाला स्पर्श करते. त्यामुळे आजतरी देवगडची अर्थव्यवस्था ही मासेमारी धंद्याशी बांधील आहे. मासळीचा हंगाम जितका तेजीमंदीत चालेल तितकी तेजीमंदी बाजारपेठेत दृष्टोत्पत्तीस येते. सामान्य माणसाच्या चेहऱ्यावरचे रंगसुद्धा त्याच प्रमाणात बदलतात. अशी ही सर्वांचा समावेश करणारी, सर्वांच्या सुखदुःखाशी निगडीत असलेली मासेमारी चालते तरी कशी ? त्याचे घटक कोणते ? त्याची साधने कोणती ? याचा आपण विचार करू.

१९६४ सालपर्यंत या ठिकाणची मासेमारी ही फक्त प्रचलित पारंपारिक पद्धतीच्या मासेमारीपुरतीच मर्यादित होती. म्हणजेच यांत्रिकीकरणाचा स्पर्श मासेमारीला झाला नव्हता. पारंपारिक पद्धतीमध्ये प्रामुख्याने रापणी, छोट्या शिडाच्या होड्यांच्या सहाय्याने समुद्रातील गरकड न्हई बुडीची मासेमारी आणि पावसाळ्यात खाड्यांच्या अंतर्गत भागातून चालणारी पागील, एवढेच मासेमारीचे प्रकार अस्तित्वात होते. यांत्रिकीकरणाची जोड नसल्याने या सर्वच मासेमारीच्या मर्यादा ठरलेल्या होत्या. कारण पावसाळा संपून सुरवातीचा सराईचा काळ आला की रापणी सुरु होते. न्हईची मासेमारी याचवेळी सुरु होते. कारण हा काल माशांचा अंडी घालण्याचा असतो. अंडी घालण्यासाठी मासे किनाऱ्यालगतच्या समुद्रात येतात. वल्ह्यांच्या आणि शिडाच्या होड्यांनी शक्य नस-

त्याने जवळच्या समुद्रात मासे येतील त्याचवेळी मासेमारी करावयाची हा संकेत, त्यामुळे हा काळ ऑक्टोबर-नोव्हेंबर मध्ये संपून जायचा. त्यानंतर बुडीच्या मासेमारीचा काळ जानेवारी ते मार्च म्हणजे मध्ये १ ते १।। महीना मासेमारी बंद. त्यानंतर पुन्हा एप्रिल-मे मध्ये अखेरची मासेमारी. समुद्राच्या लहरीवर अवलंबून असणारी. म्हणजे एकूण मासेमारीचा हंगाम वर्षाकाठी पाच महिने. आणि तोही जवळच्या समुद्रात म्हणजेच १५ वाव पाण्याच्या खोलीपर्यंत. रापणीची मासेमारी तर अगदीच मर्यादित क्षेत्रात म्हणजे किनाऱ्यापासून ५ ते ६००० फुटापर्यंतच चालते. तेवढ्या हद्दीत मासे येतील तेव्हाच ते रापणीत मिळणार. या सर्व मासेमारीत मिळणारी मासळी म्हणजे सरंगा, सुरमई, पापलेट, धोमा, बांगडा, तारली, शेंगाळा इ. थोडी मासळी तळाची, थोडी पृष्ठभागावरची, पण सर्वत मासळीचे उत्पादन आणि त्यावर गुंतलेले माणूस-बळ यांचा मेळ कधीच बसत नसे. त्याचमुळे १९४८ ते १९६० या मुदतीत या तालुक्यातला बराचसा तरुणवर्ग मुंबईसारख्या शहरात नोकरीसाठी गेला. तिथे त्यांना गोदीविभाग, पोलीसदल यामध्ये नोकऱ्याही मिळाल्या. सुरक्षित पगाराची हमी अधिकाधिक तरुणांना आकर्षीत करून गेली आणि तालुक्यातील मच्छिमार खेडी ओस पडत चालली. पर्यायाने ४० ते ६० माणसांची सतत गरज असलेले रापणासारखे धंदे बंद पडत चालले. मासेमारीचा व्यवसाय नष्ट होतो की काय अशी अवस्था निर्माण झाली.

आणि याच सुमारास यांत्रिकी पद्धतीच्या बोटींनी ट्रॉलींग पद्धतीने मासेमारी करण्याच्या कल्पनेस जोर आला. १९६० मध्ये शासनाने मच्छेच्या चार नौका बांधून संपूर्ण कोकणकिनाऱ्याची यादृष्टीने पहाणी केली. आणि ३।४ वर्षात आपला अहवाल तयार केला. त्याचे फलित म्हणजे मासेमारीचे आज दिसणारे चित्र, यांत्रिक नौकांची सतत वाढणारी संख्या आणि मुंबईच्या तरुणांना, बिगर मच्छीमार तरुणांनासुद्धा नोकऱ्या सोडून या धंद्यात शिरण्याचे वाटणारे आकर्षण १९६० मध्ये या देवगड बंदरात मासेमारीसाठी पहीला ट्रॉलर आणला तो जोशी बंधूंनी. त्यानंतर गेल्या १७ वर्षात बंदरातील ट्रॉलर्सची संख्या १०० च्या आसपास गेली, तरी बंदरात मासेमारी करणाऱ्या ट्रॉलर्सची संख्या ५०० असते. या पाचशे नौका किमान ५ महीने या बंदरातून मासेमारी करतात. आणि कोळंबी, पाप-लेट, बळे, ढोमा, शेंगटी, सुरमई, गेंजर या सर्वच प्रकारच्या मासळीचा अक्षरश: दररोज शेकडो टनांचा उपसा समुद्रातून केला जातो. अर्थात् एवढ्या प्रचंड प्रमाणावर येणाऱ्या मासळीची विल्हेवाट लावण्यासाठी शेकडो माणसांची त्यात गुंतवणूक होणे अपरिहार्यच आहे. कारण ताजी मासळी खेडोपाडी नेऊन विकणारी सुमारे ५०० माणसे काम करतात, तर तितकीच माणसे मासळी खारवून सुकी मासळी पाठविण्याचा धंदा करतात. कोळंबीची डोकी काढण्याच्या पाच सेंटरमध्ये सुमारे ३०० बायका काम करतात. तर लाँचेसनी पकडलेली टाकाऊ मासळी फिशमिलसाठी वाळविण्याचे काम दुसरी २०० माणसे करतात. मासळी विक्रीचे जवळजवळ ५० एजंट, दोन सोलायट्या, चार वर्कशॉप, २ बोटबिल्डींगचे कारखाने स्पेअर पार्टस् व मासेमारी साधनांची ४ दुकाने, ४ फिशमिल, एक बर्फ फॅक्टरी हे सगळे या एकाच


रसराजला हार्दिक शुभेच्छा !

**श्री भावकादेवी सॉ मिल**

(वारीकवाडी)

मु. पो. पडेल

आमचे येथे सर्व प्रकारचे चिरकाम सुबक व योग्य दाराने करुन मिळेल.

प्रोप्रा : सोनू हरी वारीक

धंद्याचे पुरक धंदे. मासळीची आवक वाढल्यामुळे वहातुकीचा धंदा तेजीत आला. काही नवीन ट्रक्स, टेंपो वाढले. लोकांना इकडे तिकडे ये—जा करण्यासाठी रिक्शांची आवक वाढली आणि मासळीची ओझी उचलण्यासाठी तर स्थानिक मजूर मिळेनासे झाले. म्हणून थेट विजापुरहून २०० ते ३०० कामगार दरवर्षी येऊन हमालीची कामे करतात. ही झाली नुसती माशांची विल्हेवाट लावण्याची कामे. प्रत्यक्ष मासेमारीच्या नौकांची संख्या वाढल्यामुळे त्यावर काम करणारे कसबी, निमकसबी कामगार तर सुमारे दोन हजार लागतात त्यांची आज तरी टंचाईच जाणवते. कारवार मंगलोरपासून ते थेट पूर्वकिनाऱ्यावरील मच्छिमार कामगार आणण्याची आजच पाळी आली आहे.

मासळीचे जितके प्रकार, तितकी त्यांची विक्रण्याची ठिकाणे वेगळी. कोळंबी परदेशात पाठवण्यासाठी प्रक्रिया केली जाते तर इतर बरीचशी मासळी खारवून अंतर्गत भागात पाठविली जाते. बळ्यांना मंगलोरला मार्केट फार. त्यामुळे तिकडचे व्यापारी इकडे येऊन बळे खरेदी करतात व सुकवून मंगलोरला पाठवतात. शेंगटीला आसाम, नागालॅंडमध्ये मागणी. त्यासाठी यु. पी. चे भैया देवगला येऊन शेंगटी धुरावर वाळवतात व गोणी भरुन नागालॅंडला पाठवतात. फिशमिल पावडरला तर देशाच्या अनेक भागातून पोल्ट्रीसाठी, खतासाठी मागणी असते. पापलेट, सुरमई-सारखे किमती मासे ट्रक्स भरुन मुंबई, पुणे, बेळगाव कोल्हापूर इत्यादी मार्केटमध्ये खाण्यासाठी विकले जातात.

देवगडची अर्थव्यवस्था ही आंबा आणि मासेमारी यामध्ये विभागलेली आहे, असे मानण्यात येते. मासेमारी व्यवसायासाठी एक सहाय्यक उद्योग म्हणून बर्फउद्योगाचे महत्वाचे स्थान आहे. देवगड तालुक्यात देवगड बंदरानजीक श्री. पद्माकर जोशी यांचा बर्फ-उद्योग आहे. त्याची स्थापना १९७१ मध्ये झालेली आहे. त्यावेळी भांडवल गुंतवणूक ९०,००० रु. होती. आज ही किंमत १५०,००० रु. पर्यंत वाढलेली आहे.

या उद्योगासाठी फार मोठ्या प्रमाणात कच्च्या मालाची गरज भासत नाही. केवळ पाण्यावर प्रक्रिया करून बर्फ तयार करण्यात येतो. ही पद्धत फारच सोपी, सुटसुटीत आहे.

बर्फासाठी केवळ स्थानिक बाजारपेठ आहे. मासे साठवून ठेवण्यासाठीं बर्फाचा वापर करण्यात येतो. हंगामाच्या वेळी दररोज साधारणपणे ४०/५० टन बर्फासाठी मागणी असते. परंतु तेवढा बर्फ येथे उपलब्ध होऊ शकत नसल्याने मासे वहातूक करणाऱ्या संस्था कोल्हापूर, रत्नागिरी, कुडाळ, पणजी येथूनच बर्फ घेऊन येतात. बर्फासाठी मागणी हंगामी व स्थानिक स्वरुपाची म्हणजे ऑक्टोबर-जूनपर्यंत असते. एका टनाचा भाव २००-३०० रु. पर्यंत असतो. या उद्योगात प्रामुख्याने २/३ लोकांना रोजगार प्राप्त झालेला आहे. आणि बर्फाची वहातूक डोक्यावरून करण्यामध्ये १०/१५ लोकांना रोजगार मिळालेला आहे.

आजच्या परिस्थितीचा विचार केला तर या उद्योगात प्रचंड गुंतवणूक करणे जास्त फायदेशीर ठरणारी नसली, तरी या उद्योगाला भविष्यकाळ निश्चीतच चांगला आहे. सोडा फॅक्टरी, आईसकॅन्डी, शासकीय दुग्ध योजना, मासे संग्रहण करणे इ. साठी बर्फाची मागणी वाढत्या स्वरुपाची आहे आणि म्हणूनच अशा उद्योगाला नवीन गुंतवणूक करण्यासाठी उद्योजकांना संधी आहे.

देवगड शहरात केवळ एकच बर्फ उद्योग आहे. तेथेही शीतगृहाची सोय नाही. त्यामुळे बर्फाचा साठा करुन ठेवता येत नाही. हंगामाच्या वेळी दररोज ८० टन कुवतीच्या शीतगृहाची नितांत आवश्यकता आहे. तसेच अनियंत्रीत वीज पुरवठ्यामुळे कधीकधी बर्फाचा पुरवठा देखील अनियंत्रीत स्वरुपाचा बनतो. त्यासाठी जनरेटर्सची व्यवस्था करणे आवश्यक आहे. त्यामुळे बर्फासाठी कायम स्वरुपाची उपलब्धता निर्माण होईल. सहकारी तत्वावर असाच एक उद्योग सुरु करण्याचा विचार आहे. त्यासाठी ५०% सबसीडी देण्याचा देखील सरकारचा विचार आहे. देवगड तालुक्यातील दाभोळे परिसरात असा एक उद्योग काढण्याचे प्रयत्न

सुरु आहेत. देवगडसारख्या भागात भरपूर प्रमाणात मासे उपलब्ध होऊनही त्यासाठी गोठवण्याची किंवा इतर प्रक्रियेची सोय नसल्याने येथून माशांची निर्यात होऊ शकत नाही, परकीय चलन मिळत नाही म्हणूनच सरकारने या उद्योगाकडे विशेष लक्ष देणे आवश्यक ठरते.

प्रचंड मासळी, प्रचंड वाहतूक, मासे पकडण्यासाठी नौकांना लागणाऱ्या इंधनाची प्रचंड आवक हे या मासेमारीचे वरवर दिसणारे चित्र. एकूण उलाढाल काही कोटींची आणि हा पैसा लहानापासून मोठ्यां-पर्यंत सर्वांच्या खिशातून फिरतो करमणुकीचे धंदे, दारुचे गुत्ते, बाजारपेठेतील चैनीच्या वस्तूंची दुकाने अत्यावश्यक जीवनोपयोगी मालाची दुकाने, कापड-चोपड, औषधांची दुकाने, सर्वांच्या हातातून हा पैसा फिरतो. शेवटी जात असेल धनिकांच्या निजोरीत, पण स्पर्श करतो सगळ्यांना. सगळ्यांचे जीवन उजळून टाकणारी ही सागरलक्ष्मी ! देवगडच्या कातळाला निसर्गाने दिलेले हे वरदान ! आमरसाहून अधिक गोड, शहाळ्याच्या पाण्यापेक्षा अधिक शीतल करणारा मासा, हा या देवगडच्या अर्थशास्त्राचा कणा आहे. इथं कॉलेज झालं, सिनेमा, व्हीडिओ येताहेत, गाड्या पळतात, टोलेजंग इमारती, आकर्षक बंगले उभे रहातात, या सगळ्यांच्या पायाभरणीत हा मासाच आहे. श्रीमंतीचा डोलारा या पायावरच उभा आहे आणि पुढेही याच माशावर उभारला जाणार आहे. कारण तोच या देवगडचा ' जीवनदाता ' आहे.

रसराजला हार्दिक शुभेच्छा !

**श्री. शांताराम सखाराम माळगवे**

**मु. पो. पडेल**

ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड व रसराजला हार्दिक शुभेच्छा !

**श्री. विश्वनाथ श्रीधर वायंगणकर आणि बंधू**

**मु. पो. कट्टा**

ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

**आंबा बागाईतदार व व्यापारी**

# कोळंबी....

सूर्यकांत पाळेकर
प्रथम वर्ष कला

देवगडच्या मासेमारीबद्दल अधिक सांगावे अशी स्थिती नाही. या मासेमारीत कोळंबी या प्रकारच्या माशाला फार मोठे महत्वाचे स्थान आहे. कारण हा मासा देवगड समुद्रात खूप प्रमाणात सापडतो. आणि शिवाय तो खूप पैसे मिळवून देणारा आहे, हे अजून वेगळेच !

अशा या कोळंबीचे पुढील प्रकार देवगडलगतच्या समुद्रात सापडतात. सफेद, कापशी चालू, पॉलन, बारीक, टायगर, शेंवड ह्या जाती, हे प्रकार ठराविक ठिकाणी ठराविकच वेळेला समुद्रात सापडतात, अन्यथा नाही. सफेद चिंगुळ ही रंगाने सफेद असते. तिचे वरचे टरफल पातळ असते. ती साधारणपणे किनाऱ्याला आणि खोल समुद्रातही मिळते. कापशी चिंगुळ ही जात साधारण खरखरीत टरफलाची असते. ही अधिककरुन रात्रीच्या वेळेला २५ ते ३० वाव खोलीवर मिळते. टायगर ही जात साधारणपणे काळपट व तिच्या अंगावर वाघासारखे पिवळ्या रंगाचे पट्टे असतात. शेंवड ही जास्त फार कडक म्हटली जाते. कारण तिचे टरफल फार कडक असते. चालू कोळंबी ही जात लाल रंगाची असते. तिचे टरफल जाड असते. ही जात किनाऱ्याला म्हणजे ५ ते १० वाव किंवा १२ वाव पाण्यात मिळते. ह्या जातीबरोबर पॉलन, बारीक याही जाती मिळतात. बारीक ही जात साधारणपणे आपल्या हाताच्या करंगळीपेक्षा मोठी असते. तिचा रंगसुद्धा लालच असतो. शिवाय तिचेही टरफल जाड असते. पॉलन ही जात एकदम सफेद आणि नरम असते. अशा या कोळंबीच्या अनेक प्रकारच्या जाती आणि त्यांची वैशिष्टये होत.

ही कोळंबी मारण्यासाठी लाँच मालकांना काही नियम घालून देण्यात आले आहेत. सकाळी ६ नंतर व संध्याकाळी ६ पर्यंतच ही मासेमारी करावी. १० वाव खोल पाण्याच्या बाहेर जाऊनच मग मासेमारी करावी. हे नियम मोडल्यास योग्य ती नुकसानभरपाई वसूल केली जाते.

सध्या ह्या धंद्यात देवगड परिसरातील खूप लोक गुंतले आहेत. कारण ह्या धंद्यासाठी सरकारने बऱ्याच प्रमाणात सवलती दिल्या असून मच्छिमार सहकारी संस्थांचेही त्याला चांगलेच पाठबळ मिळाले आहे. ही कोळंबी पकडण्यासाठी इथल्या लाँचिस् विजयदुर्ग आचरा या भागापर्यंत जातात. एका लाँचच्या उत्पादनावर सरासरी दहा कुटुंबाचा उदरनिर्वाह होऊ शकतो. कोळंबीचा कुठलाही भाग वाया जात नसतो कारण वाया जाणारा भाग आता फिशमिलमधून उपयोगात आणला जाऊ लागला आहे. फिश मिल मधून त्याचे कुकुटखाद्य व शेतीसाठी खत तयार केले जाते. तयार झालेला हा माल पिंपरी, चिंचवड, पुणे मुंबई या ठिकाणी ट्रकने पाठवला जातो.

एकंदरीतपणे नारळी पौर्णिमा झाल्यापासून ही मासेमारी सुरु होते. ऑगस्टपासून कमीअधिक बारीक कोळंबी मिळायला सुरुवात होते. त्यानंतर डिसेंबरपासून जास्त प्रमाणात कोळंबीचा धंदा सुरु होतो. कोळंबी पकडण्यासाठी लाँचेस् साधारणपणे दुपारी ३ वाजल्यापासून बंदरात येण्यास सुरुवात होते. त्या सर्व सायंकाळी ७ वाजेपर्यंत परत येतात. मासेमारीहून आल्याबरोबर जमा झालेली कोळंबी ठरलेल्या आपल्या कंपनीत आणून वजन केली जाते. देवगडला रत्नागिरीहून रत्ना सी फुडस्, नाईक कंपनी, गोव्याहून राहुल सी फुडस्, तसेच देवगडहून घाटे आणि उदय मत्स्योद्योग हे एकूण व्यापारी आहेत. त्यांना ह्या लाँचेस् आपली सर्व कोळंबी आणून घालतात आणि त्यांच्याकडून पावती घेतात. त्यांच्या पैशाचा हिशोब पुढे मे महिन्याच्या अखेरीस पुरा करण्यात येतो. कंपनीचा सुपरवायझर आलेली कोळंबी साफ करण्यासाठी तिथे जमलेल्या बायकामुलांना देतो. एक किलो कोळंबी साफ करण्यासाठी कंपनी त्यांना १५ पैसे देते. त्यामुळे येथील जवळपासच्या बायकामुलांना संध्याकाळच्या फावल्या वेळात सहज ५ – ६ रुपये कमाई होते. कोळंबी साफ करण्यासाठी साधारणत: १५० – २०० बायकामुले राबत असतात.

संपूर्ण साफ करुन झालेली कोळंबी बर्फामध्ये घालून रातोरात ट्रक व टेंपोने रत्नागिरी, गोवा या ठिकाणी पाठवतात. तेथल्या मोठ्या फॅक्टरींमधून कोळंबीची टरफले काढली जातात व तिच्या पोटात असलेला दोरा काढून ती साफ केली जातात. तिचे यंत्रावर व्यवस्थित पॅकिंग करुन खराब होणार नाही याची खात्री करुन परदेशी पाठवण्यात येतात.

मालाची खरेदी ज्या प्रमाणात केली जाते, त्याचप्रमाणे त्याची विक्रीही केली जाते. प्रत्येक सेंटरला मालाची खरेदी झाल्यावर तो माल ट्रकमधून प्रत्येक कंपनीला त्या त्या फॅक्टरीमध्ये पाठवला जातो. त्या ठिकाणी तो 'हेडलेस्' करण्याची व्यवस्था असते. तेथून तो हेडलेस् करून पाठवला जातो. नाही तर तसाच 'हेडॉन्' माल फॅक्टरीमध्ये पाठवला जातो. हा सर्व माल फॅक्टरीमध्ये वजन करून बघितला जातो व मग त्या त्या जातीप्रमाणे त्याचे वर्गीकरण करण्यात येते. नंतर तो 'प्रोसेसिंग हॉल' मध्ये गेल्यावर प्रत्येक जातीच्या श्रेणी पाडल्या जातात. त्या श्रेणी प्रत्येक किलोनुसार असतात. साधारणपणे चालू, कापशी, सफेद या जातीच्या कोळंबीच्या दहा श्रेणी असतात. श्रेणी निश्चित केल्यानंतर जो 'रिजेक्शन माल' निघतो तो 'पिलिंग' केला जातो. अशा मालामध्ये १) PUD, २) PED असे दोन प्रकार असतात. पैकी PUD मध्ये कोळंबीचे फक्त टरफळ काढले जाते; तर PED मध्ये कोळंबीला मधोमध कैची मारून त्यातील जो धागा असतो तो काढला जातो. परंतु बारीक ह्या मालाचे असे दोन प्रकार होऊ शकत नसतात. कारण त्याचा आकारच मुळी लहान असतो. तो माल 'हेडलेस् पॅक' होऊ शकत नाही. 'रिजेक्शन' मध्ये जो माल चांगला असतो त्याचेच फक्त 'फिलिंग' करतात. इतर माल कुटीमध्ये टाकला जातो. ही कुटी सुकवून परत त्यावर प्रक्रिया करुन त्याचे कुक्कुट खाद्य व शेतीसाठी खत यात परिवर्तन केले जाते.

कोळंबीची विक्री परदेशात खूप होते. त्यापासून खूपच परकीय चलन आपल्या देशाला मिळते. हा माल परदेशी नेण्यासाठी जी बोट असते तिच्यात कोल्डरुम्स् तयार केलेल्या असतात. ही बोट बंदरात आल्यावर ज्या ज्या देशाची मागणी असेल तसतसा माल तिच्यावर चढवला जातो. हा माल बहुधा रात्रीच चढवला जातो. कारण त्यावेळी वातावरण थंड असते. फ्रिज केलेल्या मालाला उष्ण हवा लागली तर माल खराब होतो. म्हणून ही सावधगिरी घ्यावी लागते. परदेशामध्ये 'हेडलस्' मालाला जास्त मागणी व जास्त भाव असतो. या धंद्यामध्ये भारत सरकारला अनेक कोटी रुपयांचे परकीय चलन मिळते. नंतर त्यातून त्यात्या कंपनीला तो बँकेमार्फत दिला जातो.

या कोळंबीची कृत्रिमरित्या पैदास करण्याचा यशस्वी प्रयोग रत्नागिरी येथे डॉ. रानडे यांनी केलेला असल्यामुळे अशा प्रकारचे प्रयोग आपल्याकडे दाभोळे, इळये मोठमुंबरी अशा ठिकाणी करता येण्यासारखे आहेत. अर्थात् त्यासाठी सरकारने प्रयत्न करायला हवेत

केळकर कॉलेज

# मत्स्य भुकटी....

माधुरी धुपकर
तृतीय वर्ष कला

महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर देवगड हे एक अत्यंत सुरक्षित बंदर आहे. या बंदरामध्ये प्रवासी वहातुकीची सोय आहे. तसेच मासेमारी व्यवसायासाठी देखील आवश्यक व अनुकूल वातावरण आहे. दरवर्षी देवगड बंदरामध्ये जवळपास २०० – ३०० लाँचेस् मासेमारी व्यवसायात गुंतलेल्या आहेत. यात गुजराथ-पासून केरळपर्यंतच्या लोकांचा भरणा असतो.

देवगड येथून दरवर्षी ५ – ६ कोटी रु. चे चिंगुळ, पापलेट यासारखे मासे परदेशात निर्यात करण्यात येतात. तर काही मासे स्थानिक बाजारपेठेत जाहीर लिलाव व किरकोळ स्वरुपात विकण्यात येतात. परंतु जीवनसत्वे नसलेला, खाण्यास योग्य नसलेल्या माशांचा वापर मासळीची पावडर करण्यासाठी करण्यात येतो. म्हणून येथे ' मत्स्य भुकटी ' हा एक महत्वाचा व्यवसाय आहे

देवगड येथे १९७५ पासून मासे पावडर व्यवसायासाठी कै. जगन्नाथभाऊ पारकर यांच्या पुढाकाराने सुरुवात झालेली आहे आणि आज तालुक्यात ६ मासे पावडर गिरण्या कार्य करताना दिसून येतात. देवगड शहरात श्री. पारकर श्री. पाटणकर-ढोके, श्री. कुळकर्णी-जोशी श्री. मेमान यांच्या मालकीची प्रत्येकी एकेक गिरणी आहे. तर जामसंडे येथे श्री. देशमुख व विजयदुर्ग येथे श्री. नलावडे-सरवणकर यांची प्रत्येकी एकेक गिरणी आहे.

या व्यवसायासाठी एका गिरणीसाठी साधारणपणे २.५० लाखापर्यंत गुंतवणूक आवश्यक असते. त्याला स्थिर भांडवल ५०-६० हजार रु., तर फिरते भांडवल म्हणून २ लाखपर्यंत पैसा पाहिजे असतो. स्थिर भांडवलामध्ये इमारत, २० एच्. पी. ची इलेक्ट्रिक मोटार, ग्राईंडिंग मशीन, मालसफाईची चाळणी इत्यादींचा समावेश होतो कच्चामाल म्हणजे मासे, कामगार यावर होणारा खर्च साधारणपणे २ लाखापर्यंत असतो. या व्यवसायासाठी बहुतेक भांडवलपुरवठा व्यापारी बँकामधून झालेला दिसून येतो. त्यावर १५ टक्के व्याजाचा दर आकारण्यात येतो.

कच्चामाल देवगड, मालवण, वेंगुर्ला, नाटा, जयगड, गोवा इ. ठिकाणी उपलब्ध होतो. त्याचा दर साधारणपणे टनाला १५००/२५०० रु. पर्यंत असतो. तो गोणपाटातून ट्रकच्या सहाय्याने गिरणीपर्यंत आणण्यात येतो. एका गोणपाटात २०-२५ किलो कच्चामाल असतो. गरज पडल्यास कच्चामाल परत सुकविण्यात येतो. आणि नंतर त्याची ग्राईंडिंग मशिनच्या सहाय्याने पावडर करण्यात येते. एका ग्राईंडिंग मशिनची दररोजची गाळण क्षमता ३–४ टनापर्यंत असते. त्यानंतर मालाची चाळणी होते. त्यावेळी शिल्लक राहिलेल्या कमी दर्जाच्या मालाचा वापर आंबा, नारळ व शेतीसाठी खत म्हणून करण्यात येतो. यास मागणी केवळ स्थानिक स्वरुपाचीच असते. तयार झालेली माशाची

पावडर प्रामुख्याने कोंबडी, पशुखाद्यासाठी वापरण्यात येते. त्यासाठी मुंबई, पुणे, कऱ्हाड, सांगली, अकलूज येथून मागणी असते. तयार मासे पावडरीला दर टनाला ४००० रु. पर्यंत भाव असतो.

या व्यवसायामध्ये प्रामुख्याने स्त्री कामगारांचे प्रमाण जास्त दिसून येते. स्त्री कामगारांना मिळणारे दैनिक वेतन ७-८ रु. असून पुरुष कामगारांचे दैनिक वेतन १५ रु. पर्यंत असते. काही वेळेस कंत्राट पद्धतीचा वापर करण्यात येतो. बहुतेक गिरणीमधून स्थानिक कामगारच काम करीत आहेत, तर काही ठिकाणी कर्नाटक येथील मजूर आहेत. काही वेळेस वेतनाची पातळी कामगारांच्या कामावर अवलंबून असते. या ठिकाणी काम करीत असताना कामगारांना कोणताही रोग होत नसतो असे या क्षेत्रातील जाणकारांचे म्हणणे आहे. केवळ अंगावरधूळ साचते एवढेच ! एका गिरणीमध्ये साधारणपणे ५० लोकांना रोजगार मिळतो. शिवाय मासळी वाळविण्याचे काम शेकडो लोक करतात. हा रोजगार हंगामी स्वरुपाचा (नोव्हेंबर ते जून) असतो. कारण मुळातच मासे पावडर व्यवसायाचे स्वरुप हंगामी आहे. गिरणीमध्ये दरवर्षी १ कोटी रुपयांचा खरेदीव्यवहार होत असतो.

या व्यवसायामध्ये व्यवस्थापनास महत्वाचे स्थान आहे. कच्चामाल खरेदी करणे, सुकविणे, तयार मालाची विक्री, बाजारपेठ शोधणे इ. मध्ये व्यक्तिगत स्वरुपाची देखरेख असणे आवश्यक असते, तरच या व्यवसायात नुकसानीची कमी शक्यता असते व नफ्याची शक्यता अधिक असते. फक्त कच्च्या मालाच्या उपलब्धतेवर या व्यवसायाचे भवितव्य अवलंबून असते.

आज मुंबईत ३-४, रत्नागिरी ३, मालवण १, याप्रमाणे मासे पावडर गिरण्यांची संख्या आहे. या व्यवसायासाठी काही अडचणी निर्माण झाल्या आहेत. एक तर आज सौराष्ट्र येथील मासे पावडर व्यवसायाशी महाराष्ट्रातील उद्योगपतींना स्पर्धा करावी लागत आहे. तेथे जवळपास १०० मासे पावडर गिरण्या आहेत. आणि दुसरी गोष्ट अशी की दिवसें-दिवस समुद्रातील मासे कमी होत आहेत. रत्नागिरी तेल संशोधन केंद्रामुळे समुद्रकिनाऱ्यालगतच्या पाण्यावर तेलाचा तवंग निर्माण झाल्याकारणाने माशाची निर्मिती कमी होत आहे. तसेच दूरवर व खोलवर मासेमारी करण्यासाठी अद्यावत, आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नसल्याकारणाने कच्च्यामालासाठी टंचाई हा एक मुलभूत प्रश्न निर्माण झालेला आहे.

ह्या व्यवसायामुळे देवगड गावातील, प्रत्यक्ष समुद्रातील मासेमारी न करणाऱ्या वर्गाला रोजगार मिळाला. त्यामुळे गेल्या ८/१० वर्षापूर्वी देवगड शहराला एक-प्रकारची अवकळा आल्याचा भास होत होता. तो ह्या फिशमिल उद्योगाने नाहीसा झाला. या व्यवसायामुळे देवगडच्या परिसरातील हजारो लोकांच्या हातात पैसा विपुल प्रमाणात खेळत असतो व त्यातील ७५% रक्कम बाजारातील रोजच्या उलाढालीमध्ये दिसून येते.

या उद्योगामुळे सामान्य माणसाच्या जीवनमानात सुधारणा झालेली दिसुन येते. त्यामुळे प्रत्येक कुटुंबातील मुलांना शिक्षणाच्या सोयीचा फायदा घेणे शक्य झाले, एवढेच नव्हेतर सामाजिक विकासाच्या प्रक्रियेत फिशमिल हा व्यवसाय एक महत्वाचा घटक होऊ पहातो आहे.


हार्दिक शुभेच्छा !

आनन्दे येथे लाकुड योग्य दरात विकत व चिरुन मिळेल.

तसेच आंबा पॅकिंगसाठी टिकाऊ खोके योग्य दरात मिळू शकतील.

विजय-संजय


सॉ मिल

प्रोप्रा. बाळन शंकर बोडस

मु. पो. पडेल


ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग

दिव्यत्वाची जेथ प्रचीती




छत्रपतींच्या समाधीजवळ

' रसराज ' समिती–
सुभाष कोदे, हनिफ नबाब, सतीश भिडे,
प्रा. गोठोस्कर, प्राचार्य आर. ए. कुलकर्णी,
प्रा. वळसंगकर, प्रा. कुलकर्णी, माधुरी धुपकर
संदेश शिरसाट, संजीव कुलकर्णी



प्राचार्यांसमवेत
तृतीय वर्ष कला शाखेचे विद्यार्थी




## धुंदीत या गतीच्या—

सहलीचा शुभारंभ करताता प्राचार्य →




संकटी रक्षी—

सहल प्रवासी ↓



छत्रपतींच्या सिंहासनाजवळ
प्राध्यापकांसमवेत विद्यार्थी ↓



रक्तामध्ये ओढ मातीची—



# परिवर्तन



# बँक व्यवसाय

अलका बापट
तृतीय वर्ष कला

देशाच्या आर्थिक विकासासाठी बँकिंग सोयीसवलतींचा विस्तार व विकास होणे अत्यंत आवश्यक आहे. देवगड तालुक्याच्या विकासामध्येदेखील बँकिंग व्यवसाय अत्यंत महत्वाची भूमिका पार पाडत आहे. देवगड तालुक्यात एकूण राष्ट्रीयकृत बँकेच्या ९ शाखा आहेत

## स्टेट बँक ऑफ इंडिया

ही बँक तालुक्यातील सर्वात जुनी राष्ट्रीयकृत बँक आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाची शाखा देवगडला २८-४-१९६६ ला स्थापन झाली. आज या बँकेची तिर्लोट (नवानगर) येथेही एक शाखा आहे. ही बँक बँकिंगच्या क्षेत्रात अग्रगण्य बँक म्हणून मान्यता पावलेली आहे ठेवी स्विकारणे, कर्ज देणे व इतर सेवामध्ये स्टेट बँकेने चांगली कामगिरी केलेली आहे. या बँकेकडील ठेवीचे प्रमाण सुमारे १ कोटी रु. च्यावर असून कर्जाचे प्रमाण जवळपास २० लाख एवढे आहे. ठेवीदारांची एकूण संख्या ८००० च्या वर आहे. या बँकेमार्फत रिक्शा, ट्रक्स, ट्रॉलर, मशिनरी, फर्निचर, फिशमिल इत्यादी व्यवसायासाठी कर्जाचे वाटप देवगडातच नव्हे, तर दत्तक घेतलेल्या सहा गावातदेखील केलेले आहे. ग्राहकांना योग्य आणि तत्परतेने सेवा उपलब्ध करवून देण्यामध्ये ही बँक अग्रेसर आहे. याबरोबरच पेन्शनचे हप्ते, कराचे हप्ते, सरकारची देणी इ. कार्येदेखील ही बँक करीत आहे.

## बँक ऑफ महाराष्ट्र

या बँकेची एकमेव शाखा जामसंडे येथे २०।१२।७७ रोजी स्थापन झाली. या बँकेमार्फत चर्मकार, भंगार, विक्रेते, सुतार, नाभिक, गवळी, जमीन सुधारणा, ट्रक्स, कापड दुकान, हॉटेल व्यवसाय, आंबा कलम, कॅनींग इ. क्षेत्रामध्ये ४ ते १८ टक्के व्याजदराने कर्जपुरवठा होत आहे. या शाखेचे ठेवीचे प्रमाण सुमारे ५० लाख रु. च्या वर असून कर्जाचे प्रमाण सुमारे १५ लाख रु एवढे आहे. या बँकेने १००० रु. पर्यंत कर्ज देताना Margin (वर्तावा) चा आग्रह धरलेला दिसून येत नाही ठेवीच्या एकूण १२ योजना आहेत. एकात्मिक ग्रामीण विकास योजनेखाली दीड वर्षात सुमारे २२० लोकांना सुमारे ५-३० लाख रु. कर्ज वाटण्यात आले. तालुक्याच्या विकासाच्या दृष्टीने आंबा-माड इ. फळबाग विकासासाठी दीर्घ मुदतीच्या कर्जयोजना सुरु केलेल्या आहेत. लहान मुलांसाठी 'मिटी ठेव योजने' ला चांगला प्रतिसाद मिळत आहे. आंबा-फणस यांच्या रसावर प्रक्रिया करुन ते हवाबंद करुन त्यांच्या निर्यातीस प्रोत्साहन देणे, तसेच मत्स्योद्योगाच्या विकासासाठी अनेक योजना ही शाखा राबवित आहे.

## बँक ऑफ इंडिया

ही बँक जिल्ह्यातील अग्रणी बँक आहे. देवगड तालुक्यात या बँकेच्या चार शाखा अनुक्रमे मिठबांव,

शिरगांव, वाडा व विजयदुर्ग येथे आहेत. मिठबांव येथील शाखेची स्थापना ३० ऑगस्ट १९७६ रोजी झालेली आहे. चालू ठेवी, बचत ठेवी, आवर्ती ठेवी, मुदतबंद ठेवी, महिना बचत, प्रमाणपत्र इ. प्रकारच्या ठेवीमध्ये ५५ लाख रु. गुंतलेले आहेत. गेल्या १.५ वर्षात ३० लाख रु. च्या ठेवी वाढविल्या आहेत. १० ते १५ टक्के व्याजदराने २५ लाख रु. चे कर्जवाटप केलेले आहे. हे कर्ज प्रामुख्याने आंबा, शेती सुधारणा, दुग्ध व्यवसाय, शेती उपयोगी जनावरे, एकात्मिक ग्रामीण विकास योजना इ. साठी दिलेले आहे. गेल्या वर्षापासून सोने तारण कर्जाची योजना सुरु केलेली आहे. लॉकरसाठी प्रयत्न चालू आहेत. देवगड येथे एक शाखा उघडण्यासाठी R. B. I. कडे प्रयत्न चालू आहेत.

विजयदुर्ग येथील बँक ऑफ इंडिया शाखेची स्थापना सप्टेंबर १९८२ मध्ये झालेली आहे. एकूण ठेवी सुमारे ८-५० लाख रु. असून ११ लाख रु. पर्यंत कर्ज वाटप केलेले आहे. स्वयंरोजगार या योजनेखाली प्रथमच विजयदुर्ग येथील क्वालिटी सी एन्टर प्रायझेमला कर्जपुरवठा केलेला आहे.

वाडा येथे बँक ऑफ इंडियाची शाखा २८-६-१९७३ रोजी स्थापन झाली. या बँकेच्या ठेवी सुमारे ८० लाखाच्या वर असून एकूण कर्जे सुमारे २० लाख रु. च्या आसपास आहेत.

अशाच प्रकारचे कार्य शिरगाव येथील बँक ऑफ इंडियाची शाखा करीत आहे.

## युनियन बँक ऑफ इंडिया

पूर्वीची बेळगाव बँक नंतर ती युनियन बँक ऑफ इंडियामध्ये विलीन झाली. आणि नंतर U B I. च्या शाखेची स्थापना देवगड. मोंड येथे झाली युनियन बँक, देवगड हिच्या ठेवी सुमारे ८५ लाखाच्या वर असून कर्ज वाटप १० लाखाच्या वर आहे या शाखेने तालुक्यातील कोर्ले धालवली सारख्या Unbank Centre अती मागास भागात नुकतेच २ लाख रु. कर्जवाटप कोर्ले, धालवली, पोंबुर्ले, कुणकवण यातही केलेले आहे. याशिवाय आणखी दोन गावे दत्तक घेण्याचा या शाखेचा विचार आहे. या बँकेने मासेमारी शेती, विकास, एकात्मिक ग्रामिण विकास, टेंपो, मेटॅडोर इ. साठी कर्जवाटप केलेले आहे.

२५ डिसेंबर १९७५ रोजी युनियन बँकेची शाखा देवगड येथे सुरु झाली. व युनियन बँकेची मोंड शाखा मे १९८१ रोजी सुरु झाली. या शाखेचे एकात्मिक ग्रामीण विकासामध्ये सुमारे २ लाख रु. च्या पेक्षा अधिक कर्जवाटप सुमारे २०० कर्जदारांना केलेले आहे. या शाखेकडे सुमारे २२ लाख रु ठेवी आणि कर्जे सुमारे ६ लाखाच्या आसपास आहेत.

देवगड तालुक्यातील बँकिंगचा अभ्यास करताना एक गोष्ट सहज जाणवते की या बँकांकडे प्रचंड प्रमाणात ठेवीच्या रुपात पैसा गोळा झालेला आहे. परंतु त्या प्रमाणात मात्र कर्जाचे वाटप झालेले नाही. वेळोवेळी कर्जाचे हप्ते न भरणे, कर्ज माफ होईल अशी अपेक्षा बाळगणे ही प्रवृत्ती कर्जदारांमध्ये दिसून येत असल्याने बँकांची कर्जवाटप करण्याची गती मंदावलेली दिसून येते. बँकांनी मोठ्या प्रमाणात औद्यागिक क्षेत्रासाठी प्रत्यक्ष उद्योग उभारणीसाठी कर्जपुरवठा करावा. येथील शेतमजुरांसाठी विशेष योजना आखाव्यात. गुंतवणुकीला प्रोत्साहनात्मक वातावरण निर्मीती करण्यामध्ये बँकिंग व्यवसायाला महत्वाची भूमिका पार पाडावी लागणार आहे, हे बँकांनी दूर्लक्षून चालणार नाही. दुसरे असे की बँकांनी सरकारच्या वीस कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणासाठी विशेष प्रयत्न केला पाहिजे. तालुक्यातील Unbank Centre शोधून काढून तेथे वित्तपुरवठा करणे आवश्यक आहे. तसेच तालुक्याच्या विकासासाठी इतर काही मोठ्या गावातून (मुणगे, तळेबाजार, नारिंग्रे, दाभोळे, कुणकेश्वर, मणचे बापर्डे) इ. ठिकाणी बँकेच्या शाखा उघडणे आवश्यक आहे.

आज देवगड तालुक्यातच नव्हे तर संपूर्ण कोकण प्रदेशातील बँकांमध्ये भिन्न-भिन्न स्वरुपाच्या आकर्षक रोजगाराभिमुख उत्पन्नप्राप्तीच्या अशा अनेक योजना असूनही येथील लोक मात्र त्या योजनांचा पुरेपुर फायदा घेताना दिसून येत नाहीत.

केळकर कॉलेज

# हॉटेल व्यवसाय

राजेंद्र लांबोरे
प्रथम वर्ष कला

देवगडमध्ये सुमारे १०-१२ हॉटेल्स् आहेत. वाढती लोकसंख्या व वाढत्या आधुनिकीकरणामुळे हॉटेल्स्ची संख्या जरी वाढत असली तरी दर्जात म्हणावा तसा फरक दिसत नाही. देवगडातील पहिले हॉटेल १९२८ साली श्री. दत्तात्रेय कार्लेकर यांनी सुरु केले. सुरुवातीला त्यांचे भांडवल १० रु. होते. ती रक्कम त्यांनी बाबुशेठ पारकरांकडून घेतली होती. दत्तात्रेय कार्लेकर व प्रभाकर कार्लेकर यांनी ३० ते ४० टक्के नफा मिळवून १९६० पर्यंत हा व्यवसाय केला.

देवगडमधील दुसरे जुने हॉटेल म्हणजे लळित बंधूंचे 'दिलखुष उपहार गृह' ६ डिसेंबर १९३५ साली हरिभाऊ लळित यांनी सुरु केला. ३०० रु. भांडवला-वरील या व्यवसायाचा त्यांना ४० टक्के नफा मिळत असे. आज महागाईमुळे हा नफा २५ टक्के होतो. आतापर्यंत लोकप्रिय असलेल्या त्यांच्या कांदाभजी व उसळीचे श्रेय त्यांच्या काम करण्याच्या आवडीला जाते वाणीतील आदरामुळे प्रत्येक चाकरमानी त्यांच्याकडे गेल्याशिवाय रहात नाही.

५०० रु हातउसने घेऊन १९४० साली श्री. सावळाराम चोपडेकर यांनी सुरु केलेले 'समता उपहार गृह आणि भोजनालय' हे सध्या त्यांचे चिरंजीव रत्नाकर चोपडेकर सांभाळतात. मांसाहारी जेवणासाठी विशेष प्रसिद्ध, सिझनमध्ये बनवलेला 'कोळंबी फ्राय' जवळच असलेली लॉजची सोय इ. कारणामुळे बाहेरगावच्या लोकांच्या दृष्टिने हे सोईचे ठरते. श्री. दत्ताराम हडकर यांनी दुधाचा व आंब्याचा धंदा केल्यानंतर १९६४ साली भोजनालय काढले व १९७४ साली स्टेट बँके-कडून १०,००० रु. कर्ज काढून सर्व सुखसोयींनी युक्त लॉज बांधला.

देवगडमधील हॉटेलची पहाणी करता खालील गोष्टी आढळल्या.

बऱ्याच ठिकाणी पाण्याची गैरसोय. पाणी पुरेसे मिळविण्यासाठी ग्राहकांना जादा खर्च करावा लागल्याने एकुण खर्च वाढतो.

विजेचा पुरवठा अनियंत्रित असल्याने विजेवर चालणारे पाण्याचे पंप बंद राहिल्याने गिऱ्हाईकांची व्यवस्था चोख ठेवणे कठीण जाते.

काही हॉटेलची जागा भाड्याची असल्याने हवी तशी सजावट व डागडुजी करता येत नाही.

मुंबईकडे असलेला लोकांचा ओढा पहाता कामगार मिळणे अत्यंत अवघड आहे व मिळाले तरी ते मन मानेल तेव्हा काम सोडतात. त्यामुळे नवीन कामगा-

रांची भरती केल्याने गिऱ्हाईकांना समाधानकारक सेवा उपलब्ध होऊ शकत नाही.

पदार्थांच्या बाबतीत गिऱ्हाईक परंपरावादी असल्याने शहरी पदार्थांपेक्षा उसळ, भजी, बटाटेवडा, इ. पदार्थ खाण्याकडेच जास्त कल दिसून येतो.

हॉटेल मालक व गिऱ्हाईक यांचे संबंध अधिक आपुलकीचे वाटतात. देवगडमधील हॉटेल व्यवसाया-मध्ये काही अडचणी असल्यातरी हा व्यवसाय विकसनशील आहे. देवगडमधील चेतन लंच होम, पूनम हॉटेल, श्री उपहार गृह, विकास रेस्टॉरंट, प्रकाश उपहार गृह, हॉटेल यशोदा, आदर्श उपहार गृह आणि श्री. दत्ता पारकर यांचे एस्. टी. कॅंटीन यांचा भविष्यकाळ उज्वल आहे.

★★★

"स्त्रीपूजनानेच थोर समाज थोर पदवीला
पोहोचले आहेत. ज्या देशात, ज्या
समाजात हे स्त्रीपूजन नाही
तो देश, तो समाज
कधीही मोठा होऊ
शकला नाही व पुढे कधी
काळी होणे शक्य नाही. तुमच्या
साऱ्या साऱ्या समाजाचा जो हा अधःपात
झाला आहे, त्याचे मुख्य कारण
म्हणजे या शक्तिरुपिणी
स्त्रियांची अवहेलना
हेच होय."

**स्वामी विवेकानंद**


श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय, देवगड व रसराजला

**हार्दिक शुभेच्छा !**

**श्री. कृष्णा एन्. बोरफळकर**

**मु. पो. ता. देवगड**

जि. सिंधुदुर्ग

**रसराजला हार्दिक शुभेच्छा !**

**श्री. सुधीर मोरेश्वर जोशी आणि बंधू**

**वाडेतर**

ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.

**आंबा बागाईतदार व व्यापारी**

# व्या पा र

संदेश शिरसाट
द्वितीय वर्ष वाणिज्य

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला आजच्या देवगड शहराची वस्ती सुमारे ३०० होती. आजची खालची बाजारपेठ, खाडीकाठची घरे एवढेच गाव होते. उत्तम बंदर असल्याने मुंबई, कालिकत व कोचीन, कारवार बंदराशी सागरी मार्गाने वाहतूक चालत होती. 'किलीक निक्सन' कंपनीच्या बोटीने मुंबईला व्यापार व नोकरीसाठी जाण्याचे आजच्या इतकेच आकर्षण तेव्हाही होते देवगड खाडीत बाहेरुन येणारी व स्थानिक अशा सुमारे ५० गलबताने व्यापारी मालाची वाहतूक होत असे.

गावातील मोठे वतनदार म्हणून खानविलकर, गोगटे, इनामदार, सोहनी, नाडकर्णी हे होते. सोहनी यांचे स्वतःच्या मालकीचे गलबत होते. ते मुंबईहून माल आणून इकडे व्यापाऱ्यांना घालीत. त्यावेळी भा. ब. गोरे यांचे घाऊक दुकान, कालिकतला पेढी, खाडये यांचा मुंबईला पेढी, देवगड व इतरत्र घाऊक दुकाने केरोसिन एजन्सी, ल. र. जोशी यांचे घाऊक दुकान अशी दुकाने होती. तालुक्यात पिकणारा माल खुष्कीच्या व जलवाहतुकीच्या सहाय्याने देवगडला जमा करुन गलबताने मुंबईला पाठविला जाई व मुंबई कालिकत बंदरातून आलेला माल कणकवली, फोंडा आणि अगदी निपाणीपर्यंतच्या पेठांना पुरविला जाई. त्यामुळे देवगड शहर हे कमी वस्तीचे; भाजी, दूध, लाईट, हॉटेल या सुविधा कमी असूनही शतकाच्यापूर्वी भरभराटीत होते.

गूळ ३ पै, साखर १० पै., तांदूळ पोते ५ ते ७ रु., साजूक तूप १ रु. किलो अशी स्वस्ताई असूनही स्थानिक व्यापार करणारी दुकाने मोजकीच होती. बाहेरुन आलेल्या खरेदीदारांना जेवणाची सोय म्हणून बाबाजी फोंडेकर व गद्रे यांच्या खानावळी होत्या. गावात केमिस्ट म्हणजे काष्ठौषधी विकणारे म्हणून नारायण पारकर यांचे एकमेव दुकान होते. सुरुवातीपासून पोस्ट ऑफीस होतेच. १९०५ मध्ये तार ऑफीस निघाले. देवगड अर्बन बँक २३ नोव्हेंबर १९३५ रोजी स्थापन झाली. त्यापूर्वी पैसे पोस्टल इन्शुरन्स किंवा ट्रेझरी चेकने पाठवले जात.

हळुहळु ताग व्यापार संपला व काळाच्या ओघात खाडये, गोरे, सोहनी, पारकर, नाडकर्णी आदींचा व्यापार कमी झाला. सन १९३० नंतर बाबूशेठ पारकर, नेने, नलावडे, पोकळे, जगन्नाथ शेठ पारकर यांचा व्यापार जोरात सुरु झाला. जोडीला गो. ज. पाटणकर, ल. र. जोशी यांच्या पेढ्या चालूच होत्या. सुमारे १९५५ ते ६० पर्यंत गलबतांनी मुंबईहून बंदरीमाल कालिकतखोबरे, मंगलोरी कौले येत होतीच. इ. स. १९६० नंतर मुंबई-गोवा हा राजमार्ग सुरु झाला. त्यामुळे मुंबईवरुन ट्रकने मालवहातूक सुरु झाली. आज मुंबईला भरलेला माल दुसऱ्या दिवशी दुकानावर येऊ लागला. त्यामुळे देवगड बंदराचा घाऊक व्यापार थंडावला. गलबतांची वाहतूक रोडा-

वली. १९६० नंतर फिशिंग करणाऱ्या ट्रॉलरची संख्या हळुहळु वाढू लागली. याच दरम्यान मु. ल. जोशी यांचा ट्रॉलर बांधण्याचा कारखाना सुरु झाला व सुमारे १९७५ नंतर गलबताविना ओसाड दिसणारे बंदर ट्रॉलरनी गजबजून गेले. बंदराची शान कायमच राहिली.

घाऊक व्यापार संपला. काष्ठौषधी संपून परदेशी औषधे विकणारी दुकाने सुरु झाली. त्यात ज. म. कुळकर्णी यांचे दुकान अग्रेसर आहे. रॉकेल, पेट्रोल व्यापार क्षेत्रात कुळकर्णी, गवाणकर यांचेकडून होणारा व्यापार संपून मेसर्स वा. य. पोकळे यांचे रॉकेल डिझेलचे टँकर येऊ लागले. खानावळ व्यवसायात विशेषत: समता, अलंकार लॉज इत्यादींनी सुविधा उपलब्ध करुन दिली. हॉटेल व्यवसायातील गेल्या सुमारे ४० वर्षात हरिभाऊ लळीत यांनी केलेली सेवा उल्लेखनीय आहे. वृत्तपत्र व्यवसाय ना[illegible] गोडस यांचे नंतर प्रभाकर कार्लेकर यांनी नावा[illegible]ला आणला. गावात स्टेशनरी दुकाने मोठ्या संख्येने उभारली. रस्त्यावर चालणारा भाजी व्यापार भाजी मार्केटमध्ये सुरु झाला. छपाईसाठी कल्याण सह. मुद्रणालय, गजानन प्रिंटिंग प्रेस, श्रीराम मुद्रणालय इ. चार-पाच मुद्रणालये जोरात सुरु झाली. देवदुर्ग, अणुरेणू अशी दोन साप्ताहिके सुरु झाली.

देवगड बंदरातील वाढलेले मच्छी उत्पादन व देवगड हापूस आंब्याला परदेशात वाढलेली मागणी यामुळे होणाऱ्या व्यापारी उलाढालीमुळे परप्रांतीयांची वर्दळ वाढली आणि केवळ किराणा, भुसारी, घाऊक व्यापाराची मक्तेदारी संपली तरी मच्छी व आंबा यामुळे झालेल्या व्यापारीपरिवर्तनामुळे देवगड शहराची सतत भरभराट होत आहे. याच्या अनुषंगाने देवगड अर्बन, युनियन बँक, स्टेट बँक, जिल्हा मध्यवर्ती इ. बँकांचा व्यवसाय सतत वाढत गेला. शैक्षणिक क्षेत्रात देवगड हायस्कूलच्या ५० वर्षाच्या सोयीनंतर देवगड महाविद्यालयाची स्थापना करुन देवगडच्या नागरिकांनी मानाचा तुरा रोवला अशाप्रकारे देवगड शहर सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने वाटचाल करीत आहे.

We are sinful not merely because we have eaten of the Tree of Knowledge but also because we have not eaten of the Tree of Life.

FRANZ KAFKA

All women become like their mothers. That is their tragedy. No man does. That's his.

OSCAR WILDE

Whatever you do, trample down abuses and love those who love you.

VOLTAIRE

There are two rules of life, the one general and the other particular. The first is that everyone can, in the end, get what he wants if he only tries. This is the general rule. The particular rule is that every individual is, more or less, an exception to the rule.

SAMUEL BUTLER

# सहकार विश्व

अविनाश सावंत
तृतीय वर्ष वाणिज्य

या तालुक्यातील सहकार विश्व तसे सुधारले नसले तरी, ७५ वर्षे पूर्ण करणाऱ्या सहकारी संस्था इथे आहेत. उदा. विजयदुर्ग विविध कार्यकारी सहकारी संस्था १९०७ मध्ये स्थापन झाली. १९०४ मध्ये पहिला सहकारी कायदा पास व्हावा व केवळ तीनच वर्षात विजयदुर्ग सारख्या ऐतिहासिक ठिकाणी सहकारी संस्था स्थापन व्हावी ही कौतुकास्पद बाब आहे. तर आज स्थापन झालेली शिरगाव पंचक्रोशी मागासवर्गीय सहकारी मजूर संस्था ही देवगड तालुक्याचे पुरोगामित्व सिद्ध करण्यास पुरेशी आहे.

१ देवगड तालुक्यात खालील प्रकारच्या सहकारी संस्था आहेत.

| अ नं. | प्रकार | संख्या |
|---|---|---|
| १ | प्राथमिक शेती सहकारी पतसंस्था | ३५ |
| २ | मच्छिमारी सहकारी संस्था | ५ |
| ३ | फलोद्यान सहकारी संस्था | २ |
| ४ | अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक | १ |
| ५ | तालुका खरेदी-विक्री ( विशेष पतपुरवठा आंबा ख. वि. ) | १ |
| ६ | औद्योगिक सहकारी संस्था | २ |
| ७ | मजूर सहकारी संस्था | १ |
| ८ | सहकारी गृहनिर्माण संस्था | १ |
| ९ | इतर | २ |
| १० | दूध सहकारी संस्था | २ |
| | एकूण सहकारी संस्था. | ५२ |

**२ वरील सर्व सहकारी संस्थांची सभासद संख्या—**

अ) एकूण सभासद संख्या— १६,३९०

ब) मागासवर्गीय जाति-जमातीची सभासद संख्या— १,३६४

क) शेतमजूर सभासद संख्या— १,२१३

ड) ग्रामीण कारागीर सभासद संख्या— ८९१

**३ भाग भांडवल व आर्थिक स्थिती—**

वसूल भाग-भांडवल एकूण ९,४०,७८० रु.

सभासदांचा एकूण भाग-भांडवलातील वाटा ९,००,७८० रु.

शासकीय एकूण भाग-भांडवलातील वाटा ४०,००० रु.

एकूण गंगाजळी ८,६३,४१६ रु.

बँकेकडून उभारलेली कर्जे २४,२३,८८० रु.

खेळते भांडवल ६१,०९,७०० रु.

येणे कर्ज २१,४५,५४० रु.

थकबाकी ५,५०,०४० रु.

वार्षिक उलाढाल ८८,३५,३६६ रु.

एकूण नफा २,२०,६०० रु.

वरील प्रमाणे सहकारी संस्थांची आर्थिक परिस्थिती आहे.

**४ या तालुक्यातील सर्व सहकारी संस्थांचे ऑडिट वर्ग—**

| अ. नं. | ऑडिट वर्ग | पतपुरवठा संस्था | इतर सह. संस्था |
|---|---|---|---|
| १ | 'अ' | ५ | ३ |
| २ | 'ब' | १७ | ८ |
| ३ | 'क' | ४ | ३ |
| ४ | 'ड' | — | १ |
| ५ | ऑडिट व्हावयाचे आहे | — | १२ |
| | एकूण | २६ | २७ |

**५ देवगड तालुक्यातील विविध क्षेत्रातील कार्य करणाऱ्या व्यवसायिक सहकारी संस्थांची प्रगती खालील प्रमाणे—**

**संस्थांचा थोडक्यात आढावा**

अ) शेती उत्पादक सहकारी संस्था— देवगड परिसरात जमीन डोंगराळ असल्यामुळे शेतीमध्ये समाधानकारक प्रगती दिसून येत नाही. तरीही डोंगर उतारावर होणारी शेती बरी आहे. त्यात भात, नागली, सूर्यफूल, नाचणी, बाजरी इ. मुख्य पिके आहेत. तरीही उन्हाळ्यात दुबार पिके घेता येत नाहीत. कारण गोड्या पाण्याचा पुरवठा शेतीसाठी उन्हाळ्यात होत नाही. मात्र नारळ, केळी, फणस, आंबा, कोकम, अननस, इत्यादी पिके देवगड परिसरात भरपूर घेता येतील.

शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड आंबा सिझन चालू झाल्यानंतर होते. शासकीय स्तरावर ३% व्याज अनुदान या स्वरुपात सभासदांना मिळते. तसेच १००% व्याज मागासवर्गीय जातिजमातीस अनुदानाच्या स्वरुपात मिळते. सन १९७५-१९८० अखेरीस देवगड तालुक्यात शासकीय धोरणानुसार एकूण १०२८ थकबाकीदारांना कर्ज व व्याज माफ करण्यात आलेले आहे. त्यामुळे त्या सभासदांना नवीन कर्ज मिळविणे सुलभ होईल.

ब) खरेदी-विक्री संघ— तालुका पातळीवर खरेदी-विक्री करण्यासाठी स्थापन झालेली एकमेव संस्था 'देवगड तालुका सहकारी खरेदी-विक्री संघ लि. देवगड' होय. या संघाची स्थापना २९-२-१९६० रोजी झाली. या संघामार्फत नियंत्रित साखर, रवा, मैदा, नियंत्रित

सिमेंट, फीसेल सिमेंट, दारु सामान पुरवठा, पन्हाळी पत्रे, स्प्रेपंप, लोखंडी सामान, किटकनाशके, सुरुंग-दारु इत्यादी वस्तुंचा पुरवठा अल्प नफा घेऊन केला जातो.

विशेष म्हणजे हा संघ गेली दोन वर्षे महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंझुमर्स स्टोअर्स फेडरेशनचे तालुका एजंट म्हणून काम करत आहे. संघाने १९८२-८३ साली १,०१,४०२ इतक्या वह्यांचा विद्यार्थ्यांना पुरवठा केला, ही कौतुकाची बाब आहे. तसेच हा संघ शेतक-ऱ्यांसाठी दाणेदार मिश्रखते व खनिजखतांचा तसेच कंपोस्ट खतांचा आंबा बागाईतदारासाठी पुरवठा करतो. या संस्थेला १९८२-८३ साली ७४,९८७ रु. इतका नफा झाला. संस्थेचे एकूण भागभांडवल आज ४३,७९० रु. आहे. तर सभासद संख्या १,४३५ इतकी आहे व ऑडिट वर्ग 'अ' आहे.

क) अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक— तालुक्यात शहरी भागात देवगड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेडची स्थापना १९३५ साली झाली. संस्थेचा सन १९८२-८३ मध्ये ऑडिट वर्ग 'अ' आहे. संस्थेची आर्थिक उला-ढाल खालीलप्रमाणे.

| सन | ठेवी रु. | कर्जे रु. | भाग भांडवल रु. | खेळते भांडवल रु. |
|---|---|---|---|---|
| ३०–६–७९ | ११,०४,१३८ | ६,२७,३७१ | १,११,२०० | १४,५५,३८५ |
| ३०–६–८० | १२,२४,३०२ | ७,७७,८५६ | १,२७,८२० | १५,८९,८६९ |
| ३०–६–८१ | १६,६९,८१४ | ११,२९,९६३ | १,५३,४७० | २१,०२,०७१ |
| ३०–६–८२ | १९,५२,६३८ | १३,५१,०४९ | १,८४,०१० | २४,७५,६८४ |
| ३०–६–८३ | २५,८२,९९१ | १६,५४,८१२ | २,२१,५६० | ३२,३१,३६० |

बँकेचे अधिकृत भागभांडवल ५,००,००० रु. आहे. बँकेने मानत्याने ऑडिट वर्ग 'अ' ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. बँकेचे एकूण सभासद १,७१५ आहेत. बँकेने आतापर्यंत एकूण १८,४३,८६० रु. कर्ज व्यापार धंदा, घरबांधणी व दुरुस्ती, धार्मिक कार्य इत्यादी-साठी दिले आहे. अहवालसाली बँकेला एकूण नफा ४६,८७२ रु. इतका झाला. सध्या बँकेचा कारभार उत्तम आहे. या बँकेने आतापर्यंत तोटा सोसलेला नाही. ही बँक आंबा व्यापाऱ्यांना व व्यावसायिकांना १५,००० रु. चे कर्ज १ वर्ष मुदतीने (अल्प मुदतीचे) देते. तसेच मच्छिमारांसाठी किरकोळ कर्ज देते.

ड) मच्छिव्यावसायिक सहकारी संस्था— देवगड तालु-क्यात १९८३ अखेर ५ मच्छिमारी सहकारी संस्था नोंद झालेल्या आहेत. त्यापैकी नवीनच मच्छिमारी सहकारी संस्था १ एप्रिल १९८३ रोजी स्थापन झाली. देवगडमध्ये व तारामुंबरीत असलेल्या मच्छिमारी संस्था प्रगतीपथावर आहेत देवगड येथे 'देवगड फिशरमेन्स को-ऑप-सोसायटी' आहे, तर तारामुंबरी येथे 'तारामुंबरी सहकारी मच्छिव्यावसायिक संस्था' आहे. या दोन मच्छिमारी सहकारी संस्थांची तुलना पुढीलप्रमाणे आहे.

| अ. नं. | तपशील | देवगड फिशरमेन्स को-ऑप. सोसायटी | तारामुंबरी सहकारी मच्छि व्यावसायिक संस्था |
|---|---|---|---|
| १ | स्थापना | ३–१–१९५० | १–१–१९६८ |
| २ | पूर्ण झालेली वर्षे | ३३ वर्षे | १५ वर्षे |
| ३ | मिळालेला ऑडिट वर्ग | 'ब' | 'अ' |
| ४ | सेवकवर्ग (कायम) संख्या | ७ | ८ |
| ५ | सभासद संख्या | ८४४ | ३९६ |
| ६ | राखीव निधी | ३८,७७५ रु. | ५९,०९३ रु. |
| ७ | निव्वळ नफा | ६५,४४९ रु. | ७१,६१५ रु. |
| ८ | मीठ विक्री नफा | १८७० रु. | ६७१ रु. |
| ९ | औद्योगिक साधनांची विक्री | १,७४,९८१ रु. | ३,७२,२७८ रु. |
| १० | निव्वळ नफा ( मच्छिमार साधन विक्री ) | १४,३१९ रु. | २,१७६ रु. |
| ११ | मासळी विक्री | ६,६६,५१२ रु. | ८,१४,४५५ रु. |
| १२ | निव्वळ नफा (मासळी विक्री) | ३२,५८६ रु. | ५०,३०१ रु. |

तारामुंबरी सहकारी मच्छि व्यावसायिक संस्था डिझेल तेलाची विक्री करते. त्यात संस्थेला १३,६८० रु. नफा झाला. तारामुंबरी सहकारी मच्छि व्यावसायिकांनी खालील यांत्रिक नौकांना पुरस्कृत केले आहे.

द्वारकी, सावित्री, पौर्णिमा, जयवंती, मीनाकुमारी, आनंदी, महादेव प्रसाद, भागिरथी, खोर्जाई, मत्स्यगंधा, दत्तप्रसाद, आक्का, इंदुमती, सावित्री, लिलावती, सुभद्रा, सरस्वती, लक्ष्मी, रामदास, व जानकी इ. वीस नौका आहेत. देवगड फिशरमेन्स को-ऑप. सोसायटीने खालील नौकांना पुरस्कृत केले आहे.– देवकी, जय-हनुमान, माताचौंडेश्वरी, दिर्बाई, अन्नपूर्णा, पार्वती, मिनाक्षी, गुरुप्रसाद, आईचंद्रभागा, जयहनुमान, चित्रा, साईबाबा, वसुंधरा, पंचारती, जानकी, विहंगम, नवदुर्गा, यशवंती, कौस्तुभराज, गुरुप्रसाद इ. २० नौकांना पुरस्कृत केले.

तालुक्यात असलेल्या एकूण पाच मच्छिमारी सहकारी संस्थांची सभासदसंख्या १,६९२ आहे. या सहकारी संस्थांची स्वतःची या धंद्यात गुंतवलेली भागभांडवलाची मर्यादा ९७,७३० रु. आहे. शासकीय भागभांडवल (MCDC) १३,१४,२२० रु. आहे. राखीव निधी व इतर निधींची एकूण रक्कम रु. २,४४,०२५ आहे. बाहेरील कर्जे ५,७९,६८० रु. आहे. खेळते भांडवल ३२,४८,७८० रु. आहे. मच्छिमारी सहकारी संस्था-मध्ये विकासास अजूनही प्रचंड प्रमाणात वाव आहे

इ) जिल्हा मध्यवर्ती बँक– देवगड तालुक्यात सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या तीन शाखा कार्य करतात. एक देवगड येथे, दुसरी विजयदुर्ग येथे, तर तिसरी हिंदळे येथे आहे. रत्नागिरी जिल्हा विभागणी-नंतर 'सिंधुदुर्ग' हा जिल्हा शासनाने जाहीर केला त्यामुळे रत्नागिरी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतूनच सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँकेची निर्मिती झाली. ही बँक खालील लघुउद्योगासाठी ग्रामीण भागात कर्जाचा पुरवठा करते.

१) आंबा, फणस, कोकम यापासून तयार होणाऱ्या वस्तुंचे उत्पादन.

२) बेकरी व चुनाभट्टी, पीठगिरण, टेलरिंग, केश-कर्तनालय

३) सॉमिल, काथ्या उद्योग, मेणबत्ती उत्पादन, चिरा-खणीचा उद्योग, लाकडी कोळसा उद्योग.

४) किराणा माल, लाकूड व्यवसाय, चहापान, विडीचे दुकान, लाउडस्पिकर व्यवसाय इ.

वरील व्यवसायापैकी काही प्रकल्पांना टर्सरी योजने-खाली अनुदान मिळते.

खालील कारणासाठी मध्यम मुदतीचा कर्जपुरवठा कॅश क्रेडिट व अल्पमुदतीची कर्जे बँक देते.

१) शेतकरी सहकारी संस्था व मार्केटिंग सहकारी संस्था.

२) ग्राहक, मजूर व बलुतेदार सहकारी संस्था.

३) पगारी, नोकर व विणकर सहकारी संस्था

४) औद्योगिक सहकारी, मच्छिमारी सहकारी व अर्बन बँकांना खेळते भांडवल, भाग भांडवल, कर्जे इ. मार्गांनी पैशाचा पुरवठा वरील संस्थांना बँक करते.

(अ) याशिवाय सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती बँक आंबा पीक कर्जयोजना राबविते. त्यासाठी पुढील अटी कर्ज घेणाऱ्याला पूर्ण कराव्या लागतात.

१) कराराने झाडे घेतली असल्यास ३ वर्षापेक्षा जास्त करार व त्याच्या प्रती बँकेस सादर कराव्या.

२) कर्जास दोन लायक जामीन आवश्यक आहेत.

३) सात बाराचा उतारा आवश्यक असतो.
दर एकरी प्रत्येक झाडास ५० रु. कर्ज मिळते.

(ब) मच्छिमारी सहकारी संस्थांसाठी कर्ज--
बँक अल्पमुदतीचे कर्ज होडीचा मालक व त्यावर काम करणाऱ्या गटांना जास्तीत जास्त ५०० रुपये मंजूर करु शकते. त्यासाठी कर्ज घेणाऱ्यास पुढील अटी पूर्ण कराव्या लागतात.

१) कर्जदार मच्छिमारी संस्थेचा पूर्ण सभासद असला पाहिजे.

२) कर्जदाराने होडी, जाळी व मच्छिमारी साहित्य कर्जास तारण लिहून दिले पाहिजे.

३) दोन जामीन आवश्यक असतात.

याशिवाय मच्छिमारी संस्थांना, त्यांच्या गटांना वैय-क्तिक अगर संयुक्तिकरित्या नौका [illegible] करणासाठी ६,००० रु. कर्ज विशेषतः इंजिन खरेदी करण्यासाठी दिले जाते. यांत्रिक मचवा व होडी बांधण्यासाठी दीर्घ मुदतीचे कर्ज दिले जाते.

(क) दुग्धउत्पादनासाठी दुभती जनावरे खरेदी कर-ण्यासाठी खालील प्रकारचे कर्ज दिले जाते.

| अ. नं. | तपशील | मुदत | कर्जमर्यादा |
|---|---|---|---|
| १ | संकरीत गाय खरेदीसाठी | ५ वर्षे | ५,०००।– रु. |
| २ | स्थानिक संकरीत गाय खरेदीसाठी | ५ वर्षे | ४,५००।– रु. |
| ३ | स्थानिक म्हैस खरेदीसाठी | ५ वर्षे | १,५००।– रु. |
| ४ | शेतघर व गोठा बांधणीकर्ज | ५ वर्षे | ३,०००।– रु. |
| ५ | कुक्कुट पालन (अंडी उद्योग) | | २,०००।– रु. |
| | ५० पक्ष्यांच्या युनिटकरता | – | |

(ड) याशिवाय जिल्हा मध्यवर्ती बँक, गटविकास योजना, वैरण खरेदीसाठी मका, लसुण घास, सुबाभुळ इ. उत्पादनासाठी, रासायनिक खतांचे व्यवहार करण्यासाठी, मंगलोरी कौलोत्पादन कारखान्यासाठी, बैल, खटारा व शेळ्यामेंढ्या खरेदीसाठी तसेच गोबर गॅस, फलोद्यान बांधण्यासाठी विविध प्रकारची कर्जे देते. विशेषत: आंबा, सुपारी, नारळ, केळी, बटाटा, कलिंगड नागली, भातशेतीसाठी अल्पमुदतीचे शेतीकर्ज दिले जाते. देवगड तालुक्यातील सिंधुदुर्ग जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने देवगड व विजयदुर्ग येथे खालील आर्थिक उलाढाली केल्या आहेत.

१) देवगड शाखा

रु. १२,५६,००० ठेवी. रु. १७,३७,००० कर्जे

२) विजयदुर्ग शाखा

रु. ७,४९,००० ठेवी. रु. ७,००,००० कर्जे

वरीलप्रमाणे ठेवी व कर्जे मिळून जिल्हा मध्यवर्ती बँकेने अनुक्रमे २०,०५,००० व २४,३७,००० रु. आर्थिक उलाढाल केली.

## फ) औद्योगिक सहकारी संस्था--

देवगड तालुक्यातील औद्योगिक सहकारी संस्थांचा विचार करताना दृष्टिक्षेपात सिंधुदुर्ग जिल्ह्याचा विचार करता मंगलोरी कौलाचे उत्पादन जिल्ह्याच्या खालील ठिकाणीं होते.

१) सावंतवाडी तालुका मंगलोरी कौलोत्पादक संस्था मर्यादित मु. नेमळे. तालुका-सावंतवाडी.

२) मंगलोरी कौल सहकारी औद्योगिक उत्पादन संस्था मु. आईनमळा. तालुका-कुडाळ.

३) देवगड सहकारी कौल कारखाना मर्यादित, आरे.

यातील महत्वाचा कारखाना म्हणून आरे येथील कौल कारखान्याचा उल्लेख केला जातो. यासाठी शासकीय भागभांडवल ४,९४,००० रु. व हत्यारे अवजारासाठी १०,००० रु. कर्ज अनुदानाच्या स्वरुपात मिळाले. तसेच खादी ग्रामोद्योग महामंडळामार्फत २,००,००० रु. मिळाले. वीट व कौल उत्पादनासाठी लागणारी वीज महामंडळाने नुकतीच दिली आहे. उत्पादनास १९८३-८४ मध्ये सुरुवात होईल. संस्थेचे खेळते भाग भांडवल १,००,००० रु. आहे.

देवगड तालुक्यामध्ये खालील व्यवसायांना निसर्गानुकूल परिस्थितीमुळे वाव आहे. त्यासाठी सहकारी संस्था स्थापन करणे आवश्यक आहे.

१) मच्छिमारी व्यवसायास पूरक व्यवसाय-- देवगड तालुक्यात मत्स्यव्यवसाय प्रामुख्याने चालतो. उदा. विजयदुर्ग. देवगड, कुणकेश्वर व आजूबाजूची किनारपट्टी या व्यवसायाला पूरक व्यवसाय म्हणून वाहतूक या व्यवसायाचा विचार करावा. देवगड तालुक्यातून ताजी मासळी कोल्हापूर, सांगली, मुंबई इ. ठिकाणी पाठविता येईल. तसेच त्या बाजारपेठा हळूहळू काबीज करता येतील व तेथील अन्नधान्ये, भाजीपाला, अंडी देवगड तालुक्यात आणता येतील. तसेच मासे खारविणे, बर्फ तयार करणे, हेडलेस करणे व जाळी तयार करणे हे पूरक व्यवसाय विकसित होणे आवश्यक आहेत. यासाठी लहान संस्थांनी एकत्र येऊन साखळी पद्धतीने ही कामे वाटून घेतली पाहिजेत. तसेच मच्छिमारी लाँचेस्ना व ट्रॉलर्सना डिझेल पुरवठा, ऑईल पंपाचा पुरवठा व सुटया भागांचा पुरवठा अत्यावश्यक असतो. याशिवाय बंदराच्या किनाऱ्यावर सहकारी संस्थांच्या स्वत:च्या गोडाउनची उणीव जाणवते.

२) आंबा व्यवसायास पूरक व्यवसाय-- आंबा उत्पादकांना व व्यावसायिकांना पूरक म्हणून कलम तयार करणे, रासायनिक खतांचा पुरवठा, आंबा व्यावसायिकांना मार्गदर्शन, बाजारपेठांची उपलब्धता, जाहिरात, वाहतूक हे व्यवसाय सहकाराच्या तत्वाने करता येतील. देवगडमध्ये तयार होणाऱ्या 'आंबा' या पिकापासून कॅनिंग फॅक्टरीचा व्यवसाय चालू शकेल. देवगड तालुक्यातील सहकारी संस्थांचे सहाय्यक निबंधक हे प्रामुख्याने कॅनिंग फॅक्टरीकरिता देवगड मधील आंबा, फणस व कोकम उत्पादक यांच्यासाठी मार्गदर्शन करण्यास व व्यवस्थापन कशा प्रकारचे असावे याविषयी सल्ला देण्यास सतत तयार असतात. देवगड तालुक्यात कॅनिंग फॅक्टरी प्रामुख्याने त्यांच्याच प्रेरणेने साकार होणार असे म्हटल्यास वावगे ठरु नये.

याशिवाय आंबा उत्पादकांना आंबा वाहतुकीसाठी लाकडी खोके व लोखंडी पेटया तयार करण्याचे व्यवसाय हे सहकारी तत्वावर चालण्यास पुरेसा वाव आहे.

३) फलोद्यान व्यवसाय– देवगड तालुक्यात फलोद्यान व्यवसायामध्ये आंबा, कोकम, फणस, नारळ, साग इ. कलमांच्या लागवडीसाठी प्रचंड प्रमाणात वाव आहे. या व्यवसायासाठी जमीन खरेदी करणे, कलम खरेदी करणे, कलम तयार करणे, त्याचे संरक्षण करणे इ. साठी भरपूर प्रमाणात कर्ज उपलब्ध होऊ शकते. यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीसमुहांचा अभाव देवगडमध्ये जाणवतो. तसेच देवगड मधील नारळ उत्पादक व व्यावसायिकांचा विचार करता लघुउद्योगाखाली ( Small scale industry ) काथ्या व्यवसाय यापासून दोरखंडे, पायपुसणी, सुबक जाजमे, कलाकृती, झाडू इ. वस्तू वाक्षा जाणाऱ्या काथ्यापासून तयार करता येतील.

४) गृहबांधणी सहकारी संस्था– देवगड तालुक्यात गृहबांधणी सहकारी संस्थांचा अभाव प्रकर्षाने जाणवतो. सहकारी तत्वावर गृहबांधणी सहकारी संस्था निर्माण व्हाव्यात यासाठी समर्थ नेतृत्व करणाऱ्या तरुणांची आवश्यकता देवगड तालुक्यात जाणवते. नियोजित गृहबांधणी सहकारी संस्था देवगड तालुक्यात निश्चितच लाभदायक ठरतील यात शंकाच नाही.

५) शैक्षणिक सहकारी संस्था व पूरक व्यवसाय– देवगड तालुक्यात शैक्षणिक संस्थामध्ये काम करणाऱ्या कर्मचारी वर्गाला व विद्यार्थीमित्रांना स्वस्त दरात शैक्षणिक साहित्य पुरवणाऱ्या संस्था नाहीत. तसेच विद्यार्थी सहकारी संस्थांना वीसकलमी कार्यक्रमासाठी वसतिगृह, गणवेश यासाठी कितीतरी सवलती उपलब्ध असताना विद्यार्थीवर्ग, शाळा, हायस्कूल्स् व महाविद्यालय या संधीचा फायदा घेत नाहीत, याबद्दल आश्चर्य वाटते.

६) पैशाची वाहतूक– देवगड तालुक्यातील खेडयापाडयातील लोक नोकरीधंद्यानिमित्त विशाल मुंबईत जाऊन रहातात ते आपल्याघरी नियमित पैसे पाठवत असतात. त्यांनी आपले पैसे सहकारी संस्थेमार्फत पाठवल्यास पोस्टाच्या मनिऑर्डरपेक्षा अत्यल्प दराने पैसे पाठवता येतील. या संधीचा फायदा मुंबईत राहणारे देवगडवासीय घेत नाहीत याचा खेद वाटतो.

७) दूध उत्पादन, कुक्कुटपालन, अंडी उत्पादन, मजूर सहकारी संघटना, कापड उद्योग– देवगड तालुक्यात हिंदळे या गावात दूध उत्पादक सहकारी संस्था स्थापन करून ती यशस्वीरित्या चालविलेली आहे. यावरून प्रतिकूल परिस्थितीतही दूध उत्पादन, अंडी उत्पादन, कुक्कुट पालन, वराह पालन इ. सहकारी संस्थांना भरपूर वाव आहे.

ग्राहक भांडाराची अत्यावश्यकता– देवगड तालुक्यात ग्राहक भांडार हे अत्यावश्यक असून त्याची उणीव प्रकर्षाने जाणवते. कोल्हापूरमध्ये असणाऱ्या ग्राहक-भांडाराच्या धर्तीवर देवगड तालुक्यात ग्राहक भांडाराद्वारे गहू, ज्वारी, मका, साखर, भुईमूग, प्रसाधनांची साधने, स्टेशनरी इ. वस्तुंचा भव्य व्यापार होऊ शकेल.

देवगड तालुक्यात खालील तीन गोष्टींचा अभाव जाणवतो.

१) संघटक– देवगड तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते
२) नियोजन– सहकारी संस्थांना नियोजन व व्यवस्थापन.
३) सहकाराची भावना– संघटनचातुर्य व सहकाराचे महत्व येथील लोकाना जाणवलेले नाही.

देवगड तालुक्यात काही दुर्बल (आर्थिकदृष्टया) सहकारी संस्था कार्यरत आहेत. त्या सबळ करण्यासाठी शासनाने अनेक योजना आखलेल्या आहेत. वीसकलमी कार्यक्रमाखाली काही नवीन सवलती व योजना यांचा फायदा ग्रामीण लोकांना घेता येईल. विशेषतः शेतकरी बंधूना, कृषीपंढरी योजना अत्यंत लाभदायक आहे,

तर गटसचिव योजना संस्थांना लाभदायक व मार्गदर्शक ठरणार आहे. सहकारी संस्थांनी नियोजनबद्ध विकासाची योजना डोळ्यासमोर ठेऊन काम करणे आवश्यक आहे. हाती घेतलेले प्रकल्प वेळच्यावेळी पूर्ण करणे आवश्यक असते. यासाठी उदाहरण म्हणून जामसंडे येथील संस्थेचा उल्लेख कौतुकाने करता येईल. ती देवगड तालुक्यातील आदर्श संस्था म्हणायला हरकत नाही; तर तारामुंबरी मच्छि व्यावसायिक संस्थेने यावर्षी ट्रक व टेंपो खरेदी करुन सहकारी संस्थांना वाहतूक व्यवसायात वाव आहे, हे सिद्ध करुन दाखविले आहे. देवगड परिसराचा विचार करता सहकाराशिवाय विकास साधता येणे अशक्य आहे.



# इंजिनियरिंग क्षेत्र—

सतीश धुरत / प्रथम वर्ष कला

तालुक्यात सद्या चार औद्योगिक कारखाने आहेत. १९७३ साली सुमारे १०,००० रु. भांडवलावर स्थापलेली, मे. विजय स्टील वर्क्स हा एक कारखाना आहे. या कारखान्यात एक ड्रील मशीन, एक वेल्डींग मशीन, ग्राइंडर इ. साधन सामग्री आहे. वेल्डींग, शाळेसाठी लागणारी बाके, पलंग, कंपाउंड गेट, गोबर गॅसच्या पाण्याच्या टाक्या, लोखंडी दरवाजे अशी किरकोळ कामे केली जातात.

मे. मिलींद इंजिनियरिंग वर्क्स हा थोड्याफार प्रमाणात प्रबळ व सुरळीत स्थितीत आहे. १९८० साली याची स्थापना झाली. त्यावेळी अंदाजे ८० हजार रुपयाचे भांडवल गुंतवले होते. या कारखान्यात प्रामुख्याने लेथ मशीन, ड्रील मशीन, इलेक्ट्रीक वेल्डींग, बेंच ग्राईंडर, शाफ्ट ग्राइंडर, शेप मशीन, इ यंत्रसामग्री आहे. तसेच टर्नर, वेल्डर, हेल्पर, अॅप्रेंटिस अशा प्रकारचे रोजगार आहेत. सर्व प्रकारचे इलेक्ट्रीक वेल्डींग, स्टील, फॅब्रीकेशन, ट्रॉलर्ससाठी लागणारे स्पेअर पार्टस् आणि मशिनची सर्व कामे करण्यात येतात. यासाठी लागणारा कच्चामाल त्यांना कोल्हापूर, मुंबईहून आणावा लागतो.

तालुक्यात मे. मोहिद्दीन इंजिनियरिंग वर्क्स हा सुद्धा एक कारखाना आहे

एकंदरीत पहाता या सर्व उद्योग धंद्याच्या समस्या ह्या सारख्याच आहेत. कच्चा माल हा सहकारी कोठ्यातून मिळत नसल्याने खाजगी कोठ्यात जास्त पैसा देऊन घ्यावा लागतो. त्यामुळे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेता येत नाही. तसेच प्रशिक्षीत कामगारांची संख्या कमी असल्याने कामास गती येत नाही. विद्युत पुरवठा अनियंत्रित, आधुनिक यंत्रसामग्रीचा अभाव दळणवळणाच्या योग्य सोईचा अभाव व योग्य बाजारपेठ नसल्याने अपेक्षेप्रमाणे उत्पादन होत नाही. त्यामुळे योग्य फायदाही मिळत नाही.

तालुक्यात मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहती स्थापन केल्या व छोट्या वर्कशॉपना कामे मिळाली तर स्थानिक लोकाना रोजगार मिळेल. सुशिक्षीत बेकारांना प्रशिक्षण देता येईल. दारिद्र्य दूर होईल. सरकारने मोठ्या प्रमाणात छोटे-छोटे वर्कशॉप स्थापन करण्यासाठी मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन दिले, नवीन उत्पादनाची माहिती करुन दिली, उत्पादित मालास योग्य दर्जा देऊन निर्यात वाढवली आणि पूरक धंद्यांची संख्या वाढवली तर देवगड मधील औद्योगिक वसाहत मोठ्या प्रमाणात निर्माण होईल. यातच देवगडचे शहर बनण्याची बीजे आहेत.

# सहकारी मुद्रणालय

तालुक्यातील नव्हे तर सिंधुदुर्ग जिल्ह्यातील सहकारी मुद्रण मंडळाचा विचार करता देवगडचे 'कल्याण सहकारी मुद्रणालय' हे जिल्ह्यात एकमेव होय. ८ ऑक्टोबर १९६५ साली या मुद्रणालयाची स्थापना झाली असून यांनी शून्यातून विश्व निर्माण केल्याप्रमाणें प्रगती केलेली आहे. श्री. नाबर, साटम, हडकर, भिडे, गोगटे, मेस्त्री, पुरोहित, ओगले, ठाकूर, काळे इत्यादींच्या प्रयत्नाचे यश म्हणजे त्यांनी 'देवगड तालुका सहकारी मुद्रण मंडळ, लिमिटेड' ही संस्था स्थापन करून कल्याण सहकारी मुद्रणालय सुरु केले. सुरवातीस श्री. पारकरांनी एक टेबल, ३ खुर्च्या मोफत वापरायला देऊन अल्प भाड्यात जागाही दिली. प्रथमपासूनचे चेअरमन श्री. नाबर असून सध्या चेअरमन म्हणून श्री. भिडे काम पहात आहेत. तसेच पहिले मॅनेजर श्री. काळे असून १९७० पासून श्री. हडकर मॅनेजर म्हणून नियुक्ती केली आहे. सुरवातीस कामगारांचा पगारही अत्यल्प होता व दोन-दोन महिने तो दिलाही जात नसे. बोनस, प्रॉव्हिडंट फंड इत्यादी सवलतीही मिळत नसत. आज मुद्रणालय स्वतःच्या पायावर उभे असून सरकारी स्केलप्रमाणे कामगारांना पगार व त्याबरोबरच बोनस, प्रॉव्हिडंट फंड इत्यादी सवलतीही दिल्या जातात. या मुद्रणालयाने बँकींगच्या पूर्वी गरीब लोकांसाठी 'संचित मुदत ठेव योजना' राबवली होती.

अहवालसाली संस्थेच्या भागधारक संख्येत १४ ने वाढ झाली असून आता सभासद संख्या ९४ झाली आहे. संस्थेचे एकूण भाग भांडवल रु. १६९९० झाले आहे. अहवालसाली वाटणी योग्य निव्वळ नफा रु. १८८२–३५ झाला आहे. ऑडिट वर्ग 'ब' आहे. स्वावलंबन, काटकसर व परस्पर सहकार्य या सहकारितेच्या मुख्य ध्येयांची जपणूक हे मुद्रणालय आपल्या सहकाऱ्यांसह करत आहे.

लग्नपत्रिका, अहवाल, माहिती पत्रकांची छपाई, सहकारी सोसायटचा व ग्रामपंचायतींना लागणारी स्टेशनरी, तसेच विविध प्रकारचे फॉर्म, पावती पुस्तके व रजिस्टर इत्यादींची कामे हे मुद्रणालय करते.

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकमेव सहकारी मुद्रणालय म्हणून 'कल्याण सहकारी मुद्रणालया'चा उल्लेख करावा लागेल.

**शुभांगी नेने / द्वितीय वर्ष वाणिज्य**

## सहकारितेची ३ मुख्य ध्येये

१) परस्पर सहाय्य : संघटित प्रयत्नांची उन्नती करण्यासाठी, एकमेकांच्या कल्याणासाठी एकमेकांनी प्रामाणिक प्रयत्न करणे.

२) स्वावलंबन : स्वतःचे सामर्थ्यावर उन्नत्ती करुन घेणे.

३) काटकसर : स्वतःची जमा व खर्च पाहून शिल्लक वाढवीत जाणे.

देवगड तालुका सहकारी मुद्रण मंडळ लिमिटेडचे,

# कल्याण सहकारी मुद्रणालय

## देवगड

**आपले लक्ष असू द्या–**

छपाई कामाच्या गरजासाठी – आपल्या सेवेसाठी आम्ही सदैव तत्पर आहोत.

त्या च प्र मा णे

सहकारी संस्था व ग्रामपंचायती यांना लागणारी स्टेशनरी



स्टॅंप पॅड, इंक, कार्बन पेपर, कोरी पाकीटे, क्वायर बुक विविध प्रकारचे फॉर्म–


शिवाय विविध डिझाईन्सच्या आकर्षक लग्नपत्रिका मिळतील.


सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकमेव सहकारी प्रेस

**कल्याण सहकारी मुद्रणालय**

ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग


प्राचार्यासमवेत विद्यार्थी प्रतिनिधी





प्राचार्यांसमवेत तृतीय वर्ष वाणिज्य शाखेचे विद्यार्थी

## श्री. गफूरभाई ठाकूर



देवगड तालुक्यातील तिर्लोट-नवानगर येथील श्री. गफूर-भाई ठाकूर हे प्रसिद्ध इलेक्ट्रीक कॉंट्रॅक्टर असून सद्या कुवेतमध्ये स्थायीक आहेत. महाविद्यालयाला त्यांनी भेट दिली आणि महाविद्यालयीन प्रगतीबद्दल समाधानाचे उद्‌गार काढून महाविद्यालयाचा विस्तार करण्याच्या कामी आपण भरघोस आर्थिक सहाय्य करु असे दृढ आश्वासन दिले.



शि

साहित्य क्ष संस्कृती

ण





# ॥ साहित्यविश्व ॥

अंजली नलावडे

प्रथम वर्ष कला

देवगड तालुक्याला लाभलेली साहित्यिकांची परंपरा प्रशंसनीय आहे. पेशवाई गेली आणि देशात इंग्रजांची राजवट सुरु झाली. नवीन ज्ञान, विज्ञान आणि संस्कृती आली सर्वसामान्य जनता भेदरुन गेली. पारतंत्र्याच्या अंधारात समाज चाचपडू लागला, अशा बिकट काळात सर्व परिस्थितीचा धैर्याने आणि व्यापक दृष्टीने विचार करुन समाजाला जागृत करणारा एक बुद्धिमान पुरुष देवगड तालुक्यातील पोंबुर्ले येथे जन्माला आला. त्याचे नाव बाळ गंगाधरशास्त्री जांभेकर. आपले राज्य का गेले आणि इंग्रजांचे राज्य या देशात का आले ह्याचे अचूक निदान करणारा हा महाष्ट्रातला पहिला पुरुष होता. राष्ट्रोद्धाराची विशाल दृष्टी ह्या पुरुषाजवळ होती. बाळशास्त्री हा एक बुद्धीचा चमत्कारच होता. शाळेत विद्यार्थी म्हणून शिकत असतानाच ते तेथे गणिताचे अध्यापक झाले. संस्कृत, इंग्रजी, मराठी, उच्च गणित, भूगोल, गुजराथी, बंगाली आणि फार्सी इतके विषय त्यांना येत असत.

'नेटिव्ह एज्युकेशन सोसायटी' त डेप्युटी सेक्रेटरी व 'सेक्रेटरी' म्हणून अवघ्य सतराव्या वर्षी बहुमान मिळविणारे बाळशास्त्री हे पहिले महाराष्ट्रीय विद्वान होते.

मुंबईचे पहिले गव्हर्नर माउंट स्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्यांचे स्मारक म्हणून मुंबईत निघालेल्या 'एल्फिन्स्टन कॉलेज' मधील 'पहिले असिस्टंट प्रोफेसर' म्हणजे बाळशास्त्री जांभेकर होय. हिंदू विद्वानाला मिळालेला तो अभूतपूर्व मान होय. बाळशास्त्र्यांच्या अंगी अष्टपैलू विद्वत्ता होती. मुंबई इलाख्यात विद्येचा आणि शिक्षणाचा पाया घालण्याचे महान कार्य त्यांनी केले. इतिहास, भूगोल, व्याकरण, गणित, छंदशास्त्र, नीतीशास्त्र या सर्व विषयामधली पहिली पाठ्यपुस्तके मराठी भाषेत बाळशास्त्रांनी रचली. वाङ्मय आणि विज्ञान या दोन्ही शाखामध्ये बाळशास्त्री निष्णात होते. गणित आणि ज्योतिषशास्त्र ह्या विषयात त्यांचा अधिकार फार मोठा होता. 'शून्यलब्धि' (Differential Calculus) वर मराठी भाषेत त्यांनी पहिले पुस्तक लिहीले. भारतीय शिलालेख आणि ताम्रपट ह्यांचे संशोधन करुन त्यांनी विद्वत्तापूर्ण निबंध लिहिले या दृष्टीने 'आद्य इतिहाससंशोधक' असेही त्यांना संबोधणे उचित होईल. सगळयात महत्त्वाचे असे बाळशास्त्र्यांचे संशोधन म्हणजे शके १७६७ मध्ये 'ज्ञानेश्वरी' ची पहिली छापील पोथी पाठभेदासह संगादून प्रसिद्ध केली.

मुंबईतल्या आणि महाराष्ट्रातल्या सार्वजनिक जीवनाचा पाया बाळशास्त्र्यांनी घातला. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी १८३२ च्या जानेवारीत बाळशास्त्र्यांनी मराठी भाषेतले पहिले वर्तमानपत्र 'दर्पण' सुरु करुन 'मराठी वृत्तपत्राचे जनक' ही पदवी यथार्थ केली.

सामाजिक आणि धार्मिक सुधारणा ही बुद्धिवादाने आणि तारतम्याने करावयाला पाहिजे ही बाळशास्त्रीची भूमिका होती. म्हणून सर नारायण चंदावरकर त्यांचा उल्लेख 'आद्य समाजसुधारक' असा

करतात. परकीय राज्याच्या पहिल्या प्रहरात राष्ट्र-जागृतीच्या विविध आघाडचा उघडण्याचा अग्रेसर प्रयत्न करणारे बाळशास्त्री हे महाराष्ट्राचे द्रष्टे आणि स्त्रष्टे महापुरुष होते. अव्वल इंग्रजी काळातील पहिले विचारवंत, पहिले समाजसुधारक, पहिले वृत्तपत्रकार, पहिले 'दिग्दर्शन' मासिककार, पहिले असिस्टंट प्रोफेसर, ग्रहणाविषयीची उपपत्ती मांडणारे, बहुभाषिक म्हणून जांभेकरांचे स्थान महत्वाचे आहे. महाराष्ट्राच्या आद्य ज्ञानमहर्षीचे, आद्य पत्रकाराचे आणि आद्य समाज-सुधारकाचे मूळ स्थान देवगड तालुक्यातील आहे हे देवगडवासियांचे भाग्य होय.

'कोकणचा पोर' मधून रोमांचकारी दर्यावर्दी जीवन चित्रित करणारे साहित्यसम्राट न. चिं. केळकर व पं. महादेवशास्त्री जोशी वानिवडे येथील; आपल्या सामाजिक कादंबऱ्यातून प्रतिष्ठित ढोंगबाजी उघड करणारे वि. वा. हडप कोटकामते येथील; रत्नागिरीच्या आमदार, प्रसिद्ध साहित्यिक व समाजकार्यकर्त्या कुसुम अभ्यंकर मोंड येथील; जाणिवेच्या विविध स्तरावरचे भावानुभव समर्थपणे व्यक्त करणारे विं. दा. करंदीकर धालवलीचे; तसेच ना. ग. गोरे, मृणाल गोरे, हिंदळे येथील; पु. शि. रेगे, हुडशीचे; बा. वि. मिराशी भटवाडीचे; प. स. देसाई व बाळकृष्ण वि. प्रभुदेसाई किंजवडयाचे; तर प्रसिद्ध गायक सुधीर फडके वाडयाचे अशी ही थोर परंपरा आहे. त्याप्रमाणेच गुरुदेव रानडे, र. के. खाडिलकर, वसंत बापट, विद्याधर भागवत आणि नटवर्य भोलाराम आठवले हे सर्व देवगड तालुक्यातीलच आहेत.

आजही तालुक्यातील साहित्यिकांनी हीच परंपरा पुढे चालवली आहे. श्री. श्रीपाद काळे हे देवगडमधील नामवंत साहित्यिक. त्यांच्या ४५ कादंबऱ्या व ८-१० कथासंग्रह प्रकाशित झालेले आहेत. हस्तलिखितातून त्यांनी पहिली कथा लिहीली. गर्जना, खेळगडी या मुंबईच्या मासिकातूनही त्यांनी लिखाण केले. त्यानंतरची अगदी पहिली कथा १९४९ साली 'स्वराज्य' मध्ये


रसराजला हार्दिक शुभेच्छा !



मेसर्स-
लक्ष्मण रघुनाथ जोशी
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग.
☎ ३९

ॐ स्टोअर्स
देवगड

श्री. एस्. एच्. केळकर
महाविद्यालयास
हार्दिक शुभेच्छा !

लिहीली. ' विविधवृत्तात ' कथा आल्यावर लेखक झाल्याचे समाधान त्यांना लाभले.

केसरी, सह्याद्री, सत्यकथा, मौज अशा सुमारे २०० साप्ताहिकातून त्यांनी लेखन केले. ' संकेत ' हा त्यांचा पहिला कथासंग्रह व ' उघडे सत्य ' ही त्यांची पहिली कादंबरी. ' पिसाटवारा ' या कादंबरीला मॅजेस्टिकचे बक्षिसही मिळाले आहे. ज. श्री. टिळक, रानडे यांची लेखनशैली त्यांनी उचलली आहे.

आजपर्यंत श्रीपाद काळे यांनी सुमारे १२०० कथा लिहिल्या आहेत. त्यांची ' पहारा ' ही कादंबरी न्युयॉर्क येथील ' लायब्ररी ऑफ काँग्रेस ' मध्ये एक चांगली कादबरी म्हणून समाविष्ट केली आहे. दुःख रंगवताना त्यांना खूप आनंद होतो. नाटक हा प्रांत मात्र त्यांनी अद्याप हाताळला नाही.

भिक्षुकी व्यवसायाचे परिणाम त्यांच्या लेखनावर आहेतच प्रवासाचा कंटाळा असल्याने त्यांनी प्रवास वर्णनही लिहीले नाही. वि. स. खांडेकर, माधवशास्त्री जोशी हे त्यांचे आवडते साहित्यिक. सर्वांचे जे जे चांगल दिसल ते ते उचलून आपली कक्षा त्यांनी वाढवली आहे.

डॉ. भा. वा. आठवलेंचा साहित्याशी संबंध आला तो शालेय जीवनातच. खेळगडी, शाळापत्रक, आनंद अशा हस्तलिखितातून ते लिहीत असत. नोकरी-निमित्त अनेक साहित्यिकांशी परिचय झाला व त्यातून ते लेखनास प्रवृत्त झाले. फडके, पु. भा. भावे हे त्यांचे आवडते साहित्यिक. कथा, कविता, ललितलेख व संशोधनवर लेख त्यांनी लिहीले आहेत. वृत्तपत्रातून सुमारे ३०० लेख प्रसिद्ध झाले आहेत. ' देवाची माणसे ' नामक पहिलीच कादंबरीही प्रकाशनाच्या वाटेवर आहे. आकाशवाणीवर चर्चा, कथाकथन, हार्मोनियम इ. चे कार्यक्रमही होतात. संगीत, संगीतकला अशा संगीतविषयक मासिकातून ते आपले नवीन राग व रचनाही प्रसिद्ध करतात. इतिहास, भूगोल, इंग्रजी हे आवडते विषय. संगीत दिग्दर्शक म्हणूनही त्यांनी काम केले आहे. सर्जरी हा खास विषय असून **Maharashtra Medical Journal** मध्ये सर्जरीवरचे अनेक लेख प्रसिद्ध केले आहेत. लोकसत्ता, पुढारी, बळवंत, सागर, र. टाइम्स, रत्नभूमि, अणुरेणू, केसरी, तरुणभारत, सकाळ, **Sunday Hview** मधून अनेक लेखांना प्रसिद्धी मिळाली आहे. सामाजिक, शैक्षणिक, शास्त्रीय, व्यक्तिचित्रे, मुलाखत, असेही विषय त्यांनी हाताळले आहेत. माणसाच्या अगदी जवळ जाण्याचा मार्ग- असे त्यांच्या व्यवसायाचे स्वरुप असल्याने ' अमृती जहर ओतीले ' ' नंदादीप ' ' वंशवेल, ' ' आकंठ, ' ' पेढा ' इ. वर व्यवसायाचा गहिरा परिणाम दिसतो.

कुणकेश्वर येथील डॉ. श्री. विनायक भांडारी यांनीही नाटक- एकांकिकेच्या माध्यमातून केलेली साहित्यसेवा उल्लेखनीय आहे. स्वतःला योग्य भूमिका नसल्याने स्वतःच एकांकिका लिहीण्यास सुरुवात केली.

त्यांच्या पहिल्याच एकांकिकेला महाविद्यालयीन स्तरावरचं दुसरं व अभिनयाचं पहिलं बक्षीस मिळालं. रत्नागिरी आकाशवाणीवरही त्यांनी एकपात्री एकांकिका सादर केली. रत्नागिरीच्या राधाकृष्ण नाटयमंडळातर्फे घेतलेल्या स्पर्धेत त्यांच्या 'सा प्रकृति विकाराणां .....', व 'एकाक्षराची गोष्ट' या एकांकिकांना बक्षीसे मिळाली. लेखनातील नवीन प्रवाह न हाताळता सर्व-साधारण कौटुंबिक वा कथाप्रधान अशा स्वरुपाचे लेखन त्यांना आवडते. गरजेतून त्यांना लिखाणाची प्रेरणा मिळाली आहे 'कळत - नकळत' हे नाटकही त्यांनी लिहिले आहे. 'इतिश्री', 'मागोवा', 'ओझं' 'देसायांच्या वाड्यात', 'मृत्यू', या एकांकिकाही बक्षीस-पात्र ठरल्या आहेत.

येथेच डॉ. भांडारी का थांबले याला अनेक कारणे असतील. पण नाटक, एकांकिका हा प्रकार लेखनाच्या दृष्टीने हाताळावयाचा असेल तर स्वत:जवळ तो सादर करण्यासाठी चांगला ग्रुपही हवाच. किंवा व्यावसायिक संस्थांपर्यंत नेणारा एखादा मजबूत दुवा पाहिजे, ज्यायोगे ते नाटक किमान वाचले जाईल. सद्या मात्र डॉक्टरांचा नाट्यप्रांताशी संबंध केवळ नाटक पहाण्यापुरताच आहे. खेडेगावात अनेक मर्यादा पडत असल्या तरीही परिस्थिती अनुकूल झाल्यास ते या क्षेत्रात भरघोस काही करू शकतील यात शंका नाही.

श्री. पद्माकर रामराय जोशी यांनी वयाच्या १५ व्या वर्षापासून वृत्तपत्रीय लिखाणाला सुरुवात केली. त्यावेळी रत्नागिरीच्या 'बलवंत' व पुण्याच्या 'तरुण भारत' मध्ये त्यांनी मुख्यत: पत्रलेखन केले. पुढे देवगडच्या 'साप्ताहिक देवदुर्ग' मध्ये लेख, अग्रलेख बातमीपत्रे अशा स्वरुपाचे लेखन केले. काही महिने याच साप्ताहिकात 'गस्तवाला' या टोपण नावाने 'बुरुजा-वरून' या सदरात खळबळजनक लेखनही त्यांनी केले आहे. त्यानंतर 'देवदुर्ग मध्येच दिवाळी अंकात दरवर्षी एक याप्रमाणें तीन रहस्यप्रधान इंग्रजी कादंबऱ्यांचे स्वैर मराठी रुपांतर केले आहे. याशिवाय किरकोळ वृत्त-पत्रीय लिखाण चालूच असते.

सौ. रमाबाई गोखले यांनी पाकशास्त्रावरील पुस्तक लिहून देवगडच्या लेखकात आपलीही नोंद करून ठेवली आहे.

नामांकित साहित्यिकांची परंपरा एकेकाळी देवगडला लाभलेली होती. आज तसे निश्चित सांगण्या-सारखे विशेष काही नसले तरी ही परंपरा देवगडचे उदयोन्मुख साहित्यिक निश्चीतच जोपासतील काय सांगावे, कदाचित् या लेखानेही एखादा साहित्यसम्राट निर्माण होऊ शकेल !



साहित्यिक हा दैनंदिन जीवनातील सुख-दु:ख, राग-द्वेश, चीड-संताप, विद्रोह-संघर्ष अशा जीवनात जगतो. असे जीवन अनुभवतो. तेच जीवन त्याच्या साहित्य कलाकृतीत आविष्कृत होते. साहित्य कला ही अशी समाजजीवनाच्या अंतरंगाशी, आतील ताण-तणावाशी एकरूप झालेली असते. त्यातून निर्माण होणारी कलाकृती ही 'जीवनवादी' जीवनाशी बांधिलकी मानणारी असते.

**५८ वे साहित्यसंमेलन**

हार्दिक शुभेच्छा !

**मे. वामन यशवंत पोकळे**

भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड एजंट

जनरल मर्चंट आणि कमिशन एजंट

**देवगड, जि. सिंधुदुर्ग.**

शाखा– भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेड

**पेट्रोल डिझेल पंप : कासार्डे (तरळा)**

वितरक " नर्मदा सिमेंट "

☎ ९

# ॥ शैक्षणिक चळवळ ॥


**सतीश भिडे**

द्वितीय वर्ष वाणिज्य


देवगडच्या शैक्षणिक चळवळीच्या गंगोत्रीचा मागोवा घ्यायचा झाला तर आपल्याला एक शतक मागे जावे लागते. येथील प्राथमिक शाळा १० मार्च १८७३ साली स्थापन झाली. तालुक्यात केंद्र सरकारच्या एकूण ५ बालवाड्या दिसून येतात. प्राथमिक शाळेतही स्वयंस्फूर्तीने चालवल्या जाणाऱ्या ४८ बालवाड्या आहेत. देवगड गावात मात्र केंद्र सरकारची एकही बालवाडी नाही. ग्राम पंचायतीच्या मालकीची एक व खाजगी स्वरुपातल्या तीन बालवाड्याही आहेत.

देवगड तालुक्यात लहानमोठ्या एकूण १८३ प्राथमिक शाळा चालतात .त्यापैकी २४ शाळा भाडोत्री जागेत चालतात तर ८६ शाळा गावकऱ्यांनी दिलेल्या जागेत चालत असून इतर सर्व शाळा जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जागेत चालतात. तालुक्यातल्या प्राथमिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या सप्टेंबर १९८३ च्या नोंदणीनुसार १८,७५६ एवढी आढळून येते तर शिक्षकांची संख्या ६४५ आहे. खुद्द देवगड मधील १८७३ साली स्थापलेली प्राथमिक शाळा फारशी विकसित स्वरुपात दिसत नाही. कन्या शाळा या नावाने ओळखली जाणारी केवळ मुलींसाठी असलेली ही तालुक्यातील एकमेव शाळा होय. येथे चौथीपर्यंत मुलांनाही प्रवेश दिला जातो. तांबळडेग-मिठबांव येथील शाळा फिशरीज स्कूल म्हणून ओळखली जाते. अशा शाळा संपूर्ण महाराष्ट्रात फक्त ९ असून त्यातली एक या शाळेच्या रुपानं लाभली हे विशेष होय, मुणगे व देवगडच्या हायस्कूलमध्ये मत्स्यव्यवसाय हा विषयही शिकवला जातो. तालुक्यातील ७ शाळा या उर्दू माध्यमाच्या आहेत.

तालुक्यातील माध्यमिक शाळांचा विचार करता एकूण २० शाळा माध्यमिक आहेत व सर्वात जुनी शाळा म्हणून ' शेठ मफतलाल गगलभाई हायस्कूल ' चा उल्लेख करावा लागेल. ३ मार्च १९१९ रोजी या हायस्कूलची स्थापना झाली. ब्रिटिश आमदानीपासून शिक्षकाचे गाव म्हणून प्रसिद्ध असलेल्या मिठबांव या गावाने महाराष्ट्राला अनेक प्राथमिक शिक्षक पुरवले आहेत या भागातली मराठी शाळा तर शंभर वर्षांहून जुनी [illegible] एकूण तीन तुकड्यांमधून ७० विद्यार्थी शि[illegible] असलेल्या रामेश्वर हायस्कूलमध्ये पंधराहून अधिक तुकड्या आहेत आणि विद्यार्थीसंख्या सहाशेच्या पुढे आहे. अलीकडे कनिष्ठ महाविद्यालयाची वाणिज्य शाखाही सुरु केली असून तालुक्यातील एकमेव कनिष्ठ शिक्षण महाविद्यालयही इथेच आहे. हेच हायस्कूल सध्या काथ्या शिक्षणाचे एक सरकारी अध्यापनकेंद्रही चालवते. एकेकाळी मत्स्योद्योग हा विषयही रत्नागिरी शहर वगळता याच ठिकाणी शिकवला जाई. काही दशकापूर्वी या भागातील विद्वत्तेचं काशीक्षेत्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाडे येथील हायस्कूल १९५५ साली स्थापन झालेलं आहे. सुरवातीला ३८ विद्यार्थ्यांसाठी अध्यापनाचे काम करत असलेल्या या हायस्कूलची संख्या आज ७०० पर्यंत पोचली आहे. तसेच १९५८ साली स्थापन झालेल्या पडेल येथील हायस्कूलची संख्या ६०० आहे आणि मोंड येथील ' मोंड पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळ ' या संस्थेच्या ' मोंड विद्यामंदिर ' ची प्रगतीही स्तुत्य आहे.

देवगड तालुक्यातील सर्वात अलीकडचे नवे हायस्कूल जामसंडे येथील माध्यमिक विद्यालय हे होय. जून १९८१ मध्ये त्याची स्थापना झाली असून सध्या सातवी वगळता पाचवी ते दहावीर्यंतचे सर्व वर्ग चालवले जातात. १५ शिक्षकांकडून अध्यापनाचे काम होत असलेल्या या विद्यालयाची संख्या ३३० इतकी आहे.

देवगड तालुक्यात उर्दू हायस्कूल मात्र एकच आहे. 'इब्राहिम बाबा ठाकूर हायस्कूल' या नावाचं तिर्लोट-ठाकुरवाडी येथील हायस्कूल 'युनिटी एज्यु-केशन सोसायटी' चे असून २१९ विद्यार्थी संख्येत पाचवी ते दहावीपर्यंतचे वर्ग चालवले जातात.

उच्च माध्यमिक शिक्षणाचा विचार करता मिठबांव येथे वाणिज्य शाखेचे, नारिंग्रे येथे विज्ञान शाखेचे शिक्षण हायस्कूल मधून देण्यात येते. शिरगाव येथे अकरावी वाणिज्य शाखेची सोय आहे. तर 'शेठ मफतलाल गगलभाई हायस्कूल' देवगड येथे कला व वाणिज्य शाखांचे ...वी-बारावीचे वर्ग मोठ्या प्रमाणात चालवले जातात.

तालुक्यातील महाविद्यालयीन शिक्षणाचा विचार करावयाचा म्हणजे 'श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय' याच देवगडमधील महावि-द्यालयाचा विचार करावा लागेल. कारण तालुक्यातील हे एकमेव महाविद्यालय होय. दीड लाख लोकसंख्येच्या या तालुक्यात १९७४ पर्यंत महाविद्यालयीन शिक्षणाची सोय मुळीच उपलब्ध नव्हती. तालुक्यातील माध्यमिक शाळातून त्यावेळी दरवर्षी एकूण ५०० च्या आसपास विद्यार्थी एस्. एस्. सी. उत्तीर्ण व्हायचे. त्यातील काही पुढील शिक्षणासाठी मुंबईकडे धाव घ्यायचे तर बहुतांश विद्यार्थी शिक्षणाच्या सोयीअभावी पुढच्या शिक्षणाला मुकायचे. त्यामुळे उपेक्षित, गरजू विद्या-र्थ्यांना पदवीपर्यंतचं शिक्षण इथच मिळावं, कोकणातून मुंबईकडे जाणारा तरुणांचा लोंढा थांबवून त्याला इथच स्थिर करुन स्वतःच्या विकासाबरोबरच तालु-क्याच्या विकासाचीही दृष्टी द्यावी या बहुविध उद्देशानं देवगडच्या शिक्षण विकास मंडळानं ३० जून १९७४ रोजी 'देवगड कॉलेज ऑफ् आर्टस् अँड कॉमर्स' या नावानं महाविद्यालयाची स्थापना केली. नुकताच ऑक्टोबर १९८३ मध्ये महाविद्यालयाचा नामकरण समारंभ मंत्र्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला असून आता महाविद्यालय 'श्री. सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय' या नावानं ओळखलं जातं. महाविद्यालयातून आजवर दीडशेच्यावर पदवीधर बाहेर पडले आहेत. महाविद्यालयात कनिष्ठ व वरिष्ठ असे दोन विभाग कला व वाणिज्य शाखेचे असून आज महाविद्यालयाची एकुण विद्यार्थीसंख्या पाचशेपर्यंत येऊन पोहोचली आहे. स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर भव्य आणि सुसज्ज इमारत आहे. भव्य क्रीडांगण असून थोड्याच कालावधीत ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत व विद्यार्थी वसतीगृह या वास्तू उभारण्याचा महाविद्यालयाचा संकल्प आहे. महाविद्यालयाचा परि-सर 'श्रीमती नीराबाई जगन्नाथ पारकर विद्यानगरी' या नावानं ओळखला जातो. येत्या पाच वर्षात ही विद्यानगरी अनेक उपक्रमाने गजबजून जाणार आहे. विद्यार्थीपालक योजना, उत्कृष्ट वाचक योजना, महाविद्यालयासमोर बगीचा, खेळाचे विविध साहित्य, कमवा व शिका योजना, आणि महाविद्यालयाचं भूषण असलेलं क्रिकेटचं सर्व साहित्यासह सुसज्ज मैदान या नवीन योजना महाविद्यालयात सुरु करण्यात आल्या आहेत. अशा या विकासोन्मुख महाविद्यालयाच्या संस्थेचे अध्यक्ष कोल्हापूरचे दानशूर विद्याप्रेमी श्री बापूसाहेब पंतबाळावलकर हे आहेत.

कोकणातील देवगड तालुका हा तसा दुर्गम आणि खाडींनी व्यापलेला, समुद्राच्या काठाला असलेला व जगाच्या दृष्टीने दूर टोकाला असा! तशात पावसा-ळ्याचे सहा महिने आणि नंतरच्या काळातील दमट-खारट हवा यांचाही त्रास. वाहतुकीची साधनेही तोकडीच! हाताच्या बोटावर मोजण्याइतके लोक सोडले तर इथली जनता जन्मदरिद्रीच! या सर्व पार्श्वभूमीवर हे शैक्षणिक चळवळीचे या तालुक्यातील चित्र निश्चितच कौतुकास्पद म्हणावे लागेल.

# ॥सार्वजनिक ग्रंथालये॥

**अनिरुद्ध बोंडाळे**

द्वितीय वर्ष वाणिज्य

जनतेतील कोणतीही सुशिक्षित व्यक्ती ज्या ग्रंथालयाची सभासद होऊ शकते ते सार्वजनिक ग्रंथालय. हे सार्वजनिक ग्रंथालयाचे वैशिष्टच आहे. जनतेच्या उपयोगासाठी जनतेने जनतेच्या खर्चाने चालविलेली ग्रथालये म्हणजे सार्वजनिक ग्रथालये किंवा जनता ग्रंथालये होत. सार्वजनिक ग्रंथालयसेवा ही स्थानिक स्वरुपाची असते. याला सरकार अनुदानरुपाने मदत करीत असतेच. सार्वजनिक ग्रंथालयावर केलेला खर्च ही एक उत्तम गुंतवणूक आहे. कारण सर्व प्रजा सुशिक्षित असणे आवश्यक आहे. त्यासाठी ग्रंथालये त्यांना आजन्म शिक्षण देतात. सर्वसामान्यांना शिक्षण, करमणूक व माहिती मिळणे हा सार्वजनिक ग्रंथालयाचा प्रधान उद्देश आहे. सार्वजनिक ग्रंथालयाचे उद्देशसफल करण्यासाठी सर्वसाधारणपणे खालील धोरणे सांभाळावी लागतात.

१) ग्रथालयासाठी सोईस्कर असे मध्यवर्ती ठिकाण निवडणे.

२) ग्रंथालय उघडे रहाण्याच्या वेळा सर्व व्यवसायातील लोकांना सोईस्कर ठरविणे.

३) शक्यतो सर्व विषयावरील ग्रंथ संग्रहीत करणें.

४) तात्काळ उपलब्ध होईल अशी त्यांची ठेवण्याची व्यवस्था करणे. त्यासाठी आधुनिक तंत्राचा वापर करणे.

५) त्या साहित्याचा लोकांना उपयोग व्हावा म्हणून प्रचार करणे. (व्याख्याने, चर्चासत्र, प्रदर्शन, सिनेमा, टेलिव्हीजन इ.) ग्रंथालयाला सांस्कृतिक केंद्राचे स्वरुप देणे.

६) ग्रंथालयात एकदा आलेला वाचक, श्रोता, प्रेक्षक पुन्हा येईल याची काळजी घेणे.

७) मार्गदर्शनासाठी व सहकार्यासाठी इतर ग्रंथालयांशी संपर्क ठेवणे.

८) संबंधीत व नवीन ज्ञानाचा सतत शोध घेणे.

९) कमीत कमी वर्गणी ठेवणे.

## देवगड तालुक्यातील ग्रंथालयांची प्रगती

देवगड तालुक्याचे ७७४ चौ. कि. मी. क्षेत्रफळ असून तालुक्यामध्ये लहानमोठी ६४ गावे आहेत. तर ६० ग्रामपंचायती आहेत. नुकत्याच झालेल्या जनगणनेनुसार १०,२५,७५ इतकी लोकसंख्या आहे तर त्यापैकी ५८,१६२ इतकी साक्षर आहेत. प्राथमिक शाळा १८५, माध्यमिक शाळा २०, कनिष्ठ महाविद्यालये ५ व वरिष्ठ महाविद्यालय एक अशा शिक्षणसंस्था असून त्यामुळे साक्षरतेचे प्रमाण बऱ्याच प्रमाणात वाढत आहे.

महाराष्ट्रामध्ये एकूण ८२१ सार्वजनिक ग्रंथालये आहेत. त्यापैकी एकट्या देवगड तालुक्यात लहानमोठी १७ सार्वजनिक ग्रंथालये असून त्यांची एकूण ग्रंथसंपदा ३१७०० इतकी आहे. यातील ८५% ग्रंथालये सरकारमान्य असून सरकारी अनुदानास पात्र आहेत. त्यापैकी तीन ग्रंथालये स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेली असून ती 'सार्वजनिक मोफत वाचनालय' व 'डॉ. वि. वा. नेने ग्रंथालय वाडा' (१९२५) 'मुक्तद्वार सागर वाचनालय, तांबळडेग' (१९२९) व 'उमाबाई बर्वे लायब्ररी व ग्रंथसंग्रहालय, देवगड' (१९४७) ही होत.

तालुक्यातील सर्वात मोठे ग्रंथालय म्हणून 'उमाबाई बर्वे लायब्ररी व ग्रंथसंग्रहालय, देवगड' या ग्रंथालयाचा उल्लेख करावा लागेल, तर त्या पाठोपाठ वाडा येथील सार्वजनिक ग्रंथालयाचा क्रमांक लागतो. ही दोन्हीही सार्वजनिक ग्रंथालये 'ब' वर्गातील असून त्यांची ग्रंथसंपदा अनुक्रमे ८,१६१ व ६,००० अशी आहे. तालुक्यामध्ये 'अ' वर्गातील एकही सार्वजनिक ग्रंथालय नाही. सार्वजनिक ग्रंथालयाच्या सभासदाबाबत 'मुक्तद्वार सागर वाचनालय' तांबळडेग, या सार्वजनिक ग्रंथालयाने कौतुकास्पद प्रगती केली आहे. तेथील ३५% लोक ग्रंथालयाचे सभासद आहेत. तालुक्यातील आदर्श ग्रंथालय म्हणून वाडा येथील 'सार्वजनिक मोफत वाचनालय व 'डॉ. वि. बा. नेने ग्रंथालय' वाडा, याकडे पहावे लागेल. तालुक्यातील निम्याहून, अधिक ग्रंथालयांना स्वतंत्रपणे जागा नाही. २०'×२०' च्या जागेत त्यांनी आपला संसार थाटला आहे. ती दिवसातून २-३ तासच उघडी असतात.

नारिंग्रे, शिरगाव, हिंदळे, मोंड व जामसंडे येथील सार्वजनिक ग्रंथालयांची प्रगती आशादायक आहे. कुणकेश्वर, इळये, दाभोळे येथील सार्वजनिक ग्रंथालयेही चांगल्यापैकी वाटचाल करीत आहेत. तीस वर्षापूर्वी निघालेले दर्यावर्दी वाचनालय, गिर्ये-बांदे व १९६१ साली निघालेले मोफत वाचनालय, तारामुंबरी यांची प्रगती फारच मदगतीने चालली आहे. त्यापैकी गिर्ये-बांदे येथील सार्वजनिक ग्रंथालय मध्यंतरी काही वर्षे बंद होते. आता ते नव्याने सुरू झाले आहे. तारामुंबरी येथील मोफत वाचनालय सध्या बंदच आहे. शासनाने हातभार लावल्यास ह्या रोपट्याला चांगली फळे येऊ शकतील.

तळेबाजार, मुणगे, पडेल, विजयदुर्ग, मुटाट, तिर्लोट, हडपिड, कोर्ले, धालवली या माध्यमिक शाळा असलेल्या ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालये नाहीत. ही एक चिंतेची बाब आहे. तालुक्यातील मोठ्या गावांमध्ये या गावांची गणना केली जाते. ग्रामपंचायत व राज्य-सरकार यांच्यावतीने या ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालये उभारावयास हवीत.

## उणिवा व उपाय

या तालुक्यातील नोंदणी केलेल्या सार्वजनिक ग्रंथालयामध्ये खालील उणिवा दिसून आल्या. सदरच्या उणिवा दूर करण्यासाठी त्यावर उपायही सुचविलेले आहेत.

१) विद्यार्थ्यांच्या वाढत्या जबाबदारीने व दूरवर शिक्षणासाठी जावे लागत असल्याने वेळेअभावी त्यांना इतर ग्रामस्थ लोकांना सार्वजनिक ग्रंथालयाविषयी मार्गदर्शन व प्रचार करता येत नाही.

ग्रंथालयाचे खरे महत्व उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना कळलेले असते. तालुक्यामध्ये आणखीन काही माध्यमिक विद्यामंदिरे उघडल्यास विद्यार्थ्यांचा जाण्यायेण्याचा वेळ वाचेल व त्याचा उपयोग सार्वजनिक ग्रंथालयासाठी होऊ शकेल.

२) सरकारी अनुदान व देणग्या मिळत असूनही काही ग्रंथालयांनी सभासदपद्धती सुरु केली आहे. वर्गणी भरतात तेच सभासद होतात. त्यामुळे वाचक संख्येवर परिणाम झालेला दिसून येतो.

केवळ वर्गणीअभावी वाचकांची संख्या घटू नये म्हणून पूर्णपणे मोफत ग्रंथालय सुरु करावे लागेल. यासाठी सरकारने खर्चाची पूर्णबाजू उचलावयास हवी. पुस्तकांच्या हमीसाठी काही अल्पप्रमाणात अनामत रक्कम (उदा. रु. १०/-) घ्यावयास हरकत नाही. अगदी नाइलाजाने वर्गणी गोळा करण्याची वेळ आलीच तर ती अत्यल्प असावी

३) या तालुक्यामध्ये सुमारे ६० ग्रामपंचायती आहेत व नोंदणी केलेली सार्वजनिक ग्रंथालये १७ आहेत. म्हणजेच अद्याप ४३ ग्रामपंचायत क्षेत्रातील लोकांना ग्रंथालयाचा फायदा मिळत नाही. त्यासाठी किमान प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी १ अनुदान सार्वजनिक मोफत वाचनालय राज्यसरकारने चालवावे.

४) वाढती लोकसंख्या व वाढते साक्षरतेचे प्रमाण लक्षात घेऊन सार्वजनिक ग्रंथालयाच्या अनुदानाची तरतूद केलेली नाही. त्यामुळे प्रगतीवर परिणाम झालेला दिसत आहे. दरवर्षी सुमारे २.५% प्रमाणे

# दृष्टिक्षेपात देवगड तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालये

| अ नं. | ग्रंथालयाचे नांव | स्थापनेचे वर्ष | ग्रंथ संख्या | सभासद | गावची लोकसंख्या | वर्ग | सासकीय अनुदान मिळते काय? | स्वतंत्र इमारत आहे काय? | जागेचे क्षेत्रफळ | प्रशिक्षित ग्रंथपाल आहे काय? | किती तास उघडे असते ? | एकूण नियत-कालिके |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | सार्वजनिक मोफत वाचनालय व डॉ. वि. वा. नेने ग्रंथालय, वाडा. | १९२५ | ६००० | २१५ | ४००० | ब | मिळते | आहे | ४०० चौ. फूट | नाही | ७॥ तास | ३० |
| २ | मुक्तद्वार सागर वाचनालय, तांबळडेग. | १९२९ | १०७० | ३५० | १००० | ड | ,, | ,, | ६०० ,, | ,, | ३ ,, | ९ |
| ३ | उमाबाई बर्वे लायब्ररी व ग्रंथसंग्रहालय देवगड. | १९४० | ८१६१ | २७५ | ४५०८ | ब | ,, | ,, | ४०० ,, | ,, | ७ ,, | २२ |
| ४ | दर्यावर्दी वाचनालय, गिर्ये-बांदे. | १९५४ | ९३१ | २०[illegible] | ४५०० | क | ,, | ,, | ६०० ,, | ,, | ४ ,, | ९ |
| ५ | श्री रामेश्वर मुक्तद्वार वाचनालय, मिठबांव. | १९५५ | ५६०३ | १०९ | ६५०० | क | ,, | ,, | ६०० ,, | ,, | ६ ,, | १७ |
| ६ | कै. सौ. सत्यभामाबाई नारायण राणे वाचनालय, नारिंग्रे. | १९५७ | १०३५ | ५० | १६७४ | क | ,, | ,, | ३८४ ,, | ,, | ३ ,, | १२ |
| ७ | मोफत वाचनालय, तारामुंबरी. | १९६१ | ५७२ | ८१ | ४०० | क | नाही | नाही | ३२० ,, | ,, | सध्याबंद | — |
| ८ | श्री महालक्ष्मी वाचनालय, तळवडे-वागतळवडे. | १९७२ | ३५० | १३७ | १९६५ | क | मिळते | आहे | २२५ ,, | ,, | ६ तास | ४ |
| ९ | जीवन विकास ग्रंथालय, किंजवडे. | १९७५ | १२१५ | १०० | २८०० | क | ,, | नाही | — | ,, | ३ ,, | ३ |
| १० | फणसगांव वाचनालय, फणसगाव | १९७५ | १०३५ | ५२ | २३३८ | ड | ,, | ,, | ३६० ,, | ,, | ४ ,, | १० |
| ११ | पाणपोई वाचनालय, शिरगाव. | १९७५ | १२४८ | ६६ | ६००० | क | ,, | ,, | १८० ,, | ,, | ३ ,, | १२ |
| १२ | साहित्य सम्राट न. चिं. केळकर ग्रंथालय, मोंड | १९७५ | १९०० | १०० | ४००० | क | ,, | ,, | २०० ,, | ,, | ८ ,, | १० |
| १३ | सुंदराबाई शंकर वळंजू वाचनालय, हिंदळे. | १९८० | १०८३ | ६७ | २६५० | ड | ,, | आहे | १६० ,, | ,, | ३ ,, | २० |
| १४ | कुणकेश्वर ग्राम वाचनालय, कुणकेश्वर. | १९८१ | ४२५ | ६५ | १६८० | क | ,, | नाही | १०० ,, | ,, | २ ,, | २ |
| १५ | प्रगती ग्राम वाचनालय, इळये. | १९८१ | ३३९ | २८५ | २११८ | ड | ,, | ,, | २८० ,, | ,, | ७ ,, | १० |
| १६ | लोकमान्य मुक्तद्वार, दाभोळे. | १९८१ | ३३४ | ४० | १३५० | ड | नाही | ,, | — | ,, | १ ,, | ३ |
| १७ | सन्मित्र वाचनालय, जामसंडे. | १९८२ | ३०८ | ५० | ६००० | ड | मिळते | ,, | ४०० ,, | ,, | ३॥ ,, | ७ |

लोकसंख्या वाढत आहे. या तालुक्यात साक्षरतेचे प्रमाण ४९% आहे. त्यासाठी किमान १००० लोकसंख्या असलेल्या गावामध्ये एक सार्वजनिक ग्रंथालय उघडणे आवश्यक आहे व फक्त दरडोई एक रुपयाप्रमाणे खर्चाची तरतूद करण्यास हरकत नाही.

५) ग्रंथालय चालविण्यासाठी स्थानिक स्वराज्यसंस्थांना परवानगी न देता त्यासाठी खास संस्था स्थापाव्या लागल्या आहेत. त्यामुळे व्यवस्थापनेसाठी विनाकारण खर्च होत आहे.

सार्वजनिक ग्रंथालये चालविण्यासाठी खास संस्था न स्थापता सहकारी सोसायटी, ग्रामपंचायती, देवस्थानसमिती इ. स्थानिक स्तरावरील स्वराज्यसस्थांना परवानगी दिल्यास बराच खर्च वाचेल. त्या संस्थेच्या कार्यालयाच्या वेळेशिवाय इतरवेळ सार्वजनिक ग्रंथालयासाठी ठेवल्यास जागेचा प्रश्न उद्भवणार नाही. सभागृह व इतर सुखसोई (लाईट, पाणी इ.) नवीन कराव्या लागणार नाहीत. फक्त सेवकवर्ग व कपाटे घेतल्यास त्या संस्थेच्या मालमत्तेवरच चांगल्याप्रकारे ग्रंथालय चालविता येईल. अशी सोय केल्यास ग्रामस्थांचे स्थानिक स्वराज्य संस्थेतील काम व ग्रंथालय ही दोन्ही कामे एकत्रित होतील.

६) तालुक्यातील देवगड, वाडा, मिठबांव या मोठ्या गावात व तांबळडेग, गिर्ये, नारिंग्रे, किंजवडे या लहान गावातील ग्रंथालयांमध्ये ग्रंथांची निवड व संग्रह यात फरक दिसतो. सार्वजनिक ग्रंथालयाचा शिक्षण, करमणूक व माहिती हा एकच हेतू असल्याने ग्रंथनिवडीबाबत फरक करण्याची आवश्यकता नाही. यासाठी कनिष्ठ ग्रंथालयांना वरिष्ठ ग्रंथालयांची मदत घेता येईल.

७) मागासलेल्या व लहानलहान खेड्यात ग्रंथालय उघडणे परवडत नाही. त्यामुळे तेथील लोकांना ग्रंथालयापासून वंचित रहावे लागत आहे.

या तालुक्यामध्ये वाड्यांची संख्या बरीच आहे. काही काही ठिकाणी ७-८ वाड्या मिळून एक ग्रामपंचायत झाली आहे. प्रत्येक वाडीसाठी ग्रंथालय चालू ठेवणे शक्य नाही. व सर्व वाडीतील लोकांना ग्रंथालय उघडे असण्याच्या वेळात ग्रंथालयाच्या ठिकाणी येणेही शक्य नाही. त्यासाठी फिरते ग्रंथालय करता येईल. त्यासाठी प्रत्येक वाडीतील लोकांना एक किंवा दोन दिवस ठरवून देता येईल. अशा योजनेत सहा वाडीत एक ग्रंथालय चालू शकते. एक पुस्तक देतेवेळी पुढील पुस्तकाची मागणी त्याच्याकडून लिहून घ्यावयाची व ते पुस्तक त्याला पुढील भेटीच्या वेळी द्यायचे. याप्रमाणे ग्रंथालयाचा खर्च वाचेल. वाचकांना वेळ वाचेल व वाचण्याकडे ओढा वाढेल.

८) तालुक्यामध्ये कुठल्याही दोन ग्रंथालयांमध्ये 'साखळी पद्धती' नाही. आपल्याला पाहिजे असलेले व आपल्या ग्रंथालयात नसलेले ग्रंथ इतर ग्रंथालयातून घ्यावयाचे व त्यांना हवे असणारे ग्रंथ आपल्या ग्रंथालयातून द्यावयाचे किंवा एखादा संच आळीपाळीने सर्व ग्रंथालयांना ठराविक मुदतीसाठी फिरविणे याला साखळी पद्धत म्हणतात. स्थानिक व जवळच्या ग्रंथालयाद्वारे अत्यल्प खर्चात ही योजना राबविता येईल.

९) तालुक्यातील सर्व सार्वजनिक ग्रंथालयामध्ये एकही ग्रंथालयप्रमुख प्रशिक्षित नाही. त्यामुळे व्यवस्थापनात अद्ययावतपणा दिसत नाही. ग्रंथालयातून काम करणाऱ्या सहाय्यक सेवकास व लहान ग्रंथालयाच्या ग्रंथपालास हे ज्ञान मिळावे म्हणून महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघामार्फत महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी ग्रंथपालवर्ग घेण्यात येतात. रत्नागिरी व सिंधुदुर्ग या दोन जिल्ह्यासाठी असे वर्ग 'नगर वाचन मंदिर, रत्नागिरी येथे एप्रिल-मे मध्ये घेण्यात येतात. इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेल्यांना प्रवेश घेता येतो. प्रत्येक ग्रंथालयातील किमान एका व्यक्तीला असे प्रशिक्षण द्यावे.

१०) तालुक्यात समन्वय साधण्यासाठी संघटना नाही. त्यामुळे विचारांची देवाणघेवाण करण्यास वावच नाही. देवगड तालुक्यातील सार्वजनिक ग्रंथालयप्रमुखांची एक संघटना करावयास हवी. देवगड येथे संघटनेचे कार्यालय असणे उत्तम. महिन्यातून किमान एक दिवस तरी तीन तासाचे चर्चासत्र ठेवावे

म्हणजे विचारांची देवाणघेवाण होईल. प्रश्नोत्तरातून विचारविनिमय करता येईल.

११) तालुक्यातील कोणत्याही ग्रंथालय प्रमुखाला समाधानकारक वेतन मिळत नाही. सरकारी वेतनश्रेणी दिली जात नाही. त्यामुळे अपूर्ण वेतनावर पूर्णवेळ काम करता येत नाही. नुकत्याच पार पाडलेल्या (डिसेंबर १९८३) महाराष्ट्र सरकारच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात सार्वजनिक ग्रंथालयातील ग्रंथपालांना १९८५ पासून वेतनश्रेणी देण्याचा ठराव संमत झाला आहे. उशिरा का होईना पण सरकारने उचललेले हे एक चांगले पाऊल आहे.


१२) तालुक्यातील बऱ्याच ग्रंथालयांना स्वतंत्र जागा नाही ज्यांना स्वतंत्र जागा आहे तीही अपुरी आहे. भरपूर जागेशिवाय ग्रंथालय चळवळीचा हेतू साध्य होणार नाही. ज्या ठिकाणी ग्रंथालयासाठी स्वतंत्र इमारत नाही, अशा ठिकाणी राज्यसरकारने ग्रामपंचायतीमार्फत १००० लोकवस्तीसाठी किमान १५' × २०' च्या दोन खोल्यांच्या आधुनिक पद्धतीने पक्क्या इमारती बांधून घ्याव्यात. तोपर्यंत स्थानिक स्वराज्यसंस्थेच्या जागा त्यांच्या कार्यालयांव्यतिरिक्त वेळेत ग्रंथालयांना द्याव्यात.

## कोकणविकासासाठी ग्रंथालय कायदा वेगळा हवा काय ?

शिक्षण हा राज्यसरकारच्या कक्षेत येणारा विषय आहे. ग्रंथालये सुप्रतिष्ठित व्हावीत, त्यांचा कारभार सुरळीत चालू व्हावा म्हणून राज्यसरकारने आपापल्या राज्यात ग्रंथालय कायदा करावा या हेतूने १९७२ च्या दरम्यान सार्वजनिक ग्रंथालय कायदा कसा असावा याचा मसुदा राज्यसरकारने केंद्र सरकारला पाठविला होता. इतर कायद्याप्रमाणे ग्रंथालय कायद्याची राज्यकर्त्यांना तेवढी आवश्यकता भासत नसल्याने ते काम यथावकाश होईल !

देवगड तालुक्यामध्ये खरोखरच ग्रंथालय चळवळ रुजवायची असेल तर राज्यसरकारने खास कोकणासाठी ग्रंथालय कायदा करावयास हवा. वास्तविक आपल्याकडे राज्यातील विशिष्ट विभागासाठी वेगळा ग्रंथालय कायदा करण्याची पद्धत नाही. ऑस्ट्रेलिया, ग्रेट-ब्रिटन इ. देशात अतिदुर्गम व मागासलेल्या विभागासाठी असे कायदे केलेले आहेत. परंतु देवगड तालुक्याची अवस्था पाहता ग्रंथालय कायदा वेगळा करणे आवश्यक भासते. माध्यमिक शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय अशा एकूण २६ शैक्षणिक संस्था आहेत. प्रत्येक शैक्षणिक संस्थेत ग्रंथालय असते. परंतु त्याचा सार्वजनिक ग्रंथालय म्हणून उपयोग करता येत नाही. तालुक्यामध्ये लहानमोठी एकूण १७ सार्वजनिक ग्रंथालये आहेत. तसेच तालुक्यामध्ये लहानमोठी ६४ गावे आहेत. म्हणजेच सुमारे ७५% गावांना ग्रंथालयाचा फायदा घेता येत नाही. ही परिस्थिती महाराष्ट्रात इतर भागात नाही, म्हणून कोकण विभागासाठी विशिष्ट तरतुदीसह वेगळा ग्रंथालय कायदा हवा.

सार्वजनिक ग्रंथालयाचा योग्य उपयोग व्हावा म्हणून नियम व त्याचा गैरउपयोग होऊ नये यासाठी विनिमय असावेत. सार्वजनिक ग्रंथालय कायदा करताना, सार्वजनिक ग्रंथालयासंबंधित व्याख्या, सार्वजनिक ग्रंथालये, ग्रंथ अधिकरण योजना, अर्थव्यवस्था, अधिकार इ. गोष्टींचा उहापोह व्हावा, जेणेकरुन सार्वजनिक ग्रंथालय उद्देश सफल होईल.



# ॥ काही भजनीमंडळे ॥

**प्रसाद मोंडकर**

बारावी कला

देवगडमधील प्रत्येक वाडीत एकतरी भजनी मंडळ असलेले पाहून येथील धार्मिकतेची कल्पना येते. वृद्धांबरोबरच तरुणांची संख्याही या भजनीमंडळात असली तरी ही मंडळे आर्थिक उत्पन्नाची साधने न बनता ईश्वर चिंतनासाठीच महत्वाची आहेत.

एक ते दोन तासपर्यंत चालणाऱ्या या कार्यक्रमाला गणेश चतुर्थी, लग्नसमारंभ, धार्मिक कार्ये इत्यादींच्या निमित्ताने सुपारी दिली जाते. काही प्रमाणात पैसे स्विकारले जातात व त्याचा उपयोग वाद्यखरेदी, वाद्यदुरुस्तीसाठी केला जातो. सर्वसाधारण भजनासाठी ३५ ते ४० रु. घेतले जातात तर डबलबारीसाठी १५० रु. पर्यंत ही बिदागी स्विकारली जाते.

काही तरुण मुंबईला भजन शिकून तयार होतात व येथे भजनी मंडळाची स्थापना करतात. वडीलधारी मंडळींमुळे लहान मुलांमध्येही आवड निर्माण झाल्याचे दिसते. भजनातील मुख्य व्यक्ती जी 'बुवा', तेच चाली लावतात. या चाली पारंपारिक पद्धतीच्या असतात. किंवा गुरुनी रचलेली भजनेही गाइली जातात

सर्वसाधारणपणे ३० ते ३५ व्यक्तींचा यात समावेश असतो. मंडळास दूरच्या वाडीवर निमंत्रण असेल तर प्रवास खर्च दिला जातो किंवा अधिक बिदागी दिली जाते. अशा मंडळाचे भांडवल वर्गणीतून उभे होते. तबला, पेटी, पखवाज, खंजिरी, नाल, टाळ इ. वाद्ये आवश्यक असतात. घरी जसा वेळ मिळेल तसा सराव केला जातो. डबलबारीची भजनें साधारणपणे ४ तास चालतात. रामायण, महाभारतातील कथा, भारुडे, संतांचे विविध अभंग, गवळणी यांचा त्यात समावेश असतो. सुरवातीस सर्व देवतांचा जयजयकार केला जातो.

सिद्धकला भजनी मंडळ — श्रीमती पार्वतीबाई माधव कालेकर काम पहात असलेल्या या मंडळात नित्योपासना, बोधामृत बलोपासना, व परमपूज्य कलावती आईनी रचलेली गाणी गाइली जातात. छापील पुस्तकावरून भजन शिकवले जाते. जास्तीत जास्त अनुग्रह घेतलेल्या स्त्रियांकडून भजन चालविले जाते. मनःशांती हे त्याचे कारण होय.

बेळगाव येथे या मंडळाची मुख्य शाखा आहे. बिदागी स्विकारुन भजने केली जात नाहीत. परमपूज्य कलावती आईच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात होतो. भजनीमंडळाच्या अधिक प्रसारासाठी "श्रीहरी मंदीर" बांधण्याची त्यांची इच्छा आहे.

मुरामनेवाडी विकास भजनमंडळ— तारामुंबरी येथे १९७४-७५ ला स्थापन झालेल्या या मंडळाचे प्रमुख आहेत श्री सूर्यकांत राजाराम जोशी. मुंबईस असणाऱ्या मंडळाच्या संस्थेमार्फत निरनिराळी वाद्ये व इतर भांडवल पुरवले जाते. मंडळाचे उत्पन्न सार्वजनिक कार्यासाठी खर्च केले जाते.

तारामुंबरी भजन महिला मंडळ— सौ. वैशाली विद्याधर तोंडणकरांच्या या मंडळात १० ते २० महिला असून गावातील विठ्ठल मंदिरात चतुर्थी अथवा सार्वजनिक कार्यक्रमाच्या वेळी भजन होते. टाळ हे एकच वाद्य हे वापरतात. याप्रमाणेच मळई येथील 'श्री. मंगलमुर्ति भजन मंडळ,' हे श्री. सदानंद पांडुरंग बांदकरांचे, मिराशीवाडीतील 'श्री महादेवर प्रासादिक भजनी-मंडळ हे श्री. सहदेव शिवराम मुळभ यांचे व शिरगाव येथील 'श्री. पावनादेवी प्रासादिक भजनी-मंडळ' अशी काही उल्लेखनीय भजनीमंडळेही आहेत.

मंडळामार्फत येणारे उत्पन्न सार्वजनिक कामासाठी वापरण्याची प्रवृत्ती उल्लेखनीय आहे भजनात काही प्रमाणात शास्त्रीय रागदारीचाही उपयोग केला जातो. अनेक मंडळांची अनेक वैशिष्ट्ये असली तरीही जुन्या परंपरेशी सांगड घालून धार्मिक वृत्ती जोपासण्याची प्रवृत्ती यामागे निश्चीत असलेली जाणवते.

# ॥ वृत्तपत्रसृष्टी ॥

शुभांगी सप्रे

प्रथम वर्ष कला

एकंदरीनच कोकणात वृत्तपत्रांची संख्या जास्त आहे. कोकणचा चाकरमाना कुठेही असला तरी गावचे वृत्तपत्र आठवणीने वाचतो ; त्याद्वारे जणू तो गावातील सर्वांनाच भेटत असतो.

देवगडमध्ये सद्या 'देवदुर्ग' आणि 'अणुरेणू' ही दोन साप्ताहिके इथे आहेत १९४८ ते १९५५ पर्यंत श्री. स. प. देसाई 'लोकसेवा' साप्ताहिक चालवत असत. आर्थिक अडचणीमुळे ते बंद केल्यानंतर देवगडला काहीकाळ वृत्तपत्र नव्हतेच. नंतर डॉ. भा. वा. आठवले व श्री. श्रीपाद काळे यांच्या कल्पनेवरुन, प्रत्येकी १०० रु. देऊन नऊ सदस्यांची 'मेघदूत प्रकाशन संस्था' स्थापली गेली. १ फेब्रुवारी १९७३ रोजी त्यावेळचे सभापती श्री. अमृतराव राणे यांच्या हस्ते 'साप्ताहिक देवदुर्ग' चा पहिला अंक प्रकाशित झाला. दर गुरुवारी नियमीतपणे निघणारा 'देवदुर्ग' 'कल्याण सहकारी मुद्रणालय' देवगड येथे छापून घेतला जात असे. डॉ. आठवले व श्री. पद्माकर जोशी निरनिराळ्या विषयावर लिखाण करीत असत. 'बुरुजावरुन' हे सदर व पुस्तक परीक्षण ते सातत्याने लिहीत असत.

सुमारे सहा महिन्यानंतर श्रीपाद काळेंचे संपादकत्व मधुकर केशव गोगटे यांनी स्विकारले. जाने. १९७५ मध्ये त्यानीही राजिनामा दिल्याने शि. स. देसाई स्वतः:च हे काम करु लागले. त्यातही काही अडचणी आल्याने संपादकाअभावी वृत्तपत्र बंद पडू नये म्हणून सौ. सुधा शिवराम देसाई यांनी संपादकाचे काम स्विकारले व तेंव्हापासून आजपर्यंत त्याच 'देवदुर्ग' च्या संपादकत्वाची धुरा आत्मविश्वासाने व यशस्वीपणे सांभाळत आहेत. देवगडच्या इतिहासात स्त्री संपादकाचा हा एक उत्कृष्ट आदर्श म्हणावा लागेल.

वृत्तपत्रातील मजकुराबाबत मतभेद निर्माण झाल्याने 'मेघदूत प्रकाशन संस्था' बरखास्त करण्यात आली. ५ जाने १९८० पासून 'देवदुर्ग,' श्री. शि. स. देसाई यांच्या मालकीचे झाले. अर्थात् त्यावेळी ते नुकसानीत नव्हतेच.

सुरवातीपासूनच स्वतंत्र बातमीदार नसल्याने श्री. शि. स. देसाई बातम्या जमा करत असत. कणकवलीचे एन्. डी. पाध्ये 'कणकवली समाचार' पाठवीत असत तसेच प्रसिद्धी अधिकारी व पोलीस स्टेशन यांच्याकडूनही बातम्या मिळवल्या जात. स्थानिक वार्ताहर श्री. यशवंत पोकळेंची बातम्या देण्यासाठी 'देवदुर्ग' ला खूपच मदत होते. आज 'देवदुर्ग' चे वर्गणीदार सुमारे ८५० असून प्रामुख्याने मुंबई, पुणे, देवगड तालुका, रत्नागिरी जिल्ह्यातील काही तालुके व कालीकत येथपर्यंत हे वृत्तपत्र जाते. साप्ताहिकाची वार्षिक वर्गणी सुरवातीला ८ रु होती. सद्या ती १५ रु. आहे. प्रथमपासून निघणारा 'देवदुर्ग' दिवाळी अंक वर्गणीदारांना मोफत दिला जातो. सुरवातीस येत असलेले राशिभविष्य बातम्यांच्या आवश्यकतेवरुन बंद केले गेले. 'ध्वनिप्रतिध्वनी' हे ही एक सदर असे

'खरोखर अन्याय झाला असेल तर त्याला वाचा फोडणे व कोणालाही वैयक्तिक वाकडेपणामुळे बदनाम न करणे' हा 'देवदुर्ग' चा दृष्टिकोन त्याच्या

लोकप्रीयतेस कारण असावा. कोणाच्याही आहारी न जाता बातम्या देण्याचे संपादकांचे धोरण स्तुत्य आहे. 'पोच व अभिप्राय ' हे सदर वृत्तपत्रात असते.

' देव ' चैतन्याचे तुम्ही
' दुर्ग ' आम्ही शद्बधनी ।

हे या साप्ताहिकाचे घोषवाक्य अतिशय बोलके आहे. वृत्तपत्र हा मुळातच देसाई यांच्या आवडीचा विषय असल्याने शिवाय ते स्वत: मुद्रणकलेची चांगली जाण असलेले मुद्रणकला शिक्षक असल्याने निवृत्त झाल्या-नंतर ' दैनिक देवदुर्ग ' सुरु करुन अंकही आकाराने वाढवण्याचा त्यांचा विचार ' देवदुर्ग ' च्या उज्वल भविष्याचेच द्योतक नव्हे का ?

भारताने केलेल्या यशस्वी अणुस्फोटाच्या चाच-णीवरुन ' अणुरेणू ' हे कलात्मक नाव धारण केलेले, मुख्याध्यापक नाबरांच्या हस्ते उद्घाटन केले गेलेले, तालुक्यातील दुसरे वृत्तपत्र ' साप्ताहिक अणुरेणू ' होय.

सुरवातीस मुद्रकापासूनचे काम श्री. मधुकर गोगटे करत असत. ' कल्याण सहकारी मुद्रणालयात ' छपाईचे काम होई. समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने बातम्या निवडल्या जात. 'ज्ञानविज्ञान ' व ' शिशुरंजन ' अशी सदरे त्यात दिली जात होती. १९७६ ते १९७७ पर्यंत जवळजवळ एक वर्ष तांत्रीक अडचणीमुळे हे साप्ताहिक बंद होते. मुंबई, पुणे, रत्नागिरी, कोल्हापूर, राजापूर तसेच कुवेतपर्यंत हे वृत्तपत्र पाठवले जाते. गावातील जबाबदार व्यक्ती, तलाठी, ग्रामसेवक, सरपंच व प्रतिष्ठीत व्यक्तीकडून बातम्या मिळतात.

१ जाने. १९७९ पासून डॉ. गोगटे यांच्याकडे वृत्तपत्राची मालकी आली. ३१ डिसें. १९७९ ला श्री. मधुकर गोगटे पूर्णपणे निवृत्त झाल्यानंतर श्री. विनायक मधुकर ठाकूर हे संपादक, मुद्रक, प्रकाशकाचे काम पाहू लागले. नंतर व्यावसायिक कामामुळे डॉ. गोगटेंच्याकडून त्यांचे बंधू श्री. पद्माकर गोगटे यांनी मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक अशी संपूर्ण जबाबदारी घेतली. १ जाने. १९८४ पासून श्री. यशवंत हरी वेलणकर यांची संपादक म्हणून नियुक्ती झाली.

आज ' अणुरेणू ' च्या स्थिरतेमागे डॉ. गोगटेंचे परिश्रम आहेत. आर्थिकदृष्टया सुस्थिर असून वर्गणीदार सुमारे १५०० आहेत. संपादकाला पूर्ण स्वातंत्र्य आहे. कोणताही पक्ष अथवा विचारांशी बांधिलकी नसून वृत्तपत्राचे पक्षविरहीत व वस्तुस्थितीनिदर्शक असे स्तुत्य स्वरुप आहे शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, चळवळीचे हे एक माध्यम आहे. साहित्य व क्रीडा विषयांना स्थान दिले जाते. ' अणुरेणू ' इथल्या परिसराचा आरसा होय.

अन्यायकारक बातम्या पारखून घेतल्या जातात. आठवणीने वर्गणी देणारे कमी असल्याचे दिसते. जाहिराती हा मुख्य आधार असला तरी सरकारी जाहिराती सहजासहजी मिळत नाहीत. वर्गणी देऊन वृत्तपत्र वाचण्याचा कल लोकात कमी प्रमाणात आहे.

हे साप्ताहिक चालवण्यामागे समाजसेवा आणि व्यवसाय असे दोन्ही दृष्टीकोन आहेत. वर्गणीदारांना दिवाळी अंक मोफत दिला जातो व त्यामागे लेखकांना प्रोत्साहन देण्याची दृष्टी असते. ' अणुरेणूत ' ' पत्रोपत्री, ' ' वृत्तविशेष ' अशी सदरे नियमितपणे येतात. तसेच लोकांच्या मनात दैववादी दृष्टीकोन निर्माण होऊ नये व त्यांनी प्रयत्नशील रहावे यासाठी या वृत्तपत्रात राशिभविष्यासारखी सदरे दिली जात नाहीत.

देवगड मधील वृत्तपत्रसृष्टीचा हा आढावा पाहता, ही वृत्तपत्रसृष्टी प्रगतीपथावर असल्याचे जाणवते

# ॥ समाजजीवन ॥

उदय दांडेकर

बारावी कला

देवगड परिसरातील समाज हा सर्वसाधारणपणे मालवणी भाषा बोलणारा समाज आहे. मालवणी भाषेचा प्रभाव सर्वत्र आढळतो

या परिसरात ब्राह्मण, मराठा, भंडारी, वाणी, बौद्ध, गाबीत, मुस्लीम लोक आढळतात. एकंदरीत पहाता या सर्व जातीचे आपसात सलोख्याचे संबंध असल्याचे स्पष्टपणे आढळते. जातीयता वगैरे बाबतीत फारसा काटेकोरपणा पाळला जात नाही कारण काळाची पाऊले ओळखून या परिसरातील व्यक्तींनी-देखील जातीयतेबाबत जुनी विचारसरणी बदलल्याची जाणीव होते. वाणी लोक सर्वसाधारणपणे व्यापार करताना आढळतात त्याचप्रमाणे शेती व त्याला जोडून एखादा व्यवसाय करण्याकडे लोकांचा कल आढळतो.

शेतीमध्ये मुख्यत्वेकरुन भाताचे पीक घेतले जाते. त्याचप्रमाणे आंब्याचे उत्पादन घेतले जाते. आंबा उत्पादनाकडे आंबाबागायतदार लोक अधिक काळजीपूर्वक लक्ष देताना आढळतात व आपले उत्पादन शास्त्रशुद्ध पद्धतीने घेतात.

दुसरा प्रमुख व्यवसाय म्हणजे मच्छिमारी. या व्यवसायामुळे अनेक लोकांना रोजगार उपलब्ध झालेला आहे ; व मजुरीदेखील चांगल्याप्रकारे मिळत असल्याने गावात (देवगड) इतर कामांना कामगार सहजासहजी उपलब्ध होत नाही. शारिरीक कष्टाची कामे करण्यासाठी या परिसरात बाहेरील मजूर येतात.

त्याचप्रमाणे या परिसरातील एक विशेष म्हणजे मुंबईकडे असणारा तरुणांचा ओढा! दहावी किंवा बारावीपर्यंत शिक्षण झाले की मुंबईला जाण्याचे प्रमाण फार आढळते. तिथे वडील, मोठा भाऊ, अथवा अन्य नातेवाईक असतात त्यांच्या मदतीने नोकरी मिळू शकते. त्यामुळे मुंबईला असणारा चाकरमानी लोकांचा फार मोठा वर्ग येथे आढळतो. येथील नोकरवर्ग मात्र या परिसरातील क्वचितच आढळतो.

या परिसरात भाजीपाला फारसा पिकत नसल्याने तो बेळगाव अथवा कोल्हापूरहून येथे येतो.

सर्वसाधारणपणे कमाई पुरेशी आढळते. त्यामुळे उपासमारीसारखे भयानक दृश्य येथे आढळत नाही.

या परिसरातील घरेही एकमेकांना जोडून नाहीत. ती दूरदूर आहेत. त्यामुळे सलग वस्ती फारशी आढळत नाही. घरे शक्यतो मंगलोरी कौलांची आढळतात. परसात थोडी का होईना, बाग केलेली आढळते. निरनिराळी फुलझाडे, केळी, नारळाची अथवा पोफळीची झाडे अथवा आंब्याची झाडे घराजवळ लावलेली आढळतात.

या परिसरात गणेशोत्सव फार मोठ्याप्रमाणात साजरा केला जातो या काळात दिव्यांची आरास, नवीन रंगरंगोटी व इतर सजावट मोठ्या प्रमाणात करण्यात येते काही ठिकाणी भजनाचा कार्यक्रम देखील साजरा करण्यात येतो. मात्र सार्वजनिक गणेशोत्सव व त्यानिमित्त कार्यक्रमांचा अभाव जाणवतो. येथील लोक धार्मिक प्रवृत्तीचे आहेत. धार्मिक समजुती व धर्मभोळेपणा काहीसा येथील परिसरात आढळतो.

पण त्याचबरोबर आधुनिक विज्ञानाची माहितीदेखील लोक तेवढ्याच उत्सुकतेने घेतात

पूर्वी आजारपणात दवाखान्यात जाण्याची प्रवृत्ती कमी असायची. इतरच उपाय (घरगुती व मांत्रिक) करण्याकडे कल असायचा. परंतु आता मात्र दवाखान्यात औषधोपचारासाठी जाणे पसंत करतात. त्याचप्रमाणे काळाची गरज म्हणून कुटुंबनियोजनाचे महत्वदेखील येथील परिसरात जाणवलेले आहे.

या परिसरात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने स्थान दिलेले साधारणपणे आढळून येते. स्त्रियांबाबत अनुदार दृष्टिकोन असलेला आढळत नाही. स्त्रियादेखील पुरुषांच्या बरोबरीने काम करतात. (शेती वगैरे) व कामात वाटेकरी असतात. व घराभोवती जर थोडीफार बाग असेल, तर त्याची देखरेखदेखील शक्यतो स्त्रियाच बघतात. त्याचप्रमाणे गुरांची देखभाल, भाजीपाला (अल्पप्रमाणात का होईना) वगैरे गोष्टींकडे प्रामुख्याने स्त्रिया लक्ष पुरवितात. त्याप्रमाणे काही स्त्रिया वीणकाम, भरतकाम यातदेखील प्रवीण आढळतात. नागरी संस्कृतीचा स्वीकार केल्याबद्दलची जाणीव होते. स्त्रियांचे खेळ (मंगळागौर वगैरे) पारंपारिक पद्धतीने साजरे केले जातात.

परंतु स्त्रीमुक्तीचे वारे वगैरे फारसे आढळत नाहीत. स्त्रियांचे विश्व काहीसे मर्यादितच आहे. पुरुषांच्या बरोबरीचे स्थान केवळ कष्ट करण्याच्या वेळीच स्त्रियांना दिले जाते आपले घर, आपले कुटुंब यातच रमणारी स्त्री आपणास आढळते. देवगड अथवा तुलनेने मोठ्या असलेल्या गांवात काही स्त्रिया नोकरी करताना आढळतात. परंतु, परंपरेची चौकट फारशी कोठे विस्कळीत होत आहे, असे आढळत नाही.

गणेशोत्सव अथवा इतर उत्सवांच्या निमित्ताने नाटके सादर करण्याची आवड येथे प्रामुख्याने आढळते. कलाकार स्थानिक असतात. क्वचित् स्थानिक लेखकांनी लिहिलेली नाटकेसुद्धा बसविली जातात. नाटकांना जाणकार मंडळी संगीत देतात.

येथील विद्यार्थीवर्गाचा विचार केला तर काही गोष्टी प्रामुख्याने आपणास आढळतात. येथील विद्यार्थी अनेक अडचणीतून शिक्षण घेण्याच्या प्रयत्नात असतो. गावोगावी या विद्यार्थ्यांचे निरनिराळे खेळ आढळतात. त्यात प्रामुख्याने क्रिकेट, व्हॉलीबॉल, हुतूतू, विटीदांडू, गोट्या इत्यादींचा समावेश होतो. मात्र त्याचबरोबर व्यायामशाळा, आखाडे, तालमी यांचा अभाव लक्षात आल्याशिवाय रहात नाही.

व्यसनांच्या बाबतीत काही गोष्टी आढळतात. पान, विडी व दारु या गोष्टींचे व्यसन असणारे लोक येथे आहेत. अर्थात् या व्यसनांचे प्रमाण प्रामुख्याने मजूरवर्गात आढळते व त्यात कारणांची भिन्नता आढळते.

राजकीय बाबतीत येथील लोक जागरुक आहेत, असे म्हणावयास हरकत नाही. कोणताही निर्णय शक्यतो बराच विचार करुन घेतात मतदानाचा आपला हक्क बजावण्याकडे कल आहे.

देवगडसारख्या गावात लोकमित्रमंडळ, रोटरी क्लब वगैरे संस्थांचे विविध प्रकारचे उपक्रम सुरु असतात. देवगड येथील शेठ म. ग. हायस्कूल मध्ये 'संगीतायतन' नावाची संगीत प्रेमींची संस्था, स्त्रियांचे भजनीमंडळ, महिलामंडळ वगैरे संस्था विविध उपक्रम करताना आढळतात.

या परिसरातील समाज निरनिराळ्या कारणांनी एकत्र येतो. धार्मिक समारंभ, सण उत्सव व इतर अनेक गोष्टींत वैचारिक आदानप्रदान होते परंतु कोणत्याही सामाजिक प्रश्नासाठी एकदम एकत्र येऊन काम करण्याकडे कल काहीसा कमी आढळतो. आपल्या स्वतःच्या कामात या समाजातील घटक मग्न असलेला, शक्यतो आपण बरे की आपले काम बरे अशा वृत्तीचा! सामाजिक कामासाठी इतरांनी पुढाकार घेतला तर मात्र त्याला पाठिंबा देतील, पण तोही बऱ्याच साधकबाधक विचारानंतरच !

सर्वसाधारणपणे व्यक्ती एकत्र येण्याचे प्रसंग तुलनेने कमी आढळतात उपजीविकेची साधने फारशी नसल्याने त्या कामातच बराचसा वेळ जातो. असा या परिसरातील समाज आहे, जो इतरांना उपद्रव देण्याच्या भानगडीत पडत नाही. त्यामुळे भांडणतंटे येथे क्वचितच आढळतात या परिसरात चोऱ्या वगैरे देखील फारशा होत नाहीत. असे काहीसे सत्य, पण तितकेच स्थिर व शांतताप्रिय व्यक्तीला आवडणारे वातावरण येथील समाजजीवनात आपणास आढळते.

# ॥ सागर दर्शन ॥

अलका हर्डीकर

तृतीय वर्ष कला

ने मजसी ने परत मातृभूमिला ........
सावरकरांसारख्या देशभक्ताने आपल्या मातृभूमिकडे परत जाण्याची ओढ अत्यंत कारुण्यपूर्ण शब्दातून व्यक्त केली ती सागरतीरावर बसूनच ! आमच्या सारख्या सर्वसामान्यांना मनातील सुखदु:खाच्या भावना व्यक्त करता येतात त्या या सागराजवळच ! हा सागर अगदी आबालवृद्धांचा साथीदार होऊन त्यांच्या सुखदु:खात नेहमीच सहभागी होत असतो.

देवगडसारख्या या कातळमय प्रदेशाला समुद्र-किनाऱ्याच्या ओलाव्याची पार्श्वभूमी नसती तर इथल्या रखरखीत जीवनमानची कल्पनाच करवत नाही. इतर काही गैरसोयींवर मात करणारा इथला समुद्र नवीन माणसाला आपल्या सौंदर्याने अगदी भारावून टाकतो. आणि त्यामुळे बाहेरुन येणारा माणूस इथे अगदी आनंदाने रहातो.

माणसाचं समुद्राबद्दलच वेड अगदी अनादी काळापासूनच चालत आलं आहे. जोपर्यंत माणूस सौंदर्याचा भुकेला आहे, तोपर्यंत तो समुद्राच्या त्या लाटांच्या स्पर्शासाठी असाच आसुसलेला राहील. अंगांगावर आनंदाचे, एका सुखानुभावाचे रोमांच उठवणारा तो लाटेचा स्पर्श त्याला कधीच नकोसा होणार नाही. समुद्राचं पाणी, त्याच्या पृष्ठ भागावर उठणाऱ्या लाटांचे मनोरे, किनाऱ्यावरची वाळू, विविध रुपं हे सार सर्वांनाच आकर्षून घेत असतं. लहान मुलं स्वप्नांचे किल्ले बांधतात ती या वाळूतच ! तरुणांच्या जीवनात तर या समुद्राला अत्यंत मानाचं स्थान ! आपल्या सांसारिक आयुष्याची, वैवाहिक जीवनाची गोडगुलाबी स्वप्नमालीका गुंफण्याचं त्यांच हेच ठिकाण ! नववधू आपलं आणि आपल्या भावी पतीचं नाव या वाळूच्या कणांमध्ये एकमेकात गुंफूनच त्या सुखद अनुभवाचा ठेवा ती आपल्या मनात जपत असते. वृद्धांना त्यांच्या गतकालीन सुखद आठवणी जागृत करुन देणारा, एखाद्या विरहिणीच्या विरहाचा दाह केवळ आपल्या एका लाटेबरोबर शांत करणारा, मानवी जीवनाला समाधान देऊन तृप्त करणारा समुद्र आपल्याला खूप काही देत असतो.

समुद्र किनाऱ्यावरून वाळुतून चालताना चपळाईने पळत सुटणारे खेकडे फारच सुंदर दिसतात. हे खेकडे त्या वाळुतून पळतापळताच वाळूमध्ये इतकी सुंदर नक्षी कोरतात की वाटतं, या खेकड्यांनाही चित्रकलेच्या परिक्षेला बसायला मिळावं. अशावेळी प्राणीसुद्धा कलावंत असतात, याचा प्रत्यय येतो. याच-वेळी एकावर एक येऊन आदळणाऱ्या लाटांबरोबर येणारे विविध रंगाचे शिंपले मन वेधून घेतच असतात. असं वाटतं काय बघू आणि काय वेचू ! खरंच, या समुद्राच्या विस्ताराकडे पाहाताना मनातल्या विचा-रांचा, कल्पनांचा असाच विस्तार होऊ लागतो. हजारो लाटा एकावर एक येऊन लागलीच नाहीशा होतात. मनावर येऊन आदळणाऱ्या विचारांच्या लाटा मात्र कायम राहातात.

किल्ल्यावरचा दीपगृह म्हणजे एकप्रकारचा पहा-रेकरीच ! संपूर्ण देवगडवर क्रमाक्रमाने प्रकाशझोत टाकून तो देवगडच्या संरक्षणाची जबाबदारी नित्य-नेमाने पार पाडतो. याच किनाऱ्यावर असलेलं कुणकेश्वर म्हणजेच खरं तर एका दगडात दोन पक्षी ! लाटांचा धीरगंभीर आवाज, निळेशार पाणी, गुलाबी

ऊबदार थंडी आणि दीपगृहाचा अधुनमधून पडणारा प्रकाश पाहून नकळतच–

'दिव्यत्त्वाची जेथ प्रचिती
तेथे कर माझे जुळती'

या ओळी सहज आठवतात. तांबळडेगचा समुद्रकिनारा तर बाजूच्या सुरुच्या झाडांची वाऱ्याबरोबर चाललेली गुणगुण ऐकतो आहे असं वाटतं.

या समुद्राची विविध वेळी दिसणारी रुपं मनोहारी असतात. कधी वाऱ्याची हालचाल थांबली की हा अगदी स्थितप्रज्ञासारखा शांत निश्चल रहातो. पण काही वेळा हा समुद्र खूप उग्र रुप धारण करतो. जोरदार वादळी वारे घोंगावत असतात. लाटांचे प्रचंड आवाज कानावर आदळत येतात त्यावेळी खवळलेल्या या सागराचं दर्शन घेतानाही असं कुठेतरी वाटतं की अजूनही त्याच्यातलं ते हलाहल बाहेर पडत आहे. आणि यावेळीं मात्र याच्याकडे पहाण्याची छाती होत नाही.

कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत पहाण्याच्या दृष्टिकोनावर सौंदर्य अवलंबून असतं. जो ज्या दृष्टीकोनातून ती गोष्ट बघेल तशी त्याला ती भावणार. काहीजणांना या समुद्रातील जलसंपत्ती मिळवण्यात सौंदर्य जिसेल, तर काहींना ती समुद्रात पहाण्यातच सौंदर्य दिसेल. आंबा व मासा ही याच सागराची देणगी.

असा हा विलक्षण सौंदर्याने नटलेला देवगडचा समुद्रकिनारा पाहिल्यावर जीवनाचं सार्थक झाल्यासारखं वाटतं. देवगडला येऊन आपण खूप काही मिळवल्याचं समाधान लाभतं. आयुष्यातली महत्त्वाची शैक्षणिक वर्षे या सुंदर सागराच्या कुशीत, हापूस आंब्याच्या आणि तितक्याच गोड माणसांच्या सहवासात घालवायला मिळाली यापेक्षा आणखी काय हवं ?

## ॥ संगीत परंपरा ॥

देवगडच्या वैशिष्ट्यांमध्ये संगीत साधनेचा उल्लेख करणेही उचित ठरेल. १९२२ पासून वाडचाला असलेले बापटबुवा देवगडला येत. त्यांचे गायनाचे कार्यक्रम होत असत. नारिंग्रे येथील श्रीपाद अभ्यंकर हे तबलजी होते. तेही अधुनमधुन देवगडला येत. तसेच १९२४-२५ च्या सुमारास राजाभाऊ गुणीजन यांनी दोन-तीन वर्षे गायनाचा क्लास चालवला. मौजे कुणकेश्वर येथील सीताराम बापू कुलकर्णी हे तबलजीही देवगडला येत असत. १९३२ च्या सुमारास आबा कदम यांनी देवगडला दोन-तीन वर्षं संगीताचा वर्ग चालवला. त्यांच्या शिष्यवर्गापैकी श्री. दादा नाचणकर हे आजही तबलावादक म्हणून ओळखले जातात.

१९३५ च्या सुमारास रघुनाथ जनार्दन पेंढारकर यांनी आपला गायनाचा क्लास सुरु केला. श्री पेंढारकर, शांताराम का. बोंडाळे व श्री. रामराव गोपाळ जोशी हे कै. विष्णू दिगंबर पलुसकरांचे शिष्य होत. १९४५ च्या सुमारास श्री. मधुकर ठाकूर यांचा काही दिवस संगीतवर्ग चालला. नारिंग्रे येथील श्री. कृष्णाजी वासुदेव अभ्यंकर हे गायन-वादनात प्रवीण.

अशाप्रकारे चालणारे हे सर्व तुरळक प्रयत्न अखेर निष्फळ ठरले. भजने व कीर्तने या व्यतिरिक्त अभिजात संगीत कानावर पडणे बंद झाले. १९४२ मध्ये शेठ म. ग. हायस्कूलमध्ये आलेले मुख्याध्यापक श्री. शंकर अनंत टेंकशे हे 'संगीताचार्य' होते 'नवराग निर्मिती' हे संकलनात्मक पुस्तक त्यांनी लिहिले. येथाल संगीताच्या प्रतिकूल वातावरणात त्यांनी विविध सुरांचे रंग भरले. व्यवसायानिमीत्त देवगडला आलेल्या डॉ. आठवले यांनी निरनिराळ्या रागातील स्वरमालेच्या आधारे नवीन राग व रचना निर्माण केली नतर गुरुदक्षिणा प्रेक्षागृह बांधून झाल्यावर 'संगीतायतन' हा विभाग सुरु झाला. गांधर्व महाविद्यालयाचे परीक्षा केंद्र होण्याच्या दृष्टीने अनेकांनी प्रयत्न केले. त्याचा लाभ आजही अनेक रसिक घेतात

संगीतासाठी डॉ. आठवले यांची या विषयावरील काही व्याख्यानेही आयोजित केली गेली. श्री. शंकरराव आचरेकरांनी येऊन उत्तम मार्गदर्शनही केले. 'संगीतायतन' च्या स्थापनेने गायन व वादनात अनेकजण विशारद झाले.

**आनंद प्रभुदेसाई** / द्वितीय वर्ष वाणिज्य

# ॥ स्त्री जीवन ॥


सुनंदा भांडारी

तृतीय वर्ष कला


देवगडच्या स्त्रिया आर्थिक, सामाजिक व अन्य क्षेत्रातही पुढेच आहेत. आर्थिक उलाढाली करताना मर्यादित क्षेत्र ओलांडण्यासाठी कोणतंही स्त्री-मुक्तीचं आंदोलन केलेलं नाही. एका हातान पाळण्याची दोरी धरुनच आपली प्रगती साधलेली आहे.

मनीऑर्डर रचना म्हणून ओळखल्या जाणाऱ्या देवगडच्या अर्थरचनेतली स्त्री घरासाठी अहोरात्र झटत असते. मनाला वेडावणारा सागर, प्रेक्षणीय स्थळे, निसर्ग याकडे खुल्या मनाने त्यांना पहाता येतच नाही. सूर्य-चंद्राची गणिते ही कामासाठीच मांडली जातात. मुंबईला असलेला पुरुष वर्षातून एकदा येऊन शेती करून गेल्यानंतर मागची सर्व उलाढाल स्त्रियांनाच करावी लागते.

उदरभरणासाठी मत्स्यव्यवसाय करणाऱ्या स्त्रिया मंदरी, बागमाडी, आनंदवाडी, किल्ला, कट्टा, वाडातर, शिरगाव, तळेबाजार इ. भागातील स्त्रिया अहोरात्र हा सदरदेखील कमी पडेल अशातऱ्हेने कष्टकरीत असतात. पुरुष फक्त समुद्रावरून मासे पकडून आणून देतात. त्यानंतर मासे धुणे, वाळवणे, खारवणे इ. प्रक्रिया करणे; मासळीच्या टोपल्या डोईओझ्याने बाजारात नेऊन विकणे; स्वत: गाडीवर चढून टोपल्यांची चढ-उतार करणे व बाजारातून येताना नित्योपयोगी सामान खरेदीकरणे हे सर्व स्त्रियांना करावे लागते. नवीन कपडे, दागिने, फुलांची त्यांना आवड आहे. देवावर, माणसावर जबरदस्त श्रद्धा आहे. स्वत: कर्तबगार असल्याने त्यांना अन्यायाची चीड आहे. स्वभावाने सालस व मनमोकळ्या पण बोलणं मात्र फटकळ. फेरीवाल्याकडून वस्तुंची खरेदी करणे, शहरी जीवनपद्धती, अद्ययावत केशरचना व पोशाख पहाता शहरी जीवनाचे सादपडसाद येथील स्त्रीजीवनावर उमटत आहेत असे जाणवते.

उत्पादित मालाचे पदार्थ बनवण्यात आंबापोळी, फणसपोळी, आमरस असे पदार्थ तयार करुन एखादी स्त्री २-३ महिन्यात पाचसहा हजारांची उलाढाल सहज करते, तसेच कोकम सरबत, आमसोले, आंबोशी, वाळलेले गरे, गऱ्याचे पीठ करुन विकणे हे अगोदरचेच व्यवसाय नव्या व्यापारी पद्धतीने स्त्रिया करताना दिसतात.

श्रमजीवी स्त्रियांबरोबरच ऑफीसे, बँका, शाळा इ. ठिकाणीही स्त्रिया काम करतात. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पहिली वकील स्त्री, पहिली वृत्तपत्र संपादक देवगडमध्ये आहेत. दारुबंदी शिबीर, कुटुंब-कल्याण शिबीरासारखे उपक्रम करणाऱ्या स्त्रिया सामाजिक कार्य करतानाही आढळतात. संघटनेचं महत्व व आवश्यकता जाणवलेली आहे. महागाईविरुद्ध मोर्चा, सामाजिक उलाढाल, सत्याग्रह, अशा विविध ठिकाणी येथील स्त्री दिसते. सेवाभावी संस्कारांचं महत्व जाणणारी स्त्री संघटनाही येथे कार्यरत आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातून एकमेव स्त्री अखिल भारतीय कार्यक्रमाला उपस्थित राहू शकते. यातूनच कर्तृत्वाबरोबरच नेतृत्वही रुजत असेल. या सर्वातूनच देवगडला अजूनही उज्वल असा भविष्यकाळ कुठेतरी आकार घेत असेल असं वाटतं.

# ॥ निसर्गयात्रा ॥

सुनिता पळसुले

अकरावी कला

निसर्ग ही कल्पनाच मुळी दगडातल्या देवाच्या कल्पनेसारखी आहे. देवगडला विश्वकर्म्याने देवगड म्हणून मुळातच नाव दिलं ते देवाच्या अधिष्ठानासह काळ्याकुट्ट जांभ्या दगडाच्या, लहानमोठ्या चढउताराच्या आणि निळ्याशार अथांग सागराच्या भूस्तरावर असलेल्या अनेक कृतीत, हालचालीत, निर्मितीत निसर्ग दडलेला आहे. कोकणातला निसर्ग असं कोणी सहज जरी म्हटलं तरी नक्कीच आकाशाशी स्पर्धा करणारे, क्षितिजसमांतर साष्टांग नमस्कार घालणारे चार-दोन माड आणि आंब्याची, फणसाची झाडे असलेली माडाखालची, घाटीवरची, किनाऱ्यालगतची, शेतातली सभोवार प्रशस्त अंगण असलेली घरे डोळ्यासमोर उभारतात.

कातळाच्या पार्श्वभूमीवरील निसर्ग मोठा मजेदार आहे. त्याला प्रारंभी जरी माडांची स्वागतदक्ष अशी रांग नसली तरी डाव्याबाजूला दूरवर दिसणाऱ्या सागराने या कातळाला नटविले आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला लहानमोठी उतरत्या छपरांची घरे व सभोवताली दगडाची हद्द सांगणारी तटबंदी कोकणच्या मानवी मनाचे वैशिष्ट्यच स्पष्ट करुन जातात.

वसंतात इथल्या निसर्गाला एक आगळाच रंग भरलेला असतो. संपूर्ण सृष्टी नव्या पालवीनं हिरवीगार होते. कोकणात तशी वनश्री कमीच. तरीही घराजवळच्या लहानमोठ्या माड-पोफळी, खाचखळग्यातली किनाऱ्याची झुडपं, आकाशाशी स्पर्धा करणारी चिव्याची बेटे, आणि खाडीकिनारी शांततेच्या तपश्चर्येला बसलेली चिपीची बने या सर्वांचा साज येथील कातळाला मिळतो. त्यातच रसराज हापूस प्रवाशांचे आदरातिथ्य करत असतो.

अर्थाजनामुळे सारा आसमंत आता हिरवागर्द होत आहे. याचवेळी रानातल्या फुलांना रंग भरलेला असतो. एखादा सोनचाफा माडा-पोफळीच्या आडून मंत्रमुग्ध करण्याचे काम करत असतो, भाटीवर व भाटीशेजारच्या कलमांवर पक्षी असतात. पावसाळा संपला की वाडातरच्या निसर्गरम्य चिपीच्या पानातून सारे बगळे खाडीवरून प्रवास करत मळईचा डोंगर पार करून भाटीवर जमतात व संध्याकाळी पुन्हा याच बेटावर शांत होतात. संपूर्ण विश्वच वेगळ्या प्रकारचे भासते. बंदरात आलेल्या लाँचेस् सूर्यास्ताला आनंद देऊन जातात. समुद्रावर पडलेल्या सूर्यकिरणांचा परावर्तीत प्रकाश मन मोहून टाकतो.

फळाफुलांच्या गडबडीत हा वसंत केव्हा संपतो. हेच कळत नाही. एव्हाना आकाशात दूरवर लहानलहान काळ्या ढगांचे पुंजके दिसू लागतात. 'कोकणसेवक' आणि 'कोकणशक्ती' आपला वर्षभराचा प्रवास थांबवून निघून गेलेल्या असतात. समुद्राचा संथपणा थोडा चुळबुळ करतो आणि वरुणराजा इथे वर्षाव करायला सुरुवात करतो. मोर नाचून त्याला साथ देतात. काळ्या ढगांची धावपळ पहाण्यासारखी असते. आणि कोकणची मने शेतीच्या कामात गुंतलेली असतात. लहानमोठे ओढे व नद्या दुथडी भरुन वाहू लागतात. पाणथळ जमीन दलदलीत होते. आणि बेडकयाही आपल्या आवाजाची भर त्यात टाकतात. हिवाळ्यात आंब्यांना मोहोर येतो आणि गावोगावचे उत्सव, यात्रासुद्धा मोहराला येतात.

# संकीर्ण

## ॥ फुरसे ॥

॥ प्रकाश मराठे / द्वितीय वर्ष कला ॥

देवगड म्हटल्यानंतर सर्वप्रथम डोळ्यासमोर येतो तो देवगडचा 'रसराज' हापूस आंबा आणि त्यानंतर देवगडचे आणखी काही वैशिष्ट्य आहे का असे कोणी विचारले तर त्याचे उत्तर अर्थात्च सरपटणारा प्राणी 'फुरसे' असेच द्यावे लागेल.

संपूर्ण जगामध्ये सुमारे २५०० जाती सापांच्या आढळतात. त्यापैकी जवळपास २३३ जाती भारतात आढळून येतात. एकूण २३३ जातींपैकी जवळपास ५५ जाती विषारी आहेत. या ५५ जातींपैकी २० सागरी साप, १६ फुरशांचे प्रकार, ७ मण्यारीचे प्रकार, ५ विशिष्ट प्रकारच्या सापांच्या जाती, आणखी ३ सापांच्या उपजाती, ३ घणसांचे प्रकार, आणि जातिवंत साप की ज्याला आपण कोब्रा म्हणतो तो, नागराज याचा एक प्रकार आहे.

देवगड आणि आसपासच्या परिसरात प्रामुख्याने नाग, घणस, फुरसे आणि मण्यार या चार विषारी जाती आढळतात. या चार विषारी जातींपैकी नागाचे १२ मिलीग्रॅम विष माणसाच्या शरीरात गेल्यास माणूस मरू शकतो; तर घणसाचे १५ मिलीग्रॅम विष मनुष्याच्या मरणास कारणीभूत होते. फुरशाच्या ८ मिलीग्रॅम विषाने माणूस मृत होतो तर मण्यारीचे फक्त ६ मिलीग्रॅम विष माणसाच्या शरीरात गेल्यास माणूस मरतो.

वरील जातींपैकी 'फुरसे' हा सरपटणारा प्राणी फार मोठ्या प्रमाणात देवगड आणि आसपासच्या परिसरात आढळून येतो. 'फुरशी' साधारणत: १० ते १५ इंच लांबीची असतात, फुरशाचा घेर सुमारे १ सें. मी. ते ४ से. मी. इतका आढळतो. फुरसे शेपटीकडे आकाराने जाड असते. त्याचा रंग साधारणत: करडा असला, तरीही त्यात काळसर छटा जास्त असते. अंगावर बारीक–बारीक ठिपके असतात. रंग बाह्यसृष्टीप्रमाणे बदलत असतो.

ाचे वास्तव्य प्रामुख्याने माळरानावरील दगडांच्याखाली कोरड्या जागेत असते. क्वचित् प्रसंगी लाकडाच्या मध्ये, वाळलेल्या लाकडाच्या ढिगामध्ये, लाकडाच्या भुशाखाली, गड्ड्यामध्ये आणि गवताच्या पेंडीमध्येही ाे वास्तव्य जाणवते. काही वेळा पावसाळ्याच्या दिवसात डोंगरउतारावरील पाण्याबरोबर फुरसे खाली वाहून ाचेही आढळून येते.

साधारणत: दगडाखाली फुरसे निश्चलपणे वेटोळे करुन राहिलेले आढळते. काही वेळा ते इतके निश्चल असते की पहाणाऱ्याला वाटावे की ते मृतावस्थेत आहे. बारीक किडे आणि किटक हे प्रामुख्याने त्याचे भक्ष्य असते. फुरशाच्या नर आणि मादी यामध्ये बाह्यत: फारसा फरक दिसून येत नाही.

फुरशाचा खालचा जबडा उघडा असतो आणि ते विशिष्ट प्रकारचा बारीक सुस्कारा टाकल्यासारखा आवाज करते. वरच्या जबड्यात दोन विषारी दात असतात. दातांच्या मुळाशी विषाची छोटी पिशवी असते. काही क्षणातच ते चावा घेते. चावा घेण्याच्या जागा ठराविक आढळतात. तळपाय, पाऊल, पायाची बोटे, पायांच्या बोटांमधील जागा आणि हात व हाताची बोटे इत्यादी. शरीराच्या इतर भागांना अगदीच क्वचितप्रसंगी चावल्याचे आढळून येते

चावा घेतलेल्या ठिकाणी फुरशाचे दोन्ही दात उमटलेले दिसतात. मात्र गोऱ्या माणसाच्या आणि पातळ कातडीच्या ठिकाणी ते दात अधिक स्पष्टपणे दिसतात. जाड कातडीच्या ठिकाणी तळहात, तळपाय आणि काळा माणूस असल्यास दातांच्या खुणा स्पष्टपणे दिसू शकत नाहीत.

चावा घेतलेल्या ठिकाणी वेदना होतात आणि काही वेळातच तेवढ्या भागाला सूज येते. चावण्याची तीव्रता, चावण्याची जागा, विषाचे प्रमाण इत्यादी घटकांवर चावलेल्या जागेतून रक्त येण्याची क्रीया अवलंबून असते. कधीकधी फुरसे चावल्यापासून अर्ध्यातासाच्या आत शरीराच्या निरनिराळ्या ठिकाणी रक्तस्त्राव होतो. दंशाच्या ठिकाणी, हिरड्या आणि लघवी इत्यादी ठिकाणी रक्तस्त्राव होतो. कधीकधी दोन-तीन दिवसानंतर अशा प्रकारचा रक्तस्त्राव होतो.

फुरशाचे विष त्वरीत इतके प्राणघातक नसले, तरीसुद्धा वरील प्रकारचे जे उपद्रव होतात त्यामुळे मनुष्य मृत्युमुखी पडतो. नाग अथवा मण्यार यांच्या विषामुळे जसा तात्काळ जिवाला धोका असतो, तसा फुरशाच्या विषामुळे तात्कालिक धोका नसतो व म्हणून फुरशाच्या विषारावर जरा सवडीने योग्य, अधिक काळजी घेऊन उपचार करणे सोयीचे ठरते. सूज, वेदना आणि रक्तस्त्राव या लक्षणाव्यतिरिक्त घाबरल्यामुळे, मानसिक दडपणामुळे आणि भितीने डोळे गरगरणे, जड वाटणे, तोंडाला कोरड पडणे, छाती धडधडणे, घाबरल्यासारखे वाटणे अशासारखी लक्षणे दिसून येतात.

फुरसे चावल्यानंतर चावल्या जागेपासून थोडे दूर परंतु हृदयाच्या बाजूने घट्ट बंद आवळून बांधावा. रुमाल, मुंडासे, फडका, दोर, वेल आणि यापैकी काहीच नसले, तर हातानें दाबून धरावे. चावलेल्या जनावराचा शोध घेऊन त्याला लगेच मारावे आणि ते जनावर डॉक्टरांना दाखविण्यासाठी बरोबर घ्यावे.

चावलेल्या भागाच्या हालचाली कमी करणे, शक्य असल्यास चावलेल्या भागावर बर्फ अथवा थंड पाण्याची घडी ठेवावी व नजिकच्या दवाखान्याकडे जाऊन विषारावरील इंजेक्शन घ्यावे व अन्य औषधोपचार करुन घ्यावे. चार प्रकारच्या सापावरती उपयुक्त ठरेल असे **'Polyvalent Serum'** या नावाचे इंजेक्शन उपलब्ध आहे. फुरसे चावल्यानंतर १५ दिवसांपर्यंत प्रकृतीची सर्वतोपरी काळजी घ्यावी लागते.

फुरसे चावण्याबद्दल काही अंधश्रद्धा, अपसमजुती समाजात रुढ असलेल्या आढळून येतात; त्या पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) फुरसे चावल्यानंतर आधुनिक औषधोपचार न करता मंत्र, तंत्र, नवस, तीर्थ अशाप्रकारचे उपचार करण्यात येतात.

२) फुरसे चावलेल्या व्यक्तिला अंधाऱ्या जागेत ठेवण्यात येते आणि त्याच्या कानावरती बांगड्यांचा आवाज किंवा विटाळशी बाईचा आवाज पडता कामा नये, असे सांगण्यात येते त्या व्यक्तिला फक्त दहि देण्यात येतो. अन्य कोणताही पदार्थ खाण्यास घालण्यात येते.

३) फुरसे चावल्यानंतर ' फुरसे चावले ' अशा शब्दात न सांगता ' त्याला काटा लागला ' किंवा ' पायाखाली झाले ' इत्यादी प्रकारे सांगण्यात येते. फुरसे चावले असे म्हटल्यास विष वाढेल आणि त्याच्या जिवाला धोका निर्माण होईल, अशी चुकीची समजूत असते.

४) फुरसे परतून चावले तर जास्त विषारी असते, असा एक समज आहे. त्याचप्रमाणे फुरशाचे पिल्लू चावले तर कमी विषार होतो, असाही एक अपसमज आहे

५) पूर्वजन्मीच्या पापामुळे अशाप्रकारचा दंश होतो इत्यादी प्रकारच्या अपसमजुती आढळतात.

वरील अपसमजुतींना आधुनिक विज्ञानाप्रमाणे शास्त्रीय आधार नाही, असे प्रयोगाने सिद्ध झालेले आहे. त्यामुळे नाबडतोब डॉक्टरकडे जाणे आवश्यक ठरते.

प्रामुख्याने जुलै, ऑगस्ट आणि सप्टेंबर हा फुरशांच्या प्रजननाचा काळ असल्याने या काळात फुरशी जास्त प्रमाणात आढळतात.

येथील स्थानिक विशिष्ट वर्गातील लोक फुरशी पकडण्याच्या कलेमध्ये वाकबगार आहेत. फुरशी पकडण्यासाठी ते लोखंडी अथवा लाकडी चिमटा वापरतात. साधारणतः फुरसे कोठे आढळते ते त्यांना माहीत असल्याने एखादा दगड उचलल्यानंतर त्याखालील फुरशाला चिमट्याने पकडून जवळच्या बंद करंडीमध्ये टाकले जाते करंडीचा आकार खालच्या बाजूला पसरट आणि तोंडाकडे निमुळता असतो. एका फुरशाला त्याच्या लांबीच्या आणि जाडीच्या प्रमाणात ५० पैशापासून ते १ रुपया २५ पैशापर्यंत मोबदला फुरशी पकडणाऱ्या माणसांना दिला जातो.

अशाप्रकारे फुरशी पकडणाऱ्या माणसाकडून घेऊन ती मुंबई येथील हाफकीन इन्सिटयूटकडे रवाना करण्याचे कंत्राट येथील काही स्थानिक लोक घेत असत. अलीकडे मात्र हाफकीनची गाडी दरवर्षी देवगडला येऊन फुरशी देवगडहून घेऊन जाते. दरवर्षी सुमारे तीन ते पाच हजार फुरशी मुंबईला जातात. तेथे हाफकीनमध्ये फुरशाच्या विषापासून विषारावरील लस तयार केली जाते.

पूर्वी धुळीचा कच्चा रस्ता, त्याचप्रमाणे जागोजागी गवताळ भाग असल्याने मोठ्या प्रमाणात फुरशी सापडत असत. आज काही ठिकाणी मनुष्यवस्ती वाढली, त्याचप्रमाणे स्वच्छताही वाढली आणि रस्त्यांचे स्वरुपही काही ठिकाणी बदललेले असल्याने फुरशी पकडणाऱ्या माणसांना गावोगाव रानोमाळ आणि डोंगर दऱ्यातून भटकावे लागते.



"उदात्त जीवनमूल्ये व सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कृत करा. आपलं लक्ष आकुंचित, मर्यादित ठेवू नका, ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका, तिचा बिस्तार होऊ द्या. आपली लेखणी आपल्या प्रश्नापुरतीच बंदिस्त करु नका, तिचं तेज खेड्यापाड्यातील अंधार दूर करील, असे प्रवर्तित करा. आपल्या या देशात उपेक्षितांचं, दलितांचं फार मोठं जग आहे हे विसरु नका. त्यांचं दुःख, त्यांची व्यथा नीट समजावून घ्या आणि आपल्या साहित्यद्वारे त्यांचे जीवन उन्नत करण्यास झटा. ह्यातच खरी मानवता आहे"

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर**


## ॥ विहंगविश्व ॥

॥ विजय खवळे / प्रथम वर्ष कला ॥

निसर्गाची गोड सुरांनी आराधना करणारे घटक म्हणजे 'पक्षी' होय. रंग, सूर, आकार, सवयी, भाषा, स्थलांतर या सर्वच दृष्टींने त्यांचे अवलोकन करता या विश्वाचे मनोरम दर्शन घडते. देवगड परिसरातही हे निसर्गाचे दूत पावलोपावली आपल्या विविध वैशिष्ट्यांनी मानवी मनाला रिझवीत असतात.

**दयाळ :–** सलगी करता दयाच वाटेल असा हा पोटाकडून पांढरा आहे. संध्याकाळी, विशेषतः उन्हाळ्यात एखाद्या उंच झाडावर बसून सुरेल ताना छेडताना दिसतो. सूर्योदयापूर्वीच्या किलबिलाटात याचा समावेश असल्याने एकप्रकारे हा भाटही आहे.

**सुग्रण-विणकर–** शेते पेरल्यावर थव्याथव्याने येऊन दाणे टिपणारे, छातीवर पिवळ्या छटा असणारे, चिमणी एवढ्या आकाराचे हे विणकर. माडांच्या बागात अत्यंत कौशल्याने लोंबत्या फांदीस हा शत्रुपासून सुरक्षित ठिकाणी आपले घरटे बांधतो. याच्या दोन जाती असतात, हे त्याच्या घरट्यावरुन आढळून येते.



**चंडोल :–** शेंडीवाला व शेंडी नसणारा अशा याच्या दोन जाती. हा प्रामुख्याने सपाट उघड्या माळरानात वावरतो. तुरुतुरु चालणारा चंडोल विवाहकाळात गात आकाशात उंच उडत जातो. आपल्या सुरांनी सारे आकाश व्यापतो म्हणून याला स्वर्गीय गायक म्हणतात. जमिनीवरील तृणपर्णातील किडेमुंग्या खाणारा देवगड कॉलेजकडे जाताना नेहमी दृष्टीस पडतो.

**टिट :–** नावाप्रमाणे आवाज करणारा हा छोटेखानी पक्षी. डोकीवर मागच्या बाजूस उभारलेली पिसे व दोन्ही गालावर पिवळे-पिवळे ठिपके, तसेच पंखावरही पिवळसर झाक हे याचे स्वरुप. दिसायला सुंदर असणारा हा पक्षी आंब्याच्या झाडावर नेहमी किडी धुंडताना आढळतो.

**खाटिक –** विटकरी रुपेरी झाकदार काळ्या रंगाचा नकल्या खाटिक अनेक पक्ष्यांचे आणि प्राण्यांचे आवाज हुबेहूब काढतो. कोतवाल व वेडा राघू हे याचे दोस्त. बुलबुलसारख्या छोटेखानी पक्ष्याने जर एखादे भक्ष्य पकडले असेल तर ते हिसकावून नेऊन खट्कन त्याचा फडशा पाडण्यापर्यंत खाटकाची मजल असते. काळोख पडेपर्यंत हा अन्न मिळवण्याचा प्रयत्न करतो.

**तांबट :–** पोट मोठे असून शेपूट लहान असलेल्या याच्या डोक्यावर शेंदरी रंगाचे ठिपके असतात. उंच झाडावर याचे वावरणे असल्याने हा क्वचित दृष्टीस पडतो. सावरी, पांगारे फुलले की त्यातील मध खाण्यास येणाऱ्या अनेक पक्ष्यात तांबटाबरोबरच भोरडाही असतो.

**हुप्पु :–** रंगाने विटकरी करडे, डोक्यावर शोभिवंत तुरे आणि पंखातील काळ्या-पांढऱ्या ठिपक्यामुळे हे



सुंदर दिसतात. सरळ लांब काळी चोच असणारा केंव्हातरी दृष्टीस पडतो.

**हळदा :–** रंगाने पिवळा धम्मक व पंखात आणि शेपटात काळी पिसे असतात. डिसेंबरात आंब्यांना मोहोर आला की त्यात दडून हा पिकु पिकु पिकू असे गोड आवाज काढतो. देवगडमध्ये हा वर्षभर वास्तव्य करतो.

**चातक :–** हा परदेशी पाहुणा आहे. जूनमध्ये कोकणात पावसाची वर्दी देण्यास येणारा चातक पावसाचे थेंब पिऊनच आपली वर्षभराची तहान भागवतो असे म्हणतात, याला सारंगही म्हणतात. जोडीजोडीने पावसाळाभर फिरणारा हा ऑगस्टनंतर हळुहळू दिसेनासा होतो.

याशिवाय पावसाळ्यात पानाच्या कडा चोचीने शिवून त्यात घरटे करणारा पांढरा शिंपी, फुलाफुलात बागडणारी फुलचुशी, शिंजीर, पिसारा नाचवणारा नाचरा, गाई-गुरांचे सोबती साळुंक्या, घरटे न करणारी कोकिळा, खोडे पोखरणारा सुतार तसेच एकटे फिरणारे कुक्कुट कोंबे, हरेल, कीर, होले, ल्हावे, रानकोंबडी, फुलटोचे पोपट, कबुतरे, चिमण्या असे कित्येक पक्षी देवगडमध्ये वास्तव्य करुन आहेत.

**पाकोळ्या–** पंखाचा सतत उपयोग करून हवेत तरंगणारे जे पक्षी, त्यांना आपण पाकोळ्या म्हणतो. देवगडमध्ये पाकोळ्यांचे चार-पाच जमाव दिसतात. रंगाने काळसर असलेले चिखलाचे गोळे चिकटवून वाटग्यासारखी घरटी बांधणारे ते पंकोळी होत.


**पंगोळी–** हा नावाप्रमाणे पांगळा. पायाला पुढच्या बाजूस तीनच बोटे असल्याने उभे रहाणे अवघड होते. समूहाने घरटी बांधणारा हा पिसे, गवत हे लाळेने चिकटवून आपले घर छतास वा भिंतीस बांधतो. शेपटात काड्या असल्यासारख्या दिसणाऱ्या काडीवाल्या पाकोळ्यांना 'ताखाली' म्हणतात. हा एक वेगळा गट असून तो विशिष्ट चिकाटीने जगताना आपणास दिसतो.

काही पक्षी आपले वास्तव्य पाणकिनारीच करतात. पाणकावळा, पांढरछत पाणकोंबडी, तुतवारी, बलाक, बंचक, हे नदी, समुद्र, खाडी किंवा दलदलीच्या ठिकाणी असतात. पाण्यात वास्तव्य करणारे बदक सोडले तर

आपल्याकडे हंस जवळजवळ नाहीतच. समाधी लावून बसणारे रंगीत आणि भक्षावर सूर मारून तुटून पडणारे तीन समान गुणधर्मांचे पक्षी आहेत ते म्हणजे खंड्या, बंड्या आणि कवड्या होय. शिवाय डिसेंबरात येणारे कीर, क्रौंच, कुडावळ इ. स्थलांतरी पाहुणे आहेत. शेकाट हा पक्षी टिटवीप्रमाणे नेहमी दिसतो.

सर्वांना परिचयाचा असणारा पक्ष्यांचा राजा मोर हा देवगडमधील सर्वात मोठा पक्षी आहे. त्याशिवाय गरुड, गिधाड, घारी, वैनतेच, घुबड हेही आहेतच.

**शिंगचोचा–** हा सर्वात वैशिष्ट्यपूर्ण असणारा करड्या रंगाचा पक्षी होय. त्याची भलीमोठी पांढुरकी चोच हे सर्व पक्षात भूषण होय. या चोचीसंबंधी आयुर्वेदात औषधी गुणाविषयीं सांगितले आहे. कोकणात यास



गरुड म्हणतात तर काही ठिकाणी भार्ता म्हणतात. हे दांपत्य पिलाची खूप काळजी घेतात. संसारात रमणारा हा एकमेव पक्षी आहे. याची जीवनाची चिकाटी दांडगी आहे. क्वॉक् क्वॉक् असा मोठ्याने आवाज करणारे हे पक्षी सृष्टीला सजवतात. तसेच किडी, मुंग्या, किटक, टोळ यासारख्या हानीकारक प्राण्यांचे ते उच्चाटनही करतात. परागधारणेस मदतही करतात.

काही अपवाद सोडले तर पक्षी माणसास उपकारक ठरले आहेत. उपद्रवाच्या मानाने ते समृद्धी जास्त घडवतात. कोकणात आणि प्रामुख्याने देवगडमध्ये भारतातील निम्मेअधीक पक्षी वास्तव्य करतात हे येथील परमभाग्य ! 'निसर्गाचे दूत' पक्षी होत.

'आयुष्य ही स्वतःच एक काथ्याकूट आहे.
पंचमहाभूतांस पिळून वळून हे आयुष्याचे चऱ्हाट वळावयाचे,
तेच ते तंतू जोडून जोडून लांबवीत बसावयाचे
व शेवटी सडत आले की,
मृत्यूच्या "मोगरी"ने कुटून,
पुनः काथ्या करुन पंचमहाभूतांच्या ढिगांत
मिसळून द्यावयाचे !

**– माझी जन्मठेप**

# ॥ औषधी वनस्पती ॥

॥ गजानन बोडस / प्रथम वर्ष कला ॥

**को**कणभाग हा निरनिराळ्या प्रकारच्या वनस्पति जीवनाने बहरलेला आहे. देवगडमधील काही प्रमुख वनस्पती खालीलप्रमाणे–

**कुडा** — संस्कृतमध्ये 'इंद्रजव' या नावाने प्रसिद्ध असलेला हा वृक्ष, त्याच्या पाळांचा उपयोग संग्रहणी, कृमी जुनाट अमांश यावर होतो. त्यापासून 'कुटजारिष्ट' नावाचे औषध बनवतात.

**अडुळसा**-- या नावाच्या झाडाच्या पानांचा काढा कफस्रावी असून त्यापासून 'अडुळसा सरबत' बनवतात व प्रसिद्ध 'ग्लायकोडिक टर्प वसाका' या औषधातही त्याचा उपयोग केला जातो.

**हर्डा**-- ही वनस्पती देवगड परिसरात सापडते. अनेक आयुर्वेदीय औषधात त्याचा उपयोग केला जातो.

**आवळा**-- किंवा आमलक हे झाड बहुतेक ठिकाणी आढळते. आवळा पित्तशामक असून 'च्यवनप्राश' रसायनात ते प्रमुख आहे. त्यामुळे जोम व उत्साह निर्माण होतो.

**पुनर्नवा**-- या नावाची वनस्पती या परिसरात आढळते. तिच्यात अनेक गुणधर्म आहेत. 'पुनर्नवासव' नावाचे औषध यापासून बनवतात. लघवीचे सर्व विकार नष्ट करणारी, यकृतामधील बिघाड दूर करणारी ही दिव्य वनस्पती आहे.

**पंचकोल**- ह्या वनस्पतीला येथील स्थानिक भाषेत 'पिटकुळीण' असे म्हणतात. त्याची फुले व फळे तांबडी असतात. यापासून जे 'पंचकोलासव' बनवतात ते शक्तिवर्धक असून स्त्रियांना अत्यंत हितकर आहे.

**पित्तपापडा**-- या वनस्पतीचा ज्वर निर्मूलनासाठी उपयोग होतो.

**ब्राम्ही**-- स्थानिक भाषेत 'कारिवणा'. याचा रस पोटात घेतात. उष्णतानाशक व वातनाशक हे त्याचे गुणधर्म. यापासूनच ब्राम्हीतेल बनवतात.

**माका**-- म्हणजेच 'भृंगराज'. यापासूनच्या अत्यंत शीतल तेलाचा उपयोग केस गळणे, केस पिकणे इत्यादी दोष दूर करण्यासाठी होतो.

**चिकणमूळ**-- या वृक्षाची पाळे अत्यंत शीतल असून उष्णता नष्ट करण्यासाठी शक्तिवर्धक म्हणून याचा उपयोग होतो.

**कडू किन्हाईत**-- ही वनस्पती ज्वरनाशक असून अनेक चूर्णामध्ये याचा वापर होतो.

**परिपाठ**-- या वनस्पतीचा काढा 'गोवरं' या विकारावर अत्यंत गुणकारी म्हणून उपयोगी पडतो.

**सप्तरंगी**-- या नावाचे पाळ शक्तिवर्धक असल्याने त्याचा उपयोग मधुमेहाच्या विकारावर केला जातो.

**वाकेरीचे भाते**-- या नावाची वनस्पती अत्यंत दुर्मीळ असली तरी शरीरातील कडकीचा ती नाश करते.

**जांभूळ** -- 'जांभूळ' म्हणून प्रसिद्ध असलेला वृक्ष इथे आहे. याची फळे अत्यंत मधुर. त्याचा रसही काढला जातो. मधुमेहासाठी अत्यंत परिणामकारक. याच्या बियांचाही उपयोग केला जातो.

**काजू** -- याचे उत्पन्न या परिसरात मोठे आहे. काजू आसवचा उपयोग गॅसच्या तक्रारीवर होतो. काजुपासून दारुही बनवतात.

**खैर** -- याच्या झाडापासून या परिसरात कात बनवण्याचे उद्योग हंगामात चालतात. खाण्यासाठी व पक्के रंग बनवण्यासाठी याचा उपयोग होतो.


**एरंडाची झाडे** -- 'एरंडाची झाडे' देखील या भागात चांगली तरारतात. त्याचा तेलासाठी उपयोग होतो.

**घणसरीचे पाळे** :-- या नावाने प्रसिद्ध असलेली वनस्पती इथे आहे. विषारामुळे होणाऱ्या जखमांवर हे गुणकारी आहे.

**सदाफुली** -- हे फुलझाड या प्रदेशात चांगलेच वाढते. हल्ली या फुलापासून कर्करोगावर औषध बनवण्याची संशोधन क्रिया सुरु आहे.

**सुरण** -- 'सुरण' या नावाने ओळखला जाणारा कंद येथे होतो. मूळव्याधीवर त्याचा फार चांगला उपयोग होतो.

**अननस** -- हे फळ या भागात होते. औषधी म्हणून याचा पाक कफनाशासाठी उपयोगी पडतो.
अशाप्रकारे देवगडभाग औषधी वनस्पतींनीही बहरलेला आहे.



# वा ट चा ल



२० जून ८३ रोजी महाविद्यालयास सुरुवात झाल्यानंतर, महाविद्यालयाचा दहावा वर्धापनदिन संस्थेचे सदस्य श्री. य. द. राणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. मागील परिक्षेत प्रथम वर्गात उत्तीर्ण झालेल्या महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या क्रमिक पुस्तकांचा संच पाहुण्यांच्या हस्ते देऊन गौरव करण्यात आला. याचप्रसंगी राज्य सहकारी संघावर संचालक म्हणून नियुक्ती झाल्याबद्दल श्री. य. द. राणे यांचा श्री. मुरलीधर जोशी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा वर्धापनदिन पेढेवर्फी वाटून साजरा केला.

# वाटचाल १९८३-८४

देवगड येथील कॉन्ट्रॅक्टर श्री. मेहता यांनी टेबल-टेनिसचे साहित्य देणगीदाखल देऊन क्रीडा विभाग सपन्न केला. ९ ऑगस्टच्या क्रांतिदिनानिमीत्त मुंबई विद्यापीठातील प्रौढ शिक्षण योजनेचे प्रमुख श्री. मुरलीधर गोडे यांच्या हस्ते टेबल-टेनिसचा शुभारंभ करण्यात आला.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणाऱ्या महाविद्यालयीन 'रसराज' भित्तीपत्रकाचा स्वातंत्र्यदिन विशेषांक प्राचार्यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. नव्यानेच स्थापन झालेल्या सांस्कृतिक मंडळाचा शुभारंभही विविधगुणदर्शनाच्या कार्यक्रमाने झाला.

आमच्या महाविद्यालयातील क्रिकेट खेळणाऱ्या विद्यार्थ्यांनी यंदा श्रमदानातून क्रिकेट पीच तयार केले.

२५ ऑगस्ट रोजी महाविद्यालयीन विविध निवडणुका शिस्तबद्ध रितीने घेतल्या गेल्या आणि २६ ऑगस्ट रोजी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन विविध क्रीडा स्पर्धांसाठी स्पर्धक रवाना झाले.

महाविद्यालयातील प्राध्यापक श्री. गोठोस्करांचे गोकुळाष्टमीनिमित्त श्रीकृष्णावर व्याख्यान आयोजित केले गेले.

कोकणचे सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. श्रीपाद काळे यांच्या कथावाचनाने महाविद्यालयातील वाङ्मय मंडळ विभागाचा शुभारंभ झाला. याप्रसंगी त्यांनी आपल्या १०० रु. किंमतीच्या पुस्तकांचा संच महाविद्यालयाला भेट दिला.

'प्रश्नमंजुषा' हा नवीन कार्यक्रम ५ नो. रोजी उत्साहाने पार पडला.

महाविद्यालयाच्या नामपरिवर्तनाचा समारंभ यंदा विशेष उल्लेखनीय ठरावा. समारंभप्रसंगी महाराष्ट्राचे उप-मुख्यमंत्री डॉ. रामराव आदीक, सहकार राज्यमंत्री अभयसिंहराजे भोसले व महसूल राज्यमंत्री भाई सावंत यांना यानिमित्त खास पाचारण करण्यात आले. या समारंभात 'श्री सदाशिव हरी केळकर कला व वाणिज्य महाविद्यालय' असं महाविद्यालयाचं नामकरण झालं असून महाविद्यालयाच्या परिसराला, 'श्रीमती नीराबाई जगन्नाथ पारकर' असे नाव देण्यात आले.

१४ नोव्हेंबर रोजी सुरु झालेल्या दुसऱ्या सत्रातील महाविद्यालयाचा उपक्रम म्हणजे प्राचार्यांनी प्राध्यापकांसाठी सुरु केलेला अकॅडमी हा होय. दैनंदिन कामकाजातून प्राध्यापकांनी एका वेगळ्या कारणासाठी एकत्र यावे व त्यातूनही विचारांची देवाण-घेवाण होत असताना प्राध्यापकांच्या विविध ज्ञानपैलूंचे दर्शन घडावे हा प्राचार्यांचा यामागील हेतु. सदर उपक्रमात प्राचार्य श्री. आर. ए. कुलकर्णी, प्रा. अविनाश कांबळे, प्रा. लता वळसंगकर, प्रा. भारत भोसले, प्रा. मधुकर गावडे, प्रा. दत्तात्रय बलवान, प्रा. एस. बी. घोळवे, प्रा. अनंत मिरीकर यांची व्याख्याने संपन्न झाली.

कोकण कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. प्रतापराव साळवी व रत्नागिरी मत्स्य महाविद्यालयाचे अधिष्ठाता श्री. संकोळी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह ३० नोव्हें. रोजी महाविद्यालयाला भेट देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

क्रीडांगणावर विद्यार्थ्यांसाठी उभारलेल्या डबलबार, सिंगलबारचे उद्घाटन क्रीडाशिक्षक प्रा. बी. एम. माळी यांच्या हस्ते व प्रा. श्रीकृष्ण बोराटे यांच्या प्रात्यक्षिकाने झाले.

शिवाजी विद्यापीठ मराठी विभागाचे प्रपाठक, मराठीतील नामवंत समीक्षक डॉ. ल. रा. नसीराबादकर व शिवाजी विद्यापीठातील विद्यार्थी कल्याण मंडळाचे संचालक डॉ. मोहन तावडे यांनी महाविद्यालयास ९ डिसें. रोजी सदिच्छा भेट देऊन महाविद्यालयाच्या प्रगतीबद्दल समाधान व्यक्त केले.

कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयाच्या वार्षिक वादविवाद स्पर्धा १६ डिसें. रोजी घेतल्या गेल्या. 'चित्रपटांचे परिणाम चांगले की वाईट' आणि 'विवाहाच्या वेळी वराने हुंडा घ्यावा काय?'. अशा ज्वलंत विषयावर विद्यार्थ्यांनी आपली मते हिरीरीने मांडली.

२१ डिसें. रोजी घेतलेल्या विद्यापीठ प्रतिनिधीच्या निवडणुकीत अरविंद परुळेकरची बिनविरोध निवड झाली.

बेळगावच्या दै. तरुण भारताचे संपादक श्री. किरण ठाकूर यांनी ७ जाने. ८४ रोजी महाविद्यालयाला दिलेल्या सदिच्छा भेटीमध्ये दुर्गम भागातील या यशस्वी महाविद्यालयाचे कौतुक केले.

दरवर्षीप्रमाणे या वर्षाचा क्रीडा महोत्सव आम्ही पोलीस सब्-इन्स्पेक्टर श्री. ए. ए. पराडकर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने उद्घाटित केला. दि. ११ जाने. ते १३ जानेवारीपर्यंत चाललेल्या या महोत्सवात विविध सांघिक स्पर्धांचा समावेश होता.

महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन १४, १५ जाने. रोजी सुप्रसिद्ध नाटककार शं. ना. नवरे व सौ. अंजली नवरे या उभयतांच्या उपस्थितीत पार पडले.

'रसराज' चा स्नेहसंमेलन विशेषांक श्री. शं. ना. नवरे यांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आला. नाटक, एकांकिका, मनोरंजनात्मक खेळ, शेला-पागोटे, अल्पोपाहार यांचा त्यात समावेश होता.

'जपानी पद्धतीची सजावट' या विषयावरील प्रात्यक्षिक १८ जाने. रोजी श्री. रॉय यांनी विद्यार्थ्यांसमोर सादर केले.

पुण्याचे श्री. वि. वि. गोखले यांनी २५ फेब्रुवारी रोजी महाविद्यालयास भेट दिली आणि 'भावातील ध्यानाचे विद्यार्थी जीवनात महत्त्व' यावर व्याख्यान दिले.

महाविद्यालयाच्या शैक्षणिक वर्षात घडलेल्या या प्रमुख घटना! त्याशिवाय कमवा व शिका योजना, उत्कृष्ट वाचक योजना, शिक्षक पालक योजना, नियोजन व नोकरीविषयक मार्गदर्शन मंडळ असेही नवे उपक्रम करून हे शैक्षणिक वर्ष गजबजून गेले. महाविद्यालयाच्या परिसरातही महत्त्वाचे बदल होत आहेत. पहिल्या मजल्यावर नवीन ३ खोल्या जूनपर्यंत पूर्ण होतील. त्यानंतर महाविद्यालयाच्या पुढील विस्ताराचे काम हाती घेतले जाणार आहे. विद्यार्थिनी वसतीगृहाचे बांधकामही लवकरच सुरु होणार आहे.

महाविद्यालयात यंदाच्या शैक्षणिक वर्षात राबविल्या गेलेल्या विविध उपक्रमांचे अहवाल पुढीलप्रमाणे होत.

## क्रीडा विभाग—

महाविद्यालयामध्ये देशी व विदेशी खेळांची सोय आहे. चालू वर्षी क्रिकेट मॅट, डबलबार, सिंगलबार, टेबल-टेनिस इत्यादींची भर टाकण्यात आली. ऑगस्ट महिन्यात महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हा आंतरशालेय पावसाळी स्पर्धेसाठी आमच्या ज्युनियर महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे कबड्डी, खो-खो, टेबल-टेनिस हे संघ, तसेच विद्यार्थिनींचा खो-खो चा संघ पाठवला होता. संघांनी काही विजय संपादन केले.

नरेंद्र महादेव शिरवडकर याला पोहण्याच्या स्पर्धेसाठी पाठवले होते, १०० मी. फ्रीस्टाईल व बॅकस्ट्रोक, २०० मी. फ्रीस्टाइल या स्पर्धेत तो सर्वप्रथम आला. तद्नंतर त्याला विभागीय स्पर्धेसाठी कोल्हापूरला पाठवण्यात आले. संघव्यवस्थापक श्री. एस्. एस्. बोराटे, श्री. कालिदास जोशी व श्री. महेश्वर लेले हे होते.

सप्टेंबर महिन्यात मुंबई विद्यापिठाच्या वतीने मुंबई येथे घेण्यात आलेल्या टेबल-टेनिस स्पर्धेसाठी महाविद्यालयाचा संघ सहभागी झाला होता. अजित सावंत व सदानंद देसाई या विद्यार्थ्यांनी त्या ठिकाणी चांगले कौशल्य दाखवले. संघ व्यवस्थापक म्हणून प्रा. प्रकाश उपाध्ये हे होते. त्याच महिन्यात मुंबई विद्यापिठाच्या विद्यमाने पोहण्याच्या स्पर्धा दादर येथे घेण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धेसाठी नारायण उपरकर, जोशी, सतीश धुरत, धुरी हे स्पर्धक ; १०० मी., २०० मी., २०० मी. फ्रीस्टाइल, बॅकस्ट्रोक व रिले-रेससाठी सहभागी झाले होते. संघव्यवस्थापक प्रा. ल. दा. गोलतकर होते. नोव्हेंबर महिन्यात मुंबई विद्यापिठाच्या रत्नागिरी-सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विभागीय क्रिकेट स्पर्धा मालवण येथे आयोजित केल्या होत्या. त्या स्पर्धेत महाविद्यालयीन क्रिकेट संघाने चांगली लढत दिली. संघाचे कप्तान म्हणून श्री. सदानंद देसाई व संघाचे व्यवस्थापक प्रा. भारत भोसले तसेच मार्गदर्शक म्हणून श्री. काद्री यांनी काम पाहिले.

महाविद्यालयाचा दशवार्षिक क्रीडामहोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. महोत्सवाचे उद्घाटन देवगड तहसीलचे, पोलीस निरीक्षक श्री. ए. ए. पराडकर यांनी केले. या स्पर्धेत मुला मुलींसाठी कबड्डी, खो-खो, व्हॉलीबॉल, टेबल-टेनिस, रिंग-टेनिस व कॅरम या सांघिक स्पर्धांचा समावेश होता. तसेच सुमारे तीस स्पर्धांचा समावेश अॅथलेटिक्स स्पर्धेमध्ये होता.

महाविद्यालयीन विद्यार्थी सर्वसाधारण विजेतेपद श्री. सुभाष कुळकर्णी याला मिळाले तर विद्यार्थिनी सर्वसाधारण विजेतेपद विद्या प्रभुदेसाई हीस मिळाले. कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थी सर्वसाधारण विजेतेपद श्री. नरेंद्र शिरवडकर याने व विद्यार्थिनी सर्वसाधारण विजेतेपद पद्मजा पारकर हिने पटकाविले. क्रीडामहोत्सव यशस्वी करण्यासाठी सर्वच प्राध्यापकांनी सहकार्य केले. महोत्सवाचे संचालन प्रा. ल. दा. गोलतकर व प्रा. बी. एम्. माळी यांनी केले. श्री. अरविंद परुळेकर याने क्रीडाविभाग विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून काम केले.

| प्रमुख | विद्यार्थी प्रतिनिधी |
|---|---|
| **प्रा. ल. दा. गोलतकर** | **अरविंद परुळेकर** |
| | **नथुराम उपरकर** |

卐

## राष्ट्रीय सेवा योजना—

श्री. स. ह. केळकर कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना हा एक महत्वाचा उपक्रम आहे चालू वर्षी राष्ट्रीय सेवा योजने मध्ये एकूण १५० विद्यार्थ्यांनी आपली नावे नोंदविलेली आहेत. या वर्षाच्या राष्ट्रीय सेवा योजना कार्याचा शुभारंभ दिनांक २२-८-८३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख प्रा. शशिकांत धुमाळ यांच्या हस्ते श्रीफळ फोडून करण्यात आला. त्यावेळी महाविद्यालयातील परिसरातील मैदानावरील खड्डे बुजविण्याचे व महाविद्यालया समोरील रस्त्याचे दुरुस्तीचे काम करण्यात आले. कोकण व सौराष्ट्र या प्रदेशातील पूरग्रस्त लोकांसाठी स्थापन केलेल्या कुलगुरु निधीसाठी या महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेतील विद्यार्थ्यांनी ९०० रु निधी उपलब्ध करुन दिला. दिनांक २० सप्टेंबर रोजी मुंबई विद्यापिठातील राष्ट्रीय सेवा योजना निर्मीत A class room without wall ही फिल्म विद्यार्थ्यांना दाखविण्यात आली.

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत साने गुरुजी कथामाला या उपक्रमामध्ये एकूण २४ विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे. यातील विद्यार्थी आप-आपल्या परिसरातील प्राथमिक शाळांमधून साने गुरुजींच्या कथा कथनाद्वारे जनजागृतीचे काम करीत आहेत.

'अल्पबचत' या उपक्रमामध्ये एकूण २२ विद्यार्थ्यांनी भाग घेतलेला आहे. हे विद्यार्थी आपल्या

परीने समाजामध्ये बचत वाढीकरीता उत्तेजक स्वरुपाचे वातावरण निर्माण करत आहेत. यामुळे निश्चीतच ग्रामीण भागातील बचतीमध्ये वाढ होणार आहे.

'एक निरक्षर साक्षर कर' या उपक्रमामध्ये ३१ विद्यार्थ्यांनी भाग घेतला आहे. सरकारच्या १६ व्या कलमातील प्रौढ साक्षरता मोहिमेसाठी यामुळे हातभार लागत आहे. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत देखील निरक्षर प्रौढांना साक्षर करण्याचे राष्ट्रीय कार्य विद्यार्थी करीत आहेत.

३-१२-८३ रोजी (C. S. W.) केंद्रीय समाज-कल्याण मंडळ व राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने एक दिवसाचे 'कुटुंब कल्याण प्रेरणा शिबीर' कन्याशाळा देवगड येथे भरविण्यात आलेले होते. त्यामध्ये ४५ महिलांनी भाग घेतला होता. अशाच प्रकारची शिबीरे तालुक्यातील इतर भागातही भरविण्याचा राष्ट्रीय सेवा योजनेचा संकल्प आहे.

एक दिवसांच्या शिबीरातून (Day Camps) देवगड येथील तालुका शाळा नं. १ व महाविद्यालयाच्या क्रिडांगणाची दुरुस्ती करण्यात आली.

दिनांक २३–१२–८३ ते १–१–८४ या कालावधीत देवगडपासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या तारामुंबरी येथे ग्रामीण पुनर्रचना शिबीर आयोजित करण्यात आलेले होते. या कालावधीत तारामुंबरी येथील स्मशानवठीकडे जाणारा ४५० फूट लांबीचा, १५ फूट रुंदीचा व १.५ फूट उंचीचा रस्ता बांधण्यात आला. येत्या पाच वर्षामध्ये ११०० फूट लांबीचा हा रस्ता पूर्णपणे तयार करण्यात येणार आहे. शून्यातून नवनिर्मिती करण्याचे आवाहन शिबीरार्थी-समोर होते. याशिवाय गावाची शैक्षणिक पाहणी करण्यात आली. गावातील १०० विहीरींमध्ये जंतूनाशक औषधे टाकण्यात आली. वीसकलमी कार्यक्रमाचा प्रचार व प्रसार रत्नागिरी येथील गोगटे-जोगळेकर महाविद्यालयातील 'जनसेवा कलापथक' या मनोरंजनाच्या माध्यमाद्वारे करण्यात आला. तारामुंबरी येथील प्राथमिक शाळेमध्ये ५ वी, ६ वी, ७ वी या वर्गातील विद्यार्थ्यांना शिकविण्याचे कार्य १८ शिबीरार्थींनी केलेले आहे. शिबीर कालावधीमध्ये श्रमदानाबरोबरच बौद्धिक स्वरुपाची चर्चा व व्याख्याने आयोजित केलेली होती. यामध्ये डॉ. भा. वा. आठवले, श्री. भोगाडे, फलोद्यान अधिकारी, पत्रकार श्री. यशवंत पोकळे, शि. स. देसाई बँक शाखाधिकारी, श्री. पी आर. धनवटकर, श्री. व्ही. वाय. करंदीकर, श्री. व्ही. व्ही. राणे, श्री. एस्. व्ही. पडवळ, श्री. भेंडेगिरी, पंचायत समिती डॉ. बी. व्ही. पै व श्री. मुरलीधर जोशी यांचा समावेश होता. शिबीराचे उद्घाटन आमदार दादासाहेब राणे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. शिबीर यशस्वी होण्यासाठी प्राचार्य आर्. ए. कुलकर्णी यांचे मार्गदर्शन व ग्रामस्थांचे बहुमोल सहकार्य लाभले होते.

श्री. अनिल गावडे, संजय कदम, प्रकाश मराठे व कु. अलका हर्डीकर व कु. सुनंदा भांडारी यांची या वर्षी एन्. एस्. एस्. विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून निवड झाली आहे. प्रा. शशिकांत धुमाळ हे राष्ट्रीय सेवायोजना प्रमुख असून त्यांना सहाय्यक म्हणून प्रा. सुरेश सोनटक्के काम पहात आहेत.

प्रमुख
**प्रा. शशिकांत धुमाळ**

卐

## ग्रंथालय—

ग्रंथालय म्हणजे ज्ञानभांडार ! या ज्ञानभांडारात सर्व तऱ्हेच्या ज्ञानाची भर पडावी म्हणून महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी वर्षाच्या सुरवातीसच स्वतः प्राचार्य श्री. आर. ए. कुलकर्णी, ग्रंथपाल श्री. एस्. एस्. पाटील, प्रा. ए. पी. मिरीकर व प्रा. एस्. आर. धुमाळ यांची समिती नियुक्त केली. वर्षभरात वेळोवेळी या समितीची सभा घेऊन ग्रंथालयाबाबत विचारविनीमय झाला.

ज्ञानार्जन करण्यासाठी व विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार करण्यासाठी सुसज्ज व उच्च प्रतीच्या ग्रंथांनी समृद्ध असे आमचे ग्रंथालय आहे. विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे मुबलक वाचनसाहित्य आम्ही उपलब्ध करुन देत आहोत. ग्रंथालयाचा सर्वांना पुरेपूर फायदा करुन

घेता यावा यासाठी ग्रंथालय सकाळी ८ ते १२ व दुपारी ३ ते ६ या वेळेत उघडे असते. ग्रंथालयात विविध भाषेतील विविध विषयावरील सुमारे सव्वा लाख रु. किमतीचे ७।। हजार ग्रंथ आहेत. चालू शैक्षणिक वर्षी सुमारे १४ हजार रु. किमतीची एकूण ८०० पुस्तके खरेदी केली आहेत. ग्रंथालयात दररोज १०० ग्रंथांची देवघेव होते. कला व वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासाबरोबर इतर विषयाचेही ज्ञान मिळावे म्हणून इतर विषयावरील ग्रंथ आम्ही ग्रंथालयात घेतलेले आहेत. तसेच ग्रंथालयामध्ये विविध विषयावरील ५० नियत कालिके, १२ वर्तमानपत्रे घेतली जातात. संदर्भ, संशोधन व मनोरंजन यासाठी उपयोग व्हावा म्हणून ग्रंथालयामध्ये आतापर्यंत घेतलेल्या सर्व नियतकालिकांचे सुमारे ३०० खंड बांधून घेतलेले आहेत.

बहुसंख्य विद्यार्थी ग्रामीण भागातून येतात. आर्थिक अडचणीमुळे त्यांना ग्रंथालयातील पुस्तकांवरच अवलंबून रहावे लागते. म्हणून गृहवाचनासाठी विद्यार्थ्यांना अभ्यासाची एकाच वेळी २ ते ४ पुस्तके आठवड्याच्या मुदतीने दिली जातात.

पुस्तकपेढीतर्फे गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना नाममात्र रक्कम भरुन वर्षभर वापरण्यासाठी पुस्तके दिली जातात. चालू वर्षी सुमारे ८ हजार रु. किमतीची ८०० पुस्तके २०० विद्यार्थ्यांना दिली आहेत.

**श्री. एस्. एस्. पाटील**
M. A. B. Lib. Sc.
ग्रंथपाल

卐

## निवडणूक--

महाविद्यालयातील निवडणुकीत जनरल सेक्रेटरी म्हणून दिनेश खाडिलकर व विद्यार्थिनी प्रतिनिधी म्हणून माधुरी ठाकूर यांची निवड झाली.
दि. २५ ऑगस्ट रोजी घेण्यात आलेल्या वर्ग प्रतिनिधींच्या निवडणुकीत खालील विद्यार्थ्यांची मतदानाद्वारे निवड झाली.

अकरावी कला-- लीलाधर कोयंडे
अकरावी वाणिज्य-- अनघा कुलकर्णी
बारावी कला-- उदय दांडेकर
बारावी वाणिज्य-- जयानंद फाटक
प्रथम वर्ष कला-- तुळशीदास डामरी
प्रथम वर्ष वाणिज्य-- सुनील पारकर
द्वितीय वर्ष कला-- नथुराम उपरकर
द्वितीय वर्ष वाणिज्य-- सतीश भिडे
तृतीय वर्ष कला-- अरविंद परुळेकर
तृतीय वर्ष वाणिज्य-- दिनेश खाडिलकर

विद्यापीठ प्रतिनिधी पदासाठी अरविंद परुळेकर याची बिनविरोध निवड झाली.

विद्यार्थी महामंडळाच्या विविध विभागांची जबाबदारी खालीलप्रमाणे सोपविण्यात आली.

१) जनरल सेक्रेटरी-- दिनेश खाडिलकर
२) विद्यार्थिनी प्रतिनिधी-- माधुरी ठाकूर
३) पाश्चात्य खेळ-- अरविंद परुळेकर
४) भारतीय खेळ-- नथुराम उपरकर
५) रसराज भित्तीपत्रक-- सतीश भिडे
६) सांस्कृतिक मंडळ-- सुनील पारकर
७) एलॅ. फोरम व गायडन्स-- तुळशीदास डामरी
८) वादविवाद मंडळ-- उदय दांडेकर
९) नियोजन व प्रसिद्धी-- जयानंद फाटक
१०) सहल विभाग-- लीलाधर कोयंडे
११) वाङ्मय मंडळ-- अनघा कुलकर्णी

तसेच खालील विद्यार्थ्यांची विद्यार्थी-कल्याण समिती निवडण्यात आली-- १) सुशील राणे २) श्रीकांत धुपकर ३) सदानंद देसाई ४) चित्रा गानू ५) माधुरी ठाकूर

सदर निवडणुकांचे काम प्रा. अनंत मिरीकर व प्रा. सुरेश सोनटक्के यांनी पाहिले.

प्रमुख
**प्रा. अनंत मिरीकर**

卐

## स्नेहसंमेलन–

महाविद्यालयाचे दहावे स्नेहसंमेलन सुप्रसिद्ध नाटककार श्री. शं. ना. नवरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. दि. १४ जानेवारी रोजी या संमेलनास प्रारंभ होताना प्रमुख पाहुण्यांच्या पत्नी सौ. अंजली नवरे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण समारंभ पार पडला आणि 'रसराज' स्नेहसंमेलन विशेषांकाचे प्रकाशन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते झाले. रात्री प्रा. अनंत मिरीकर यांनी दिग्दर्शित केलेले 'साष्टांग नमस्कार' हे नाटक सादर करण्यात आले.

दिनांक १९ जानेवारी रोजी महाविद्यालयात करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमात मनोरंजनात्मक खेळ, शेला-पागोटे, तसेच अल्पोपाहार इत्यादींचा समावेश होता. विद्यार्थी विरुद्ध प्राचार्यासह प्राध्यापक असा मित्रत्वाचा क्रिकेट सामनाही आयोजित करण्यात आला. रात्री 'तिसरी घंटा', 'गजा नाटक करतो', 'साडी उडाली आकाशी' अशा एकांकिका सादर करण्यात आल्या. तसेच प्रा. प्रकाश उपाध्ये यांनी बसविलेला विविध गुणदर्शनाचा कार्यक्रमही सादर करण्यात आला.

शिस्तबद्धतेनें व उत्साही वातावरणात पार पडलेल्या या स्नेहसंमेलनाच्या यशास संमेलन कार्याध्यक्ष प्रा. गोठोस्कर, व जनरल सेक्रेटरी दिनेश खाडिलकर, विद्यार्थिनी प्रतिनिधी माधुरी ठाकूर, सर्व वर्गप्रतिनिधी व स्वयंसेवकांचे परिश्रम कारणीभूत ठरले.

स्नेहसंमेलन कार्याध्यक्ष
**प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर**

विद्यार्थी प्रतिनिधी
**दिनेश खाडिलकर**
**माधुरी ठाकूर**

卐

## कमवा व शिका योजना–

महाविद्यालयात जून ८३ पासून ही नवी योजना अंमलात आणली असून सदर योजनेत प्रारंभी १० विद्यार्थी सहभागी होते भेंडी लावणे, क्रिकेट व खो-खो मैदान तयार करण्यासाठी मदत, बगिचा व सभोवतालचे गवत काढणे, ग्रंथालयीन व कार्यालयीन कामे या योजनेतील विद्यार्थी करीत आहेत. सदर योजना प्रा. शाम पाटील व प्रा. श्रीकृष्ण बोराटे हे हाताळत आहेत. या योजनेद्वारा गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शिक्षण पूर्ण करण्यासाठी अर्थसहाय्य मिळावे असा हेतू आहे.

卐

## प्राध्यापक-पालक योजना–

विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन संबंधातील अडीअडचणी समजून घेऊन त्या निवारण करण्याच्या दृष्टीने सदर योजना जून ८३ पासून राबवण्यात आली अकरावी, बारावी कला व वाणिज्य, तसेच बी. ए. / बी. कॉम भाग एक या वर्गासाठी अनुक्रमे प्रा. श्रीकृष्ण बोराटे, प्रा शाम पाटील, प्रकाश उपाध्ये, प्रा. कालिदास जोशी, प्रा सुरेश सोनटक्के, प्रा. भारत भोसले यांनी त्या-त्या वर्गाचे पालकत्व स्वीकारले. विद्यार्थ्यांत जबाबदारीची जाणीव निर्माण करून एक नवा आदर्श, व्यक्तिमत्व संपन्न विद्यार्थी घडवण्याच्या दृष्टीने सर्वच पालक प्राध्यापकांनी प्रयत्न केले. विद्यार्थ्यांकडून प्रश्नावली भरून घेऊन विद्यार्थ्यांच्या कौटुंबिक व महाविद्यालयीन अडचणी समजून घेऊन त्या सोडविल्या. हा उपक्रम आमच्या प्राध्यापकांनी यशस्वीरित्या राबविला आहे.

卐

## सहकार विभाग–

देवगड तालुक्याचे रजिस्ट्रार (नोंदणी अधिकारी) यांनी 'महाविद्यालय सेवक सहकारी पतपेढी मंडळ' या संस्थेस सिंधुदुर्ग जिल्हा म. स. बँकेत खाते उघडण्यास परवानगी दिली

प्रमुख
**प्रा. दत्तात्रय बलवान**

## सहल–

प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही महाविद्यालयाची सहल काढण्यात आली. विद्यार्थ्यांची संख्या पाहता गणपती-पुळे, पावस, रत्नागिरी ही ठिकाणे निवडली गेली. काही प्राध्यापकांनीही सहलीत सहभाग दिला.

## सांस्कृतिक मंडळ–

विद्यार्थ्यांमधील सुप्तगुणांना उत्तेजन देण्याचा प्रयत्न प्राचार्यांच्या उपयुक्त मार्गदर्शनाखाली सदर विभागातर्फे सतत करण्यात येतो.

यावर्षी १५ ऑगस्ट रोजी विद्यार्थ्यांनी बसव-लेल्या विविध गीतांचा बहारदार कार्यक्रम सादर करण्यात आला. ३१ ऑगस्ट रोजी गोकुळाष्टमी निमित्त प्रा. गोठोस्कर यांचे 'श्रीकृष्ण चरित्र' या विषयावर भाषण झाले.

दि. ५ आक्टोबर रोजी एक अनोखा कार्यक्रम प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आला. बुद्धिची कसोटी घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी विचारलेल्या विविध प्रकारच्या प्रश्नांना प्राचार्य व प्राध्यापकांनी हजरजबाबीपणे उत्तरे दिली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांना फार आवडल्याचे आढळले.

१७ डिसेंबर रोजी वादविवाद स्पर्धेचा सुरेख कार्यक्रम झाला. स्पर्धकांनी हिरीरीने मते मांडली. परिक्षक म्हणून डॉ. बोरफळकरांनी काम पाहिले. स्नेहसंमेलनाच्या 'साष्टांग नमस्कार' या नाटकाचा नारळ त्यांच्या हस्ते फोडण्यात आला. दि. ७ जाने. रोजी विद्यार्थ्यांसाठी निबंधस्पर्धा आयोजित केली होती.

सांस्कृतिक विभागातर्फे स्नेहसंमेलनात ३ अंकी नाटक ३ एकांकिका तसेच विविध गुणदर्शन हे कार्यक्रम बसवले गेले.

| प्रमुख | विद्यार्थी प्रतिनिधी |
|---|---|
| **प्रा. अनंत मिरीकर** | **सुनील पारकर** |

卐

## वाङ्मय मंडळ–

उद्‌घाटन– दि. ४ सप्टें. ८३ रोजी सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. श्रीपाद काळे यांच्या हस्ते व त्यांचा कथावाचनाचा कार्यक्रम.

कथाकथन स्पर्धा– २७ जानेवारी रोजी १० विद्यार्थ्यांना उत्कृष्ट सहभाग.

निबंध स्पर्धा– दिल्ली येथील लिओ क्लबतर्फे झालेल्या, 'आसाम एक ज्वलंत प्रश्न' या विषयावरील निबंधात माधुरी धुपकर (तृतीय वर्ष कला) हिला १५१ रु चे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक.

स्वा. सावरकर जन्मशताब्दीनिमित्त हिंदु विद्यार्थी सभेने आयोजित केलेल्या निबंध स्पर्धेसाठी 'विज्ञाननिष्ठ सावरकर' व 'वीर सावरकरांची समता' या विषयावरील निबंधांचा सहभाग.

कविता स्पर्धा– 'वृंदावन' या संस्थेने घेतलेल्या मुंबई-पुणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांच्या कविता स्पर्धेसाठी काही विद्यार्थ्यांच्या कवितांचा सहभाग.

| प्रमुख | विद्यार्थी प्रतिनिधी |
|---|---|
| **प्रा. लता वळसंगकर** | **अनघा कुलकर्णी** |

卐

## 'रसराज' भित्तीपत्रक–

आमचा प्रत्येक विद्यार्थी त्याच्या कलागुणांसह उमटतो तो इथेच. यंदाही 'रसराज' चे सर्वच अंक आपल्या साहित्याने सुशोभित करण्याचा प्रयत्न सर्वच विद्यार्थ्यांनी केला. कथा, कविता, लेख सामाजिक प्रश्नांचा उहापोह करणारे साहित्य विद्यार्थ्यांकडून मिळाले. चित्रलेखा पाटणकर हिच्या कविता विशेष उल्लेखनीय ठराव्या. प्रतिवर्षाप्रमाणे उत्कृष्ट कथा, कविता, लेख, मुखपृष्ठ व संपादनाची बक्षीसे काढली.

## प्रसिद्धी–

महाविद्यालयात वेळोवेळी होणाऱ्या उपक्रमांना, कार्यक्रम– समारंभाना योग्य ती प्रसिद्धी, 'देवदुर्ग'

'अणुरेणू', 'सागर', 'र. टाईम्स', 'तरुण भारत' (बेळगाव) अशा वृत्तपत्रातून देण्यात आली. या सर्व वृत्तपत्रांच्या संपादकांनी या बातम्या आपलेपणाने छापल्या. प्रसंगी छायाचित्रेही प्रसिद्ध केली. वरील सर्व वृत्तपत्र संपादकांचे आभार.

## इतर–

अशा विविध विभागांच्या द्वारे आमचे महाविद्यालय प्रगतीचे उपक्रम हाताळत आहे. विद्यार्थ्यांच्या कलागुणांच्या यशाबरोबरच विद्यार्थ्यांचे शैक्षणिक यशही उल्लेखनीय आहे.

बारावी कला– ५८ टक्के
बारावी वाणिज्य– ४९.१ टक्के
प्रथम वर्ष कला– १०० टक्के
प्रथम वर्ष वाणिज्य– ८८.६८ टक्के
द्वितीय वर्ष कला– ९० टक्के
द्वितीय वर्ष वाणिज्य– ७०.८३ टक्के
तृतीय वर्ष कला– १०० टक्के
तृतीय वर्ष वाणिज्य– २२ टक्के

अशा शैक्षणिक यशाशिवाय विद्यार्थी बाहेरच्या स्पर्धेतही यश संपादन करत आहेत. अरविंद परुळेकर या विद्यार्थ्याची मुंबई विद्यापीठाच्या स्टुडंट्स कौंसिलच्या कार्यकारिणीवर रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांचा प्रतिनिधी म्हणून निवड झाली.

विद्यार्थ्यांना विशेष मार्गदर्शन मिळावे म्हणून प्राचार्यांनी गायडन्स युनिटद्वारे; प्रथम, द्वितीय, व तृतीय वर्ष वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी खालील प्राध्यापकांची व्याख्याने आयोजित केली. आमच्या विद्यार्थ्यांना त्याचा खूप फायदा झाला.

प्रा. जी. व्ही. कुंभोजकर– न्यू कॉलेज, कोल्हापूर
प्रा. दळवी– Evening Law College व प्रसिद्ध कायदेतज्ञ
प्रा. एस्. एस्. कुलकर्णी– कोल्हापूरचे प्रसिद्ध चार्टर्ड अकौंटंट

१९८३–८४ च्या शैक्षणिक वर्षात, काही अपरिहार्य कारणास्तव महाविद्यालय सोडून गेलेल्या प्राध्यापकांची व सहकाऱ्यांची उणीव आम्हास जाणवली.

प्रा. अरुण गो. पणदुरकर
प्रा. अविनाश वि. कांबळे
प्रा. प्रकाश शं. रानडे

तसेच या शैक्षणिक वर्षात महाविद्यालयात आगमन झालेल्या प्राध्यापकांचे व सहकाऱ्यांचे आम्ही स्वागत करीत आहोत.

प्रा. सईसराव भा. बोळवे
प्रा. अरुण श्री. गोगटे
प्रा. बी. एम्. माळी

महाविद्यालयाचे बरे-वाईट प्रतिबींब उमटवणारा हा अहवाल आम्ही आपल्या 'वाटचाल' द्वारे सादर केला आहे.

पारितोषिके :

१) कै. काशिबाई शंकर तावडे :

अ) एफ्. वाय्. बी. कॉम मुलीमध्ये प्रथम– रु. ७०/–
राणे नीला रमाकांत

ब) एफ्. वाय्. बी. ए. मुलीमध्ये प्रथम– रु. ७०/–
पराडकर मेघा काशिनाथ

## ॥ कीर्तिपताका १९८३-८४ ॥

२) कै. सौ. यशोदा रघुनाथ भिडे :

अ) बारावी कॉमर्स प्रथम– रु. २५/–
पेठे विजया वासुदेव

ब) एफ्. वाय्. बी. कॉम. प्रथम– रु. २५/–
राणे नीला रमाकांत

क) एस्. वाय्. बी कॉम. प्रथम– रु. २५/–
सावंत अविनाश बाळकृष्ण

ड) टी. वाय्. बी. कॉम. प्रथम– रु. २५/–
भाबल चंद्रकांत तुकाराम

३) सौ. सुधा रघुनाथ व रघुनाथ सदाशिव भिडे :

अ) बारावी कॉमर्स द्वितीय क्रमांक– रु. २०/–
दातार डी. डी.

ब) एफ्. वाय्. बी. कॉम. द्वितीय क्रमांक– रु. २०/–
नेने शुभांगी माधव

क) एस्. वाय्. बी. कॉम. द्वितीय क्रमांक– रु. २०/–
करंदीकर सुभाष कृष्णाजी

ड) टी. वाय्. बी. कॉम. द्वितीय क्रमांक रु. २०/–
गोखले आशा मोरेश्वर

४) कै. हरी वामन लिमये :

अ) बारावी कॉमर्स प्रथम– रु. ४०/–
पेठे विजया वासुदेव

ब) टी. वाय्. बी. कॉम. प्रथम– रु. ४०/–
भाबल चंद्रकांत तुकाराम

५) कै. लक्ष्मण वामन लिमये :

अ) बारावी आर्टस् प्रथम– रु. ३५/–
जोशी साधना यशवंत

ब) टी. वाय्. बी. ए. प्रथम– रु. ३५/–
साटम प्रदीप महादेव

६) कै. मंगेश गणेश पिंगे (वरेरी)
सर्वोत्कृष्ट विद्यार्थी रु. ७५/–

विभागून–

हर्डीकर अलका मा.
गावकर सुरेखा का.

७) कै. सुधीर श्रीपाद झांटये :

टी. वाय्. बी. कॉम. प्रथम रु.– ७५/–
भाबल चंद्रकांत तुकाराम

८) डॉ. शांताराम सिताराम शिरसाट :

अ) बारावी कॉमर्स प्रथम– रु. ४५/–
पेठे विजया वासुदेव

ब) एफ्. वाय्. बी. कॉम. प्रथम– रु. ४५/–
राणे नीला रमाकांत

९) कै. वामन सिताराम शिरसाट :

अ) बारावी आर्टस् प्रथम– रु. ४५/–
जोशी साधना यशवंत

ब) एफ्. वाय्. बी. ए. प्रथम– रु. ४५/–
आचरेकर अंकुश गोविंद

१०) डॉ. भा. बा. आठवले :
एस्. वाय्. बी. ए. प्रथम– रु. २०/–
गावकर सुरेखा का.

११) श्री. बाळकृष्ण पर्शराम उर्फ मामा जोशी :
अ) बारावी आर्टस् प्रथम– रु. ४०/–
जोशी साधना यशवंत
ब) बारावी कॉमर्स प्रथम– रु. ४०/–
पेठे विजया वासुदेव
क) एफ्. वाय्. बी. ए. प्रथम– रु. ४०/–
आचरेकर अंकुश गोविंद
ड) एस्. वाय्. बी. ए. प्रथम– रु. ४०/–
गावकर सुरेखा का.
इ) टी. वाय्. बी. ए. प्रथम– रु. ५०/–
साटम प्रदीप महादेव
फ) एफ्. वाय्. बी. कॉम. प्रथम– रु. ४०/–
राणे नीला रमाकांत
ग) एस्. वाय्. बी. कॉम. प्रथम– रु. ४०/–
सावंत अविनाश बाळकृष्ण
ह) टी. वाय्. बी. कॉम. प्रथम– रु. ५०/–
भाबल चंद्रकांत तुकाराम

११ब) श्री. बाळकृष्ण पर्शराम उर्फ मामा जोशी :
अ) बारावी आर्टस् द्वितीय क्रमांक रु. २०/–
ढोके आर. एम्.
ब) बारावी कॉमर्स द्वितीय क्रमांक रु. २०/–
दातार दत्तात्रय दिनकर
क) एफ्. वाय्. बी. ए. द्वितीय क्रमांक रु. २०/–
देसाई सदानंद शिवराम
ड) एस्. वाय्. बी. ए. द्वितीय क्रमांक रु. २०/–
धुपकर माधुरी नारायण
इ) टी. वाय्. बी. ए. द्वितीय क्रमांक रु. २०/–
तेली तुकाराम सहदेव
फ) एफ्. वाय्. बी. कॉम. द्वितीय क्र. रु. २०/
नेने शुभांगी माधव
ग) एस्. वाय्. बी. कॉम. द्वितीय क्र. रु. २०/–
करंदीकर सुभाष कृष्णाजी
ह) टी. वाय्. बी. कॉम. द्वितीय क्र. रु. २०/–
गोखले आशा मोरेश्वर

१२) कै. जानकीबाई रामचंद्र बोडस :
टी. वाय्. बी. ए. प्रथम क्रमांक– रु. ११०/–
साटम प्रदीप महादेव

ब) कै. रामचंद्र गणेश बोडस :
टी. वाय्. बी. कॉम, प्रथम– रु. ११०/–
भाबल चंद्रकांत तुकाराम

१३) कै. सौ. लक्ष्मीबाई मुरलीधर सोनटक्के :
टी. वाय्. बी. ए. अर्थशास्त्रात सर्वप्रथम–
रु. २५/–
बापट राजेंद्र गजानन

१४) श्री. विठ्ठलराव कांबळे :
बारावी कला व वाणिज्य शाखेतून मराठीत
सर्वप्रथम– रु. २५/–
सावंत अजित बाळकृष्ण

१५) कै. सौ. उषा भास्कर बोडस :
बारावी कॉमर्स प्रथम– रु. ११०/–
पेठे विजया वासुदेव

१६) ज्ञानेश्वर पारितोषिक (प्रा. धुमाळ यांचे प्राचार्य गोपाळराव मयेकर यांच्या नावे)
टी. वाय्. बी. ए. मराठीत प्रथम– रु. १००/–
साटम प्रदीप महादेव

१७) कै. भास्कर मोतीराम कोरगांवकर वकील
बारावी इंग्रजीत सर्वप्रथम– रु. ३०/–
विभागून– पेठे विजया वासुदेव
बर्वे आशालता गोविंद

卐

### शिष्यवृत्या :

१) कै. दत्तात्राम भास्कर पाटणकर :
अ) बाराबी कॉमर्स प्रथम क्रमांक रु. १५०/–
पेठे विजया वासुदेव

ब) एफ्. वाय्. बी. कॉम. प्रथम क्रमांक रु. १५०/–
राणे नीला रमाकांत

क) एस्. वाय्. बी. कॉम. प्रथम क्रमांक रु. १५०/–
सावंत अविनाश बाळकृष्ण

२) श्रीमती लक्ष्मीबाई दत्तात्रय पाटणकर :
अ) बारावी आर्टस् मुलींमध्ये प्रथम क्र. १५०/–
जोशी साधना यशवंत

ब) एफ्. वाय्. बी. ए. मुलींमध्ये प्र. क्र रु. १५०/
पराडकर मेघा काशिनाथ

क) एस्. वाय्. बी. ए. मुलीस प्र. क्र. रु. १५०/-
गावकर सुरेखा काशिनाथ

३) कै. नारायण दत्तात्रय पाटणकर :
अ) बारावी मुलींमध्ये द्वितीय क्र. रु. १५०/–
सप्रे शुभांगी भालचंद्र

ब) एफ्. वाय्. बी. ए. प्रथम क. रु. १५०/–
आचरेकर अंकुश गोविंद

क) एस्. वाय् बी. ए. मुलीमध्ये द्वितीय क्रमांक
रु. १५०/–
धुपकर माधुरी नारायण

### शिष्यवृत्या (कनिष्ठ विभाग) :

देवगड केंद्रात सर्वप्रथम व १० वी ला
७० टक्यांपेक्षा अधिक गुण

१) जोशी कामिनी मधुकर रु. ३४२/–

१० वी ला ७० टक्यांपेक्षा अधिक गुण
असणारे विद्यार्थी

२) कुलकर्णी अनघा राजाराम रु. १५०/–
३) सारंग अनिल बापू रु. १५०/–
४) चिदरकर विनोद महादेव रु. १५०/–
५) पारकर श्रीपाद सदानंद रु. १५०/–

समिंदरापोटी, मासोळीची माया,
भणाणतो वारा, कोळी गीत गाया,
मचव्याच्या पायी, लाटांचे पैंजण !

काठावरी माड, माडावरी फळे,
वर पाहतांना, दृष्टी खाली वळे,
वाळूशी बोलती, सोनेरी किरण !

असे हे कोकण, असे हे कोकण
इथे अमृताचे, भरले रांजण !

–जगदीश खेबूडकर

# आमचा प्राध्यापक वर्ग

१) प्राचार्य आर. ए. कुलकर्णी, एम्. ए. (इंग्रजी) (मराठी)
२) प्रा. पुरुषोत्तम गोठोस्कर, एम्. ए. (इंग्रजी)
३) ,, ल. दा. गोलतकर, एम्. ए. बी. एड् (इतिहास)
४) ,, मधुकर म. गावडे, एम्. ए. बी. एड्. (भूगोल)
५) ,, हेरंब ल. पटवर्धन, एम्. कॉम्. सी. ए. (अकौंटन्सी)
६) ,, टी. सेल्व्हराज, एम्. ए. बी. एड्. (अर्थशास्त्र)
७) ,, शशिकांत रा. धुमाळ, एम्. कॉम्. (कॉमर्स)
८) ,, सुरेश म. सोनटक्के, एम्. ए. (अर्थशास्त्र)
९) ,, अनंत पु. मिरीकर, एम्. ए. एल्. एल्. बी. (इतिहास)
१०) ,, दत्तात्रय बा. बलवान, एम्. कॉम्. (कॉमर्स)
११) ,, भारत ना. भोसले, एम्. एस्सी. (संख्याशास्त्र/गणित)
१२) ,, लता भि. वळसंगकर, एम्. ए. बी. एड्. (मराठी)
१३) ,, एस्. बी. घोळवे, एम्. ए. (अर्थशास्त्र)
१४) ,, अरुण श्री. गोगटे, बी. ए. एल्. एल्. बी. (कायदा)
१५) ,, सुलभा म. कुलकर्णी, एम्. ए. (मराठी)
१६) ,, प्रकाश म. उपाध्ये, एम्. ए. (इंग्रजी)
१७) ,, कालिदास ग. जोशी, एम्. ए. (अर्थशास्त्र)
१८) ,, श्रीकृष्ण शं. बोराटे, एम्. ए. बी. एड् (भूगोल)
१९) ,, शाम सा. पाटील, एम्. कॉम्. (कॉमर्स/अकौंटन्सी)
२०) ,, बजरंग म. माळी, बी. ए. बी. पी. एड्.

# ग्रंथालय

१) श्री. एस्. एस्. पाटील, एम्. ए., बी. लिब्. एस्सी. (ग्रंथपाल)
२) ,, यशवंत तुकाराम देऊलकर, मुख्य शिपाई

# कार्यालय

१) श्री. गणेश बालचंद्र गोडबोले, मुख्य लिपिक
२) ,, महेश्वर बा. लेले, वरिष्ठ लिपिक
३) ,, श्रीनीवास आ. पळसुले, बी. कॉम् कनिष्ठ लिपिक
४) ,, चंद्रकांत यशवंत महाडीक, शिपाई
५) ,, वसंत वासुदेव धोपटे, ,,
६) ,, नामदेव दामाजी केतकर, ,,
७) ,, अनंत कृष्णा बाणे, रखवालदार

# मे. अमृत विष्णू नलावडे

उंची चहा व काथ्या बंडलचे व्यापारी.

## स्टेशन रोड, कोल्हापूर - ४१६००१

ऑफिस फोन – २३०५२, २४७८५. निवास : २३७८५

तार : 'NALAWDECO' पो. बॉ. – १३८

: संबंधित फर्मस् :

**मे. नलावडे आणि कंपनी**
जनरल मर्चंट, कमिशन एजंट
स्टेशन रोड, कोल्हापूर.

**मे. नलावडे ट्रेडलाइन्स**
डिस्ट्रीब्युटर्स अॅंड कमिशन एजंट
१०५ शिवाजी पार्क, कोल्हापूर.

12/13

COLLEGE OF ARTS & COMMERCE
LIBRARY